INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
UNIVERSITY OF MUMBAI
Re-accredited with 'A' Grade By NAAC

एम.ए. (शिक्षणशास्त्र) - भाग २
अभ्यासपत्रिका - क्र. ४

# शिक्षणाचा इतिहास

**डॉ. संजय देशमुख**
**कुलगुरू**
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अंबुजा साळगांवकर**
**प्रभारी संचालक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
**प्रभारी अभ्यास साहित्य**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **डॉ. हेमलता चारी, उपसंचालक (शैक्षणिक)**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक आणि संपादक** : **डॉ. सुनिता मगरे, सहयोगी प्राध्यापक**
शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक:**

**डॉ. शारदा. व्ही. शेवलेकर, प्राचार्या,**
डी.बी.एस.अध्यापक महाविद्यालय,
धुळे.

**डॉ. माधवराव बी सोनकांबळे, सहयोगी प्राध्यापक,**
एस. एन्. डी.टी. अध्यापक महाविद्यालय,
पी. जी. विभाग, कर्वे रोड, पुणे -३८.

**डॉ. संजीवनी मुळे, प्राचार्या,**
गव्हर्नमेंट अध्यापक महाविद्यालय,
अंबाजोगाई - ४३१५१७.

**डॉ. शरद एस. धर्माधीकारी**
सेवासदन अध्यापक महाविद्यालय,
उल्हासनगर - ४२१ ००३.

**डॉ. ज्ञानेश्वर भामरे**
सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
उल्हासनगर- ३(जि. ठाणे).

**प्रा. सुनिता लोंढे, अधिव्याख्याता.**
एच.बी.बी.एड. अध्यापक महाविद्यालय,
वाशी नवी मुंबई. एम.ए.एम.एड.,
भ्रमणध्वनी ९८६९१५८६०८.

**सौ. रेखा जगदाळे, सहाय्यक प्राध्यापक,**
एच.बी.बी.एड. अध्यापक महाविद्यालय,
वाशी नवी मुंबई. एम.ए.एम.एड.

**एम.ए. (शिक्षणशास्त्र) - भाग २ -अभ्यासपत्रिका - क्र. ४ - शिक्षणाचा इतिहास**

**नोव्हेंबर २०१५**

प्रकाशक : **प्रभारी संचालक**
**दूर व मुक्त अध्ययन संस्था,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.**

अक्षरजुळणी : **श्री ग्राफिक सेंटर**
२८, मंगल वाडी,
मुंबई - ४०० ००४

मुद्रण :

# अनुक्रमणिका


| प्रकरण नं. | घटकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण १** | | |
| | वैदिक आणि उत्तर वैदिक काळातील शिक्षण | १ |
| **प्रकरण २** | | |
| | उत्तर वैदिककालीन शिक्षण | १५ |
| **प्रकरण ३** | | |
| | बौध्द शिक्षण पध्दती | २५ |
| **प्रकरण ४** | | |
| | मुस्लिम शिक्षण | |
| अ | मुस्लिम शिक्षणाचा परिचय | ३५ |
| ब | मुस्लिम शिक्षणपद्धती<br>(Islamic Education) | ४५ |
| **प्रकरण ५** | | |
| | स्वातंत्र्य पूर्व कालीन भारतीय शिक्षण<br>(Module III Education During pre Independet India) | ६७ |
| **प्रकरण ६** | | |
| | भारतीय शिक्षण आणि शैक्षणिक प्रगती | ८४ |
| **प्रकरण ७** | | |
| | भारतीय शिक्षणातील महत्त्वपूर्ण विकास (१९२१-१९३७)<br>(Important Development in Education during 1921-1937) | ९७ |
| **प्रकरण ८** | | |
| अ | माध्यमिक शिक्षण आयोग<br>मुदलियार आयोग (१९५२-५३)<br>(Secondary Education Commission 1952-53) | १०५ |
| ब | शिक्षण आयोग<br>कोठारी आयोग (१९६४-६६)<br>(Education Commission- 1964-66) | १११ |
| **प्रकरण ९** | | |
| अ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण<br>(National Education Policy- 1986) | ११७ |
| ब | राममूर्ती समिती<br>(Ramamurti Committee- 1990) | १२१ |

**प्रकरण १०**

भारतीय शिक्षणाच्या काही समस्या

| | | |
|---|---|---|
| अ | गळती आणि स्थगनाची समस्या (Problem of Wastage and Stagnation) | १२५ |
| ब | परीक्षा सुधार (Clearing House) | १३० |
| क | अल्पसंख्याकाचे शिक्षण (Education for Marginalized Group) | १३६ |
| ड | समावेशित शिक्षण (Inclusive Education) | १४० |

**प्रकरण ११**

शिक्षणातील प्रवाह आणि वाद

| | | |
|---|---|---|
| अ. | राष्ट्रीय ज्ञान आयोग (National Knowledge Commission) | १४५ |
| ब. | उच्च शिक्षणावर जागतिकीकरणाचा प्रभाव (Impact of Globalistion on Higher Education) | १५३ |
| क. | समृद्ध विकासाची ध्येये (युनोस्को) | १५९ |
| ड. | खाजगीकरण आणि उच्च शिक्षण (Privatization and Higher Education) | १६१ |


★★★

## GROUP A PAPER 4 HISTORY OF EDUCATION

### Course Objectives

To develop an understanding of

- Progress of education in ancient India- Vedic, Post Vedic and Buddhist Education.
- Progress of education in medieval India- Islamic education.
- Education during pre and post independent India.
- The various committees and commission formed for the progress of education during pre and post independent India.
- The various issues and trends in education in India.

### MODULE I: PROGRESS OF EDUCATION IN ANCIENT INDIAN EDUCATION- REVIEW)

### 1. Vedic and Post Vedic Education

a. Fundamentals of ancient Indian education

b. Purpose of studying Vedas- Rig-Veda, Yajurvcda, Atharvaveda, Samveda

c. Educational system -main characteristics

d. Female education

e Swadhaya or self learning

f. Teacher - importance and duties

g. Duties of a student

h. Forms of educational Institutions:- Gurukulas, Parishads and Sammel

### Buddhist Education System

a. Characteristics of Buddhist Education

h. Pupil:-Meals, residence and curriculum

c. Methods of teaching

d. Female Education

c. Comparison of Buddhist and Brahmanical Education

**MODULE If: PROGRESS OF EDUCATION DURING MEDIEVAL TIMES**

**3. Islamic Education**

a. Introduction to Islamic Education

b. State patronage and Growth of education during this t

c. Primary Education (Maktabs)

d. Higher Education (Madarsas)

c. Female Education

f. Student and Teacher relationship

**MODULE III: EDUCATION DURING PRE INDEPENDENT INDIA**

**4. Anglicization of Education 1836-1855**

a. Exponents of Oriental Education

b. The Anglicists

c. Macaulay Minutes and Its effect

d. Female Education

e. Woods' Despatch-1854 :- Recommendations

**5. Indian Education and Educational Progress**

a. Indian Education Commission- Recommendations regarding Primary, Secondary and University Education

b. The University Commission (1902)

c. The Hartog Committee (1928-29)

d. The Filtration Theory of Education

**Important Development in Education During 1921-1937**

a. Inter University Board

b. Establishment of new Universities

c. Teachers Training

d. Technical Education

## MODULE IV: EDUCATION DURING POST INDEPENDENT INDIA

### 7. Various commission and policies on Education

a. Secondary Education Commission 1953

b. Education Commission 1964-66

c. National Policy on Education 1986

d. Rammurthy Review Committee 1990

c. National Commission on Teachers 1999

d. National Focus Committee 2004

### 8. Some Problems of Indian Education

a. Problems of wastage and stagnation

b. Examination Reform

c. Inclusive Education

d. Education for Marginalized Group

### 9. Trends and Issues in Education

a. National Knowledge Commission

b. Impact of Globalizalion on Higher Education

c. Millennium Development Goal given by UNESCO Highlighting Education

d. Privatization of Higher Education.

♦ ♦ ♦

## ASSIGNMENTS FOR INTERNAL ASSESSMENT

1. Critical and comparative analysis of any two commissions on education in post
2. Analyze any two problems in education having a historical hearing and suggest measures to overcome them.

## REFERENCES:


1. Dash M. (2000), Education in India: Problems and Perspectives, Easten Book Corporation.
2. Ghosh S.C. (2007), History of Education in India, Eastern Book Corporation.
3. Jain M. (2003), History in the New NCERT Textbooks I-'allacics in the IIIC Report, Delhi NCERT.
4. Lall M. (2005), The Challenges for India's Education System, Chatham House: London.
5. Mookerji R. K.(1990), Ancient Indian Education; Brahmanical and Buddhist Delhi, IViotilal Banarsidass Publishers.
6. Ramehandra P, and Ramkutnnr V. (2005), lyducation in India. Eastern Book Corporation.
7. Rawat. P. L.(1956), Historv of Indian Education Ancient to Modern Delhi. Bharat Publicutions.
8. Reyhner .j. (2004), Historv of Indian Education. Vohra Publishers.
9. Sharma R (2006), History of Indian Education. Shubhi Publishers.
10. Vashist R. (2005), History of Education in India, Eastern Book Corporation.


♦ ♦ ♦

## प्रकरण १
# वैदिक आणि उत्तर वैदिक काळातील शिक्षण

**घटक संरचना**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ प्राचीन भारतीय शिक्षणाची मूलतत्त्वे

१.३ प्राचीन भारतीय शिक्षणाची प्रमुख लक्षणे

१.४ वेदाभ्यासामागील हेतू

१.५ वैदिक काळातील शिक्षणपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये

१.६ सारांश

१.७ स्वाध्याय


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या वाचनानंतर आपणास खालील गोष्टी करता येतील.

- प्राचीन भारतीय शिक्षणाच्या मूलतत्वाची चर्चा करू शकाल.
- प्राचीन शिक्षण पद्धतीशी निगडीत संबोधाच्या अर्थाचे आकलन होईल. प्राचीन भारतीय शिक्षणाच्या प्रमुख लक्षणाचे आकलन होईल
- वेदाभ्यासामागील हेतू समजू शकेल.
- वैदिक काळातील शिक्षण पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये विशद करू शकाल.

## १.१ प्रस्तावना

प्राचीन जागतिक वाङ:मयात वेदांना अनन्य साधारण महत्व आहे. भारतीय जनमानसावर वेदांचा फार मोठा प्रभाव सुरवातीपासूनच आहे. भारतीय संस्कृतीच्या उदगम-विकासाची, आचारविचारांच्या निरनिराळ्या पदरांची, विविध भारतीय धार्मिक, सामाजिक, राजकीय वा अन्य संस्थांच्या जडण-घडणाची माहिती वेद वाङ:मयातूनच मिळते. प्राचीन कालीन भारतीय शिक्षणाचा परिचय करून घ्यावयाचा असल्यास आपणास वेदांचाच आधार घ्यावा लागतो. प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती ही वैदिक शिक्षण पद्धती म्हणून ओळखली जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास प्राचीन शिक्षण पद्धती ही वेदांवर आधरित असल्याने तिला वैदिक शिक्षण पद्धती म्हणूनही संबोधले जाते. वैदिक कालखंडाचे विभाजन प्रामुख्याने दोन कालखंडामध्ये केल्याचे आढळते.

**वैदिक काळ**

| पूर्व वैदिक काळ | उत्तर वैदिक काळ |
|---|---|
| ऋग्वेद काळ | ब्राह्मणकाळ |

जगात इतरत्र कोणत्याही देशात आपल्याला पहावयास मिळणार नाही अशी अद्वितीय गुणवैशिष्ट्ये आपणांस प्राचीन वैदिक शिक्षण पद्धतीत पहावयास मिळतात.

## १.२ प्राचीन भारतीय शिक्षणाची मूलतत्त्वे

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती ही जगातील सर्व शिक्षण पद्धतीसाठीचे प्रेरणस्थान ठरते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट मानुन शिक्षण म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे वाटचाल करणे व त्या दृष्टीनेच शिक्षण देण्याची परंपरा प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीत पहायला मिळते. वैदिक शिक्षण हे जरी धार्मिक शिक्षणाच्या स्वरूपात असले तरी ऐहिक जीवनाकडे दुर्लक्ष करण्यात आले नाही त्यामुळे या काळात विद्यार्थ्यांना भौतिक आणि अध्यात्मिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जात असे. प्राचीन शिक्षण पद्धतीत नीतीमत्ता, चारित्र्याची जडणघडण, सुसपंन्न व्यक्तिमत्व निर्मिती, शिस्त, सामाजिक जीवनाकरिता आवश्यक असणारे गुण आणि त्याच बरोबर ऐहिक समृद्धी यावर अधिक भर देण्यात आला. याच दृष्टीने प्राचीन भारतीय शिक्षणाची महत्वाची अशीमूलतत्त्वे नमूद करता येतात.

### १) व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास:

कोणत्याही शिक्षण पद्धतीत बालकाच्या व्यक्तिमत्व विकासावर भर दिलेला दिसून येतो. व्यक्तिमत्व विकसनास आवश्यक असणारे सर्व अनुभव प्राचीन शिक्षणाद्वारे दिले जात असत. जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्याचे व त्या अनुषंगाने मानसिक तयारीचे धडे या काळात विद्यार्थ्यांना दिले जात असत. येथे केवळ पुस्तकी शिक्षणास मान्यता दिलेली नव्हती तर विद्यार्थ्याच्या संपूर्ण जीवनाचा विकास साधण्यासाठी जरूरी असे जिवनशिक्षण, व्यावहारिक शिक्षण आणि अध्यात्मिकता या सर्व गोष्टींना स्थान दिलेले होते. सर्वांगीण विकास घडण्याहेतू आवश्यक असणाऱ्या सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांवर विशेष भर दिला जात असे.

### २) औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाच्या जबाबदाऱ्यांचा योग्य मेळ घालणे:

प्राचीन शिक्षण पद्धतीनुसार शिक्षणास प्रारंभ उपनयन विधीद्वारे होऊन त्याची समाप्ती समावर्तनाने होत असे. शिक्षणाच्या कालावधीत, शिस्तबद्धरित्या पार पाडला जाई. प्रत्येक मूल हे शिष्यत्त्व पत्करेल असे होत नसे कारण ते वडिलोंच्या हाती निर्णय स्वातंत्र्या राहिल्याने जर पित्याने आपल्या पाल्यास गुरूगृही पाठविले तरच ते शिक्षण घेणे शक्य होई. परंतू इतर अनौपचारिक शिक्षण घेण्याची समान संधी प्रत्येक व्यक्तीस असे.

### ३) शिक्षणाचा प्रारंभ:

विद्यार्थ्यांच्या आतंरिक आणि बाह्य विकासासाठी शिष्याचे लवकरात लवकर शिक्षण सुरू व्हावे अशी त्या काळी धारणा होती. गुरूगृही राहून अध्ययन करण्यासाठी 'उपनयन' संस्कार होणे जरूरी होते. शिक्षणासा प्रांरभ करण्यासाठीची वयोमर्यादा वर्णानुसार भिन्न होती, गुरूगृही राहून अध्ययनाचा कालावधी अधिक होता एका वेद अध्ययनासाठी कमीत कमी १२ वर्षाचा कालखंड असे. १२वर्षे शिक्षण

पूर्ण झाल्यांनतर शिष्याला घरी जाण्याची परवनगी मिळत असे. त्यापूर्वी 'समावर्तन समारंभ' केला जात असे. यावेळी गुरू शिष्याला सत्य वचन, कर्तव्यपालना संदर्भात मार्गदर्शन करीत असे.

**४) अध्ययन तासिका:**

प्राचीन शिक्षण पद्धतीत शिक्षण हे चारभिंतीमध्ये बंदिस्त नव्हते तर ते निसर्गाच्या सानिध्यात दिले जात असे. पावसाळ्यात मात्र ते मंदीर वा तत्सम वास्तूंमध्ये दिले जाई. अध्ययनासाठीच्या तासिका ह्या साधारणतः ७ ते ८ तासांच्या असत. गुरूकुल किंवा आश्रय हे उत्तम नैसर्गिक वातावरणात नदी किनारी असत, जेथे वातावरण हे शांतीमय असे मानवी व्यवहारांचा अपवर्तनाचा अध्ययनकर्त्यावर दुष्परिणाम होऊ नये याची खबरदारी घेऊनच गुरूकुलाची स्थापना ही मुख्य वस्ती पासून खूप दुरवर केली जात असे.

**५) गुरू शिष्य संबंध:**

वैदिक काळात गुरूगृही राहून शिक्षण घेण्याची पद्धत असल्याने गुरूच्या सानिध्यात राहिल्यानंतर गुरू-शिष्य परंपरा निर्माण होई. गुरूच्या दृष्टीने शिष्य म्हणजे त्यांची स्वतःची मुलेच असत. त्यांच्या सर्व गरजांकडे गुरूंचे लक्ष असे.गुरू-शिष्यांच्या एकत्र सहवासामुळे प्रेम, आपुलकी, जिव्हाळा या भावनांची निर्मिती सहजपणे होत असे. शिष्यही आपल्या गुरूचा सन्मान ठेवत.

**६) शिस्तीवर भर:**

वैदिक काळातील शिक्षणात शिस्तीला अतिशय महत्व होते. सूचना, नियमांपेक्षा नियमित अध्ययनातूनच शिस्तीचे धडे मिळत असत. खरे बोलावे, प्राणीमात्रावर दया करावी, व्यसन करू नये, कोणाचीही कुचेष्टा करू नये, इंद्रियंनिग्रह आणि चारित्र्य निष्कलंक असावे हा महत्वाचा दंडक असे. आहार, विहार, निद्रा याबाबतीत स्वंयशिस्तीवर भर दिला जात असे. आश्रम वा गुरूकुलातील सर्व शिष्यांसाठी मग तो गरीब असो वा श्रीमंत साध्या राहणीवर भर दिला जात असे.

**७) अल्प गुरू-शिष्य प्रमाण:**

सर्व गुरूकूल/आश्रमातील गुरू-शिष्यांचे प्रमाण अत्यल्प असे. विद्यार्थी संख्या मर्यादित असे. त्यामुळे गुरूंना शिष्यांचा सर्व बांबीकडे जातीने लक्ष पुरविणे शक्य होई. काही कारणास्तव जर गुरूकुलात विद्यार्थी संख्येत जर वाढ झाली तर विद्यार्थ्यांमधील ज्येष्ठ व हुषार विद्यार्थ्याची 'पीठाचार्य' म्हणून नियुक्ती केली जाई. गुरूच्या अनुपस्थित आश्रमाचा सर्व कारभार त्याच्या हाती असे.

**८) शिष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर राखणे:**

अध्ययन कालावधीत शिक्षेला महत्त्व नव्हते. शिष्यांना गुरू कडून सहानुभूतीपूर्वक वागणूक मिळे. गुरू-शिष्य संबंध सलोख्याचे असत.गुरू हे ज्ञानी असले तरी ते शिष्यांचा अनादर करीत नसत. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनाकरिता आवश्यक असलेले सर्व ज्ञान आणि गुण हे विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे यावर गुरू लक्ष देत असे. प्रत्येक विद्यार्थ्याने एका विशिष्ट विषयात योग्यतेरूप प्राविण्य मिळण्यावर भर देण्यात येई.

**९) मोफत शिक्षणाची सुविधा:**

शिक्षण हे मोफत असे. कारण येथे कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नव्हती. फी न

आकारण्यामागील आणखी एक कारण म्हणजे शिक्षणात कोणाचाही हस्तक्षेप नको होता. शिक्षण हे पूर्णतः स्वायत्त होते ते कोणाच्याही वर्चस्व वा अधिपत्याखाली नव्हते. गुरूकुलातून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या मोबदल्यात त्याला कोणत्याही आर्थिक स्वरूपात देणे दयावे लागत नसे.चांगल्या दर्जाचे शिक्षण हे संपत्तीवर अवलंबून नसून ते विद्वतेवर आधारित होते. शिष्य हा स्वइच्छेने गाई, घोडा, शेती किंवा साध्या भाजीपाल्याच्या स्वरूपातही आपल्या ऐपतीनुसार गुरूदक्षिणा म्हणून गुरूस अर्पित करीत असे. शिक्षण हे विकत घेता येत नसे तर ते प्रत्येकास आपल्या कुवतीनुसार, क्षमतेनुसार प्राप्त करावे लागे.

## १.३ प्राचीन भारतीय शिक्षणाची प्रमुख लक्षणे

प्राचीन भारतीय शिक्षण हे प्राथमिकता वेदांचे शिक्षण होते. ब्राह्मण ग्रंथ, उपनिषदे, धर्मसूत्र याद्वारे आपल्याला वेदकालीन शिक्षणाचे स्वरूप लक्षात येते. आर्यभट्ट लिखित अमरकोष, व्याकरणकार पाणीनी, अर्थशास्त्रकार, कौटील्य, पंतजली यांच्या योगदाना इतकेच महत्व चरकांच्या वैद्यक शास्त्रासही जाते हे सर्व ब्राह्मण कालीन साहित्य आहे. वेदांनतर ब्राह्मण ग्रंथांची निर्माती झाली भविष्यातील पिढीकरिता शिक्षणाची उद्दिष्टे, ध्येय ठरविण्याच्या कामी ब्राह्मण कालीन शिक्षण हा एक स्त्रोत ठरू शकतो. डॉ.अे.एस अलतेकरांच्या मते 'ब्राह्मण कालीन शिक्षणाचा मुख्य भर हा धार्मिकता, धर्मआचरण संबंधी विचारांचे अर्क समजावून देणे, चारित्र्यांची जडणघडण करणे, व्यक्तिमत्त्वाचा विकास साधने, नागरी आणि सामाजिक जाणीवा मनावर बिंबविणे, सामाजिक कार्यक्षमतेत वाढ करून राष्ट्रीय संस्कृतीचे जतन आणि प्रसरण करणे या सर्व गोष्टींवर होता.

### १) आध्यात्मिक आणि धार्मिक मूल्यांवर भर:

शिष्यास धार्मिकतेकडे नेण्याच्या दृष्टीने त्यांच्या मन, आत्मा, विचार यांना दैवित्वाकडे नेण्यासाठी व त्याची एक चांगली व्यक्ती म्हणून घडण होण्यांच्या दृष्टीने प्रयत्न करणे हा प्राचीन शिक्षणाचा प्राथमिक हेतू होता. ज्ञानाचा शोध घेणे म्हणजे धार्मिक मूल्यांचा शोध घेण्याप्रमाणेच असे. विद्यार्थ्यांच्या जिवनाची घडणही विधीवत धार्मिक नियमानुसार घडत असे.प्रत्येक धार्मिक विधीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याने सहभागी होऊन प्रार्थना म्हणणे अनीवार्य असे, त्यांना सर्व धार्मिक उत्सवांमध्ये सहभागी व्हावे लागे. धार्मिक नियमांविना शिक्षण असूच शकत नव्हते. धार्मिक विधीद्वारे आध्यात्मिक मूल्यांना उत्तेजन देण्याच्या मनस्वी, तीव्र इच्छेवर आंत्यतिक विश्वास त्याकाळच्या शिक्षणपद्धतीचा होता. शिक्षणांचे अतिंम ध्येय हे आत्मसाक्षात्कार असल्याने आध्यात्मिक व धार्मिक मूल्यावर अधिक भर असल्याचे दिसून येते.

### २) चारित्र्याची घडण:

चारित्र्याची घडणीवर जितका भर वैदिक काळात दिला गेला. इतका अन्यत्र भारतीय इतिहासातील कोणत्याही कालखंडात दिला गेला नसावा. चांगले वर्तन व शुद्ध चारित्र्य हेच शिक्षणाचे फलित होते. इंद्रियावर विजय प्राप्त करून सदगुण अंगिकारणे यालाच अधिक महत्व दिले गेले होते. नैतिक मूल्यांचे आचरण हेच सूज्ञपणाचे लक्षण मानले जाई. धर्मपालन, आणि मनोनिग्रहानेच व्यक्तीच्या चारित्र्याची घडण होते या गोष्टीवर अत्यंत विश्वास होता.केवळ उपदेशापेक्षा कृती अधिक महत्वाची असल्याने शिक्षकाच्या अध्यापना बरोबरच त्यांच्या वर्तमानातूनच या चारित्र्याचे धडे शिष्यास आपोआप मिळत असत.

### ३) जबाबदार नागरिकत्व आणि सामाजिक मूल्यांचा विकास:

भारतीय शिक्षणात नागरी सदाचार आणि सामाजिक मूल्याच्या जडणघडणीस समान महत्व

देणे हे भारतीय शिक्षणाचे कायम उद्दिष्ट राहिले आहे. गुरूकुलातून ब्रह्मचारी बाहेर पडून समाजात परत आल्यावर त्यांने गरीब, श्रीमंत, यांना त्याच्या दु:ख, पिडा, व्याधीतून मुक्त करणे अभिप्रेत असे. त्यांने पाहुण्यांचे आदरातिथ्य आणि गरजुसाठी दयाळुपणा दाखविणे जरूरी असे. ब्रह्मचार्यातून जेव्हा ते गृहस्थाश्रमात प्रवेश करीत तेव्हा त्यांच्याकडून प्राप्तज्ञानाचे संक्रमण, संस्कृतीचे संवर्धन स्वत:द्वारे समाजाप्रत पोहोचविणे अपेक्षित केले जाई.

### ४. व्यक्तिमत्त विकास:

शिष्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडविणे हाच शिक्षणाचा मुख्य गाभा आहे याची जाणीव प्राचीन काळातील गुरूंना होती. मानवी व्यक्तिमत्वाकडे देवाची अलौकिक कलाकृती म्हणून पाहिले जाई. अनेकविध उदाहरणाद्वारे शिष्यांमध्ये आत्मविश्वास, आत्मसन्मान, स्वयंनिर्बध आणि स्वाभिमान यासारखे व्यक्तिमत्वास आवश्यक गुणविशेष विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याच्या दृष्टीने गुरू प्रयत्नशिल राहत असत.

### ५. राष्ट्रीय संस्कृतीचे जतन आणि प्रसार:

शब्दांच्या माध्यमातून मुखोतगत करून वैदिक संस्कृतीचे अंखडित ठेवून ती पिढ्यान पिढ्या संक्रमित होत आहे. पवित्रग्रंथातील पावित्र्यसूचक भागाचे पाठांतर किंवा स्मरण तरी प्रत्येकाने किमान करणे जरूरीचे आहे. प्रत्येकाने या प्राचीन सांस्कृतिक ठेव्याचे जतन आणि सवर्धन करण्याचे काम आपले मानले पाहिजे. धर्मगुरू वर्गाने संपूर्ण वेद वाडमय स्मरणात ठेवून ते पुढील पिढ्यांकडे पाठविले त्याचे संक्रमण केले त्यामुळेच ते आजही आपणास मूळ रूपात पहावयास मिळतात. बाह्या आक्रमणाकाकडून होणाऱ्या मंदिर, मठाचा विध्वंसामुळे काही साहित्य नष्ट पावले असले तरी कोणत्याही लेखनकलेशिवाय प्राचीन शिक्षणपद्धती आपल्या संस्कृतीचे सरंक्षण आणि सवंर्धन करण्यात यशस्वी झाली आहे.

## १.४ वेदाभ्यासामागील हेतू

ज्या तत्कालीन वाड:मयातून प्राचीन काळातील विचारधन पहावयास मिळते ते वाड:मय म्हणजे वेद होत. भारतीय समानजीवनात वेदास अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय संस्कृतीची मूळे ही वेदात वसलेली आहेत. सुमारे ५०००वर्षापूर्वीचे वैदिक वाड:मय आजही जशासतसे पहावयास मिळते. 'वेद' म्हणजे ज्ञान. 'वेद' या शब्दाची उत्पत्ती 'विद'या शब्दापासून झालेली आहे. त्याचा अर्थ जाणणे किंवा माहित असणे थोडक्यात वेद म्हणजे विविध प्रकारचे ज्ञान होय. वेदांमध्ये आर्य संस्कृतीची माहिती समाविष्ट आहे. वेदांची रचना बहुतांश पद्यामध्ये (Verses) आहे. पंरतू काही भाग मात्र गद्यातही रचलेला आहे. वैद्यिक गद्यालाच यजुषऋचा, (Melodious Verses Sama) मंजूळ काव्यातील साम असे म्हटलेले आहे या वैविध्यामुळेच वेदांना 'त्रिवेद' किंवा वेदत्रयी असे म्हणतात.ऋचा आणि साम यांना सूक्त असे म्हणतात. अशा या वेदांचे चार गटात वर्गीकरण केले गेल आहे.

**वेद**

ऋग्वेद | यजुर्वेद | सामवेद | अथर्ववेद

### १) ऋग्वेद:

ऋग्वेद हा वेदांमधील महत्वाचा प्रमुख असा वेद आहे. 'ऋक'याचा अर्थ स्तुतिगीत यातील काही सूक्ते भौतिक सुखासाठी, दीर्घायुष्यासाठी, देवांची आळवणी करणारी आहेत. तर काही

विश्वोत्पतीविषयक व अख्यानमय आहेत. ऋग्वेदात १०२८ सूक्ते आहेत. सूक्ते म्हणजे सर्व विद्येचा संग्रह होय. साधारणपणे अग्नी, इंद्र, वरूण आणि मरूय इ. देवतांची स्तुती या सुक्तांमधून केलेली आहे. यात पुरूखा-उर्वशी, यम-यमी संवाद याद्वारे लौकिक व आध्यात्मिक संस्कारविषयक बाबींवर प्रकाश टाकला आहे. विश्व व त्यामध्ये भरून राहिलेला आत्मा ह्याविषयी उत्कृष्ट कल्पना यात मांडलेली आहे. ऋग्वेदाचा आयुर्वेद हा उपवेद आहे.

**२) यजुर्वेदः**

यात यज्ञांना उपयोगी पडणारे मंत्र, यज्ञकर्मे व त्यासंबंधीचे विवेचन आहे. हा आर्यांचा धर्माचा आधारभूत ग्रंथ आहे. यातील महत्वाचा ग्रंथ म्हणजे 'शतपथ ब्राम्हण होय त्यामध्ये यज्ञाचे स्पष्टीकरण व शब्दार्थाची फोड, विशिष्ट मंत्रांचे अर्थबोधक स्पष्टीकरण अत्यंत उद्‌बोधक आहे. यजुर्वेदात मनोरम कथा आहेत. मनूची प्रलयविषयक गोष्ट यातच आढळते. 'यजुर्वेदाचा उपवेद' धनुर्वेद' असून यजुर्वेदाच्या शेवटच्या भागाला इशोपनिषद म्हणतात. ज्यांचा संबंध आध्यात्मिक साधनेशी जोडला जातो.

**३) सामवेदः**

वेदातील ऋचा, ज्यांची रचना विशेष छंदरूपात आहेत त्या सुरांवर गावयाच्या असतात. त्या बद्दलची माहिती देणारा सामवेद आहे. भारताचा इतिहास व संगीतशास्त्राची मुळे जाणून घेणाऱ्यासांठी ही सामगाने (ऋचांचे गायन) महत्वाची ठरतात. यातील संहितेतील बहुतेक ऋचा ऋग्वेदातील आहेत. यात ऋग्वेदापेक्षा ७५मंत्र अधिक आहेत. गाण्यासाठी आवश्यक असणारा शब्दोपच्चारातिल फरक यात दर्शविला गेला आहे. सामवेदाचा उपवेद गांधर्ववेद आहे.

**४) अथर्ववेदः**

अथर्व आंगिरस या ऋषीच्या नावाने हा वेद ओळखला जातो. यात सुखकारक व पीडाकारक अशा दोन्ही मंत्राचा समावेश केला आहे. रोग बरे करण्यासाठी असणारे मंत्र सुखकारक मानले जातात. तर जादुविद्या वशीकरणासंबंधीचे मंत्र पीडाकारक समजले जातात. यात आरोग्य, गणिती, तंत्र शेती, ग्रहशांती संबंधी उपयुक्त माहिती असल्याने आजच्या काळातील त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. या वेदातील वरूणसुत्र हे काव्याच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे.

'मानवाचा अथवा आर्यजातीचा अभ्यास करावयाचा असेल तर वेदांच्या तोडीचे अन्य साधन नाही.' असे मत विश्वव्याख्यात पंडित मॅक्समुल्लर यांनी नोंदविले आहे. भारतीय जनमानसावर वेदांचा फार मोठा प्रभाव सुरवातीपासूनच आहे. भारतीय संस्कृतीच्या उदगम-विकासाची, आचार विचारांच्या निरनिराळ्या पदरांची, विविध भारतीय धार्मिक, सामाजिक, राजकीय वा अन्य संस्थांच्या जडण-घडणीची माहिती वेद वाङःमयातूनच मिळते. जगातील बऱ्याचशा प्रमुख भाषेत वेदांचे भाषांतर झाले आहे. वेद म्हणजे काय ? त्यांची उद्दिष्ट काय होती ? त्यांनी ती का लिहली ? असे अनेक प्रश्न वर्षानुवर्ष चर्चिले जात आहे. अनेक मान्यवरांनी यावर भाष्य केलेली आहे. परंतू या सर्वात Soyan यांनी मांडलेले मत स्विकाहार्य आहे. त्यांनी कृष्णयजूर्वेदा या आपल्या पुस्तकातून वेदाचा अर्थ स्पष्ट केला आहे त्यांच्या मते 'वेद हे अशा गोष्टीचे प्रतिक आहे त्याद्वारे व्यक्ती आपले इच्छित उद्देश तर साध्य करू शकतेच व त्याचबरोबर स्वतःला वाईट सवयी, अयोग्य गोष्टी, अनुचित वर्तनापासून दूर ठेवू शकते. वेदांची स्वतःचीच अशी अंगभूत वैशिष्ट्ये आहेत की ज्याद्वारे आपणास प्राचीन भारतीय संस्कृती, सांस्कृतिक जीवन आणि लोकांचे जीवनविषयक तत्वज्ञान याची माहिती प्राप्त होऊ शकते. भारताच्या जीवनविषयक तत्वज्ञानात जीवन हे निरर्थक आहे हे अमान्य करून, जीवनाचे अंतिम ध्येय हे

आत्मासक्षात्कार होणे यावर विश्वास ठेवते. या शाश्वत सत्याचे स्पष्ट दर्शन आपल्याला ऋग्वेदाचा अभ्यासातून घडते. वेदांच्या आशयाचे वर्गीकरण प्रामुख्याने पुढील तीन प्रमुख घटकांद्वारे केले जाते. ते पूढील प्रमाणे.

१)'ज्ञान' आणि सुजाणता (शहाणपण)

२)'कर्म' किंवा कृती, कार्य वा अचारसंहिता.

३)'उपासना' किंवा देवाप्रती आत्मसमर्पण.

प्राचीन काळापासून शिक्षणाचे दोन प्रकार आढळतात. यातील एक प्रकार वैदिक ज्ञानाची परंपरा मुखोदगत करणे या स्वरूपाचा आहे तर दुसरा प्रकार हा चितंन, मनन या स्वरूपाचा आहे. वेदविद्येच्या पाठांतरात वर्णाच्या उच्चारांना फार महत्व होते. वर्णाचा उच्चार करताना शब्दावरील आरोह, अवरोह यावर विशेष लक्ष दिले जाई. मंत्र हा गुरूमुखातूनच घ्यावा लागे. आपल्या कर्मानुष्ठान, तप आणि ईश्वर आराधनेच्या कामी मंत्र हे आपल्या जीवनास मार्गदर्शन करवितात.भारतात वेदाचे सामर्थ्य आजही अबाधीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वेदाभ्यास करणारे शिक्षण आणि त्यांचे शिष्य ऋचा, मंत्राच्या योग्य उच्चाराने, ध्वनीच्या पवित्रतेने आणि त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाने ते शक्य झाले आहे. वेदांने मानव कल्याणासह विश्वकल्याणाची मनोकामना केली आहे.

सर्वे आजच्या काळात वेदाचे अध्ययन हे पुरोहीत वर्गापुरते सिमित राहिले आहे ; ज्यांना आज फारशी समाजात प्रतिष्ठा लाभलेली नाही.

वेद हे जणू आपल्या धर्माची मूळे आहेत आणि इतर आनंदाचे क्षण वा उत्सव हे झांडाच्या फळा, फुलाप्रमाणे आहेत. ही मूळे जरी चिखलात खोलवर रूतल्याप्रमाणे असली तरी त्या मुळांचे अंतर्गत भाग हे शेंड्यावरील फळा, फूला इतकाच ताजा व प्रसन्न असतो. त्यामुळेच वेद अध्ययन आणि त्यांचेआपल्या दैनंदिन जीवनातील धार्मिकविधी कार्य ही महत्वाची ठरते; त्यासाठी वेद हे अंतकरणापासून शिकण्याची त्याचे अर्थ जाणून घेण्याची आणि त्यांचे योग्यरित्या पठन करण्याची आवश्यकता आहे.

वेदांमागील मुख्य हेतू होता तो म्हणजे वेद जाणुन घेणे. मानवी ज्ञानाच्याही पलीकडे जाऊन सत्याचा शोध घेणे. व्यक्तीच्या आतंरिक व बाह्य शुद्धी करून त्यास परमोच्च आध्यात्मिक विकासाद्वारे मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविणे हा वेदांचा प्रमुख उद्देश होता. देव काय आहे हे जाणून घेऊन देवाशी असलेले आपले नाते समजावुन घेणे. त्या नात्यानुसार आपले कार्य करणे हा ही एक हेतू वेदांचा होता. वेदांमागील आणखी प्रमुख हेतू म्हणजे वेदांमध्ये नमूद केलेल्या बाबींचा व्यक्तीने पालन केल्यास ती परमोच्च पदास जाऊन पोहचते.

आपणास वेदांबद्दल पुरेसे ज्ञान प्राप्त झाले असले तरी, वैदिक भाषेच्या आकलनाअभावी, वैदिक ज्ञान प्राप्त करण्याच्या कामी असमर्थ ठरतो.

आधुनिक शिक्षणास स्वीकारार्ह अशी वैदिक कालीन शिक्षणाची लक्षणे (विशेष) प्राचीन भारतीय शिक्षण आणि आधुनिक भारतीय शिक्षणात फारच अंतर आहे. असे असले तरी आधुनिक शिक्षणातील सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक अशा दोन्ही भांगामध्ये प्राचीन शिक्षणाची रोवलेली बिजे पहावयास मिळतात.

**१) आदर्शवाद:**

आज जरी आपण आधुनिक युगात वावरत असलो तरी आपणास लाभलेल्या सांस्कृतिक वारश्याचा आपण रास्त अभिमान बाळगतो. आजही आपण धर्म, देव व गौरवशाली परंपरांना महत्व देतो.त्यामुळेच विज्ञान, धनसंपत्ती आणि भौतिकवादापेक्षा आपण चारित्र्य, आध्यात्मिकता अणि तत्वज्ञानावर अधिक भर देतो. आजच्या युगात संपत्ती, हिंसात्मक शक्ती आणि मुत्सदेगिरीला प्राधान्य दिले जात असले तरी आपण मात्र सत्य आणि अंहिसेच्या मार्गाचा स्विकार करतो. आपण आजही आदर्शवादाची कास धरून, आदर्श जीवनाचा मार्ग अवलंबितो.

**२) शिस्त आणि शिक्षक विद्यार्थी संबंध:**

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त बाहेरून न लादता ती नैसर्गिकरित्या वाढावी याची योजना वैदीक काळातील शिक्षणात होती. साध्या जीवनावर भर दिल्याने आणि गुरूच्या सान्निध्यात राहिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात कायम स्वरूपाची शिस्त अंगी बानलेली होती.आजच्या शिक्षणपद्धतीत आपण बघत आहोत की, बेशिस्तीमुळे शालेय वातावरण बिघडत आहे.आणि त्याच बरोबर अनेक समस्याही निर्माण होत आहेत.प्राचीन शिक्षण पद्धतीत शिस्तीचें अंग आणि गुरूशिष्य संबंध येथे विचारात घेतल्यास शिस्तीची समस्या सुटण्यास काही अंशी फलदायी ठरेल.

**३) अध्ययनाचे विषय:**

या काळात व्याकरण, न्यायशास्त्र, स्मृती, ज्योतिष इ.विषय शिकविले जात, वैदिक शिक्षण हे सर्वस्वी संस्कृत भाषेतून होत असे जीच्याकडे आज दुर्लक्ष होत आहे त्या संस्कृत भाषेतून होत असे जीच्याकडे आज दुर्लक्ष होत आहे. या संस्कृत साहित्यात शांती, सदभावना, मानवता आणि वैश्विक बंधूत्व या सर्वांचा परामर्श घेतला असल्याने आपल्या आजच्या अभ्यासक्रमात याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

**४) अध्यापन पद्धती:**

या काळात अध्यापनात श्रवण, मनन आणि चिंतनाला महत्व होते. मंत्रातील अर्थ मनन-चिंतनाद्वारे शोधून त्याचे रक्षण करण्याचे काम या पद्धतीने केले. पाठांतराच्या क्रमश पदपाठ, क्रमपाठ, जटापाठ आणि धनपाठ या ४ पद्धती होत्या. विद्वान गुरू आपल्या शिष्यांना तत्वज्ञानातील तत्वांचे व गूढ अर्थाचे आकलन करून देत असत त्यासाठी उदाहरण, दाखल्याचा वापर करीत असत. चर्चा, वादविवाद, परिषदा या माध्यमातूनही शिक्षण दिले जात असे याच बरोबर स्वंयअध्ययनावरही भर दिला गेला होता.ज्या आजच्या औपचारिक न -औपचारिक शिक्षणाच्या अध्यापनपद्धती म्हणून प्रचलित आहे.

**५) विद्यार्थ्यांचे साधे राहणीमान:**

वैदिक काळात सर्व विद्यार्थ्यांना समानतेने वागविले जात असे.सर्वांना सारखी कामे व अन्न मिळे. साधी राहणी व उच्च विचार हा मंत्र जीवनाचे सूत्र होते. आजच्या पिढीच्या राहणीमानात झपाट्याने बदल होत आहे, आधुनिक फॅशन्स, चंगळवाद, मौज-मजा मस्तीने, जीवन व्यतीत करण्यापलीकडे कल झुकत असल्याने 'साधी राहणी आणि उच्च विचारा'ऐवजी उच्च राहणी आणि साधे विचार करण्याचे तत्व अंगिकारताना दिसत आहे. संपूर्ण जीवनाचा समतोल बिघडत चालला आहे. आपले जीवर आंनदपूर्ण, निरामय बनविण्यासाठी या पिढीने प्राचीन जिवन पद्धतीचे भान ठेवून त्याचे महत्व जाणुन घेणे आवश्यक आहे.

### ६)विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास:

शिष्याचा आंतर-बाह्य विकास घडवून आणणे हे प्राचीन शिक्षणाचे उद्दिष्ट होते. जे आजच्या शिक्षणपद्धतीचे आहे. वैदिक काळात व्यक्ती शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सपूंर्ण जीवनाचा विकास करणे या स्वरूपाचे होते यात नीतीमत्ता, मनाची शुचिता, जीवनशिक्षण, व्यावहारिक शिक्षण आणि आध्यात्मिकता या सर्व गोष्टींना स्थान दिलेले होते. केवळ पुस्तकी शिक्षण हे मान्य केलेले नव्हते. शांत, प्रसन्न, निसर्गमय वातावरणात मानवी वस्तीपासून दूर शिक्षणव्यवस्था होती. आज जरी आपण चालु असलेल्या शिक्षणव्यवस्थेद्वारे विद्यार्थ्यांचा आध्यात्मिक, नैतिक, भावनिक, शारिरिक, मानसिक आणि बौद्धिक असा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न करत असलो तरी तो बऱ्याचअंशी पुस्तकी स्वरूपात व सैद्धांतीक पातळीवरच राहतो, प्रत्यक्ष स्वरूपात फारच कमी प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडविण्यासाठी प्रात्यक्षिक कार्याची जोड देणे गरजेचे आहे.

### शिक्षण मोफत आणि सार्वत्रिक स्वरूपाचे:

शिक्षण हे मुफ्त आणि सार्वत्रिक स्वरूपाचे होते. फी जर काही असेल तर ती, ज्ञानग्रहण केलेल्या व्यक्तीने, अर्थाजन करू लागल्यानंतर आपल्या गुरूला दिलेल्या गुरूदक्षिणेच्या स्वरूपात असे. विद्यार्जनाच्या कालावधीत राहण्याची, जेवण्याची सोय ही मोफतच असे. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या शैक्षणिक ध्येय धोरणातसुद्धा याच मोफत व सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केल्याने ० ते १४ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षा मोफत केले आहे. यासाठी अनेक उपक्रम राबवुनही अपेक्षित फलप्राप्ती झालेली नाही असे दिसून येत आहे. यावरून आपल्या हे लक्षात येतेच की, आधुनिक शिक्षणावर वैदिक कालीन शिक्षणाची छापही कायम आहेच.

## १.५ शैक्षणिक प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये

वैदिक काळात शिक्षणाला समाजामध्ये महत्वाचे स्थान होते. त्याला धार्मिक व समाजासाठी अत्यंत महत्वपूर्ण मानले जात असे. आर्यजनांच्या मते शिक्षण हे शारिरिक, मानसिक, आध्यात्मिक व सामाजिक समृद्धी प्राप्त करण्याचे एकमेव साधन होते. सुसंस्कृत होण्याकरिता शिक्षण घेणे अनिवार्य मानले जात असे. अशिक्षीत माणसाला असंस्कृत व पशुसमान मानले जाई. शिक्षण हे नव्या दिशा दाखवण्याचे व ज्ञानाचे साधन मानले जाई. शिक्षणाला मानवाचा 'तिसरा डोंळा' म्हणता येईल. शिक्षणामुळेच मनुष्य आपल्या गुरूप्रती असलेल्या ऋणातून मुक्त होऊ शकतो. अशी धारणा त्याकाळी लोकांमध्ये दृढ होती. वेगळ्या शब्दात सांगता येईल की, त्या काळी शिक्षण हा मानव जीवनाचा सर्वात महत्वाचा भाग होता.

वैदिक काळातील शिक्षणाची वैशिष्ट्ये पुढिलप्रमाणे आहेत

### १) ज्ञान:

शिक्षण हे ज्ञान आहे. मानवाला मिळालेला तो तिसरा डोळा आहे. ज्ञानामुळे मानवाचे अंतश्र्वक्षू उघडतात. एका दिव्य आध्यात्मिक प्रकाशाची त्याला प्राप्ती होते. व त्याची जीवनयात्रा सुलभ होते. ज्ञानामुळे मनुष्याचा सर्वांगीण विकास शक्य होतो. ज्ञान मानवाचे मातेप्रमाणे रक्षण करते. व पित्याप्रमाणे सन्मार्गाची प्रेरणा देते.

शिक्षणामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो. 'वेद' हा शब्द 'विद'या धातूपासून उत्पन्न होतो व 'विद' चा अर्थ 'ज्ञान' असा आहे.

Sayan च्या मते वेद ईष्ट गोष्टींच्या प्राप्तीचो अनिष्ट गोष्टींच्या परीहाराचे साधन आहे व वंद्य आहेत. चतुर्वेद, श्रुतिस्मृत्यादिकांच्या अभ्यासामुळे मानवाच्या विचारांच्या कक्षा रूंदावतात व त्याला एक नवी बौद्धिक पातळी प्राप्त होते.

### २. शिक्षणाची ध्येय:

प्राचीन भारतात, शिक्षणाचे ध्येय हे केवळ 'भौतिक व आदिभौतिक जीवन सुलभ व्हावे' एवढेच मर्यादित नसून संपूर्ण अपरोक्षानुभूती घडावी (Complete self realization)व जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून आत्म्याची मुक्ती व्हावी, हे होते.

या काळी शिक्षणाला एक तात्विक घडण होती, ज्या अंतर्गत शिक्षक, ईश्वराच्या उपासनेवर भर देई तसेच धार्मिकता, आध्यात्मिकता, शीलसंवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास व संस्कृती, समाज व देश यांच्या विकासासाठी आवश्यक जडण-घडणीवर ही भर देई.

परंतु असे असून देखील, शिक्षणाचे आद्य उद्देश्य हे विविध जाती-जमातीच्या लोकांना व्यावसायिक शिक्षणाद्वारे त्यांचे जीवन व्यतीत करण्यास तयार करणे हे होते. शिक्षणाचे स्वरूप मौलिक, धार्मिक व आध्यात्मिक होते व आजच्या सारखे परीक्षा पास करून डिग्री मिळवणे असे मुळीच नव्हते. शिस्तीचा जर विचार केला जावा तर लक्षात येते की इतरत्र शिस्ती पेक्षा स्वयशिस्तीवर भर दिला जाई.

### ३. तत्कालीन शिक्षणाची सूचनापद्धती (Methods of instruction):

त्या काळातील शिक्षण हे शिष्यकेंद्रीत (pupil-centered) होते. शिक्षणासाठी ठराविक एकच पद्धत वापरली जात नसे तरीही, सामान्यतः शिष्याने पाठांतर करणे व गुरु ने स्पष्टीकरण करणे अशी पद्धत प्रचलित होती. शिवाय, प्रश्नोत्तरे, चर्चा,वाद-विवाद इ. प्रसंगी कथाकथनाद्वारे शिक्षण दिले जात असे. कक्षाधारित शिक्षण (Class room teaching) अस्तित्वात नव्हते. परंतू (Monitorial system) प्रचलित होते. व नव्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी ज्येष्ठ विद्यार्थ्यांची नेमणूक केली जात असे. शिक्षणाला परिपूर्णता प्राप्त व्हावी म्हणून देशोदेशी यात्रा करणे अनिवार्य मानले जाई. अशा प्रकारे शिक्षणाचा प्रसार मौखिक माध्यमाद्वारे व चिंतनाद्वारे केला जाई.

मौखिक पद्धतीमध्ये विद्यार्थी वैदिक मंत्र व ऋचा मुखोदूत करीत असत. जेणे करून त्या आपल्या मूळ स्वरूपातच प्रसारित व्हाव्यात व त्यात चुकून काही परिवर्तन होवू नये. ज्या छंदादिक शास्त्रीय नियमांवर ऋचा, स्तोत्र इत्यादी गोष्टी अवलंबून असतात. ते प्रथमतः व्यवस्थित शिकविले जात असत. काही विशेष श्लोक त्यांचे उच्चारण व त्यांचा अर्थ यावर विशेष भर दिला जाई. मौखिक पद्धतीत शुद्ध व योग्य उच्चारणाकडे विशेष लक्ष्य दिले जाई. व म्हणूनच व्याकरण आणि उच्चारणाचे शिक्षण हे सर्वांना सक्तीने दिले जाई. याच रितीने वैदिक मंत्राचे वप ऋचांचे जतन करण्याचा प्रयत्न केला गेला.

मनन ही चिंतनाच्या वरची पातळी आहे. मननाद्वारे वैदिक मंत्राचा अर्थ लावून त्यांचा अभ्यास मनामध्ये साठवला जाई. ही पद्धत विशेषतः हुशार विद्यार्थ्यांसाठी होती व मननपद्धतीने हुशार विद्यार्थ्यांना संशोधनकार्य करण्यासाठी प्रवृत्त केले जात असे.

### ४) शिक्षणाचे माध्यम- (Medium of instruction):

पूर्वी शिक्षणकेद्रे आश्रम, विद्यालय, पाठशाळा इ. फक्त ब्राह्मण वर्गच चालवत असत व सर्व ग्रंथ संस्कृत भाषेतच लिहीले जात असत. म्हणूनच शिक्षाणाचे माध्यम संस्कृत होते.

### ५) उपनयनविधी (मौज, व्रतबंध):

'उपनयन' या शद्वाचा अर्थ 'संपर्कात राहणे' किंवा 'जवळ राहणे' असा होतो. ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य कुळातील मुलांचे अनुक्रमे वयाच्या आठव्या, अकराव्या आणि बाराव्या वर्षी उपनयन करून त्यांना गुरूगृही पाठविले जात असे. हा विधी, मुलाचे शैशव संपून बाल्यावस्थेत पदार्पण होण्याचे तसेच शैक्षणिक जीवनात पदार्पण करण्याचे द्योतक होता. अशा प्रकारे, 'गुरूच्या संपर्कात मुलाला आणणे ' या अर्थाने उपनयन विधी हा एक महत्वाचा घटक होता. कालांतराने हा विधी फक्त ब्राह्मण वर्गातच सिमीत होवून बसला.

### ६) ब्रह्मचर्य :

प्रत्येक विद्यार्थ्याला ब्रह्मचर्याचे पालन करणे अनिवार्य होते.व फक्त अविवाहितानांच गुरूकुलात प्रवेश मिळत असे. सदाचाराला अत्यंत महत्वपूर्ण मानले जाई. विद्यार्थी जीवनात प्रवेश करताच विद्यार्थ्याला विशिष्ट प्रकारचे यज्ञोपवीत धारण करावे लागत असे (Makhla) व त्याचा प्रकार त्याच्या वर्णावर अवलंबून असे ब्राह्मणाला ''मूंज''गवताचे (munj grars), क्षत्रियांना दोऱ्याचे (gut-Taanta), वैश्यांना लोकरीचे यज्ञोपवीत धारण करावे लागत असे. त्याचप्रमाणे त्यांनी वापरावयाचे कपडेही रेशमी, लोकरीचे इ.ठरत असे. विद्यार्थीजनांना सुंगधीद्रव्ये, सौदर्यप्रसाधनाचा व मादक पदार्थांचा वापर सर्वस्वी वर्ज्य होता.

### ७) भिक्षा मागणे (माधुकरी-उंचवृत्ती)(Alms Systms):

स्वतःच्या व गुरूच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी शिष्याची असे व त्यासाठी शिष्यगण दारोदार माधुकरी मागत व ते हिन समजले जात नसे कारण प्रत्येकाच्याच घरातील मुले शिकत असताना भिक्षा मागून निर्वाह करीत असत. या प्रथे मागचा हेतू प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विनम्रता निर्माण करण्याचा होता. या प्रथेमुळे 'आपले शिक्षण 'हे समाजाया दयेवर चालते व समाजसेवा हे आपले कर्तव्य आहे. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनावर आपोआपच बिबंवल्या जात असत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भिक्षुकी शिवाय पर्यायच नव्हता पण श्रीमंत विद्यार्थ्यांनासुद्धा भिक्षुकी करूनच निर्वाह करावा लागत असे.

### ८) शिक्षकाचा सामाजिक दर्जा व योगदान (Status & service of the teacher):

शिक्षकांचा सामाजिक दर्जा फार उंच होता. राजे सुद्धा शिक्षकांचा आदर व सन्मान करत असत. गुरूला ब्रह्मा विष्णू व महेश्वरासमान वंद्य मानले जात असे. त्याचप्रमाणे गुरूजन देखील आपल्याशिष्यांना सख्या आई-वडिलांप्रमाणेच मायेने वागवत.गुरू शिष्यामंधील नाते सदभावनेचे व सुलभ होते. गुरूकुलात शिकत असताना गुरूची सेवा करणे हे प्रत्येक शिष्याचे परमकर्तव्य असे. गुरूची आज्ञा न पाळणे पातक मानले जाई व त्यासाठी कठोर शिक्षा केली जाई. पाणी भरणे, दातवाणी साठी बाभळीच्या काड्या गोळा करणे वगैरे साधी कामे शिष्यांना करावी लागत. गुरूजन ही या सर्व कामांमुळे शिष्यांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये याची योग्य ती काळजी घेत असत. सुट्टीत विद्यार्थी स्वगृही परतत असत.तेव्हा त्यांनी गुरूसेवा करणे अपेक्षित नसे.

### ९) उपयोगिता (Practicability):

शिक्षणाच्या वैचारिक पैलू खेरीज त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग होतो की नाही हे बघितले जाई. म्हणूनच शिक्षणामुळे कला, साहित्य व तत्वज्ञानाचा विकास होतच असे परंतु शिष्याला कृषी, पशुसंवर्धन आणि इतर व्यावसायविषयक प्रायोगिक ज्ञान मिळत असे. या बरोबरच शिक्षण घेतल्यामुळे औषधांसंबंधी ज्ञान ही मिळत असे. डॉ.अल्तेकरांच्या मते तत्कालीन शिक्षणाचे उद्देष्य फक्त सामान्य ज्ञान देण्यापुरतेच मर्यादित न राहता विविध विषयातील तज्ज्ञ निर्माण करणे हे होते.

### १०) प्रत्येकासाठी शिक्षण (Education for Individual):

तत्कालीन शिक्षणाचे स्वरूप हे सामुहिक असण्यापेक्षाही ते वैयक्तिक होते. मुलाच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय होते.प्रत्येक शिक्षक प्रत्येक शिष्याचा सर्वांगिण विकास व्हावा या साठी स्वत:चे जीवन समर्पित करत असे. प्रत्येक शिष्याचा योग्य शारीरिक व बौद्धिक विकास व्हावा म्हणून गुरू प्रत्येक शिष्यावर लक्ष्य ठेवत असे.असे असूनही अपात्र व अपंग(विशेषत: मानसिक व मौलिकदृष्ट्या असक्षम असलेल्या)शिक्षण घेण्याची सोय नव्हती.

### ११) शिक्षणाचा कालावधी (Duration of learning):

वयाच्या २४व्या वर्षापर्यत शिष्याला गुरूगृही राहून विद्याग्रहण करावी लागत असे व तदनंतर त्याने आपले सांसरिक जिवन सूरू करणे अपेक्षित असे.शिष्यांचे त्यानुसार गट पडत-

१)२४व्या वर्षापर्यत शिक्षण घेतलेले - वसु

२)३६व्या वर्षापर्यत शिक्षण घेतलेले - रूद्र

३)४८व्या वर्षापर्यत शिक्षण घेतलेले - औदित्य

### १२) अभ्यासक्रम (Curricalum):

जरी तत्कालीन शिक्षणात मुख्यत: वैदिक साहित्यातच अभ्यास केला जात असला तरीही इतिहास, महापुरूषांच्या कथाव पुराणावरील विवेचने यांचा ही अभ्यासात समावेश असे. विद्यार्थ्यांनी गणिताचा (मापनशास्त्राचा, Metrics )अभ्यास करणे अत्यंत आवश्यक होते. अंकगणिताच्या जोडीला भूमितीचे ही ज्ञान दिलें जाई. शिष्यांना चारही वेदातील ज्ञान दिले जात असे. अभ्यासक्रमाच्या विस्तृत कक्षेत आध्यात्मिक व भौतिक ज्ञान, वेद, वैदिक, व्याकरण, गणित, देव-देवतांवरील ज्ञान, परमात्म्यावरील ज्ञान, भूतप्रेतासंबंधीचे ज्ञान, खगोलशास्त्र, तर्कशास्त्र (logic), तत्वज्ञान, नैतिकता, वर्तन इ. असे अनेक विषय येत असत. अशा संपन्न अभ्यासक्रमामुळेच या काळातील ब्राह्मणी साहित्याची निर्मीती झाली.

### १३) सर्वांना समान संधी (equal opportunities to all):

सर्वच शिक्षणेच्छुकांना जात, जमात, वर्ण इ. भेदभाव न करता विनामुल्य व सु लभ शिक्षण मिळत असे व म्हणूनच समाजातील सर्व स्तरांतून आलेल्या विद्यार्थ्यांना समान स्तरावर शिक्षण मिळत असे.

### १४) साधी राहणी व उच्च विचारसरणी (Plain living and highthinlig):

शिक्षण संस्था या गुरूकुल स्वरूपात निवासी पद्धतीच्या (Residential) असत. गुरूकुल

दूर जंगलात वसलेली असत. व गुरू व शिष्य तिथे एकत्रच राहत असत. शिक्षण हे नेहमी निर्मळ, शांत व मनमोहक वातावरणात दिले जाई. गुरूकूल व आश्रमातून साधी राहणी व उच्च विचारसरणी या धोरणाअंतरगत, चारित्र्य घडावे अशा पद्धतीने शिक्षण दिले जाई.

### १५) शैक्षणिक स्वातंत्र्य (Academic Freedom):

शिष्यांना शैक्षणिक स्वातंत्र्य असल्यामुळे ते चिंन्तन व मनन करण्यामध्ये मग्न असत. यामुळेच त्यांच्या विचारांमध्ये स्वत्व व सच्चेपणा (originality) वृद्धिगंत होत असे.

### १८) भारतीय संस्कृतीतील वरिष्ठ स्थान (High place to Indian culture):

भारतीय संस्कृती ही धार्मिक भावनांनी ओतप्रत होती व शिक्षणक्षेत्रात तिला उच्च स्थान दिले गेले होते.

### १९) व्यावसायिक शिक्षण व गणिताचे शिक्षण :

वैदिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षण व गणिताच्या शिक्षणाला खूप महत्व होते. मनूकडून आपल्याला व्यावसायिक शिक्षणाच्या कक्षेचा बोध होईल. व्यावसायिक भूगोल विविध प्रांतातील माणसांच्या गरजांचा अभ्यास, नितीमूल्यांची देवाण-घेवाण, वस्तूंचा दर्जा, विविध औद्योगिक केंद्रावर बोलल्या जाणाऱ्या भाषांचा अभ्यास इत्यादी गोष्टींना अभ्यासात खूप महत्व होते. पेढीच्या तत्वाचा ही (Theory of banking) अभ्यासक्रमामध्ये समावेश असे.या शिक्षणासाठी नियोजित शिक्षण संस्था नसल्या तरीही हे ज्ञान मानवाला कुटुंबियाच्या सहवासात मिळत असे. प्राचीन भारतीयांनी भूमितीची एक सोपी प्रणाली निर्माण केली होती. सुमारे ४०० ई.स.पू.ते ४००ई.स.या कालावधीत निर्माण झालेले शुल्कसुत्र हे गणितावरील प्राचीनतम कार्य आहे. आर्यभट्ट (४७६-५२ ई.स.पू) हे भारतीय गणितातील सर्व प्रथम नाव होय. शून्याची संकल्पना ही याच काळात निर्माण झाली.

## १.६ सारांश

कोणत्याही प्रकारच्या लेखन कलेच्या मदतीशिवाय आपल्या सांस्कृतिक आणि साहित्यीक वारश्याचे जतन सवंर्धन आणि प्रसार करण्यात प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती यशस्वी ठरली आहे. परकीय आक्रमणातून मंदीर, मठाच्या होणाऱ्या विध्वसांतून हे साहित्य अबाधित ठेवण्यात प्राचीन शिक्षणाचा सर्वात मोठा वाटा आहे. जतन आणि संवर्धित केलेल्या वारश्याचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित न राहता तो इतर उपखंडात सुद्धा पोहोचला आहे. व या सर्वाचे श्रेय वैदिक शिक्षणास जाते. प्राचीन भारतीय शिक्षणाची मुलतत्वे पाहता आपणास लक्षात येते की, प्राचीन गुरूंनी आपल्या शिष्यांचा केवळ ऐहिक अंगाचा विचार न करता पारमार्थीक अंगाचाही विचार केल्याने शिष्यास एक मानव म्हणून घडताना तो विचार किती सार्थ होता ते पटते. वेदाभ्यासामागील हेतू केवळ भारतीय समाज कल्याणाचा नसून संपूर्ण विश्वातील भानकल्याणाचा असल्याचे जाणवते. वैदिक काळातील शिक्षणाची जी वैशिष्ट्ये आहेत ती आजही आपल्या शिक्षणपद्धतीस दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन ठरतात.

## १.७ स्वाध्याय

१) आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीच्या उल्लेखनीय पैलूंवर चर्चा करा.

२) आपणास वेदअभ्यासाची गरज का आहे ? वेदाभ्यासात अडथळे निर्माण करणाऱ्या निर्बधात्मक बाबी नोंदवा.

३) प्राचीन शिक्षण पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती ते सांगा. वर्तमान शिक्षणासंदर्भात त्यांची उपयुक्तता मांडा.

४) वेदाभ्यासामागील हेतू स्पष्ट करा.

★★★

## प्रकरण २
# उत्तर वैदिककालीन शिक्षण

**घटकाची संरचना**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ उत्तर वैदिक काळातील शिक्षण

२.३ स्त्रीयांचे शिक्षण

२.४ स्वाध्याय किंवा स्वअध्ययन

२.५ शिक्षकाचे महत्व आणि त्याची कर्तव्ये

२.६ विद्यार्थ्याची कर्तव्ये

२.७ शैक्षणिक संस्था

२.८ सारांश

२.९ स्वाध्याय


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या वाचनानंतर आपणास खालील गोष्टी करता येतील.

- उत्तर वैदिक काळातील शिक्षणातील बदल स्पष्ट होतील.
- स्त्री शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट होईल.
- कालखंडानुरूप शिक्षणातील स्वयंअध्ययनाची उपयुक्तता सांगता येईल.
- प्राचीन काळातील शिक्षकाचे महत्व आणि त्याच्या कर्तव्याबद्दल चर्चा करू.
- विद्यार्थ्यांची विद्यार्थीदशेतील कर्तव्यांचे आकलन होईल.
- उत्तर वैदिक काळातील शिक्षणक संस्थांचे स्वरूप व त्यांचे महत्व विशद करू शकाल.

## २.१ प्रस्तावना

ऋग्वेद काळानंतरच्या वैदिक काळास उत्तर वैदिक काळ किंवा ब्राह्मण काळ असे म्हणतात. हा कालखंड म्हणजे वैदिक संस्कृतीची द्वितीय अवस्था आहे. या काळात वेदकाळातील शिक्षणाचे ध्येय होते तेच राहिले. शिक्षणाद्वारे ऐहिक व पारलौकिक जीवनाची तयारी होत असे. वेद, पुराणे, इतिहास, व्याकरण, अंकगणित, न्यायशास्त्र, उपनिषदे इ. विषयांचा अभ्यास करावा लागे. उत्तर वैदिक काळात अनेक गुरूकूले (शैक्षणिक संस्था) अस्तित्वात होती. शिष्याला संपूर्ण काळ गुरूच्या सहवासात घालवावे

लागत असल्याने गुरूकुलातील शिस्तीचे काटेकोर पालन करावे लागत असे. शिष्याच्या अज्ञानाचा नाश करून त्याला ज्ञानाच्या प्रकाशात आणणाऱ्या गुरूचे महत्वही त्याकाळी खूप होते. जे जे स्वत:ला अवगत असेल ते सर्व तो आपल्या शिष्याला देत असे. कुठलाही पगार न घेता गुरू आपल्या शिष्याला ज्ञानदानाबरोबरच भावी जीवनासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे प्रशिक्षणही देत असे.या काळातील गुरू-शिष्यांचे संबंध अतिशय प्रेमाचे व जिव्हाळ्याचे होते. गुरूविषयी कायम आदरभाव असणे हे या शिक्षणपद्धतीचे वैशिष्ट्य होते. उत्तर वैदिक काळात मात्र वैदिक काळाप्रमाणे स्त्री शिक्षणाचा दर्जा न राहता सर्वसामान्यपणे स्त्रियासांठी वेदाध्यायन मागे पडून केवळ केशप्रसाधन, चित्रकला, संगीत, नृत्य, स्वंयपाक विषयक बाबींच्या शिक्षणापुरते ते मर्यादित राहिले. शिष्यांच्या अध्ययनासाठी स्वाध्याय वा स्वंयअध्ययनावर भव राहिला. गुरूकूल परिषद, संमेलन या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून अध्ययनाचे कार्य चालू राहिले.

## २.२ उत्तर-वैदिक काळातील शिक्षण

उत्तर वैदिक काळ जो ब्राह्मण काळ म्हणून ओळखला जातो. त्या काळातील शिक्षण पद्धतीचे वर्णन करताना एफ.इ.क्ये आपल्या ''प्राचीन आणि नंतरच्या काळातील भारतीय शिक्षणाचा इतिहास''या पुस्तकात म्हणतात. ''बदलत्या समाजव्यवस्थेत आणि साम्राज्यांच्या अस्तंगत परिस्थितीतही ब्राह्मणिक शिक्षण प्रणाली केवळ टिकून राहिली नाही, तर हजारो वर्षे त्या शिक्षणप्रणालीने शिक्षणात प्रकाशझोताप्रमाणे मार्गदर्शन केले आणि अध्ययन-अध्यापनाच्या क्षेत्रात अनेक नामवंत विद्वानांनी केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात आपल्या कार्याचा ठसा उमटविला''यावरून असे दिसते की, ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येय पूर्व-वैदिक काळातील ध्येयाप्रंमाणेच होती. त्यामध्ये ज्ञानप्राप्ती या ध्येयाला विशेष महत्त्व होते. ज्ञानविना मनुष्य पशुतुल्य मानला जात असे या काळात 'सत्याच्या बोधातून मोक्षप्राप्ती' हेच शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट होते जे तत्व परमसत्याचा बोध घडवून आणेल तेच फक्त ज्ञान मानले जाई. उपनिषदांच्या मते सत्य हेच ज्ञान आहे व इतर सर्व ऐहिक ज्ञान हे मिथ्य आहे. केवळ ऐहिक ज्ञान असणे हे अज्ञानासमानच मानले जाई. उपनिषदे म्हणतात की, ऐहिक ज्ञानाने मोक्षप्राप्ती होत नाही त्यामुळे माणूस मायेच्या बंधनात अडकून राहतो.

### उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची वैशिष्ट्ये:

#### १) उपनयन संस्कार:

वैदिक व वेदोत्तर अशा दोन्ही काळात 'उपनयन' संस्कार महत्वाचा मानला जात असे. या बद्दलचे ऋग्वेदातही काही ठिकाणी संदर्भ आढळतात. वैदिक-काळात विद्यारंभापूर्वीच उपनयन संस्कार करणे बंधन कारक नव्हते परंतु उत्तर वैदिक काळात मात्र तसे करणे महत्वाचे मानले जाऊ लागले वेदोत्तर काळात उपनयन संस्काराचे महत्व इतके वाढले की, की उपनयन म्हणजे माणसाचा पुनर्जन्म असे मानले जाऊ लागले. विशेंषत: ब्राह्मणामध्ये याचे महत्व खूप होते. म्हणूनच उपनयन झालेल्या ब्राह्मणांना ''द्विज''(दोनदा जन्मलेल्या) म्हटले जाऊ लागले.

#### २) शिक्षकाचे स्थान महत्वाचे:

उत्तर वैदिक काळात गुरूला फक्त गुरूकुलातच नाही तर संपूर्ण समाजात महत्वाचे स्थान दिले गेले आहे. गुरू सर्वांसाठी एक मोठा मार्गदर्शक असे. परंतु असे करण्यापूर्वी गुरूजन शिष्यांची पात्रता पहात असत. देवांनतर गुरूचेच स्थान मोठे मानले जाई व गुरूला समाजात राजापेक्षाही मोठा दर्जा होता. उपनिषदिक काळात जेव्हा स्वाध्यायाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले.तेव्हा देखील गुरूचे

समाजातील स्थान अबाधित राहिले. गुरूच्या मदतीशिवाय कोणतेही ज्ञान आत्मसात करता येत नाही असे मानले जाई म्हणजेच, ''गुरूवीण मुक्ती मिळत नाही' अशी धारणा होती. उत्तर वैदिक काळातील अभ्यासक्रम- उत्तर वैदिक काळात अभ्यासक्रमात अधिक विषय समाविष्ट केले गेले. वेद-मंत्र तर वेदकाळापासून शिकवले जात असत परंतु उत्तरवैदिक काळात वेदांवर आधारित अनेक प्रकारच्या साहित्याची निर्मीती झाली. त्यामुळे धार्मिक विषयांबरोबरच अनेक ऐहिक, सांसरिक बाबींचा ही अभ्यासक्रमात समावेश केला गेला. वेद, इतिहास, पुराणे, व्याकरण, गणित, ब्रह्मविद्या, निरूक्ती (शद्वांची व्युत्पत्ती व त्यावरून अर्थलावण्याचे शास्त्र), खगोलशास्त्र, न्यृत्य, संगीत इत्यादिकांचा ही समावेश अभ्यासक्रमात केला गेला.

त्या काळी प्रश्नोत्तरे पद्धती प्रचारात होती.याच्यातून अनेक कठीण व भाववाचक (निराकार ?)संकल्पनांना सोपे करून समजून घेतले जाऊ लागले. सूक्ष्म व संक्षिप्त आध्यात्मिक तत्त्वांचा शास्त्रार्थ लावला जाऊ लागला. काही मुद्दांना सोपे करण्यासाठी उदाहरणे, कथा, जीवनचित्रे, इ.चा ही शिक्षणपद्धती मध्ये समावेश केला जाऊ लागला.

### ४) विद्यार्थ्यांची दैनंदिन जीवनचर्या-(Daily routines of students):

उत्तर वैदिक काळात 'गुरू'मंडळीच आश्रम शाळा स्थापित करत व चालवत असत. व त्यामुळे त्यांनी ठरवून दिलेल्या शिस्तीच्या व वर्तनाच्या नियमांचे पालन करणे शिर्ष्यांना अनिवार्य असे.

#### (अ) प्रात्यक्षिक शिक्षण :

प्रात्यक्षिक शिक्षणात तीन भाग असत. क)भिक्षुखी करणे (ख)यज्ञकुंडाकरिता अग्नी तयार करणे. (ग) आश्रमातील इतर मंडळी व जनावरे यांची काळजी घेणे, त्याशिवाय शिष्यांनी शेतीची कामे करणे ही अपेक्षीत होते. यामागे विविध उद्देश होते.

भिक्षुकी ही नफेकऱ्यांना शिकवण देण्यासाठी होती. यज्ञाग्नी पेटविण्यामागे शिष्यांच्या बौधिक विकासाचा उद्देश होता तर शेती व पशुपालनामध्ये शिष्याला स्वायत्ततेची शिकवण देण्याचा हेतू होता.

#### (ब) मानसिक विकास (Mental development):

श्रवण, चिंतन व मनन या तीन गोष्टीचा समावेश मानसिक शिक्षणामध्ये केला होता संपूर्ण मनोविकासासाठी या तीन्ही गोष्टी अत्यावश्यक मानल्या जात असत श्रवण केलेल्या गोष्टींवर चिंतन करणे ही पद्धत त्यावेळी सर्वमान्य होती व तीच आज ही उपयोगात आणली जात असते.

#### (क) नैतिक विकास (Moral development):

अनुशासित व नियंत्रित जीवन जगणे हा नितीमत्ता शिक्षणाचा पाया होता. नीतीमत्ता शिक्षणाचा माणसाच्या वर्तनावर परिणाम होतो. फक्त मौखिक सूचनांचा उपयोग माणसाचे वर्तन सुधारू शकत नाही. म्हणून सद्वर्तनसाठी ब्रह्मचर्यपालन आवश्यक मानले जाई.

### ५)शिक्षणाचा कालावधी (Duration of education):

वेदोत्तर काळात शिक्षणाचा कालावधी हा वैदिक काळासारखाच होता. हा कालावधी जवळपास बारा वर्षाचा होता परंतु अभ्यासावयाचे विषय वाढले होते. असे असून ही शिक्षणाचा कालावधी ठराविक नव्हता. बारा वर्षांहून अधिक काळ विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांची उदाहरणे ही आपल्याला आढळतात.

### ६) दिक्षांत उपदेश (समावर्तन)(Convocation address):

बारा वर्षे विद्यार्जन केल्यानंतर, घरी परतण्यापूर्वी आचार्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी शिष्यगण त्यांच्या जवळ एकत्र जमत असत. या प्रसंगी आचार्य आपल्या शिष्यांचे भावी आयुष्य सुखी व्हावे व सुरळीत चालावे या करिता काही उपदेशपर वक्तव्य करीत असत. ते गृहस्तधर्मपालन, समाज व देशाची काळजी घेणे व मानवतेची सेवा करणे या बाबत आपल्या शिष्यांना उपदेश करत असत. ह्या समारोपाच्या सोहळ्याला 'समावर्तन'असे म्हटले जाई.

### ७) परमज्ञान (Supreme knowledge):

आपल्या गुरूवरती संपूर्ण निष्ठा असणे प्रत्येक शिष्याला बंधनकारक होते. ज्या शिष्यांची संपूर्ण निष्ठा गुरूचरणी समर्पित असेल, केवळ त्यांनाच परमसत्यतत्वाच्या खऱ्या ज्ञानाचा अधिकार आहे असे मानले जात असे. म्हणून खरे ज्ञान मिळविण्यासाठी शिष्य सदगुरूच्या शोधात असत.

### ८) स्त्री शिक्षण (Women's education):

उत्तर वैदिक काळात स्त्री शिक्षणामध्ये अनेक बदल घडून आले व त्यामुळे स्त्री-शिक्षणाचे पतन झाले वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा समानधिकार होता. परंतु वेदोत्तर काळात मात्र स्त्रियांना धार्मिक व सामाजिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले त्यांना धार्मिक कार्यात सम्मिलित होण्यास मनाई होती. आता त्यांना पूर्वीसारखा सामाजिक दर्जा प्राप्त नव्हता म्हणूनच त्यांच्या सामाजिक व बौद्धिक विकासाचा मार्गच बंद झाल. परंतु उपनिषद काळात मात्र काही सुधार झाला व त्यांना पुन्हा पुरूषांच्या बरोबरचा दर्जा व तसेच शिक्षणाचा समानधिकार प्राप्त झाला.

### ९) वर्णव्यवस्था आणि शिक्षणाचे सामाजातील स्थान (Varna system and education in society):

वैदिक काळातील वर्णव्यवस्था ही मनुष्याच्या कार्यावर व कर्मावर आधारित होती. त्या काळात प्रत्येकाला त्याचा व्यवसाय निवडण्याची मुभा होती. व त्यावरून त्याचा वर्ण ठरत असे. परंतु वेदोत्तर काळात मात्र मानवाच्या जन्मावरून, कुळावरून त्याचा वर्ण ठरविला जाऊ लागला व समाज चातुर्वणात विभागला जाऊ लागला. असे असले तरीही या काळात आजच्या सारखे वर्णाचे सूक्ष्म विघटन झालेले नव्हते.

### वैदिक काळातील शैक्षणिक साफल्य पुढील प्रमाणे वर्णन केले जाऊ शकते. (educational achievements of vedic age):

१) आध्यात्मिक विकासावर तत्कालीन शिक्षणाचा जोर होता मनुष्यमात्राचे देवाप्रती, आपल्या पीतरांप्रती, आपल्या गुरूजनांप्रती आणि समाजाप्रती असलेले ऋण फेडण्यासाठी या काळी आश्रम व्यवस्थेचा अंगिकार केला गेला.

२) प्रथमत: पाल्याच्या शिक्षणाच्या इच्छेचे बीरोजपण पालकांच्या मनामध्ये केले गेले आहे की जे पालक आपल्या मुलांना शिक्षण देत नाहीत ते आपल्या मुलांचे शत्रू आहेत.

३) मुल्यांच्या चारित्र्याविकासावर खूप लक्ष्य ठेवले जाई शिक्षक मुलाच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासावर खूप भर देत असत.

४) कर्तव्यपूर्तीच्या प्रशिक्षणातून सामाजिक कौशल्याचा विकास घडवून आणला जात असे.

५) राष्ट्रीय संस्कृतीचे जतन व्हावे व तिचा प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न केला जात असे.

६) शिक्षण हे विनामुल्य असे व त्याचा संबंध खर्च राजाकरवी व समाजाकरवी भागविला जात असे.

७) गुरूकुलात राहून एका पोषक वातावरणात शिक्षण ग्रहण केले जात असे.

८) शिष्याला गुरूने ठरवून दिलेल्या आदर्शावर चालावे लागत असे. त्याला आपला निर्वाह भिक्षुकी करून चालवावा लागत असे. या प्रथेमुळे शिष्यामध्ये विनम्रता व सहिष्णुता निर्माण होत असे.

९) शिष्य तयार करताना त्यांचा स्वभाव, आद्यानुभव (early experiences)जडण-घडण व परिस्थिती यांच्याकडे लक्ष्य दिले जात असे.

१०) स्वाध्यायाला खूप महत्व होते.

११) शिक्षणाचे माध्यम हे ब्रह्मवाक्य होते. (the medium of education was divine pronouncement)

१२) परीक्षा मौखिक पद्धतीने घेतली जात असे. पंडितवृंदा समक्ष (congregation of scholars)शिष्याला मौखिक उत्तरे द्यावी लागत असत. जर त्यांना संतुष्ट करण्यामध्ये शिष्य यशस्वी झाला तरच त्याला पदवी किंवा उपाधी मिळत असे अशी उपाधी प्राप्त करण्यासाठी अशा पंडितवृंदाचा अभिप्राय अत्यंत महत्वाचा असे.

१३) या काळात व्यवसायिक शिक्षण देखील प्रचारात होते. सैनिकी, विज्ञान, कृषी, पशुसंवर्धन, पशुवैद्यकशास्त्र, आयुर्वेद इत्यादी विषय शिकविले जात असत. रसायन शास्त्रही शिकविले जात असे. ललितकला व हस्तकौशल्याला तर विशेष महत्व प्राप्त होते.वाणिज्यासंबंधीचे ज्ञान विशेष लोकप्रिय होते.

## २.३ स्त्री शिक्षण (Female education)

वैदिक काळात स्त्रियांना पुरूषांबरोबरच दर्जा दिला जात असे शिक्षणावधीत त्यांना ही ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असे. त्या वेदांचा व इतर धार्मिक व तत्वज्ञान विषयक ग्रंथांचा अभ्यास करत असत. धार्मिक व तात्विक विवेचनात सहभागी होण्याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असे. ऋग्वेदातील अनेक संहिता या स्त्रियांनी रचल्या आहेत. गुरूकुलामध्ये गुरूजन मुलामुलींना एकसमान वागणूक देत असत.व कसल्याही प्रकारचा भेदभाव करीत नसत. मुलींचे शिक्षण घरीच सुरू होत असे जिथे त्यांना मुळाक्षरे शिकविली जात. तिथेच त्यांन गृहकृत्यदक्ष बनविले जात असे. किंबहुना 'गृह-शास्त्राचे', 'घर'हे एक छोटेखानी पण प्रमुख विद्यापीठच होत. असे म्हणू श्रीमंत मंडळी आपल्या घरातील स्त्रियांच्या शिक्षणासाठी घरीच पगारी शिक्षकांची नेमणूक करत. काही ठिकाणी घरचे पुरोहित अथवा घरची सुशिक्षीत वडीलधारीच मंडळी मुलींना शिक्षण देत. मुलींसाठी काही विशेष वसतीगृहेदेखील असत जिथे सुयोग्य महिला शिक्षक वर्ग त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलत. जरी स्त्री-पुरूष सहाध्ययनाचे (co-education)विशेष प्राविधान नसले तरीही सहाध्ययन निषिद्ध अजिबात नव्हते. स्त्रियांना धर्म, साहित्य, नृत्य , संगीत आणि इतर ललित कलांचे शिक्षण दिले जात असे. त्यामुळेच स्त्री शिक्षण त्या काळी आपल्या परमोच्च अवस्थेत होते. स्त्रियांशिवाय पुरूष प्रगती करू शकत नाहीत असा समज त्या काळी होता व स्त्रियांना शक्तीचा,पदाचा,

संतृप्तीचा व ज्ञानाचा मोठा स्त्रोत मानले जाई. म्हणून वैदिक काळात अशी दृढ धारणा होती की जरी स्त्रीची शारिरिक घडण पुरूषापेक्षा वेगळी असली तरीही तिची बौद्धिक पातळी पुरूषापेक्षा हीन मुळीच नाही. व तिच्या जवळ उत्तम स्मरणशक्ती बुद्धिमत्ता कोणत्याही प्रकारचे शिक्षण आत्मसात करण्याची क्षमता आहे असे ही मानले जात असे की स्त्रीच वर्णन हे तिच्या स्त्रीत्वामध्ये व मातृत्वामध्ये नीहित आहेत. आणि म्हणूनच स्त्रीच्या शिक्षणाचे स्वरूप हे पूरूषांच्या शिक्षणापेक्षा वेगळे होते कारण तिने गृहकृत्यदक्ष असणे अपेक्षित होते.

वेदांमध्ये अनेक ठिकाणी स्त्रियांचे महत्व समजावून सांगितले आहे. त्या काळी अनेक स्त्रियांनी आपल्या ज्ञानाने व तपश्चर्येने साध्वीपद प्राप्त केले होते. लोपमुद्रा, अपल्ला, घोष व विश्ववरा या अत्यंत संमानित साध्वी होऊन गेल्या.याज्ञवल्क्याच्या मते मैत्रेयी व कौनीतीकी या साध्वीनी ही वेदांतील काही ऋचा रचल्या आहे तर ब्रह्मनच्या मते गंडब्रवाव ग्रबिता यांनी उच्च शिक्षण ग्रहण केले होते. स्त्रियांना सपूंर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी पालकांची आहे. असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. त्यांना कलेचे शिक्षण ही दिले गेले पाहिजे.

## २.४ स्वाध्याय

षडवेदांगांपैकी प्रथम वेदांग, शिक्षावली ( ?)हे शिक्षणाच्या नियमांवर म्हणजेच उच्चारण व उच्चारशास्त्रावर भाष्य करते.त्यात बारा अणुरका आहेत-

१) पहिली अणुरका ''ओम शं नो मित्र''अशा शांती मंत्राने सुरू होते.

२) दुसरी अणुरका ''शिक्षे''तील घटकांना अनुसूचित करते

३) तिसरी अणुरका विविध उच्चारातील गहन संबंधावर आहे

४) चवथी अणुरका ही मंत्र व मंत्रोपचारा संबंधी आहे.

५) पाचवी व सहावी या दोन अणुरका ब्रह्मतत्वाचे वर्णन करणाऱ्या आहेत.

६) सातवी अणुरका पाक्थ (पाङक्थ)(pankhta)उपासना नावाच्या ध्यानाबद्दल आहे.

७) आठवी अणुरका ओम या दैवीशब्दाची महती सांगते.

८) नववी अणुरका, ब्रह्मतत्वाचा शोध घेत आपले जीवन कसे जगावे सांगते.

९) दहावी अणुरका स्वाध्याय बद्दल सांगते.

१०) अकरावी अणुरका म्हणजे आचार्यांनी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सूचनांची यादी आहे.

११) बारावी अणुरका ही शांती मंत्राने शिक्षावल्ली ( ?)चे समापन करणारी आहे.

नववी अणुरका ही शिक्षण, स्वाध्याय व प्रवचन यावर अतिशय जोर देणारी आहे आणि या गोष्टी मनुष्याने आयुष्यभर करत राहाव्यात असे सांगते.

स्वाध्याय म्हणजे स्वतःचे अध्ययन त्यातील प्रमुख क्रिया म्हणजे यौगिक साहित्याचा अभ्यास करणे व त्या बरोबर मंत्र जप करणे. केवळ योग क्रियेद्वारे व एखाद्या पुस्तकाच्या मदतीने स्वाध्याय संपन्न होत नाही. स्वाध्याय म्हणजे मंत्रोच्चार व धार्मिक ग्रंथ वाचनाने केलेला स्वतःच्या अस्तित्वाचा अभ्यास इश्वर गीतेत स्वाध्यायाचे वर्णन करताना असे म्हणते की जप हाच स्वाध्याय आहे. श्रवणव मनन याद्वारे तो केला जातो. जप हा दोन प्रकारचा असतो. मौखिक व मानसिक स्वयंशिक्षणाची कला,

मनन व अभ्यास या द्वारे जी 'आत्मानुभूती' (Self realization) होते त्यालाच स्वाध्याय म्हणतात. शिष्य हा आत्मपरिक्षण करीत असे व सतत जप करीत असे. हा जप सदगुरू ने दिलेल्या गुरूमंत्राचा असे. शिष्य वैदिक वेदोत्तर काळात स्वाध्यायाअंतर्गत उपनिषदातील महावाक्यांच्या अर्थावर मनन करीत असत.

स्वाध्याय आपल्याला तीन मुलभूत गोष्टी शिकवतो-

(क)स्व-स्वरूप (Self -edenlity )

(ख)स्व-शक्ती (Self -power)

(ग)स्व- कर्तव्य (self- duty)

**(क) स्व-स्वरुप** :

हे देवी स्वरूप आपल्याला नव्या ज्ञानाचा प्रकाश प्रदान करते.

**(ख) स्व-शक्ती:**

''मी निर्बल कसा असू शकेन ? मी आयुष्यात कोणती ही लढाई कशी हरेन ? जर परमेश्वराचा वास सर्व प्राणीमांत्रामध्ये आहे तर मी स्वत:ला क्षुद्र का लेखू ?''अशी सशक्त भावना हीच भावना आपल्या सांसरिक व आध्यात्मिक जीवनाला यशस्वी करेल.

**(ग) स्व-कर्तव्य:**

''जीवनामध्ये आपले खरे कर्तव्य काय ? फक्त धनसंचय करणे हे का ? सांसरिक सुखांच्या मागे लागणे हेच खरे जीवन ध्येय असू शकेल का ?''-असा विचार. भोग जिवनाच्यापलिकडे भावजिवन असते व त्याचा अर्थ समजावून घेऊन त्याची अनुभूती करायची असते. त्याच्याही पलीकडे भद्रजीवन असते आणि असे ही जीवन आपल्याला जगता आले पाहिजे हे कर्तव्य समजावून घेतल्यानंतर आपल्या जीवनाला नवा अर्थ प्राप्त होतो . या सर्व स्वाध्यायांतर्गत अभ्यासल्या जात असत. नियमित स्वाध्याय केल्याने मनात सकारात्मक विचार एकत्रित होतात व मनशुद्धी होते आणि त्याचमुळे माणसाचा स्वाभिमान वृद्धीगंत होतोव त्यास यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगता येते.

## २.५ शिक्षकाचे महत्व आणि त्याची कर्तव्ये

शिक्षण हि द्विधुव्रात्मक प्रक्रिया असल्याने शिक्षक आणि विद्यार्थी हे त्याचे मुख्य घटक आहेत. गुरू विद्यार्थ्यांस (शिष्यास) शारिरिक, भौतिक आणि अध्यात्मिक ज्ञान देत. ही शिक्षण पद्धती जरी शिक्षककेंद्री असली तरी गुरु शिष्यांच्या गरजांचे आणि शंकांचे योग्यरित्या समाधान करीत.शिष्याच्या जीवनाचे फलीत हे गुरूच्या अध्यापन आणि मार्गदर्शनावर निर्भर असे. गुरू हे शिष्यांसाठी आध्यात्मिक पिता असत. वडिलांप्रमाणेच गुरू देखील आपल्या शिष्यांची काळजी घेत असत. शिष्यांच्या सर्वकष विकासाकडे गुरू जातीने लक्ष घालीत असत. शिष्यांच्या राहण्याची, खाण्याची आणि वैद्यकीय अशी सर्व व्यवस्था गुरूच आपल्या गुरूकुलात करीत असत. शिष्यांच्या वर्तनावर, आरोग्याकडे आणि चारित्र्याकडे गुरूचे बारकाईने लक्ष असे. त्याच बरोबर आजारी शिष्यांची सुश्रूषा करणे, त्यांच्या शकांचे निरासन करणे, कोणत्याही शिष्यांमध्ये गरिब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव न करता समान वागणूक देण्याचे काम गुरू करीत असत.कोणत्याही मोबदल्याशिवाय शक्य होईल त्यारितीने शिष्यांच्या सर्वांगीण विकासकडे लक्ष पुरविण्याचे महान कार्य गुरूकरवी केले जात असे.

या काळात गुरूला खूप मान दिला जात असे. हा सन्मान समाजाकडून तसेच राजाकंडूनही राखला जात असे. गुरूमुखातून निघालेला शब्द वा आज्ञा ही देवाच्या आज्ञे इतकीच महत्वाची मानली जात असे. शिक्षण परंपरेत गुरूला लाभणारा सन्मान हेच त्याकाळातील शिक्षणपद्धतीचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

## २.६ शिष्यांच्या जबाबदाऱ्या (विद्यार्थ्यांची कर्तव्ये)

वैदिक शिक्षणामध्ये गुरू-शिष्य संबंध याला प्राथमिक स्वरूपाचे महत्च आहे. उपनयन करून शिक्षण संपेपर्यत गुरुगृही राहणे आणि समावर्तन झाल्यानंतर स्वगृही परत येणे ह्या प्रक्रियेतून प्रत्येक शिष्याला जावे लागत असे. कोणत्याही शिष्यांस गुरूचे शिष्यत्व लाभण्यासाठी काही गुणांची आवश्यकता भासे. शिष्य म्हणून गणना होण्यासाठी त्या शिष्याठायी दिसणारे वा त्याचे शिष्यत्व दर्शविणारे गुणधर्म पुढीलप्रमाणे-

अ) जो गुरूने दाखविलेल्या मार्गाने जातो.

ब) जो गुरूच्या आज्ञेचे पालन करतो.

क) ज्याला गुरूकडून शिक्षाही केली जाऊ शकते.

उ) ज्याचे गुरूकडून कौतुकही होते.

इ) ज्याचे गुरूकडून धर्मोपदेश प्राप्त होतो.

फ) ज्यास समानतेने वागणूक मिळते .

ग) जो ज्ञानप्राप्तीसाठी स्वतःला वाहुन घेणारा (समर्पण )असतो.

धर्मसूत्रात गुरू-आणि शिष्यांसाठी काही नियम सांगितले आहेत. गुरूप्रती आस्था बाळगून त्यांनी घालून दिलेल्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन प्रत्येक शिष्याने करावे. संपूर्ण शिक्षणकला संपेपर्यत त्याने इतरत्र कोठेही न राहता गुरूसानिध्यात राहणे आवश्यक असे.

उजाडण्यापूर्वीच शिष्याला स्नान करून तयार रहावे लागे.सूर्योदयानंतर अग्निपूजा करणे, नवापाठ घेणे व जुन्याची उजळणी करणे मध्यान्हीस माधुकरी मागणे, भोजन करणे व दुपारी अभ्यास, संध्याकाळी संध्या, अग्निपूजा, रात्रीच जेवण नंतर अध्यायन, उजळणी व या शिवाय वेळ पडेल तेव्हा गुरूची सेवा व ते सांगतील ती कामे करणे याच बरोबर गुरूंचे गोधन राखणे, पाणी आणणे, लाकडे आणणे, शेतावर काम करणे अशा गोष्टी शिष्याला कराव्या लागत.

वरील दिनचर्ये प्रमाणेच शिष्याला काही शिष्टाचारांचे पालन करावे लागत असे. जसे गुरूंना नावने संबोधू नये, गुरूच्या समोर भिंतीला टेकूण बसणे, गुरूपेक्षा खालच्या जागी बसणे, पाय लांब करून बसणे इ. गोष्टी करू नयेत असा दंडक होता. शिष्याने गुरू उठण्यापूर्वी उठावे व गुरू निद्रिस्थ झाल्यावर झोपावे खोटे बोलू नये. दारूला स्पर्श करू नये, चारित्र्य निष्कलंक असावे हा महत्वाचा दंडक होता. तामसी आहार करू नये. शिवाय निंदा, प्राणी हत्या टाळावे. काया, वाचा, पोट यावर नियंत्रण ठेवावे. या सर्व गोष्टींकडे गुरूंचे बारकाईने लक्ष असे ; कारण साधी राहणी आणि उच्चविचारसरणी हे त्याकाळच्या शिक्षणाची मुख्य प्रेरणा होती. ब्रह्मचार्याचे पालन करणे हे सर्वांसाठी अनिवार्य होते.

## २.७ शैक्षणिक संस्था

वैदिक काळात शिक्षणाच्या मुख्य ६प्रकारच्या संस्था कार्यरत होत्या. त्या गुरूकुलाचाच एक भाग होत्या. कुल/गोत्र, चरण, परिषद चरक, परिवारजकचार्य आणि संमेलन या पैकी तीन संस्थाचा विचार येथे केलेला आहे त्या संस्था म्हणजे गुरूकुल, परिषद आणि संमेलन.

### १) गुरूकुलः

गुरूकुल म्हणजे जेथे गुरूचे वास्तव्य असते व जे मूळ वस्तीच्या गर्दी-गोंगाटापासून दूर नैसर्गिक वातावरणात वसलेले ठिकाण. गुरूकुलपद्धती हे ह्या काळातील एक वैशिष्ट्य होते.उपनयन संस्कार झाल्यावर प्रत्येक जातीवर्गानुसार वयाच्या ५व्या किंवा ९व्या वर्षापासून पालक आपल्या पाल्यास गुरूगृही पाठवित असत. गुरूगृही शिष्य हा गुरूच्या छत्रछायेखाली राहत असल्याने त्याच्या संस्कारक्षम मनावर गुरूच्या आचारविचारांचा प्रभाव पडत असे. अध्ययन काळात शिष्यांनी आपल्या गुरूसह गुरूगृही राहणे हा अर्थ गुरूकुलातून सूचित होतो. गुरूकुलामध्ये विद्यार्थ्याला शैक्षणिक व कौटुंबिक वातावरण मिळत असे. कौटुंबिक वातावरणामुळे शिस्त, शांतता, संयम, त्याग, प्रेम इ. धडे आपोआपच मिळत असत. गुरूकूलाचे वातावरण पवित्र, धार्मिक, आल्हाददायक असल्याने त्याचा उत्तम संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होत असे. गुरूकुलात गुरू आपल्या कुटुंबासह राहत असल्याने गुरू आणि त्याच्या कुटुंबाची सेवा करणे हे शिष्याचे प्राथमिक कर्तव्य मानले जाई.

### २) परिषदः

परिषद यात विविध प्रकारच्या एकाच विषयाशी संबंधीत शाखा यांच्या समावेश करण्यात आला. उपनिषदांच्या काळात अनेक विद्वान व्यक्ती एकत्र येऊन तात्विक प्रश्नांवर विचार करीत आणि विद्वान ब्राह्मणांनी एकत्र राहणे यातून परिषद ही संस्था कायम स्वरूपाची बनली. डॉ.मुखर्जी यांनी परिषदेची तुलना एका विद्यापीठाशी केली आहे आणि परिषद या संज्ञेखाली विविध क्षेत्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची आधुनिक कॉलेजशी तुलना करून त्यांना चरण ही संज्ञा दिलेली आहे.या परिषदांमधून नवीन कल्पना आणि विचार मांडले गेले आणि त्यातून नविन सिद्धांन्त निर्माण झाले.

### ३) संमेलनः

कोणत्याही विशिष्ट उद्देशाने एकत्रित येणे हा संमेलनाचा साधा अर्थ आहे. अशा प्रकारच्या शैक्षणिक संस्थेत सामन्यतः राजाच्या आमंत्रणावरून सर्व विद्वान मंडळी चर्चा करण्यासाठी, स्पर्धेच्या हेतूने वा काही शिकण्यासाठी एकत्रित येत असत. विद्वानांचा येथे सत्कार, गौरव केला जाई.

## २.८ सारांश

वैदिक व उत्तर वैदिक काळातील गुरू-शिष्यांचे नाते सलोख्याचे होते. शिक्षणाद्वारे 'सत्यम शिवम सुंदरम' हे तत्त्व शिष्यांना अंगीकृत करविले जात असे. वेद वाङःमयास शिक्षणात अनन्यसाधारण महत्व होते.व स्वाध्यायाला सुद्धा खूप महत्व दिले जाई. वैदिक काळ स्त्री शिक्षणास पूरक होता पण उत्तर वैदिक काळात याच्या स्वरूपात बदल झाला. प्राचीन भारतीय शिक्षणपरंपरेची मूळ धारणा होती ती समाजऋणाचे भान ठेवण्यावर शिक्षक आपल्या संपूर्ण पैशाचा उपयोग समाजऋण फेडण्यासाठी करीत. त्यामुळे त्यांना समाजात उच्च स्थानही होते. या कालखंडात शिक्षणाच्या कक्षेत येणारी सर्व उदाहरणे व दाखले हे पुढील पिढीसाठी शिक्षण व्यवस्थापनाच्या कार्यात मार्गदर्शक ठरतात. प्राचीन काळच्या गुरूंनी

शिक्षणात जी अग्रदूत म्हणून भूमिका बजावली आहे तिचे प्रत्येक शिक्षकाने अनुकरण करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी आपल्या कृतीतून सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त केली होती. शिष्यांच्या वर्तनावरही गुरूच्या कृतीचे चांगले संस्कार घडले जाई. त्यामुळे शिष्य देखील आपल्या गुरूस आपल्या पालकांइतकाच सन्मान देत असत.गुरूकुल, परिषद, संमेलन या सारख्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस योग्य न्याय मिळत असे.

## २.९ स्वाध्याय

१) उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) उत्तर वैदिक काळात आपणास कोणकोणते बदल झालेले दिसून येतात ?

३) वैदिक काळातील शिक्षणात शिक्षकाची भूमिका/कर्तव्य कोणती होती ते सांगा.

४) वैदिक काळातील शिक्षणाची आणि वर्तमान शिक्षण पद्धतीची चिकित्सकरित्या तुलना करा.

५) टिपा लिहा.

१) स्वाध्याय.

२) वैदिक कालीन शिक्षणात विद्यार्थ्यांचे कर्तव्ये.

३) वैदिक कालीन शैक्षणिक संस्था.

★★★

# प्रकरण ३
# बौध्द शिक्षण पध्दती

**घटक संरचना**

३.० उद्दिष्ट

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ बौध्द शिक्षण पध्दतीची वैशिष्ट्ये

३.२.२ विद्यार्थी : जेवण, राहण्याची व्यवस्था आणि अभ्यासक्रम

३.२.३ अध्यापनाच्या पध्दती

३.२.४ स्त्री शिक्षण

३.२.५ ब्राह्मणकालिन आणि बौध्द शिक्षणातील फरक

३.३ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ

३.४ सारांश

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या वाचनानंतर आपणांस

(१) बौध्द शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

(२) बौध्द शिक्षणामधील विद्यार्थीचे जेवण, त्याची राहण्याची व्यवस्था व त्यांच्यासाठी असलेला अभ्यासक्रम स्पष्ट करतील.

(३) बौध्द शिक्षणातल स्त्री शिक्षण कसे होते त्याचे स्पष्टीकरण करतील.

(४) बौध्द शिक्षण आणि ब्राह्मणकालिन शिक्षण यातील तुलना करतील.

## ३.१ प्रास्ताविक

बौध्द शिक्षण या घटकात आपण बौध्द शिक्षणाची वैशिष्ट्ये, विद्यार्थ्यांचे जेवण, त्यांची राहण्यांची व्यवस्था, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती, स्त्री शिक्षण आणि ब्राह्मणकालिन आणि बौध्द शिक्षणातील तुलना याचा अभ्यास करणार आहोत. यामध्ये बौध्द शिक्षणामध्ये कोणकोणत्या बाबींचा विचार केलेला होता त्याची काही माहिती यात दिलेली आहे. बौध्द शिक्षणात विद्यार्थ्यांबद्दलची माहिती देताना त्याची राहण्याची व्यवस्था, जेवणाची व्यवस्था आणि त्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम याचा विचार केलेला आहे. कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम ठरविल्यानंतर तो अभ्यासक्रम कसा शिकवायचा यासाठी वेगवेगळया

पध्दती सांगितल्या जातात. बौध्द शिक्षणात त्या पध्दती कोणत्या होत्या त्याही सांगितलेल्या आहेत. विशेषत: बौध्द शिक्षणात स्त्रीयांना जे स्थान दिले होते त्याचीही माहिती दिलेली आहे. शेवटी ब्राह्मणकालिन आणि बौध्द शिक्षणातील फरकही स्पष्ट केला आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ बौध्द शिक्षणाची वैशिष्ट्ये :-

अभ्यासाच्या हेतुच्या आधारे बौध्द शिक्षणाची जी वैशिष्ट्ये सांगितली जातात ती पुढीलप्रमाणे :-

**(१) पब्बज्जा:-**

वैदिक शिक्षणामध्ये उपनयन हा जो संस्कार केला जात होता त्याचप्रमाणे बौध्द शिक्षणात हा संस्कार केला जात होता. पब्बजाचा अर्थ बाहेर आणणे असा होतो. विद्यार्थी कुटुंबापासून वेगळा होवून बौध्द संघात प्रवेश करताना हा संस्कार केला जात होता, पण त्यासाठी आठ वर्षाच्या वयाची अट होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत शिक्षण दिले जात असे. संघ प्रवेशाच्या वेळी एक विधी केला जात असे. मठाचा सर्वश्रेष्ठ भिखु बालकाकडून खालील मंत्र तीन वेळा म्हणून घेत असे.

बुध्दं सरणं गच्छामि

धम्मं सरणं गच्छामि

संघं सरणं गच्छामि

या मंत्रावर भिखु दहा आज्ञा देत.

संघात घेतल्यानंतर त्याला आठ नियमाचे काटेकोरपणे पालन करावे लागत असे. ते आठ नियम असे : १) झाडाखाली राहणे २) साधी वस्त्रे अंगावर परिधान करणे ३) सात्विक भोजन घेणे ४) भिक्षा मागणे ५) औषध म्हणून गोमुत्र पिणे ६) अलौकिक शक्तीचा अभिमान न धरणे ८) स्त्रीयांशी संबंध न ठेवणे.

विद्यार्थ्याला श्रमण किंवा सामनेर या नावाने ओळखले जात होते.

**(२) उपसंपदा संस्कार :**

विद्यार्थ्याने बारा वर्षे अध्ययन केल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी हा संस्कार केला जात होता. हा संस्कार बौध्द संघातील कमीत कमी दहा शिशुच्या उपस्थितीत केला जाई. त्या विद्यार्थ्यांचा आचार्य म्हणजे गुरु असत. त्या आचार्याने आपल्या शिष्याची ओळख करुन देण्याची पध्दत होती. त्यात शिशु त्याला प्रश्न विचारत असत. विशेषता त्या प्रश्नाच्या उत्तरावरुनच बहुमताने त्याला संघात घ्यावयाचे की नाही ठरवित असत. त्यांनी निवडलेल्या भिखुजवळ १२ वर्षे शिक्षण त्यांना घ्यावे लागत असे. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याच्या दृष्टीने हा संस्कार किती महत्वाचा होता याची प्रचिती येते. तसेच यावरुन असेही स्पष्ट होते की शिक्षणामध्ये लोकशाहीचा वापर केला जात होता. दुसरे असे की विद्यार्थी केंद्री शिक्षण पध्दतीचाही वापर होत होता हे सिध्द होते. अर्थात संघातील सर्व नियमांचे पालन करण्याचे काम त्याला करावे लागत होते. एकदा विद्यार्थी श्रमण झाल्यानंतर सांसारिक गोष्टीशी त्याचे संबंध राहत नसे.

### (३) सर्वांना प्रवेश:

बौध्द शिक्षणात जात, धर्म, पंथ आणि लिंगभेद विरहित शिक्षण दिले जात होते. सर्वांना शिक्षणाची समान संधी होती. आज जसे आपण लोकशाहीत शिक्षण देतो तोच प्रकार त्या काळात होता. यावरुन त्याकाळी किती पुरोगामी विचार रुजलेले होते ते स्पष्ट होते.

### (४) विद्यार्थ्यांची निवड:

शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना काही अटी घालून दिलेल्या होत्या. या अटी घालण्याचे कारण केवळ शिक्षणातून चांगला नागरिक तयार व्हावा हा होता. त्या अटी पुढीलप्रमाणे होत्या :-

१) नपुंसक २) गुलाम - ज्याच्यावर कर्ज आहे ३) राजाचा नोकर ४) ज्याचे नाव डाकू, चोर म्हणून जाहीर झालेले आहे. ५) जो तुरुंगातून पळून आला आहे. ६) जो शरीराने धड नसेल. ७) ज्याच्या शरीराचा भाग विकृत झाला आहे. ८) ज्याला राजाकडून शिक्षा झाली असेल. ९) ज्याला शिकण्याची आई-बापाकडून परवानगी मिळाली नसेल. १०) ज्याला क्षय, महारोग किंवा इतर अनेक रोग झाले असतील. या सर्व अटी वरुन विद्यार्थी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ असावा हाच हेतु होता हे स्पष्ट होते.

### (५) शिक्षणाचे वय:

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या आठव्या वर्षापासून होत असे. विशेष म्हणजे अगदी परिपक्व वयापासून शिक्षण देण्याची पध्दत अतिशय मोलाची होती. दुसरे असे की विद्यार्थ्याला आपल्या स्वतःच्या गुरुची निवड करण्याचा अधिकार होता. त्यातून हे स्पष्ट होते की विद्यार्थी केंद्री शिक्षणाला किती महत्व दिले जाते होते.

### (६) शिक्षणाचा कालावधी:

वयाच्या आठव्या वर्षापासून तिसाव्या वर्षापर्यंत शिक्षण मिळत असे म्हणजे शिक्षणाचा कालावधी एकूण २२ वर्षाचा होता. सध्याच्या मेडिकल, इंजिनिअरिंग शिक्षणासाठी एवढा कालावधी लागतोच. तसाच त्यावेळी त्यांनी विचार केलेला दिसतो.

### (७) बौध्द शिक्षणातील शिक्षण संस्था:

बौध्द शिक्षणाचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे प्रगत शिक्षण संस्था, नालंदा विक्रमशीला, उदत्नपुरीविहार, तक्षशीला नदिया, जगदला, मिथीला यांचा जगभर नावलौकिक होता. वेगवेगळया देशातील विद्यार्थी या विश्वविद्यापीठातून शिक्षण घेत असत. विशेष म्हणजे या संस्थातून वेगवेगळया धर्माचाही अभ्यास केला जात असे म्हणजे त्या काळच्या शिक्षणात धर्मनिरपेक्षता किती मोठी होती हे सिध्द होते. ही सर्व बौध्द शिक्षणाची वैशिष्ट्ये असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द तत्त्वज्ञानाची चिकित्सा करुन नवीन बौध धम्माची मांडणी आपल्या Buddha and His Dhamma या ग्रंथात केली आहे.

## ३.२.२ विद्यार्थी : जेवण, राहण्याची व्यवस्था आणि अभ्यासक्रम :-

या अगोदरच्या भागात आपण शिक्षणासाठी विद्यार्थी कसा निवडला जात असे याची चर्चा केली आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण मठ, विहार आणि विद्यापीठातून होत असे. राहण्याच्या ठिकाणी त्यांना नियमाचे

पालन करणे आवश्यक होते. मठ व विहाराना राजाकडून मदत मिळत असे. विद्यार्थी शिक्षकांचे संबंधं अत्यंत जिव्हाळ्याचे होते. गुरुची त्यांना काही कामे करावी लागत असत. मठाची व्यवस्था राजे लोक करीत. त्यांनी विहारे देखील बांधली होती. काही वेळा सामान्य लोक अन्न पुरवीत असत. विद्यार्थ्यांनी लोखंड किंवा मातीपासून बनविलेली भिक्षापात्र घेऊन भिक्षा मागावी लागत असे. मठातील विद्यार्थ्याचे जीवन सामुहिक होते. त्यांना शिस्तीचे नियमही घालुन दिलेले होते. उदा. भिक्षा मागताना कोणावरही सक्ती करु नये. विद्यार्थ्याने शिक्षकाची सेवा करणे, भिक्षा मागणे, दिवसातून तीन वेळा जेवण घेणे, तीन वेळा कपडे बदलणे, शुध्द पाण्याने आंघोळ करणे आवश्यक होते. विद्यापीठामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जेवण मोफत होते. निवास व भोजन मोफत असल्यामुळे विद्यार्थ्यांना चिंता नव्हती ह्राएन त्संगच्या वेळी तीन हजार विद्यार्थ्यांना विद्यापीठ मोफत जेवण देत असे. तक्षशीला विद्यापीठ वसतिगृहयुक्त होते. असे असले तरी काही विद्यार्थी बाहेर देखील राहत होते. उदा. काशीचे राजपुत्र जान्हु खाजगी निवासात राहत होते. बौध्द शिक्षणात त्यांना जो अभ्यासक्रम होता तो पुढीलप्रमाणे :-

अ) **प्राथमिक स्तर (काल १२ वर्षे) :-** सिध्दीरस्तु नावाची बालपोशी व त्यातील वर्णमालाची ४९ अक्षरे, लेखन, वाचन, अंकगणित, शब्द विद्या, शिरप्रस्तान विद्या, चिकित्सा विद्या, हेतु विद्या व अध्यात्म विद्या अशा वेगवेगळया विद्या समाविष्ट केल्या होत्या.

ब) **उच्च शिक्षण:-** यामध्ये व्याकरण, धर्म, ज्योतिष, तत्त्वज्ञान, औषधशास्त्र व अन्य धर्माचा अभ्यास होता.

क) **व्यावसायिक शिक्षण:-** वास्तुशास्त्र, कृषी, व्यापार, पशुशास्त्र, धर्नुविद्या, भविष्यकथन, विविध गृह व्यवसाय, पशुचे बोलणे, शारीरिक संकेताचा अर्थ, शल्यविद्या, शिकार व हत्ती ज्ञान यांचा समावेश होता.

ड) **वाङ:मयीन शिक्षण:-** वाङ:मयीन शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे दोन भाग केले होते. एक धार्मिक अभ्यासक्रम तर दुसरा लौकिक अभ्यासक्रम होता. १) धर्मपिटीका-बौध्द तत्त्वज्ञानाची धार्मिक शिकवण २) विनयपिटीका-मठातील कायदे ३) अधिधर्म पिटीका-यात वरील दोन्ही पिटकाचे तात्वीक स्पष्टीकरण होते.धार्मिकमध्ये नावाप्रमाणेच हिंदु, जैन, तत्त्वज्ञान, अध्यात्म विद्या व तर्कशास्त्राचा समावेश केलेला होता तर लौकीक अभ्यासक्रमामध्ये शिवण, विणकाम, कताई इ. विषयाचा समावेश होता.

इ) शारीरिक शिक्षणामध्ये १) पोहणे २) रथ चालविणे ३) कुस्ती ४) हत्तीवर बसणे ५) तलवार चालविणे ६) दुसऱ्याच्या विचाराचा अंदाज बांधणे इत्यादीचा समावेश होतो.

ई) योगाचे शिक्षण

वरील अभ्यासक्रमातील विषयाचा विचार केला तर असे आढळून येते की, त्याकाळी समाजाच्या गरजांचा विचार करुन कसा प्रगत अभ्यासक्रम तयार केला होता हे सिध्द होते.

### ३.२.३. अध्यापन पध्दती :

अभ्यासक्रमाच्या स्वरुपानुसार शिक्षकाला आपली अध्यापन पध्दत निश्चित करता येते. मागच्या भागात आपण अभ्यासक्रमाबद्दलची माहिती पाहिलेली आहे. त्याचा विचार करुन त्यानी ज्या वेगवेगळया अध्यापन पध्दती वापरल्या जात होत्या त्या पुढीलप्रमाणे :-

**(१) मौखीक पध्दत:**

यामध्ये तोंडी प्रश्नोतरे व शुध्द उच्चारावर अधिक भर दिला जात होता. विद्यार्थ्यांकडून पाठांतर करुन घेतले जात असे. वर्गामध्ये जसे व्याख्यान पध्दतीने शिकविले जाते त्याप्रमाणे त्याचा वापर केला जात होता.

**(२) चर्चा पध्दती:**

चर्चेमुळे विचारांची देवाण घेवाण मोठया प्रमाणात घडू येते. शंका दुर करता येतात. बौध्द शिक्षणात भिखु एखादा विषय निवडून त्यावर चर्चा करत असत. वेगवेगळया धर्मावर आणि जीवन व्यवहारावर चर्चा होत असे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना चर्चेत भाग घ्यावयाला सांगत असत. आजही या पध्दतीची उपयुक्तता मोठी असल्यामुळे त्याचा वापर करणे गरजेचे आहे.

**(३) पृथक्करण आणि वर्गीकरण पध्दत :**

आज आपण बी.एड मध्ये विद्यार्थ्यांकडून पाठ तयार करायला सांगून तो घ्यायला सांगतो. त्या पाठात आशयाचे पृथक्करण करुन किंवा त्याचे वर्गीकरण करुन शिकवितो त्याप्रमाणे त्या शिक्षणात त्याचा वापर केला जात होता. त्यामुळे आशयातील बारकावे विद्यार्थ्यांना कळतात. संकल्पना स्पष्ट होतात. अशा या पध्दतीचा वापर त्याकाळीही मोठ्या प्रमाणात केला जात होता.

**(४) स्पष्टीकरण व प्रकटीकरण:**

नवीन सिध्दांत किंवा तत्वे समजावून सांगण्यासाठी स्पष्टीकरणाचा वापर केला जात असे. स्पष्टीकरण एकतर्फी होऊ नये म्हणून विद्यार्थ्याला त्या बाबतीत काही मते मांडण्यासाठी प्रकटीकरणाचा वापर होत होता. स्पष्टीकरणात उदाहरण व दाखले यांचा उपयोग केला जात होता. आजही आपण या पध्दतीचा वापर मोठ्या प्रमाणात करतो यावरुन ही पध्दत पूर्वीही वापरली जात होती हे सिध्द होते.

**(५) पर्यटन:- (भटकंती व प्रवास पध्दती):**

अनुभवातून मिळालेले ज्ञानाचे रुपांतर आकलनात होते. वेगवेगळया स्थळांना भेटी देवून त्याची माहिती दिली जात होती. विद्यार्थ्याला सामाजिक प्रश्नांची जाण येण्यासाठी सामाजिक परिस्थिती समजावून सांगण्यासाठी याचा उपयोग केला जात होता. आजकाल बीनभिंतीच्या शाळा याचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला आहे. ह्या पध्दती आजही आपण स्वीकारल्या असून शाळेत व महाविद्यालयात त्याचा वापर होत आहे.

**(६) वैयक्तिक मार्गदर्शन :**

त्याकाळी मठ किंवा विहारांतून विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जात होते त्यासाठी शिक्षक पहिल्या प्रथम विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेत व त्यानुसार मार्गदर्शन करत. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होत असत. सध्या तर आपण शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असला पाहिजे अशी भूमिका मान्य केली आहे.

### (७) वादविवाद पध्दती:

या पध्दतीचा वापर करण्याचे कारण म्हणजे बौध्द शिक्षणात वेगवेगळया धर्माचा समावेश केलेला होता. वेगवेगळया धर्माच्या तत्वाचे आकलन होण्यासाठी ह्या पध्दतीचा वापर केला जात होता पण त्यासाठी काही अटीचे पालन करणेही अगत्याचे होते. कारण केवळ वादासाठी त्याचा वापर होऊ नये हे पाहिले जात होते. आजही काही परिषदामधून असे अनुभव आपणास येत असतात तेव्हा एखाद्या विषयावर निकोप पध्दतीने चर्चा घडवुन याची हाच त्यामागचा हेतु होता.

### (८) पुरावा पध्दत:

खरे म्हणजे या पध्दतीचा वापर इतिहास विषयाचे अध्यापन करताना मोठ्या प्रमाणात केला जातो. याच पध्दतीचा वापर बौध्द शिक्षणामध्ये केला जात होता. इतिहास लिहण्यासाठी इतिहासातले पुरावे द्यावे लागत असतात. या पध्दतीचा वापर करण्यासाठी शिक्षकांना खालील पुरावे द्यावे लागत.

१) तात्वीक भाग किंवा सिध्दांत २) कारण ३) उदाहरण ४) समानता अथवा साधर्म्य ५) विरोधाभास ६) प्रत्यक्ष पुरावा ७) विधान ८) अनुमान याचा कसा वापर केला ते विद्यार्थ्याला सांगण्याची पध्दत होती. यावरुन त्याकाळी अध्यापन किती उच्च दर्जाचे होते ते स्पष्ट होते. आजच्या शिक्षकाला आपले अध्यापन प्रभावी करण्यासाठी या पध्दतीचा वापर करणे गरजेचे आहे.

### (९) तर्कशास्त्राचा वापर :

मनुष्य हा बुध्दीवादी प्राणी आहे. तर्कसंगत विचार करुन मांडलेले मुद्दे प्रभावी ठरतात. चर्चा पध्दतीत तर याचा मोठ्या प्रमाणात वापर त्याकाळी केला जात होता. आजही आपण उदाहरणाकडून नियमाकडे जाताना याचा उपयोग करतो. तर्कामुळे विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता विकसित होते. शिक्षणातून तर्क करण्यासाठी आजही त्याचे महत्व अन्यन्यसाधारण असे आहे.

### (१०) विद्वानाच्या परिषदा:

बौध्द शिक्षणात याला खूप मोठे महत्व होते कारण भिख्खुंना वेगवेगळया ठिकाणी जावून धर्माचा प्रसार करण्याचे काम करावे लागत असे. त्याची पूर्वतयारी म्हणून बौध्द संघात प्रत्येक पौर्णिमेला व प्रतिपदेला विद्वान मंडळींच्या सभा होत असत. त्यात भिख्खु आपली मते निर्भिडपणे मांडत असत. प्रत्येक भिख्खुने अशा विद्वानाच्या परिषदेला हजर राहणे बंधनकारक होते. त्याशिवाय एक वार्षिक परिषदही होत असे. त्यात विद्यार्थ्यांना आपली मते मांडण्याचा पूर्ण अधिकार दिलेला होता. आजही आपण उच्च शिक्षणामध्ये या पध्दतीचा वापर करत असतो.

### (११) एकांतामध्ये ध्यानधारणा:

गौतम बुध्दाने आपल्या जीवनामध्ये ध्यान धारणेला खूप महत्वाचे स्थान दिले होते. भिखु जंगलामध्ये एकांतात बसून ध्यानधारणा करत त्यामुळे त्यांना एखाद्या गोष्टीचे रहस्य उलगडत असे. विद्यार्थ्यांनाही त्याचे शिक्षण दिले जात असे. आजच्या परिस्थितीमध्ये अशा पध्दतीची गरज आहे असेही आपणाला वाटते.

### (१२) प्रकल्प पध्दत:

गौतम बुध्दानी ब्राह्मण वरदवजासाठी ह्या पध्दतीचा वापर केला होता.

### ३.२.४ स्त्री शिक्षण:

स्त्रीयांना संघात प्रवेश मिळत असे. त्यामुळे त्यांना एक प्रकारची मुक्ती मिळत असे. स्त्रीयांसाठी वेगळया मठाचीही व्यवस्था केली होती. स्त्रीयांना बौध्द तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी वेगवेगळया देशात पाठविले जात होते. त्यातील ठळक उदाहरण म्हणजे संघमित्रा यांना सिलोनमध्ये धर्मप्रचारासाठी पाठविले होते. स्त्रीयांना मिळणाऱ्या समान वागणुकीमुळे अनेक कर्तृत्ववान स्त्रीया तयार झाल्या. त्यात सुप्रिया, विशाखा, आम्रपाली, शील भटारिका, विजयांका प्रभु देवी याचा विशेष उल्लेख करावा लागेल. स्त्रीयांना समान स्थान देणाऱ्या बौध्द धर्माचा स्वीकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. बौध्द धर्माच्या तत्वाचा एक भाग म्हणून स्त्रीयांसाठी त्यांनी हिंदु कोड बील आणले. भारतीय राज्य घटनेतही स्त्रीयांना समानतेचा अधिकार दिला. यावरुन स्पष्ट होते की बौध्द शिक्षणात स्त्रीयांना प्रतिष्ठा जी मिळाली होती ती आजच्या शिक्षणातूनही जपणे आवश्यक आहे.

### ३.२.५ बौध्द शिक्षण आणि ब्राह्मणकालीन शिक्षण यातील फरक आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| बौध्द शिक्षण | ब्राह्मणकालीन शिक्षण |
|---|---|
| १) बौध्द शिक्षणाचा पाया गौतम बुध्दाने घातला | १) ब्राह्मणकालीन शिक्षणाचा पाया कोणीही घातला नाही. |
| २) बौध्द शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सिध्दीरस्तु हे पुस्तक पुर्ण केल्यानंतर तर्कशास्त्र, व्याकरण व शास्त्र यांचा समावेश केला होता. | २) ब्राह्मणकालीन शिक्षणाच्या अभ्यासक्रमात चार वेदा बरोबरच व्याकरण, फलज्योतिष, न्याय, अर्थशास्त्र, इतिहास, वैद्यकशास्त्र यांचा समावेश केला होता. |
| ३) बौध्द शिक्षणात सार्वजनिक शिक्षणाची व्यवस्था होती. जात, धर्म, पंथ व लिंग विरहीत शिक्षण दिले जात होते. शिक्षणात जातीभेद पाळले जात नव्हते. | ३) ब्राह्मणकालीन शिक्षणात सार्वजनिक शिक्षणाची व्यवस्था नव्हती. वैदिक काळात शिक्षणाची समान संधी दिली गेली होती परंतु ब्राह्मणकाळात मात्र ती नाकारली गेली. वर्णव्यवस्थेला महत्व दिलेले गेले होते. |
| ४) बौध्द शिक्षणात सर्व जातीतील वर्गातील आणि धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षण खुले होते. | ४) ब्राह्मणकालीन शिक्षणात ब्राह्मणांनाच शिक्षणाचा अधिक अधिकार दिला होता. शुद्रांना शिक्षण घेण्याची बंदी होती. |
| ५) बौध्द शिक्षणात सामान्य लोकांच्या शिक्षणासाठी सामान्य विद्यालये होती. | ५) ब्राह्मणकालीन शिक्षणात सामान्य लोकांच्या शिक्षणासाठी सामान्य विद्यालये नव्हती. |

| बौध्द शिक्षण | ब्राह्मणकालीन शिक्षण |
|---|---|
| ६) बौध्द शिक्षणातील शिक्षण देणाऱ्या संस्था लोकशाही पध्दतीने कारभार करत होत्या. मठ आणि विहारातून विद्यार्थी शिक्षण घेत होते. समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक शिक्षण देत असत. | ६) ब्राह्मणकालीन शिक्षण गुरुकुल पध्दतीने शिक्षण दिले जात होते. गुरुकुल ही संस्था एकतंत्रवादी होती. |
| ७) बौध्द शिक्षणाचे स्वरुप संघटनात्मक संस्था स्वरुपी होते. | ७) ब्राह्मणकालीन शिक्षणाचे स्वरुप व्यक्तीगत होते. गुरुच्या आश्रमात जावून विद्यार्थी शिक्षण घेत असे. |
| ८) बौध्द शिक्षणात विभिन्न जातीतील भिख्खू शिक्षक होते. | ८) ब्राह्मणकालीन शिक्षणात शिक्षक ब्राह्मण जातीतील होते. |
| ९) बौध्द शिक्षणात शिष्ट्यावर कडक बंधने नव्हती. | ९) ब्राह्मणकालीन शिक्षणात शिष्यावर अनेक कडक बंधने होती. |
| १०) बौध्द शिक्षणात विद्यार्थ्याला भिख्खू म्हटले जात होते. | १०) ब्राह्मणकालीन शिक्षणात विद्यार्थ्याला शिष्य म्हटले जात होते. |
| ११) बौध्द शिक्षणात शिक्षणाचे माध्यम लोकभाषा होती. पाली, पाकृत स्थानिक भाषेतून शिक्षण दिले जात होते. | ११) ब्राह्मणकालीन शिक्षणात शिक्षणाचे माध्यम संस्कृत होते. |
| १२) बौध्द शिक्षणात अध्ययन अध्यापनासाठी अनुमान पध्दत, चर्चा पध्दत, ध्यानधारणा, तज्ञ लोकांची व्याख्याने याचा अवलंब केला जात होता. | १२) ब्राह्मणकालीन शिक्षणात अध्ययन अध्यापनासाठी पाठांतर, स्पष्टीकरण, प्रश्न विचारणे व योग याचा अवलंब केला जात होता. |
| १३) पहिल्याप्रथम घर व नंतर मठात शिक्षण घेण्याची पध्दत होती. त्या मठ किंवा विहारालाच शैक्षणिक संस्था म्हटले जाई. | १३) ब्राह्मणकालीन शिक्षण मुख्यत्वे घरगुती शिक्षण होते ज्यामध्ये जंगल हे घर समजून तरुण विद्यार्थ्यांना त्यात समाविष्ट करुन घेतले जात होते. |
| १४) विद्यार्थी जेव्हा घर सोडून विहारात शिक्षणासाठी जात असले जरी त्याने त्यात शिक्षण पूर्ण केले तरी पुन्हा घरी जाण्याची त्याला परवानगी नव्हती. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला बौध्द धर्माचा प्रसार करण्यासाठी बाहेर जावे लागत असे. | १४) उपनयनानंतर १२ वर्षे गुरुजवळ राहावे लागे आणि हा कालावधी संपल्यानंतर घरी जाणे, लग्न करणे किंवा ऐहिक जीवन जगण्याचा पर्याय दिलेला होता. |
| १५) बंधुवर्गामध्ये जेव्हा खाजगी मालमत्ता रद्द केला गेला तेव्हा याच बंधुवर्गाने स्वतः मोठ्या प्रमाणात मालमत्ता धारण करुन मोठे श्रीमंत झाले आणि त्यांनी मठाला देणग्या दिल्या. | १५) खाजगी मालमत्ता बाळगण्याचा अधिकार गुरुकुलाला, गुरुला किंवा शिष्याला नव्हता. |

| बौध्द शिक्षण | ब्राह्मणकालीन शिक्षण |
| --- | --- |
| १६) शिक्षक विद्यार्थ्यांवर नियंत्रणकरीत असल्यामुळे ब्राह्मणकालीन शिक्षणाप्रमाणे त्याचे संबंध तेवढेच जिव्हाळयाचे नव्हते. | १६) शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते अत्यंत जवळचे आणि जिव्हाळयाचे होते. गुरु वर्गाला शिक्षण न देता वैयक्तिक फरकानुसार शिक्षण देत असत. गुरुने शिष्याचे सातत्याने पर्यवेक्षण करण्याची तरतुद होती. |
| १७) जो शिक्षणासाठी येईल त्याला शिक्षण दिले जात होते. सर्व जातीसाठी सारखे शिक्षण होते. | १७) शिक्षण सार्वत्रिक होते परंतु अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण हे सर्व जातीसाठी सारखे नव्हते. योग्यतेनुसार शिक्षण होते. |
| १८) अध्यापनाची पध्दतीमध्ये चर्चा, अनुयान आणि प्रात्यक्षिक पध्दतीचा वापर केला जात होता. शिक्षण मेळावा आयोजित करुन त्यांनी जे मठातून शिक्षण घेतले त्याला प्रात्यक्षिक आकार देण्याचा प्रयत्न केला जात असे. | १८) अध्यापनाची पध्दत मौखीक होती. |
| १९) अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणाचे विषय नव्हते. | १९) शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय होते. असे असले तरी धार्मिक वाङ:मयीन सैनिकी, व्यापारी आणि व्यावसायिक शिक्षण देण्याची तरतुद होती. |

## ३.३ परिभाषिक शब्द

१) Buddist Education - बौध्द शिक्षण

२) Characteristics of Buddhist Education- बौध्द शिक्षणाची वैशिष्ट्ये

3) Pupil: - Meals, residence and curriculum - विद्यार्थी:- जेवण राहण्याची व्यवस्था आणि अभ्यासक्रम

४) Methods of teaching - अध्यापन पध्दती

५) Female Education - स्त्री शिक्षण

६) Comparison of Buddhist and Brahmanical Education- बौध्द आणि ब्राह्मणिक शिक्षणाची तुलना

## ३.४ सारांश

बौध्द शिक्षण ब्राह्मणकालीन शिक्षणानंतर अस्तीत्वात आले. त्यामुळे त्यांची वैशिष्ट्ये वेगळी होती त्याचा प्रथम अभ्यास करण्यात आला. वैशिष्ट्याचा विचार केल्यानंतर या शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था कशी होती याचाही अभ्यास करुन त्यांच्यासाठी तयार केलेल्या अभ्यासाची माहिती घेतली. अभ्यासक्रमाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी ज्या वेगवेगळया पध्दती वापरल्या गेल्या त्याचीही विस्तारपूर्वक मांडणी केली. या शिक्षणात स्त्रीयांचे स्थान कोणते होते याचा आढावा घेतला. शेवटी बौध्द शिक्षण आणि ब्राह्मणकालीन शिक्षण यातील फरक स्पष्ट केला गेला आहे.

★★★

## प्रकरण ४

# मुस्लिम शिक्षण

# अ - मुस्लिम शिक्षणाचा परिचय

**घटना संरचना**

४अ.० उद्दिष्ट्ये

४अ.१ प्रस्तावना

४अ.० मुस्लिम शिक्षण पद्धतीचा परिचय -वैशिष्ट्ये

४अ.१ शिक्षण संकल्पना

४अ.२ मुस्लिम शिक्षण पद्धतीचे तत्त्वज्ञान

४अ.३ शिक्षणाची ध्येये

४अ.४ औद्योगिक शिक्षण

४अ.५ ललित कलांचे शिक्षण

४अ.६ अध्यापन पद्धती

४अ.७ अभ्यासक्रम

४अ.८ शिस्त, स्वातंत्र्य आणि शिक्षा बक्षिसे

४अ.९ युद्धकला (सैनिकी)शिक्षण

४अ.१०शिक्षणासाठी वसतीगृहे

४अ.११ बिसमिल्लाखानी (मक्ताब)समारंभ

४अ.१२ वर्गनायक पद्धती

४अ.१३ परीक्षा पद्धती

४अ.१४ वैद्यकी शिक्षण

४अ.१५ वाङःमय व इतिहास

४अ.१६ निःशुल्क शिक्षण

४अ.१७ ज्ञान प्रसाराची साधने

४अ.१८ शिक्षण सर्वासाठी खुले

४अ.१९ शिक्षणात सत्ताधिशांच्या विचारांन अनुसरून बदल

४अ.२० राजाश्रयी शिक्षण

४अ.२१ पदवीदान समारंभ

४अ.२२ आपली प्रगती तपासा

४अ.२३ सारांश

४अ.२४ स्वाध्याय

## ४अ.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही -

१. मुस्लिम शिक्षण पद्धतीची पार्श्वभूमी स्पष्ट करू शकाल.

२. मुस्लिम शिक्षण पद्धतीचा परिचय करवून दयाल.

३. मुस्लिम शिक्षण पद्धतीचे तत्त्वज्ञान स्पष्ट करू शकाल.

४. मुस्लिम शिक्षणाची ध्येये स्पष्ट करू शकाल.

५. मुस्लिम शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करू शकाल.

## ४अ.० प्रस्तावना

शिक्षण कसे द्यावे ही समस्या प्रत्येक काळातील शासन कर्त्यांना भेडसावत असते. प्रत्येक काळात विशिष्ट शिक्षणपद्धती प्रचलित असतात या शिक्षणपद्धतीचा प्रभाव त्याकाळातील एकूणच शिक्षणावर आणि सामाजिक सांस्कृतिक जीवनावर पडत असतो. भारतासंदर्भात विचार करता भारतावर जवळ-जवळ ६५०वर्षे मुस्लिमांचे अधिपत्य होते. या काळात विविध राज्यकर्त्यांनी शिक्षणाचा विचार केला. या बाबतची पार्श्वभूमी अगोदर समजून घेणे आवश्यक ठरते.

## ४अ.१ पार्श्वभूमी

भारताच्या संपत्तीकडे आकृष्ट होऊन महमद गझनीने अनेक वेळा या देशावर आक्रमणे केलीत. यात इ.स.१०२४ मध्ये सोमनाथावर केलेले आक्रमण प्रसिद्ध आहे. महमदानंतर १३० वर्षांनी गजहनीच्या गादीवर मोहमद घोरी बसला. हा अतिशय महत्त्वकांक्षी होता. त्याने ११९२ मध्ये दिल्लीचे सम्राट पृथ्वीराज चौहान यांना पराभूत करून मुस्लिम राजवटीची स्थापना केली.

राज्यस्थापनेनंतर त्याने भारतातील शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न केले. त्याने मंदिरे तोडून मशिदी बांधल्या तसेच मुस्लिम शिक्षण पद्धतीची मुहुर्तमेढ रोवली. त्याचा सेनापती बाखीयार खिलजी याने नालंदा आणि विक्रमशीला अशा शैक्षणिक केंद्राचा सर्वनाश केला.

इ.स.१२०६मध्ये मोहमद घोरीचा मृत्यू झाला तेव्हापासून १५२६पर्यंत भारतात सुलतानांचे राज्य होते. या अवधित गुलाम, खिलजी, तुघलक, तसेच सैयद लोदी या नावाच्या पाच राजवंशानी सत्ता संपादन केली. इ.स.१५२६मध्ये इब्राहिम लोदीला हरवून बाबराने मुगल वंशाची स्थापना केली.

इ.स.१५२६ ते इ.स. १८५७ पर्यंत भारतात मुगलांचे राज्य होते. या वंशात बाबर, हुमायुन, अकबर, जहॉंगीर, शाहजहाँ आणि औरंगजेब हे प्रमुख शासनकर्ते झालेत.बहादूरशहा हा या वंशातील शेवटचा शासनकर्ता होता.

इ.स.१८५८मध्ये इंग्रजांनी बहादूरशहा जाफर याला सत्तेतून पायउतार करून कैदी केली व रंगून येथे पाठविले. अखेर इ.स.१८५८मध्ये भारतात मुस्लिम राजवट संपुष्टात आली. या प्रमाणे भारतात मुस्लिमांचे राज्य इ.स. १२०६ ते इ.स.१८५८ असे जवळ जवळ ६०० वर्षे होते.

या काळात शिक्षणाच्या स्वरूपात अनेक परिवर्तन आलित. ज्या देशात आजपर्यंत शिक्षणात वैद्यिक ऋचा आणि बौद्धसूत्राचे अध्ययन-अध्यापन होत होते त्या देशात 'मकतब' आणि 'मदरसा' मधून कुरआन तसेच इस्लामी धर्मग्रंथाचे वाचन-पठण सुरू झाले. संस्कृत आणि प्राकृत भाषेचा प्रभाव हळू हळू क्षीण होत गेला. आणि फारशी ही राज्यभाषा असल्याने लोक फारशीच्या अध्ययनाकडे वळू लागले. फारशी भाषेची जाण ज्यांना आहे त्यांना शासन दरबारी चांगल्या पदावर नोकऱ्या मिळू लागल्या. पुढे संस्कृत आणि फारशी यांच्या आदान प्रदानातून उर्दू भाषेचा जन्म झाला.

सातव्या शतकात महमद पैंगबराने इस्लामीधर्माची तत्त्वे सांगीतलीत. या तत्त्वांचे अनुकरण करणाऱ्यांना इस्लामिक किंवा इस्लाम असे म्हणतात. मुस्लिमांनी पैसंबराचे तत्त्वज्ञान मुस्लिम शिक्षण पद्धतीत आणला त्या शिक्षण पद्धतीला मुस्लिम शिक्षण पद्धती किंवा 'इस्लामिक शिक्षंण पद्धती' म्हणतात. किंवा मध्ययुगीन शिक्षण पद्धती म्हणतात.

## ४अ.० मुस्लिम शिक्षण पद्धतीचा परिचय-वैशिष्ट्ये

### २.१ 'शिक्षण 'म्हणजे काय? (संकल्पना):

शिक्षण म्हणजे कशाने आत्मा पूष्ट बनतो किंवा आत्म्याचे नुकसान होते ते जाणून घेणे होय.

**-इनाम आबू हनिफा**

प्रत्येकान हे जग व मृत्यूनंतरचे जग या बाबतीत बरोबर प्रत्येकाने जग व मृत्यूनंतरचे जग या बाबतीत बरोबर काय आहे, चूक काय आहे यातील फरक जाणून घ्यावा.व जी बरोबर वर्तणूक आहे ती निवडावी म्हणजे बुद्धि त्यास चुकीच्या मार्गावर नेणार नाही असे न केल्यास अल्लाच्या रोषास पात्र होईल.

मुस्लिम शिक्षण हे मूलतः धार्मिक शिक्षण असून त्याचा उद्देश पवित्र कुराणात मानवाचा जो परमेश्वरांशी संबंध स्पष्ट केला आहे ते जाणणे असा होता.

## ४अ.२ मुस्लिम शिक्षण पद्धतीचे तत्त्वज्ञान

१. **'ला ईलाह ईलिल्लाह मुहमद दुर्र रसुल्लाह'** हा मूलमंत्र होय (या जगात अल्लावाचून दुसरा कोणी पुज्यनिय नसून मुहमद रसूल त्याचे दूत आहेत.)

२. ईश्वराने मुहमदाद्वारे **पैगाम** (संदेश) पोहचविला आहे.

३. इस्लामि तत्त्वज्ञानाचे **'इमान'**(श्रद्धा) व **'अमल'** (आचरण) असे दोन भाग आहेत. 'इमान' या सहा बाबींचा समावेश होतो. अल्लाह, देवदूत, देव प्रणित ग्रंथ, देवाचे प्रेषित, अंतिम निवाड्याचा दिवस, ईश्वराचे आदेश नबीने (परम ज्ञानाची घोषणा करणारा) /ईश्वराने /अल्लाने घोषित केलेल्या सत्याची स्थिती म्हणजे ईमान होय. 'अमल' मध्ये कलमा पठण (अध्ययन), मुलमंत्र पठण, पाचवेळा नमाज, रमजान महिन्यात रोजा, सूर्यास्तानंतर जेवण, वार्षिक उत्पन्नाचा २.५%

हिस्सा जकात म्हणून दानधर्मासाठी ठेवणे. जीवनात मक्केची (हजयात्रा) यात्रा एकदा तरी करणे. या बाबी येतात.

४. इस्लामचे पूर्ण पालन करणारा '**मुअमीन**' तर एकाही बाबतीत पालन न करणाऱ्यास 'काफील' असे म्हणतात.

५. '**ज्ञान**' म्हणजे उत्कृष्ठता, ज्ञानाच्या माध्यमाने परमेश्वराशी जवळीक साधता येईल. मनुष्य हा पृथ्वीवरील सर्वात उत्कृष्ठ प्राणी व बुद्धिमत्ता हा त्याचा सर्वात चांगला गुण होय. ज्ञान शिकविणे म्हणजे पूजा होय''

**-अल-गझाली.**

६. **तत्त्व**-अल्ला सर्व शक्तीमान व एकमेव आहे त्याच्या संदेशानुसार आचरण करावे

७. **मूल्ये** - नम्रमा, त्याग, साधेपणा, शिष्टाचारयुक्त वर्तन, प्रामाणिकपणा, न्यायसंमत आचरण, चिकाटी, धैर्य, शूरता हास्य इत्यादी. आचरण प्रेषित मुहमदने केले.

८. **सत्य**- पवित्र कुरआन मध्ये जे सांगितले ते अंतिम सत्य होय त्यानुसार आचरण करावे.

## ४अ.३ शिक्षणाची ध्येये

### १. ज्ञान प्रसार (Spred of light of Learning):

स्त्री अथवा पुरूष कोणीही असो त्यांनी जीवन भर ज्ञानाचा शोध घ्यावा ज्ञान संपादन करणे हे त्यांचे कर्तव्य होय. सर्व मुस्लीम राजवटीवर मंहमद पैगबंराच्या विचार सरणीचा प्रभाव होता. त्यामुळे सर्वच बादशाह ज्ञान प्रसाराच्या कार्याला प्रथम प्राधान्य देत. कारण ज्ञानग्रहण केल्यामुळे मुक्ती मिळते. मुक्तीचे ते एक साधन मानले जाई.लष्करी शिक्षण, युद्धशिक्षणापेक्षा ज्ञानाला अधिक महत्त्व होते कारण'हुतात्म्याच्या रक्तापेक्षा विद्यार्थ्यांच्या लिखाणाची शाही पवित्र असते.'असे लिहिण्याच्या शाहीचे वर्णन केल्याचे आढळते. ज्ञान हे अमृत आहे आणि ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे कारण ज्ञानानेच धर्म-अधर्म ,कर्तव्य-अकर्तव्य यातील फरक जाणता येतो. सच्चा मुसलमानाने 'ज्ञान ग्रहण' केले पाहिजे असा मंहमद पैगबरांचा आग्रह असल्यामुळे मूस्लीम शिक्षणाचे ज्ञानप्रसार हे महत्वाचे ध्येय होते.

### २.धर्मप्रसार-(Propogation of Islam):

मुस्लीम, इस्लाम धर्माचा प्रसार करणे हे पुण्य कार्य (सबाब) समजत असत. धर्माचा प्रचार व प्रसार हा शिक्षणाच्या माध्यमातून योग्य तऱ्हेने होऊ शकतो, असा विश्वास असल्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून धर्मप्रसार होत असे. मदरसांमधून धर्म, दर्शनसाहित्य, इतिहास, अध्ययन-अध्यापनातून धर्म प्रसार होत असे.

### ३. विशिष्ट नैतिकतेचा प्रसार (Infussion of distince Morality):

इस्लाम धर्मास अपेक्षित असलेल्या नैतिकतेचा प्रसार करणे हे एक शिक्षणाचे ध्येय होते. इस्लामचे कायदे, सामाजिक परंपरा व राज्य शास्त्राची तत्वे यावर आधारित नीतीमत्तेचा पुरस्कार करून समाजाची नितीमत्ता वाढविण्याचा प्रयत्न असे.

**४. ऐहिक प्राप्ती संपादन करणे (Achievement of material property):**

अर्थ प्राप्ती हे ऐहिक सुखाचे माध्यम आहे. शिक्षणाच्या प्रसारासाठी सरकार दरबारातील उच्च पदाचे आकर्षण राज्यकर्त्याकडून जनतेसमोर ठेवले जाई. आपल्या भौतिक उन्नतीसाठीही लोक मुस्लीम शिक्षण घेत असत. त्यांना सरकारात 'सिपसालाहार', 'काजी' अथवा 'वजीर' अशी पदे मिळत होती.हे शिक्षण भौतिक जीवनाशी जवळचे होते. समाजातून उत्तम कारागीर, कवी, इतिहासकार, न्यायधिश, व्यावसायिक, राजकारणपटू निर्माण व्हावेत असा प्रयत्न असे. त्यासाठी राज्यकर्ते विद्यावेतन, बक्षिसे, जहॉगिरी अशी अमिषे ठेवीत असत. यावरून जीवनात भौतिक सुख कसे वाढेल आणि त्यासाठी शिक्षणाचा उपयोग कसा होईल अशी व्यवस्था होती.

**५.मुस्लिम राज्यास स्थिरता व बळकटीचा प्रयत्न (Establishment of muslim superemacy):**

मुस्लिम राज्यकर्ते भारतीयांना शिक्षणातून आपली सभ्यता, संस्कृती आणि निती यांचे शिक्षण देत. ज्यांच्यावर राज्य करावयाचे त्यांची सहानुभूती मिळविणे गरजेचे होते व राज्यकारभारही व्यवस्थित चालविता येईल हे धोरण लक्षात घेतले होते.

**६. धर्मपरायणता निर्माण:**

मुस्लिमांमध्ये धर्मपरायणता निर्माण व्हावी हा एक उद्देश मुस्लिम शिक्षणाचा होता. त्यासाठी 'मक्तब' व 'मदरसा' हे विभाग मशिदित असत. मशिदित सामुहिक 'नमाज' होत असे ज्यामुळे व्यक्तीत धर्मपरायणता निर्माण होईल.

**७. अरबी, फारशी भाषेचा विकास:**

धर्म प्रसार हे मुस्लिम राज्यकर्ते मानत. इस्लामची शिकवण, त्यांचे धार्मिक ग्रंथ हे अरबी, फारशी भाषेत असत राजदरबारातील व्यवहार याच भाषांमधून होत असे. त्यामुळे अरबी, फारशी, उर्दु भाषांचा विकास शिक्षणातून साधणे क्रमप्राप्त होते. या भाषेतून इस्लामाचे तत्त्वज्ञान शिक्षणातून दिले जाई. आणि शिक्षणातून या भाषांचा विकास आपोआपच साधला जात असे.

**८. चारित्र्य संवर्धन:**

या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांमध्ये योग्य सवयींचा विकास करण्यास संधी असे. मक्तब व मदरसा या स्तरावर असणाऱ्या शिक्षणातून चांगले चारित्र्य घडवून एक चांगले व्यक्तिमत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असे.

## ४अ.४ औद्योगिक शिक्षण (Vocational Education)

शिल्पकला, हस्तव्यवसाय, चित्रकला, स्थापत्यकला, विणकाम इ. शिक्षण मुस्लिम शिक्षण प्रणालीत दिले जात असे. या शिक्षणासाठी अनेक कारखाने व कारागीरांची कुटूंबे उपलब्ध होती त्यांना अशा प्रकारचे शिक्षण घेण्याची गरज अथवा इच्छा होती त्यांना कौशल्यप्राप्त कारागीरांकडून त्यांचेकडे जावून शिक्षण घ्यावे लागत होते. हे शिक्षण नि:शुल्क असे. घराघरातही हे शिक्षण वडिलोपार्जित व्यवसायातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असे. अकबर, जहागीर, शहाजहान यानी या विविध शिक्षणकलांना उत्तेजन दिले. पूल, सार्वजनिक विहिरी, बागा, कालवे, सुंदर इमारती, मशिदी, रस्ते मुघल काळात झालेली आहेत. व्यवसाय शिक्षण कारखान्यामधून घेतल्यानंतर पोट भरण्यासाठी

नोकरी मिळत असे किंवा स्वतःचा व्यवसायही सुरू करून कौशल्ययुक्त चांगल्या कारागीरांना राजाश्रय मिळे. हस्त व्यवसायाच्या शिक्षणाला प्रारंभ लहान वयातच होई. कामात प्रगती झाली की, पगार देत असत. सर्व कामे कारखान्यांच्या देखरेखीखाली चालत असत.

## ४अ.५ ललीत कलांचे शिक्षण

मुस्लिम राजवटीत ललीत कलांना फार उत्तेजन मिळाले. वैभव, थाटमाट, ख्याली-खुशाली, चैन यांचा राजे, महाराजे यांना शौक होता. उत्तमोत्तम चित्रकार, गवई, वादनकार अशा मंडळींना राजाश्रय मिळे. मुघलकालीन चित्रे व कला कुसरीच्या वस्तू यांनी जगाचे लक्ष वेधले. नृत्य कलेलाही राजदरबारी स्थान होते. ताजमहाल, लाल किल्ला, दिवाण-ईआम, स्नानगृहे इ. कलापूर्ण गोष्टी भारताच्या वैभवाची आजही साक्ष देत आहेत. भारतातील कुसरीस परदेशात मोठी बाजारपेठ होती.

## ४अ.६ अध्यापन पद्धती

मौखिक, व्याख्यान, प्रात्यक्षिक, सराव (Tibil, Riyazi, Ilani, Practice), स्व-अध्यायन आणि उदगामी-अवगामी पद्धती होत्या.चर्चा, पत्रलेखन, मनन, प्रश्न इ. पद्धती तसेच उदाहरणांचा वापर अध्यापनात होता.

## ४अ.७ अभ्यासक्रम

लेखन, वाचन, गणित, फारशी, उर्दु, कुरआण व इतर धार्मिक ग्रंथ, महमद पैगंबराची वचने, इस्लामी कायदा, इतिहास, व्याकरण, भुगोल, गणित, तर्कशास्त्र, ज्योतिष अर्थशास्त्र,सैनिकी शिक्षण यांचा समावेश अभ्यासक्रमात होता. नैतिक विकासासाठी 'गुलिस्तान' व 'बोस्तान' शिकविले जात असे. लैला-मजनू, सिंकदरनामा अशा कथांही शिकविल्या जात असत. सुफी पंथातील तत्त्वज्ञानाची शिकवण, गायन, नक्षीकाम, विणकाम, सूतकाम, हस्तकला, चित्रकला असे विषय अभ्यासात असत. अकबराच्या कारकिर्दीत व्याकरण, पतंजली योगदर्शन, न्याय यांचा समावेश संस्कृत विद्यालयाच्या अभ्यासक्रमात करण्यात आला होता. अभ्यासक्रमात हदीस, फिका, फरित, फतवा, हिब्ज इ. ग्रंथाचा समावेश होता. हदिस -महंमद पैगबंराची वचने (इस्लामी स्मृती) फिका- कुरआन मधील आचरण पद्धती, फरित - अरबी शब्दाचे उच्चार,हिबज- मुखोदगत सराव केलेल्या आशयाचे स्पष्टीकरण फतवा-कुरआन व हदिस यांच्या आधारे केलेल्या कोणत्याही समस्येचे निरसन, निष्कर्ष अथवा निर्णय अथवा आदेश.

## ४अ.८ शिस्त, स्वांतत्र्य आणि शिक्षा, बक्षिसे

शारीरिक शिक्षा देण्यास प्रारंभ मध्ययुगीन कालावधीत झाला शाळेत गैरहजर विद्यार्थ्यांना तसेच दिलेले ज्ञान सोप्या तऱ्हेने आकलन न करणाऱ्या विद्यार्थ्यांना उभे राहणे, छड्या मारणे, ओणवा राहणे अशा प्रकारच्या शिक्षा असत. नियमित प्रार्थना (नमाज) करण्याचे बंधन होते. थोरांशी अदबीने, नम्रतेने वागणे अशी शिस्त होती. शिक्षण हे बहुतांशी शिक्षककेंद्री होते. विद्वानांना बक्षिसे दिली जात. बक्षिसे पदकांच्या, प्रशस्ती पत्राच्या स्वरूपात असत. विद्यावेतनही दिले जाई, हुशार विद्यार्थ्यांना सरकारदफ्तरी नोकरीही मिळत असे.

## ४अ.९ युद्धकलाशिक्षण (सैनिकी शिक्षण)

राज्याच्या बळकटीसाठी युद्धकलेची आवश्यकता होती. सुलतानशाहीत ही युद्धकला लोकप्रिय झाली होती. राजपूत्रांना युद्धकलेचे शिक्षण बालपणापासून मिळे. मुस्लिम लोक युद्ध कलेत युद्धशास्त्रात तरबेज होती. मुघल आमदानीत युद्धकला अधिक विकास पावली.

युद्धकलेत सामान्य लोकांना धनुष्यबाण, भालाफेक व इतर हत्यार चालविणे, किल्याला वेढा देणे, घोड्यावर व हत्तीवर बसून युद्ध करणे अशा शिक्षणाचा समावेश होता. राज घराण्यातील व्यक्तींना सेना संचालन, संघटन, नेतृत्व अशा प्रकारचे शिक्षण मिळत होते.

## ४अ.१० शिक्षणासाठी वसतीगृहे

मक्तबसाठी वसतीगृहाची सोय नव्हती मात्र मदरसांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची व्यवस्था होती. काही मंडळी नावलौकिकासाठी वसतीगृहाचा खर्च चालवित असत. ही वसतीगृहे शहरात, गावातच असत, गावापासून लांब नसत वसतीगृहात मोफत राहणे, जेवणे व बिछाना तसेच लिहिण्याची साधने मिळत असत. रुग्णालय व तलाव अशा सोयी वसतीगृहात उपलब्ध असत. एका वसतीगृहात सुमारे २४० विद्यार्थ्यांची व्यवस्था होत असे. शाही इमारती, प्रार्थनेच्या सुंदर इमारती, आवारासमोर सुंदर बगीचा अशा थाटाची वसतीगृहे होती. विद्यार्थ्यास दरमहा एक सोन्याचे नाणे मिळत असे.

## ४अ.११ बिसमिल्ला खानी (मक्तब) समारंभ

मुलांना शाळेत पाठविण्याच्या समारंभाला बिसमिल्ला खानी (किंवा मक्ताब) समारंभ असे म्हणत. मौल्यवान(उंची) वस्त्रे परिधान करावयास लाऊन मुलाला मित्रांच्या समवेत गादीवर बसून हा समारंभ केला जात असे. मुलींच्या बाबतीत हा समारंभ वेगळा असे. मुलगी ज्यावेळी शिकण्यास सज्ज होई त्यावेळी रंगीत कागदावर 'जरफीशानी' (Zarfishani) अशा आशयाच्या शुभेच्छा लिहल्या जात. या समारंभासाठी अनेक लोक एकत्र जमत. मुलीच्या पालकाकडून गुरूला गुरूदक्षिणा म्हणून मौल्यवान भेटी दिल्या जात. आणि या भेटी ज्यावेळी मुलगी पुस्तक वाचावयास सुरवात करीत असे त्यावेळी तिचे पालक तिच्या खोलीत येऊन देत नसत.

## ४अ.१२ वर्गनायक पद्धती (Monitorial System)

वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याची संधी दिली जात असे हे विद्यार्थी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना अध्यापन करीत. त्यामुळे हुशार विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा स्त्रोत म्हणून उपयोग खालच्या विद्यार्थ्यांना होई.

## ४अ.१३ परीक्षा पद्धती

पाठांतर केलेले कागदावर लिहिता येते की नाही हे बघितले जाई पाठांतर केलेल्या आशयावर मौखिक परीक्षाही होई. एक पाठ पाठांतर झाल्यांनतर गुरू (शिक्षक)दुसरा पाठ पाठांतरासाठी विद्यार्थ्याला देत असत.गुरूंच्या शिफारशीनंतर विद्यार्थ्यास एका वर्गातून दुसऱ्या वर्गात प्रवेश दिला जात असे. प्रचलित पद्धतीप्रमाणे वार्षिक सहामाही परीक्षा अशी कोणतीही परीक्षापद्धती नव्हती. सातत्याने अवलोकातून, निरीक्षणातून विद्यार्थ्यांचे परीक्षण होत असे.

## ४अ.१४ वैद्यकी शिक्षण

वैद्यक शास्त्र हे अनेक मूस्लिमशिक्षण केंद्रातून शिकविले जात असे. रामपूर हे केंद्र औषधासाठी विशेष प्रसिद्ध होते. युनानी पद्धतीचा उपचारपद्धती होती. अकबराला वैद्यकशास्त्रात रूची असल्यामुळे अनेक मरदसांमधून त्याने वैद्यकीय शिक्षणाची व्यवस्था केली होती.

## ४अ.१५ वाङ:मय व इतिहास

मुस्लिम राजवटीत साहित्यीक , पंडित, इतिहासकार पुढे आलेत. इतिहास लिहिला जात असे. अमिरखुसरो हा प्रसिद्ध कवी होऊन गेला. अब्दुल फाजल हा विद्वान लेखक व इतिहासकार होता. फैजी हा कवी होता.

## ४अ.१६ नि:शुल्क शिक्षण

शिक्षणाचा खर्च विद्यार्थ्यांना लागत नसे. कोणत्याही प्रकारची फी नव्हती. या सर्व संस्थांचा खर्च शासन, श्रीमंत व्यक्ती करित असत. मदरसांमध्ये निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य नि:शुल्क असे आणि महिन्याला विद्यावेतनही काही मदसांमधून मिळत असे.

## ४अ.१७ ज्ञान प्रसाराची साधने

मक्तब, मदरसा या व्यतिरिक्त, वाचनालये, वाङ:मय मंडळे काव्यस्पर्धा (मुशाहरा), सवाल-जवाब ही माध्यमे ज्ञानप्रसारासाठी होती.

## ४अ.१८ शिक्षण सर्वांसाठी खुले

लहान-थोर, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरूष या सर्वासाठी मुस्लिम शिक्षण खुले होते. त्यामुळे आचार-विचारांची देवाण-घेवाण होत असे व धर्मप्रसारही होत असे.

## ४अ.१९ शिक्षणाात सत्ताधिशांच्या विचारांना अनुसरून बदल

मुस्लिम राजवटीत घराणी व राज्यकर्ते सतत बदलत होते. त्याचा परिणाम शिक्षकांवर झालेला दिसून येतो, त्यामुळेच शिक्षणात अनेक नवीन बदल घडून आलेत. उदा. जहाँगीरच्या काळात चित्रकलेला महत्व होते. औरंगजेबाच्या काळात फक्त मुस्लिम शिक्षणाला प्राधान्य होते. तर अकबराने हिन्दु व मुस्लिम यांच्या शिक्षणाला उत्तेजन दिले व शिक्षणात दोन्ही धर्मातील अभ्यासक्रमाचा समावेश करून समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

## ४अ.२० राजाश्रयी शिक्षण

मुस्लिम शिक्षण पद्धतीत राजाश्रय होता. कारण त्या त्या काळातील सत्ता सम्राटांना शिक्षणात रस होता. त्यांनी शाळा, वाचनालये मक्तब, मदरसा यासाठी ठिकठिकाणी इमारती बांधल्या होत्या. त्याचप्रमाणे विद्वान, कवी, संगीतकार यांनाही राजाश्रय दिला जात असे. विद्यार्थ्यांना विद्यातेतनही दिले जात असे.

## ४अ.२१ पदवीदान समारंभ

विशिष्ट क्षेत्रात प्राविण्य मिळविण्यासाठी पदव्या दिल्या जात. तर्कशास्त्र आणि तत्वज्ञानासाठी 'फाझील'(Fazil) पदवी तर वेदांत (Theology) साठी 'आलीर' (Alirr) आणि वाङःमय तज्ज्ञासाठी कबील (Qabil) पदवी अशा विविध पदव्या समारंभापूर्वक दिल्या जात. (टिप- 'गुरू -शिष्य संबंध' आणि 'स्त्रि शिक्षण' या वैशिष्ट्यांचा विचार याच प्रकरणात पुढील भागात स्वतंत्र्यरित्या करण्यात आला आहे.)

## ४अ.२२ आपली प्रगती तपासा

योग्य पर्याय निवडा.

१. बिसमिल्लाखानी समारंभ म्हणजेच ---------विधी होय. अ.मक्ताब ब.मदरसा क.पदवीदान

२. मुस्लीम शिक्षण पद्धतीत उच्च शिक्षणाचे केंद्र म्हणजे --------होय. अ.मदरसा ब.मक्तब क.दर्गाह

३. इस्लामचे पूर्णपणे पालन करणाऱ्यास ----म्हणतात. अ.मुअमीन ब.काफील क.इमान

४. शिक्षण म्हणजे कशाने आत्मा पुष्ठ बनतो किंवा आत्म्याचे नुकसान होते हे जाणून घेणे होय' ही शिक्षणाची व्याख्या खालीलपैकी कोणी केली. अ.महमद पैंगबर ब.इब्राहिम लोदी क.इमाम आबू हनिफा

५. ''ज्ञान म्हणजे असा गुण की जो मनाल उजळून टाकतो ''असा विचार----यांनी केला. अ.इमाम आबू हनिफा ब.औरंगजेब क.झारनुजी

६. कुरआन व हदिस यांच्या आधारे केलेल्या कोणत्याही समस्येच्या निरसनास, निर्णयास अथवा आदेशास -------म्हणतात. अ.फिका ब.हिजाब क. फतवा.

७. मुस्लिम शिक्षण पद्धतीत वाङःमय तज्ज्ञासाठी ------ही पदवी बहाल करण्यात येईल.अ.कबील ब.आलीर क.फाझील

## ४अ.२३ सारांश

ज्ञानप्रसार, धर्मप्रसार, ऐहिक विकास साधणे, मुस्लिम राज्यास स्थिरता व बळकटी आणणे, मुस्लिम लोकात धर्मपरायणता निर्माण करून अरबी, फारशी, उर्दु या भाषांचा विकास साधने, चारित्र्य संवर्धन करणे ही शिक्षणाची ध्येये मुस्लीम शिक्षण पद्धतीची होती. औद्योगिक शिक्षण, ललित कलांचा विकास, सैनिकी शिक्षण, शिक्षणासाठी वसतिगृहे उभारणे, शिक्षणाला राजाश्रय प्राप्त करून देणे.निःशुल्क शिक्षण व सर्वांसाठी शिक्षण खुले ठेवणे ही मुस्लिम शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये होत. अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणाबरोबर इतर विषयाचा, कला शिक्षणाचा समावेश करणे, धार्मिक उन्नती बरोबर ऐहिक उन्नती करणे हे शिक्षणाचे विशेष मुस्लिम शिक्षण पद्धतीतून लक्षात येतात. मुस्लिम शिक्षण पद्धतीलाच इस्लामिक शिक्षण किंवा मध्ययुगीन शिक्षण पद्धती म्हणतात.

## ४अ.२४ स्वाध्याय

१. मुस्लिम शिक्षण पद्धतीचा सविस्तर परिचय करून दया.

२. मुस्लिम शिक्षणाची विविध ध्येये स्पष्ट करा.

३. मध्ययुगीन शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. भारतातील मुस्लिम शिक्षणाची कोणती वैशिष्ट्ये वर्तमान काळात योग्य वाटतात ते विशद करा.

५. मुस्लिम शिक्षण पद्धताचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

६. मध्ययुगीन कालखंडातील शिक्षणाची प्रमुख वैशिष्टे स्पष्ट करा.

७. मध्ययुगीन कालखंडातील शिक्षणपद्धतीचे टीकात्मक परीक्षण करा.

★★★

## प्रकरण ४

# ४ब - मुस्लिम शिक्षणपद्धती

## (Islamic Education)

-मुस्लिम राज्यकर्ते आणि त्यांच्या काळातील शिक्षण विकास
(State partonage and growth of education during this time)
-प्राथमिक शिक्षण-मक्तब (Primary Education-Maktab)
-उच्च शिक्षण-मदरसा (Higher Education-Madrsas)
-स्त्री शिक्षण (Female Educatiion)
-विद्यार्थी व शिक्षक संबंध (Student and Teacher Relationship)

**घटना संरचना**

४ब.० उद्दिष्ट्ये

४ब.१ प्रस्तावना

४ब.२ मुस्लिम राज्यकर्ते आणि त्यांच्या काळातील शिक्षण विकास

४ब.३ गुलाम वंश साम्राज्य

४ब.४ खिलजी वंश साम्राज्य

४ब.५ तुघलक वंश साम्राज्य

४ब.६ लोदी वंश साम्राज्य

४ब.७ मुघल वंश साम्राज्य

४ब.८ मुस्लिम शिक्षण-प्राथमिक शिक्षण -मक्तब

४ब.९ मुस्लिम शिक्षण -उच्च शिक्षण - मदरसा

४ब.१० स्त्री -शिक्षण

४ब.११ विद्यार्थी-शिक्षक संबंध

४ब.१२ मुस्लिम शिक्षण पद्धतीने काय दिले ?(या पद्धतीचे, गुण, फायदे अथवा देणगी)

४ब.१३ मुस्लिम शिक्षण -उणिवा

४ब.१४ मुस्लिम शिक्षणाची विद्यापीठे (केंद्रे)

४ब.१५ आपली प्रगती तपासा.

४ब.१६ सारांश

४ब.१७ स्वाध्याय

## ४ब.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही -

१. मुस्लिम राज्यकर्ते आणि त्याच्या काळात शिक्षणाचा विकास कसा झाला हे स्पष्ट करू शकाल.

४. प्राथमिक शिक्षणाचे (मक्तब मधील शिक्षणाचे) स्वरूप स्पष्ट करू शकाल.

३. उच्च शिक्षणाचे (मदरसा मधील शिक्षणाचे)स्वरूप स्पष्ट करू शकाल.

४. मुस्लिम शिक्षण पद्धतीतील स्त्री शिक्षणाचा विकास स्पष्ट करू शकाल.

५. मुस्लिम शिक्षणातील विद्यार्थी व शिक्षक यातील संबंध स्पष्ट करू शकाल.

६. मुस्लिम शिक्षण केंद्राबद्दल (विद्यापीठाबद्दल)माहिती सांगू शकाल.

७. मुस्लिम शिक्षणपद्धतीचे समीक्षण करू शकाल.

## ४ब.१ प्रस्तावना

इ.स.१२०६ ते इ.स.१८५८ पर्यत जवळ जवळ ६५० वर्षे भारतात मुसलमानी सत्ता होती. या काळात गुलाम, खिलजी, तुघलक, लोदी, मुघल (मोगल) यांची सत्ता होती. त्या त्या काळातील राजांनी राजकीय विकासाबरोबरच शैक्षणिक सास्कृतिक विशेषणाकडे लक्ष दिले. आपल्या विचारानुसार मतानुसार शिक्षणात बदल घडवून आणले. या मध्ययुगीन काळात असलेल्या पद्धतीला मुस्लिम शिक्षण पद्धती (Islamic Education )किंवा मध्ययुगीन शिक्षण (Medival Education)पद्धती म्हणतात. या काळातील त्या त्या सत्ताधिशांचा प्रभाव या शिक्षण पद्धतीवर दिसून येतो.

## ४ब.२ मुस्लिम राज्यकर्ते आणि त्यांच्या काळातील शिक्षण विकास

| इ.स.१२०६ १२९० | इ.स.१२९० १३२० | इ.स.१३२० १४१४ | इ.स.१४५१ १५२६ | इ.स.१५२६ १७०७ |
|---|---|---|---|---|
| **गुलाम वंश साम्राज्य** | **खिलजी वंश साम्राज्य** | **तुघलक वंश साम्राज्य** | **लोदी वंश साम्राज्य** | **मुघल वंश साम्राज्य** |
| १.कुतुबुद्दिन ऐबक | १.जलालउद्दिन खिलजी | १.गसासुद्दिन तुघलक | १.सैयद लोदी | १.बाबर |
| २.आल्मताश | २.अल्लाउदिन खिलजी | २.महंमद तुघलक | २.भल्लोल लोदी | २.हुमायून |
| ३.रजिया | ३.मुबारक खिलजी | ३.फिरोज तुघलक | ३.इब्राहिम लोदी | ३.अकबर |
| ४.नासरूद्दिन | | | | ४.जहाँगिर |
| ५.बल्बन | | | | ५.शहाजहान |
| ६.महंमद | | | | ६.औरंगजेब |

## ४ब.३ गूलाम वंश साम्राज्य

### १.कुतुबुद्दिन ऐबक:

हा गुलाम साम्राज्याचा संस्थापक होता. त्याने प्रथम मुस्लिम लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. तो अतिशय विद्वान होता. त्याच्या चार वर्षाच्या कारकिर्दीत त्याने अनेक 'मक्तब', 'मदरसा' आणि मशिदी बांधून शिक्षणाचा प्रसार केला. त्याने बौद्धविहार व मंदिरे याचा विध्वंस करून मशिदी आणि मदरसांची निर्मिती केली.

**२.आल्मताश:**

ऐबक नंतर आल्मताश गादीवर आला. तो सुद्धा शिक्षणप्रेमी होता. परंतू हवे तितके लक्ष त्याने शिक्षणाच्या विस्ताराकडे दिले नाही. त्याने दिल्ली मध्ये पहिला मदरसा बांधला.त्यात अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले.

**३.रजिया:**

ही आल्मताशाची मूलगी होती. तिचा कुरआनाचा गाढा अभ्यास होता ही सर्वगुण संपन्न अशी स्त्री होती. तिच्या काळात 'मुईझ्झी' ही एक मोठी मदरसा निर्माण झाली. रजिया बुरखा वापरत नसे.

**४.नासरूद्दिन :**

याने अनेक हुशार विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. त्याने एक पंजाब मध्ये तर दुसरे जालंधर मध्ये अशी दोन महाविद्यालये काढली.

- शिक्षणाचा प्रचार हे त्याचे ध्येय होते.
- कुरआनच्या स्वहस्तलिखित प्रतीची विक्री करून तो आपला चरितार्थ चालवित असे.

**५.बल्बन:**

- हा वाडमयाचा भोक्ता होता.
- याने अनेक विद्वान व अनेक बुद्धिवानांना राजाश्रय दिला.
- याने नसरूद्दिन महमुद यांच्या नावाने 'नसिरीया'नावाची मदरसा निर्माण केली.

**६.महंमद:**

- हा बल्बनचा मुलगा.
- याने सर्वप्रथम वाड:मय मंडळाची स्थापना केली.
- हा व त्याचे मित्र एकत्र जमून तत्त्वज्ञानावर चर्चा करीत.
- त्याच्या काळात होऊन गेलेला हिन्दी कवी 'अमीर खुसरो'हा त्याचा शिक्षक (गुरू) होता.
- मंहमदाच्या काळात शिक्षणाबरोबरच वांड्.मय निर्मितीच्या कार्यालाही चालना दिली गेली.

## ४ब.४ खिलजी वंश साम्राज्य

**१.जलालउद्दिन खिलजी :**

हा बुद्धिवान होता व त्याला साहित्यात रूची होती. त्याने बुद्धिमतांचा आदर करून नव साहित्यासाठी प्रोत्साहन दिले.

**२:अल्लाउद्दिन खिलजी:**

याला शिक्षणात अजिबात रस नव्हता. त्याने सुरू असलेल्या अनेक शैक्षणिक संस्था बंद केल्या तरीही त्याकाळात अनेक विद्वानांनी कला व साहित्यात प्रगती केली.

**३.मुबारक खिलजी :**

याने फार उल्लेखनीय कामगिरी केली असल्याचे दिसत नाही.

## ४ब.५ तुघलक वंश साम्राज्य

**१. गयासुद्दिन तुघलक:**

हा स्वतः विद्वान होता. त्याला शिक्षणाविषयी प्रेम होते.

**२. महंमद तुघलक :**

हा शिक्षणप्रेमी होता, लेखकही होता. त्याला वैद्यकशास्त्र, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादीचे ज्ञान होते. तत्वज्ञानातील अनेक ग्रंथाचे वाचन त्याने केलेले होते. अनेक विद्वानांना राजसभेत बोलावून तो वाद-विवाद घडवून आणत असे.त्याने विद्यार्थ्यासाठी विद्या वेतन सुरू केले. अनेक नवीन 'मक्तब'स्थापन केले. नंतर काही कारणाने त्याच्या वृतीत बदल घडून आल्याने त्याने शिक्षणाच्या सोयी सुविधा बंद केल्या. त्याच्या काळात शिक्षणाला थोडी उतरती कळा लागली.

**३. फिरोज तुघलक :**

- हा स्वतः विद्वान व शिक्षणप्रेमी होता. त्याने पुन्हा शिक्षणक्षेत्रात लक्षणीय व आश्चर्यकारक प्रगती घडवून आणली.त्याचे नाव भारतातील मुस्लिम शिक्षणाच्या प्रगतीसाठी सुवर्णाक्षरांनी लिहीले गेले.
- त्याच्या काळात दिल्ली हे महत्वाचे शिक्षणाचे केंद्र बनले त्याने शिक्षणसंस्थांना मदत केली परतु ३०वसतीगृहे असलेल्या शैक्षणिक संस्था स्थापन केल्या.
- मशिदींना लागून मदरसा, मक्तब यांची स्थापना करून विद्वान शिक्षकांची नियुक्ती केली. शिक्षकांना पेन्शन चालू केले.
- हा शिक्षणासाठी राज्याकडून आर्थिक पुरवठा करीत असे.
- शिक्षण ही राज्याची एक महत्वाची जबाबदारी आहे असे त्याचे म्हणणे होते. त्याने बेक़ारांसाठी नोकरी केंद्र स्थापन केले.
- अनेक संस्कृत ग्रंथांचा त्याने फारशी भाषेत अनुवाद केला.
- हिंदू धर्माविषयी त्याची वृत्ती सहिष्णूवादी होती.
- त्याने स्थापन केलेल्या मदरसापैकी 'मदरसा-ए-फिरोझशाही' ही प्रसिद्ध मदरसा होती.त्याने विद्यार्थ्यांना विद्यावेतन सुरू केले असे इतिहासकार फेरिस्ता लिहतो.
- गुलामांना सक्तिने मुसलमान करून त्यांना उद्योगधंदयाचे शिक्षण देण्याची सोय केली.

## ४ब.६ लोदी वंश साम्राज्य

**१. सैय्यद लोदी :**

- याची शिक्षणाबाबत उल्लेखनीय कामगिरी नाही.

- याच्या काळात 'बंदारून' हे विद्येचे केंद्र बनले.

**२. भल्लोल लोदी:**

- याने काही मदसाची स्थापना केली.
- बुद्धीमान लोकांचे तो आदारातिथ्य करीत असे.

**३. इब्राहिम लोदी :**

- हा स्वत: कवी होता. त्याने अनेक कविता लिहिल्या. 'गुलरस'या टोपणनावाने तो कविता करित असे.
- याने अनेक परदेशी विद्वानांना आमंत्रित करून त्यांच्याकडून विविध ग्रंथाचे भाषांतर करवून घेतले.
- हा हिंदूधर्माविरोधी असल्याकारणाने त्याने अनेक हिंदू शाळा नष्ट करून त्याठिकाणी मक्तब आणि मदरसा उभारल्या.

## ४ब.७ मुघल वंश साम्राज्य

**१.बाबर :**

- याने'शोहरती-इ-आम' (Shohrati -I-Aam) या संस्थेची स्थापना केली.
- याला अरबी,फारशी आणि तुर्की या भाषांचे चांगले ज्ञान होते. आणि शिक्षणाविषयी आवड होती.
- हा काव्यातही रस घेत असे. वांडमयः, कला आणि कलाकारांचा तो भक्त होता.
- सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शाळा स्थापनेची जबाबदारी त्याने सोपविली होती.
- दिल्ली येथे मदरसा स्थापन करून त्यात त्याने गणित, भूगोल, खगोलशास्त्र व धर्मशास्त्र यांचा समावेश केला.

**२. हुमायून :**

- आपले वडील बाबर यांचेप्रमाणे हाही विद्वान होता.
- याला कवी, तत्वज्ञ यांच्या सहवासात रहायला आवडे.
- याने दिल्ली येथे भव्य अशी शैक्षणिक संस्था निर्माण करून त्याचे प्रमुख पद शेख हुसेन यांना बहाल केले.
- हा जेव्हा जेव्हा बाहेर जात असे त्यावेळी त्याच्याजवळ पुस्तकांचा संग्रह असे यावरून त्यांचे ग्रंथप्रेम लक्षात येते.
- याने विद्वान व बुद्धिमान व्यक्तीसाठी अतिथीगृहे बांधली.
- खगोलशास्त्र व भूगोल याविषयांची महाविद्यालये सूरू केली.

**३. अकबर:**

- मध्ययुगीन काळात भारताच्या इतिहासात अकबराचे स्थान अतिशय महत्वपूर्ण होते. त्याची

संपूर्ण कारकिर्द प्रशासनाच्या बाबतीच नव्हे तर शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा उल्लेखनीय आहे. याला शिक्षण प्रसाराची आवड होती.

- शिक्षण, कला, वांडमयः तत्त्वज्ञान आणि इतिहास या क्षेत्राच्या विकासासाठी याने विशेष प्रयत्न केले. त्यासाठी त्याने धोरणे आखली होती. याने अनेक महाविद्यालयांची स्थापना केली.

- संस्कृत भाषेतील ग्रंथांचे फारशी भाषेत भांषातरास चालना दिली. उदा.महाभारत, रामायण, अर्थर्ववेद, लीलावती इ.

- याच्या काळात हिंूद व मुस्लिम यांची मुले एकत्र शिक्षण घेत होती.भविष्यकाळातील धोका ओळखून'शिक्षण'ही मुस्लिम शिक्षणाची मक्तेदारी राहू न देता त्याला हिंदू शिक्षणाची जोड त्याने दिली म्हणूनच मुस्लिम मुले कुरआन ग्रंथाचा तर हिंदू मुले व्याकरण, वेद, पतंजली योग दर्शन यासारख्या ग्रंथांचा अभ्यास करीत.

- याला स्वतःला यंत्र, यांत्रिक प्रयोगामध्ये आवड होती. त्याच्यामुळे त्याच्या काळात 'व्यावसायिक प्रशिक्षण' देणारे कारखाने अस्तित्वात आले. अकबराच्या काळात उर्दु भाषेचा प्रचार होऊन ती ह्या काळाची राष्ट्रभाषा बनली होती. याने सर्व धर्मियांना एकत्र आणण्याचा असफल प्रयत्न केला.

- याच्या काळात आग्रा हे उच्च शिक्षणाचे केंद्र होते. याने फत्तेपूर सिक्री या शहराची स्थापना आगऱ्याजवळ केली.

- याने धर्म व न्याय खात्याचा मंत्र्यावर शिक्षणाची जबाबदारी सोपविली

**ललितकलांना उत्तेजन:**

अकबराने चित्रकला,गायन, लेखन, शिल्पकला, कला कौशल्य इ. स्थापत्यकला इ. कलांना उत्तेजन दिले.

**शिक्षक कसा असावा:**

शिक्षकाने अध्यापनात पाच गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

१.अक्षर ओळख

२.शब्दांची समज

३.बोधपर वाक्य

४.कविता

५.पूर्विचा पाठ

**अभ्यासक्रम:**

खगोलशास्त्र, चेहरेपट्टीशास्त्र, घरगुती व्यवहार, कायदे, वैद्यकी, तर्कशास्त्र इ. विषयाचा समावेश केला, नीतीग्रंथ, तत्त्वज्ञान, अंकगणित, भूमिती सह न्याय, वेदांत, योगसुत्रे (पंतजली)या संस्कृत ग्रंथांचा समावेश अकबराने मुस्लिम शिक्षण पद्धतीच्या अभ्यासक्रमात केला. हदिस, फिका, फतवा यांचाही समावेश अभ्यासक्रमात होता.

**वादविवाद चर्चा यांना प्राधान्य:**

सर्व धर्मियाना एकत्र आणून धर्म, तत्त्वज्ञान, शास्त्र अशा विषयांवरील चर्चा अकबर नेहमी घडवून आणत असे. त्यावेळी आपला धर्म श्रेष्ठ कसा या विषयी विचार मांडण्याची मूभा असे.

**प्रयोगशिलता:**

अकबराला 'मानवाची पहिली भाषा कोणती ?'असा प्रश्न पडला. चर्चेत जो-तो आपलीच भाषा श्रेष्ठ असे मांडित असे. त्याने त्याचे समाधान झाले नाही त्याने एक प्रयोग करून पाहिला परंतू त्याला या प्रयोगात यश आले नाही.

त्याने १२ अर्भकांना जन्मल्याबरोबर मुक्यांच्या हवाली केले व त्यांजकडून वाढविले. त्यांच्यापूढे एकही शब्द उच्चारला नाही. की कानावर पडू दिला नाही. बारा वर्षानंतर त्यांना भाषा तज्ज्ञासमोर उभे केले, त्यांना काही बोलता येईना ते खुणा करीत व परस्परांजवळ आपले विचार खुणांनीच प्रकट करीत.

हा प्रयोग शास्त्रशुद्ध नसला तरी अकबराची प्रयोगशिलता यातून दिसून येते.

**शिक्षणाची व्यवहार्यता:**

अकबराचे याबाबत असे म्हणणे की, ''आज ज्याची जरूरी आहे अशा कोणत्याही गोष्टीची आबाळ होता कामा नये.''या विधानावरून त्याची शिक्षणाबाबातची व्यवहार्यता लक्षात येते.

थोडक्यात,

शिक्षणाने कार्यक्षमता अंगी यावी या विषयी अकबर दक्ष होता परंतु त्याच्या सूचनांचा किती उपयोग करून घेतला गेला हे कळणे कठीण बादशाही फतव्याचा काही शाळातून प्रचार झाला असेल मात्र तशी विशेष यंत्रणा अस्तित्वात नव्हती. एवढे निश्चित की अकबराच्या कारकिर्दीत नवनव्याकल्पना, प्रयोगशिलता, कलाकौशल्य,शिल्पकला या बाबत विकसीत झाला विद्वानांना राजाश्रय मिळाला. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रयत्न शिक्षणातून करण्यात आला.

**४.जहाँगिर:**

- हा तुर्की व पार्शियन भाषांचा गाढा अभ्यासक होता.
- हा, एखाद्या धनिकाच्या मृत्यूनंतर त्याची संपत्ती तो राजदरबारी खर्च न करता मदरसांच्या विकासासाठी खर्च करीत असे.
- ज्या मदरसांना तेरा पेक्षा अधिकवर्षे झाली आहेत त्यांची डागडूजी करून अधिकतर विद्यार्थी संख्या असेल तर त्यांना नवीन मदरसांमध्ये प्रवेश दिला जाई.
- याने कलाकार, संगीतकार, कवीयांना आश्रय देऊन कला विकासासाठी मदत केली. तसेच तो चित्रकलेचा मोठा शौकिन होता.

**५.शहाजहान:**

- याने विद्वान, बुद्धिवान लोकांसाठी बक्षिसे व शिष्यवृत्त्या सुरू केल्या.

- इ.स.१६५०मध्ये त्याने दिल्ली जामा मशिदीवजळ मदरसा स्थापन केली. तेच आज इंपिरिकल महाविद्यालय म्हणून ओळखले जाते.
- याने 'दर-उल-बाग'महाविद्यालयाची डागडुजी केली.
- याची मुलगी जहाआराने आग्रा येथे जामा मशिदीजवळ एक मदरसा सुरू केली.
- याचा मुलगा दारा-शुकोन हा सुद्धा ज्ञानप्रेंमी होता. त्याने फारशी अरेबिक/संस्कृत भाषांचे अध्ययन केले होते. अनेक संस्कृत ग्रंथांची त्याने भाषांतरे केली.
- शहाजहानच्या काळात स्थापत्य कलेला उत्तेजन मिळाले आगऱ्याचा ताजमहाल, मोतीमशिद सारख्या वास्तू आजही प्रसिद्ध आहेत.

**६.औरंगजेब:**

- हा इस्लाम धर्माचा कट्टर अभिमानी होता त्याच्या काळात त्याला इतर धर्माचा प्रसार होणे मान्य नव्हते. त्याने अनेक मंदिरे, पाठशाळा,यांचा विध्वंस करून त्या जागी मक्तब, मदरसांची निर्मिती केली.
- मुस्लिम विद्वानांचा तो पुरस्कर्ता होता. त्यांच्यासाठी त्याने बक्षिसे व शिष्यवृत्त्या सूरू केल्या.
- निवृत्ती वेतन ही संकल्पना औरगंजेबाच्या काळात विकसित पावली.
- याला अरेबिक, फारशी उर्दु भाषा अवगत होत्या व तो विद्वानही होता.
- सतराव्या शतकातील शिक्षण पद्धतीवर तो नाखूष होता, कारण या शिक्षणात जीवन, जीवनाला आवश्यक गोष्टी, विचार करण्याची पात्रता याचा अभाव त्याला आढळला. तत्कालीन शिक्षण हे जीवनाशी सुसंगत नाही असे तो मानी.
- शिक्षण प्रक्रिया समाजभिमुख असणे आवश्यक आहे असे त्याचे मत होते.
- मातृभाषा आणि चारित्र्य याकडे तत्कालीन शिक्षणाने फारसे लक्ष दिले नाही असे त्याचे म्हणणे होते.
- याने अभ्यासक्रमात मूलभूत बदल केला. इतिहास, भूगोल, भाषा या विषयाबरोबरच विविध कला चांगल्या सवयी, चारित्र्य निर्मिती या सर्वांचा समावेश असणारा अभ्यासक्रम त्याने तयार केला.
- अनेक वाचनालयांची निर्मिती केली.
- अहमदनगर, सियालकोट, गुजरात येथे अनेक मदरसा निर्माण केल्या.
- मातृभाषेला त्याने प्राधान्य दिले. देवाची प्रार्थना करतांना मातृभाषेतच करावी असे त्याचे मत होते.
- हिन्दू शिक्षणावर त्याने बहिष्कार पुकारला.
- याचे कुरआन पाठ होते व मुस्लिम धर्माच्या तत्त्वज्ञानात तो निपूण होता.
- बोहरी समाजाच्या शिक्षणात त्याने विशेष लक्ष घातले

**शिक्षक कसा असावा?**

- औरगंजेबास त्याचा गुरू भेटावयास आला होता तेव्हा त्याला भेटण्याची त्याने टोलवा टोलवी केली व पुढे भेट घेतली. त्याने त्या समयी गुरूला विचारलेले प्रश्न म्हणजे शिक्षक कसा असावा

याबाबतच्या अपेक्षाच जणू त्याने व्यक्त केल्या आहेत. त्याने आपल्या गुरूला विचारलेले प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. ते प्रश्न खालील प्रमाणे-

१. 'मुल्लाजी आपल्या आगमनाचे कारण काय ?''

२. तुम्ही कोणत्या मानसन्माची अपेक्षा करता ?

३. विचार करा की तुम्ही मला काय दिले ?

४. माझ्या ज्ञानाची विशालता वाढवलीत ?

५. ज्या काळात बालकाची बुद्धी चालाख असते तो काळ फुकट घालविलात ना ?

६. अरबी भाषेचा आग्रह का धरीलात ?प्रार्थनेसाठी मातृभाषा पुरी पडत नाही का ?

७. आत्म्याची उन्नती घडवून आणण्यासाठी आपण मला काय दिलेत ?

८. विचार करायला शिकवलत ?

९. युद्ध कौशल्य, राजनिती शिकवलीत ?

१०. राजपुत्राच्या उपयोगी पडेल असे काय शिकविले ?

११. शहाणपणा (wisdom) धैर्य (Tolerance) या शब्दांचा अर्थ महत्वाचा वाटला नाही का ? हे आम्हाला शिकवले ?

१४ब. मानवी स्वभावाची गुंतागुंत, तिचे व्यापकज्ञान, स्वदेशाचा इतिहास, भूगोल, देशभाषा यातील काय शिकवले ?

थोडक्यात, उपरोक्त विचारलेल्या प्रश्नातून सतराव्या शतकातील शिक्षणावर खरमरित टिका तर आहेच परंतू गुरूंची (शिक्षकाची) गुणवत्ता, पात्रता, काय असावी असे या प्रश्नामधून सूचित होते.

## ४ब.८ मुस्लिम शिक्षण पद्धती - प्राथमिक शिक्षण- मक्तब

### मक्तब (Maltab)-(Primary Education):

प्राथमिक शिक्षण 'मक्तब'मध्ये दिले जात असे. मक्तब हा शब्द अरबी भाषेतील 'कुतूब'या शब्दापासून तयार झाला असून त्या 'कुतूब' शब्दाचा अर्थ'त्याने लिहीले'असा होतो म्हणून जेथे लिहिले शिकविले जाते त्या ठिकाणास 'मक्तब' असे म्हणतात. मक्तब ही प्राथमिक शिक्षणाची शाळाच होय. सर्व मुसलमान बालकांनी मक्तब मध्ये शिक्षण घेतले पाहिजे अशी अपेक्षा केली जात असे.

### १.प्रवेश:

वैदिक कालखंडात प्राथमिक शिक्षणात प्रवेश मिळविण्यासाठी 'उपनयन'(मुंज)हा संस्कार करावा लागे त्याचप्रमाणे मुस्लिम शिक्षण पद्धतीत प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ म्हणून 'बिसमिल्लाह' रस्म (विधी) संपादन करावा लागे. त्यानंतरच बालकाला मक्तब मध्ये प्रवेश दिला जाई.

**वय**-बालकाचे वय चार वर्षे, चार महिने, चार दिवस इतकें असले पाहिजे नंतरच त्याला मक्तब मध्ये प्रवेश मिळत असे.

**वस्त्र**-या विधीत बालकाला नवीन वस्त्र परीधान करावे लागे.या वेळी त्याचे सर्व नातेवाईक गोळा होत. बालकाला मित्रांसह गादीवर बसविले जाई व समोर कुरआन ठेवत असत.

**उच्चारण**- कुरआनातील आयतास मौलवी वाचून तसे उच्चारण करावयास बालकास सांगत.

## २. शिक्षणाचा (प्राथमिक)अभ्यासक्रम:

वेगवेगळ्या मक्तब मध्ये वेगवेगळे अभ्यासक्रम होते. सुरवातीला लेखन, वाचन, अंकगणित शिकविले जाई, विद्यार्थ्यांना सरावानंतर कागदावर लिहावे लागे. शारीरिक शिक्षणात हुतूतू सारखे खेळ होते. अक्षरांचा आकार व उच्चार याला महत्त्व असे. कुरआन मधील कलमे व काही वचने, शब्द शिकविले जात.

जोतिष, शरिरविज्ञान, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, इतिहास, विज्ञान या सारख्या विषयांचा क्रमबद्ध अध्यापनासाठी उपयोग होत असे. फारशी भाषेचा व्याकरणाचा प्रारंभ देखील मक्तब मध्येच होत असे.नैतिक शिक्षणात शेखसद्दीचे गुलीस्ताँ व बोस्तान याचा अभ्यास स्पष्टीकरणासह करवून घेतला जाई. उर्दु या अतिरिक्त विषयाचे अध्ययनही होत असे. शेती, युनानी औषधीचा परिचय, पत्रलेखन, युसूफ-जुलेखा, लैला-मजनू, सिकन्दरनामा, मुस्लिम फकिरांच्या गोंष्टी,हिब्जचे पाठांतर अशा अनेक बाबीचा समोवश अभ्यासक्रमात होता.

## ३. अध्यापन पद्धती:

**मौखिक**-तोंडी उच्चार करावयाचे व ते बालकांनी ऐकावयाचे.

**पाठांतर पद्धती**-पहिला पाठ पूर्ण करावयाचा नंतर दुसरा पाठ पाठांतरासाठी घ्यायचा. पहिला पाठ पूर्ण झाल्याशिवाय मौलवी दुसरा पाठ देत नसत.

**लेखन**-लेखन सरावातून अध्ययन केलेले, पाठांतर केलेले फारशी भाषेत लिहून काढावयाचे. सुंदर हस्ताक्षरास महत्व होते यासाठी दिवसातील चार तास दिले जात. बोरूने लिहले जाई.

**वर्गनायक पद्धती**-जेष्ठ विद्यार्थ्यांनी मागील विद्यार्थ्यांना शिकविण्याची पद्धत होती.

## ४. इतर वैशिष्ट्ये:

- अध्ययन अध्यापनाचे काम सकाळी सुरू होत असे.
- दुपारी बालकांना जेवण देण्यात येत असे.
- शिक्षण विनामूल्य होते.
- शिक्षकांच्या जेवणाची व्यवस्था राज्यशासन किंवा स्थानिक श्रीमंत लोक करित. मंगल प्रसंगी खेड्यातून धान्याचा साठा दान म्हणून येत असे.
- धर्म शिक्षण आणि व्यवहारज्ञानासाठी बौद्धिक शिक्षण याची सांगड घातली जात असे.
- हिब्ज (पाठांतर)करणे हे अध्ययनाचे मूलतत्त्व होते.

**५.इतर छोटी प्राथमिक शिक्षणाची केंद्रे.**

**खानगाहे:**

या प्राथमिक शिक्षणाच्या केंद्रात फक्त मुसलमान मुलांनाच प्रवेश होता. या केंद्रांचा कारभार समाजाकडून होणाऱ्या मदतीने चालत असे. त्यासाठी एक विश्वस्तमंडळ (ट्रस्ट)होते.

**दरगाहे:**

हे 'खानगाहे'या संस्थेला समांतर असे प्राथमिक शिक्षणाचे ठिकाण होते. फरक एवढाच की श्रीमंत, दानशूर व्यक्तींच्या आश्रयाने या चालत. त्याची देखभाल दानशूर व्यक्तीच करीत.

- **कुरआन-शाळा:**

या शाळांचा उद्देश 'कुरआन' शिकणे एवढाच होता या शाळा दरगाह, मशिद यात भरविल्या जात. वाचन, स्मरणावर भर असे. कधी कधी वाचनावर आधारित अर्थही विचारला जात असे. यात लेखन, गणित यांचे ज्ञान दिले जात नसे.

## ४ब.९ मुस्लिम शिक्षण : उच्च शिक्षण-मदरसा (Madarsa) (Higher Education)

मुस्लिम शिक्षण पद्धतीत मदरसा मध्ये उच्च शिक्षण दिले जात असे. 'दरस'या शब्दापासून मदरसा हा शब्द तयार झाला असून 'दरसा' याचा अर्थ भाषण देणे असा होतो.

- **प्रवेश:**

मक्तब मधील शिक्षण पूर्ण केल्यानंतर मदरसांमध्ये प्रवेश मिळत असे. ही प्रवेशाची अट सोडल्यास कोणताही प्रवेश विधी (मक्तब सारखा) होत नसे.

- **शिक्षणाचा कालावधी**-१२वर्षाचा होता.

- **शिक्षक नेमणूक:**

सरकारी मदसांमध्ये शिक्षकांची नेमणूक शासनाद्वारे केली जात असे. तर खाजगी मदरसांमध्ये विश्वस्त मंडळ , अथवा एखादी जाणकार व्यक्ती. किंवा श्रीमंत व्यक्ती शिक्षकाची नेमणूक करीत असे.

- **निवास:**

मदरसांना लागूनच विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था केली जात असे.

- **शिक्षणाचे माध्यम:**

फारशी, अरबी भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. परंतु मातृभाषेत शिक्षण देण्याची प्रथा औरंगजेबाच्या काळात सुरू झाली.

- **अभ्यासक्रम**

- **लौकिक अभ्यासक्रम:**

अरबी साहित्य, कृषी, व्याकरण, कायदा , गणित, भूगोल इतिहास, तत्वज्ञान, नितीशास्त्र, ज्योतिष, अर्थशास्त्र युनानी चिकित्सा (वैद्यक शास्त्र) फारशी साहित्य.

**• व्यवसाय शिक्षण**

- विणकाम, अभियांत्रिकी, कृषी, प्रशासन इ.
- धातूने बनविलेल्या वस्तुंचा वापर, लोकर साफ करणे इ. व्यवसायांचा समावेश.
- शिवणकाम, स्वयंपाक सर्व व्यवसाय शिक्षणात शिक्षणाच्या व्यवसायाला महत्व होते.कारण हा व्यवसाय 'ज्ञान' व नैतिकसवयी शिकवितो.

**धार्मिक शिक्षण(अभ्यासक्रम)**

- बखीरच्या म्हणण्यानुसार खालील बाबी अभ्यास क्रमात होत्या. नफसीर (भाषा किंवा टीका)

फिक (इस्लामी कायदा)

हदिस (इस्लामी स्मृती)/(पैगंबराची वचने)

उसुल-ए-फिक (इस्लामविधी, नियम तत्वे)

तराबुक्क (गुढवाद)

अदाद (वाड:मय)

तिब (वैद्यकशास्त्र)

रियाझी (गणित शास्त्र)

नजूम (खगोल शास्त्र)या विषयाचा समावेश होता.

-फिका-(कुराण मधील आचरण पद्धती)

हदिस-(मंहमद पैगंबराची वचने)

फिरत-(अरबी शब्दाचे उच्चार)

हिब्ज-(मुखोदगत सराव केलेल्या आशयाचे स्पष्टीकरण)

फतवा-कुरआन व हदिसच्या आधारे केलेल्या कोणतही समस्येंचे निरसन, निर्णय अथवा आदेश

कुरआनमधील चरण पाठांतर करणे, त्यांची चिकित्सा करणे. इस्लाम संस्कृती व परंपरांचा अभ्यास, इस्लाम धर्माचे कायदे (कानून) सुफी पंथाचे तत्त्वज्ञान इ. धार्मिक बाबी अभ्यास क्रमात होत्या.

**सप्त कलांचा अभ्यास :** त्रिविद्या व चतुर्विद्या यांचा अभ्यास.

**त्रिविद्या**
- व्याकरण
- अलंकार
- वादविवाद

**चतुर्विद्या**
- अंकगणित
- भूमिती
- संगीत
- खगोलशास्त्र

तसेच नक्षीकाम, हस्तकला, गायन, नृत्य, चित्रकला याचा समावेश होता. अकबराच्या पदरी तानसेन नावाचा सुप्रसिद्ध गायक होऊन गेला.

**अध्यापन पद्धती:**

- मौखिक
- संभाषण पद्धती
- लेखन
- वाचन
- चर्चा इ.
- वर्गनायक पद्धती.

**परीक्षा:**

१) तोंडी

२) विद्यार्थी वर्तनाचे शिक्षकाने केलेले अवलोकन.

३) चर्चा, संवाद, वक्तृत्व करता येते की नाही यासाठी परीक्षा असे.

• फारशी ग्रंथाचा अभ्यास-(क्रमिक पुस्तके)

- रूकत-इ-अबुल
- फजल
- मुल्ला मुनीरची पत्रे
- इन्शा -इ-युसुफी
- अबुल फझलचा 'अकबर नामा'
- तारिक -हा -फिरूस शाही इ.फारशी ग्रंथ अभ्यासासाठी होते.

चंद्रभाग ब्राह्मणाची पत्रे तसेच फैझी याने 'लीलावती' या गणिताच्याा संस्कृत ग्रंथाचे फारशी भाषांतर केले होते.

**• बक्षिसे, शिक्षा:**

चांगले संभाषण, वक्तृत्त्व असणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देत असत. विद्यार्थ्यांची वर्तणूक योग्य नसेल तर शिक्षाही होत असे. गुंणवतांना, अभ्यासंकाना विविध पदव्यांचे प्रमाणपत्रही दिले जाई. उदा- धर्मशास्त्रज्ञ निपूण असणाऱ्यास 'आलीम' ही पदवी तर साहित्यात निपून असणाऱ्यास काबिल ही पदवी दिली जात असे. तर्कशास्त्र दर्शन शास्त्रात निपूण असणाऱ्यांना 'फजील 'ही उपाधी देत असत.

विविध ठिकाणी असलेल्या विविध मदरसांचा अभ्यासक्रमात एकवाक्यता नव्हती.दिल्ली येथील मदरसांमध्ये 'हदीस' तथा तफसीर (Tradition and Rexegesis)याचा समावेश होता तर सियालकोट येथील मदरंसामध्ये व्याकरण शिकविले जात असे.

पिटर मुंडी या परकीय प्रवाशाने आग्रा येथे असलेल्या जेसुईट महाविद्यालयाचा उल्लेख केला आहे. दिल्ली येथे अनेक मदरसा होत्या त्यामध्ये महत्वाची मदरसा म्हणजे माहम अनघाने स्थापन केलेली 'खैर-उल-मंझील' ही होय.

### इतर उच्च शिक्षण संस्था:

### फारशी शाळा:

शासन कर्त्यांची भाषा फारशी असल्याने हिंदू व मुस्लिम व्यक्तीला भाषेचे ज्ञान असणे आवश्यक होते. या गरजेतून या शाळांची निर्मिती झाल्याचे दिसते. या शाळांचा दर्जा उच्च होता. स्मरण, पाठांतर, लेखन यावर भर होता.

### अरबी शाळा:

ह्या शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे त्यांना शिक्षणाचा दर्जा तर होताच परंतु अभ्यास क्रमाचे स्वरूप व्यापक होते. अलंकार शास्त्र (Rhetoric) कायदा, ज्योतिष, निसर्ग तत्त्वज्ञान, अध्यात्मविद्या (Metaphysics), मुस्लिम तत्त्वज्ञान यांचे अध्यापन अरबी शांळामधून होत असे. मदरंसामधील अभ्यासक्रम व मध्ययुगातील युरोपिय विद्यापीठातील अभ्यासक्रम यात बरेचसे साम्य दिसून येते. मुस्लिम शिक्षणाचा मोठा प्रभाव पश्चिमेवर बराच काळ पडला होता परंतू भारतात तेवढा प्रभाव पडला नाही.

### मुस्लिम शिक्षण पद्धती

## ४ब.१० स्त्री शिक्षण (Female Education)

मंहमदाच्या म्हणण्यानुसार 'स्त्री' आणि 'पुरूष' या दोघांनाही ज्ञान मिळविण्याचा अधिकार आहे. त्यामुळेच मुस्लिम काळात काही अंशी स्त्रियांच्या शिक्षणाची सोय होती.

- लहान वयात मुली मक्तबमध्ये शिक्षण घेण्यासाठी जात. त्यांचे नियमित शाळेत येण्याचे प्रमाण कमी असे. त्या गटागटाने शाळेत येत असत.
- शिक्षणात फक्त लेखन, वाचन शिकवले जात असे. त्यांच्यासाठी वेगळा असा अभ्यासक्रम नव्हता.
- शहरातील मुलींना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होत असे परंतु ग्रामीण भागात याबाबत उदासिनता होती.
- खाजगीरितीने स्त्रियांना शिक्षण दिले जाई त्यात गृहशास्त्र आणि धार्मिक शिक्षण यांचा समावेश होता.
- राजघराण्यातील स्त्रियांना गायन, साहित्य, वादन याचांहि अभ्यांस करीत. बाबरची मुलगी गुलबदन बानू बेगम हिने 'हुमायुननामा' लिहला होता. ती युद्धशास्त्र, राजनीती शास्त्र यातही प्रवीण होती.
- नूरजहाँ ही राजकारणात प्रवीण होती. तसेच ती व मुमताज महल यांना गायन व वाड्.मय यांची आवड होती.
- झेब्बुन्नीसा ही उच्च शिक्षित स्त्री होती. ती औरंगजेबाची मुलगी होती. तिचे हस्ताक्षर अतिशय सुंदर होते. तिचा फारशी आणि अरेबिक वाड्.मयाचा अभ्यास होता. तिचे स्वतःचे असे दर्जेदार ग्रंथालय होते. ती फारशी कवयित्री होती.
- अहमदनगरची चांदसुलताना युद्धकला व वादन यामध्ये प्रसिद्ध होती. तिला अरबी, फारशी, तुर्की, कानडी, मराठी भाषा अवगत होत्या.

- बाबरची बहिण 'खानजादा बेगम' उच्चशिक्षित होती.
- शहाजानची मुलगी जहाँनारा फारशी भाषेत कविता करी.
- रजियाने दिल्लीत 'मुइज्जी 'मदरसा काढली तिचा दरबार विद्वानांनी भरला असे. ती स्वत: बुरखा वापरत नव्हती.
- अकबराने मुलींच्या शिक्षणासाठी शाळा काढल्या होत्या.उदा. फत्तेपूर सिक्रीच्या राजवाड्यातील शाळा.
- लहानपणी मुलींचे शिक्षण मुलांच्या बरोबरीने (Co-Education) होत असे नंतर खाजगी रितीने घरातच मुलींचे शिक्षण होत असे.सुतकताई, गृहशिक्षण मुलींचे शिक्षण होत असे.
- पुष्कळ विधवा स्त्रिया कुरआन शिक्षण देण्याच्या पवित्र कार्याला वाहून घेत.
- शिक्षणासाठी बाहेर पडताना बुरखा वापरणे आवश्यक होते.म्हणून बाहेर जाऊन शिक्षण घेण्यात मुलींमध्ये अनुत्साह होता.
- काही शिक्षक, श्रीमंताच्या घरी, राज्यकर्त्यांच्या घरी जाऊन खाजगीरित्या शिकवित असत.

थोडक्यात,

मुस्लिम राज्य कर्त्यांचा अनुत्साह, स्त्री शिक्षणाबाबत इच्छा शक्तीचा अभाव, पडदा पद्धती, ग्रामीण भागात शिक्षणाचा फारसा प्रभाव नव्हता या कारणास्तव स्त्री शिक्षणाच्या सोयी मुस्लिम काळात उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे अनेक स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या, मागासलेल्या होत्या.

**मुस्लिम शिक्षणपद्धती:**

## ४ब.११ विद्यार्थी-शिक्षक संबंध (Student's and Teacher Relationship)

- शिक्षक विद्यार्थ्यांकडून धर्मातील नीती नियमांच्या कठोर अधीन राहून आचरणाची अपेक्षा करीत असे.
- जे विद्यार्थी हुशार व विशेष योग्यता असलेलें असतील त्यांना शिक्षक राजदरबारी, सरकारात नोकरीसाठी शिफारस करीत.
- विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकाविषयी आदर, मानसन्मान होता. शिक्षकही विद्यार्थ्यांवर प्रेम करत. याला काही अपवादही असत. उदा. स्वतः औरगजेबाने आपले गुरू मुल्लाशाह सालेह यांना अज्ञातवासात जाण्याचे फर्मान काढून कठोर वागणूक दिली.
- विद्यार्थी शिक्षकांसमोर विनम्रता प्रकट करीत व त्यांचा आज्ञेचे पालन करीत.
- काही मदरसांमधून शिक्षक आणि विद्यार्थी एकाच वसतीगृहात राहत. त्यात आत्मीयता होती.
- शिल्पकलेतील शिक्षक व विद्यार्थी यातील संबंध निकटचे असत त्यांना एकमेकांबरोबर राहणे दोघांच्या गरजेचे होते.
- शिक्षकाला जो विद्यार्थी प्रसन्न करेल त्याच्यावर अल्ला प्रसन्न होतो असा विश्वास होता.
- शिक्षकाने आपले ज्ञान लपवून ठेवणे पाप मानले जाई.आपल्या जवळ असलेले सर्वज्ञान शिक्षकाने विद्यार्थ्याला दिले पाहिजे तरच विद्यार्थी सक्षम होईल. परिपक्व होईल असा विश्वास होता.

- विद्यार्थ्यांनी शिक्षकांची सेवा करावी हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य होते. शिक्षकाला वेतन कमी असले तरी समाजातील त्याचे स्थान दुर्लक्षित होऊ नये म्हणून विद्यार्थी काळजी घेत.
- अध्यापन हे पवित्र कार्य असल्यामुळे शिक्षक शिक्षणासाठी वाहून घेत.
- विद्यार्थी शिक्षकांना पितृतुल्य मानीत. शिक्षकही विद्यार्थ्यांवर प्रेम करीत असे.
- शिक्षक विद्यार्थ्यांना स्वावलंबन व कष्ट करण्याच्या सवयी लावत.
- विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचा विशिष्ट असा काळ ठरलेला नव्हता. आपल्या विद्यार्थ्यांची गुरू स्वतःच परीक्षा घेऊन वरच्या वर्गात पाठविण्याची शिफारस करीत असे.
- अध्ययन, अध्यापन सकाळी सहा ते रात्री नऊ पर्यत असे. मध्ये भोजनासाठी आणि विश्रांतीसाठी वेळ होता.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागील पाठाची उजळणी गुरूवारी होत असे, गुरूवारी दुपारी तीन नंतर सुटी असे. आणि शुक्रवारीही सुटी असे. शुक्रवार हा दिवस पवित्र मानला जाई.
- श्रीमंत कुटूंबातील विद्यार्थ्यांना त्याच्या घरी जाऊन जे शिक्षक शिक्षण देत त्यांना मिया असे संबोधत.
- सुंदर हस्ताक्षरांची गणना कलेत होई म्हणून शिक्षक विद्यार्थ्यांना लिखाणासाठी चार ते सहा तास देत असत.-शिक्षक विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी एक ते दोन तास देत असत.
- मदरसा, मक्तब ह्या शाळा हिंदू विद्यार्थ्यांना खुल्या होत्या. त्यांनाही शिक्षक शिकवित. भेदभाव नव्हता.-विद्यार्थ्यांना पाठीवर व हातावर घडी मारून शारिरीक शिक्षा शिक्षक देत असे. अथवा खोलीत थोडा वेळ बंद करूनही शिक्षा दिली जात असे.
- शिक्षक विद्यार्थ्यांना रागावताना, शिक्षा करताना विविध प्राण्यांच्या उपमा देत असे.तसेच 'अण्डे' असेही म्हणत.
- काही शिक्षक भोळेही असत. विद्यार्थी जर फळ, फुल, पीठ दाळ आणून देत असेल तर काही वेळा त्याला शिक्षक शिक्षा माफही करीत. अर्थात हे छोट्या व ग्रामीण शाळात होत असे.
- छोट्या शाळेतील(मक्तबं मधील) काही मिया (शिक्षक) एका हातात पिण्यासाठी हुक्का आणि दुसऱ्या हातात छडी घेऊन बसत.
- मंगल प्रसंगी, सणाच्या वेळी, गावात कोणत्याही चौकात विद्यार्थी लहान लहान काठ्या वाजवीत आणि मक्तबसाठी धान्य गोळा करीत. शिक्षक मात्र आपल्या बिछान्यावर बसून असे.
- मदरसांमधील विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्याला एक 'आशर्फी' मिळत असे.आणि दैनिक भोजनात मिठाई व एक फळ दिले जाई.
- विद्यार्थ्यांची योग्यता व कुशलतेसाठी बक्षिसे ठेवली जात. शिक्षकांनाही बक्षिस देऊन मानसन्मान करीत.

## ४ब.१२ मुस्लिम शिक्षण पद्धतीने काय दिले?(या पद्धतीचे, गुण, फायदे अथवा देणगी)

१) मुस्लिम शिक्षण सर्वासाठी खुले होते. त्यामुळे लहान-थोर, गरीब-श्रीमंत यांच्या आचार विचारांचा परिचय झाला.

२) उर्दुच्या रूपाने हिंदू-मुस्लिम देवीघेवीचे एक साधन मिळाले, त्यामुळे हिंदू-मुस्लिम ऐक्य वाढले.

३) विद्वान व सत्य शोधनास वाहिलेली मंडळी तयार झाली

४) सांस्कृतिक शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांची सांगड घातली गेल्याने ऐहिक व परलौकिक जीवनाची तयारी झाली.

५) शिक्षण व्यवसायाभिमूख झाले.

६) नैतिक शिक्षणाची जोड मिळाली.

७) शिक्षण हे केवळ लौकिक शिक्षण नसून धार्मिकतेची त्याला जोड होती. म्हणून लोकांमध्ये धर्मपरायणता वाढीस लागण्यास मदत झाली.

८) मुस्लिम शिक्षणातून उत्तम कला उदयास आल्यात त्यांचा विकास झाला.

९) भारताला परदेशात कलेबाबत आणि उद्योगधंदयाबाबत बाजारपेठ म्हणून लौकिक मिळाला.

१०) निशुल्क शिक्षणाची संधी प्राप्त झाली.

११) विविध राज्यकर्त्यांनी शिक्षणात लक्ष घातले त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत त्या -त्या राज्यकर्त्यांच्या विचारांची, धोरणाची, कार्याची छाप शिक्षण व सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात पडली (उदा.अकबर, औरंगजेब इ.)

१२) मुस्लिम शिक्षणाच्या काळात कवी, इतिहासकार, लेखक, चित्रकार गायक यांचे उंदड पिक आले. त्यामुळे संस्कृती विषयक प्रश्नांना नवे वळण मिळाले.

१३) वाड्.मयातून जीवनाची अनुभूती व सौंदर्य यांचा आस्वाद घेता येऊ लागला. गद्य, पद्य, काव्य, ललीतकला या गोष्टी शिक्षणात आल्या.

१४) शिक्षण उदयोन्मुख झाले.

१५) वर्गनायक पद्धती मिळाली.

१६) इतिहास लेखनाची वृत्ती मुस्लिम काळातच उदयास आली.

## ४ब.१३ मुस्लिम शिक्षण पद्धतीतील उणिवा (दोष)

१. या शिक्षणाचा भर धार्मिकतेवर अधिक असल्यामुळे धर्मांधता वाढली.

२. सर्वांसाठी शिक्षण खुले असले तरी त्याचा फायदा उच्चवर्णीय व मध्यम वर्गीय घेत. हिंदूना फारसा फायदा मिळत नसे.

३. शिक्षांचा भार वाढला, त्यामुळे विद्यार्थी दिशाहीन झालेत.

४. गुरूबद्दल आदर कमी झाला.

५. उच्च शिक्षणाचे माध्यम अरबी व फारशी भाषा असे. अरबी यावयास खुप कालावधी लागे. उर्दु

हे शिक्षणाचे माध्यम फार उशिरा बनले.

६. सर्वत्र मुसलमानी जनतेत शिक्षणाचा प्रसार होऊ शकला नाही.

७. पडदा पद्धतीमुळे सामान्य कुंटूंबातील स्त्रिया शिक्षणासाठी बाहेर पडत नसत. त्यामुळे स्त्री शिक्षण वंचित राहिले.मागासलेले राहिले. केवळ राज्यघराण्यातील स्त्रियाच पुढे शिकल्या.

८. पाठांतरावर भर असल्यामुळे विचार करण्याची पात्रता कमी झाली.

९. मातृभाषेची उपेक्षा झाली.

## ४ब.१४ मुस्लिम शिक्षणाची विद्यापिठे (शिक्षणाची केंद्रे)

मदरसांमधील शिक्षणक्रम सर्वत्र ठराविक असा नव्हता. जसे शिक्षक उपलब्ध होतील तशी विषय शिकविण्याची सोय त्या त्या मदरसामधून असे. मदरसा या माध्यमिक शाळांप्रमाणे तशाच महाविद्यालयीन संस्थाप्रमाणे कार्य करीत. त्यांचे कार्य पाहाता त्यांना उच्च शिक्षण असे नामाभिधान योग्य ठरेल. दिल्ली, जानपूर, आग्रा, बेदर येथील मदरसांना काहीना काही कारणास्तव विद्यापीठाचे स्वरूप प्राप्त झाले. ती फार मोठी शिक्षणकेंद्रे बनली. तेथे चालू असलेल्या शिक्षणसंदर्भात त्यांच्या कार्याची माहिती उदबोधक ठरेल.

**आग्रा**-भारताच्या इतिहासात आग्रा प्रसिद्ध आहे. आग्रा राजधानीचे शहर झाले तसेच ते शिक्षणाचेही केंद्र बनले. शिंकदर लोदीने तेथे शेकडो शाळा सुरू केल्या. परदेशी विद्वान लोकही राज्याश्रयासाठी भारतात आले. कालांतराने आग्रा विद्यापीठ बनले. तेथे उच्च शिक्षण शाळा व महाविद्यालये निघाली. उच्च शिक्षणासाठी परदेशाहून विद्यार्थी येत अकबराच्या कारकिर्दीत आग्रा सांस्कृतिक केंद्र बनले. तसेच विद्या, कला यांचे आगर झाले. उद्योगधंद्यांची भरभराट झाली. पंडित, मोलवी, तत्त्वज्ञ, कवी आगाऱ्यास जमा झाले.स्वतःबादशहाही आगऱ्याला होणाऱ्या विद्वानांच्या वादविवादात भाग घेई. अकबराची कारकिर्द म्हणजे आग्ऱ्याच्या इतिहासातील सुवर्णयुग होय. आग्रा येथे जगातील एक आश्चर्यही उदय पावले.

**दिल्ली**- हे तर राजधानीचे शहर. प्रथमपासूनच ते शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व पावले. तेथील बादशहा शिक्षणात रस घेत. नासिरुद्दिनची नसीरिआ मद्रसा वैभवशाली होती. गुलाम घराण्याने दिल्लीला शिक्षणाचे केंद्र बनविले. अल्लाउद्दिन खिलजीचे कारकिर्दीत मोठमोठे पंडित, तत्त्वज्ञ, येथे आले. फेरिस्ता म्हणतो त्रेचाळीस विद्वान धर्म व कायदा यांत प्रावीण्य होते. फिरोज तुघलख याने ३० महाविद्यालये स्थापिली; गुलामांच्या शिक्षणाची सोय केली.मोगल बादशहाचे कारकिर्दीत दिल्लीचे वैभव वाढले. हुमायुनाने खगोल व भूगोल यासाठी महाविद्यालय सूरू केले. बदाउनी हा तेथील विद्यार्थी होय. जहाँगिरानेही जुन्या मदरसांची डागडुजी केली. शहाजहानने जुम्मा मशिदीजवळ एक महाविद्यालय काढले. बराच काळ दिल्ली हे शैक्षणिक केंद्र म्हणून गाजले.

**जोनपूर**- जोनपूर हे मुस्लिम विद्येचे केंद्र म्हणून फार प्रसिद्ध पावले होते. इराणमधील शिराज या केद्रांची त्याची तुलना करतात. भारतीय शिराझ म्हणून ते विख्यात होते. कला, वाड्.मय ह्यांच्या उच्चशिक्षणासाठी जोनपूरची प्रसिद्धी होती. दूरदूरच्या प्रांतातील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येत. इब्राहीम शर्कीच्या अमदानीत (१४०२-१४४०)जोनपूरला फार महत्त्व चढले. शिंकदर लोदीने येथील महाविद्यालयाचा नाश केला. पण लवकरच शिक्षणकेंद्र म्हणून जानपूरने डोके वर काढले.

साम्राज्य सत्ताधिकारी म्हणून जो पुढे ख्याती पावला त्या शेरशहाने येथेच विद्याभ्यास केला होता. वडिलांशी भांडून तो बंगालमधून येथे आला व वडिलांनी तेथून परत येण्याविषयी त्यास जेव्हा कडक पत्र लिहीले तेव्हा त्याने समरामपेक्षा जोनपूर हे कसे सरस आहे ते वडिलांना कळविले. इतिहास, काव्य व तत्त्वज्ञान ह्यांचा त्याने येथे अभ्यास केला व फारशी मधील सादीच्या कविता येथेच तोंडपाठ केल्या.शहाजहान बादशहाच्या कारकिर्दीपर्यंत अनेक मशिदी व महाविद्यालये येथे स्थापन झालेली जानपूरने पाहिली. इब्राहिम शर्कीने शिक्षणावर बराच पैसा खर्च केला. हूशार विद्यार्थ्यांना इनामे दिली. तसेच येथील होतकरू विद्यार्थ्यांना राज्यकारभारात वरच्या दर्जाच्या जागा दिल्या. येथे हस्तव्यवसाय, राज्यशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, युद्धशास्त्र यांचे उत्तम शिक्षण मिळे.

**बेदर**-बहामनी राज्यातील बेदरचे महाविद्यालय १५व्या शतकातील उत्तरार्धात महमद गवान नावाच्या आश्रयदात्याने खाजगी रितीने काढलेले होते. त्याचे वर्णन केल्याशिवाय मुस्लिम विद्येच्या केंद्राची कथा अपुरी राहिल. महमद गवान हा प्रसिद्ध लेखक विद्वान गणिती होता. विद्येला उत्तेजन मिळावे म्हणून त्याने उदार हस्ताने पैसा खर्च करून बेदरचे महाविद्यालय स्थापन केले.त्याने त्या विद्यालयासाठी एक भव्य इमारत बांधली. ही इमारत भर दुमजली होती. इमारतीमध्ये एक प्रशस्त चौक होता. ह्या इमारतीसाठी त्याने प्रचंड खर्च केला. शंभर शंभर फूट उंचीचे दोन भव्य मनोरे पुढील कोपऱ्यात उभारले होते. या इमारतीचे बांधकामास तीन वर्षे लागली. मनोऱ्याचा दर्शनी भाग रंगीत मुलामा चढवलेल्या विटांचा होता. आजदेखील त्याचा पडका भाग याची साक्ष देत उभा आहे. औरंगजेब बादशहाने जेव्हा बेदर काबीज केले तेव्हा त्याच्या सैनिकांनी या इमारतीचा ताबा घेऊन त्या इमारतीच्या एका भागात दारूखाना काढला. त्यातील दारूच्या स्फोटामूळे ह्या दर्शनीय इमारतीच्या बऱ्याच भागाचा विध्वंस झाला. या इमारतीला लागून जी मशीद होती तिच्या सभोवताली असलेल्या खोल्यांतून विद्यार्थी व शिक्षक राहात असत. येथे एक तीन हजार ग्रंथांचे वाचनालय होते. या महाविद्यालयाचा प्रमुख शेख इब्राहिम मूलतानी हा होता व बहामनी राज्यातील राजपुत्राचे शिक्षण त्याचे हाताखाली झाले होते. त्याची राज्याचा न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली होती. ह्या सर्व महाविद्यालयातून उत्तमोत्तम प्राध्यापक असत. त्यांना सर्वत्र मान असे मुस्लीम विद्येच्या सुवर्णकालात या महाविद्यायावरून पुष्कळ नामवंत शिक्षक बाहेर पडले. काही विशेष विषयांच्या अभ्यासासाठी ही केंद्रे प्रसिद्ध होती. दिल्लीचे वैशिष्ट्य इस्लामी कायदा,लखनोचे वैशिष्ट्य वेदान्तपरज्ञान, पंजाब गणित व गृहशास्त्र तर रामपूरचे तर्कशास्त्र व वैद्यकी असे होते.

## ४ब.१४ आपली प्रगती तपासा

**प्र. योग्य पर्याय निवडा.**

१. मुस्लिम शिक्षण पद्धतीलाच---------शिक्षण पद्धती म्हणतात.
**अ.प्राचीन** **ब.मध्ययुगीन** **क. अर्वाचीन.**

२. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे, प्रार्थना मातृभाषेतून करावी असे मत-----या राज्यकर्त्याचे होते.
**अ.फिरोज तुघलक** **ब.जहाँगिर** **क.औरंगजेब**

३. बुरखा पद्धतीचा अवलंब ------ही करत नसे.
**अ.रजिया** **ब.गुलबदन बानू** **क.झेब्बुन्नीसा**

४. -------याने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शाळा स्थापनेची जबाबदारी सोपवली.

**अ.अकबर ब.बाबर क.औरंगजेब**

५.---------याने लिलावती या संस्कृत ग्रंथाचे भाषांतर फारशी भाषेत केले.

**अ.फिरोज तुघलक ब.अकबर क.फैजी.**

६. -------याने सर्व धर्मियांना एकत्र आणण्याचा असफल प्रयत्न केला.

**अ.बाबर ब.हुमायून क.अकबर .**

७. -------याच्या काळात शिक्षकांना निवृत्ती वेतन सुरू केले.

**अ.फिरोज तुघलक ब.शहाजहान क.औरंगजेब.**

८. मक्तब मध्ये प्रवेश घेण्यासाठी बालकाचे वय ----इतके असावे अशी अट होती.

**अ.चार वर्षे ब.चार वर्षे, चार महिने**
**क.चार वर्षे, चार महिने, चार दिवस**

९. मक्तब हे जसे प्राथमिक शिक्षणाचे केंद्र होते तसे खालील पैकी एका संस्थेतही प्राथमिक शिक्षण दिले जाई.

**अ.मदरसा ब.खानगाहे क.फारशी शाळा.**

१०. ---------हे उच्च शिक्षणाचे केंद्र होते.

**अ.मदरसा ब.दरगाहे क.फारशी शाळा**

११. ----हे मुस्लिम शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्ये होते.

**अ.सक्तीचे शिक्षण ब.नि:शुल्क शिक्षण क.मानसशास्त्रावर आधारित शिक्षण.**

१४ब. 'हुमानयूनामा' हा ग्रंथ-----ने लिहिला.

**अ.नूरजहाँ ब.गुलबदन बानू बेगम क.हुमायून**

१३. ----हा मुस्लिम शिक्षणपद्धतीतील दोष होता.

**अ.वर्ग नायक पद्धती ब.विद्यार्थ्यांना शारिरिक शिक्षा**
**क.व्यवसाय शिक्षण**

१४. खालील पैकी ----- हे मुस्लिम शिक्षण पद्धतीचे केंद्र नव्हते.

**अ.आग्रा** **ब.जैनपूर** **क.नालंदा**

१५. गुलाम घराण्याने ------ हे शिक्षणाचे केंद्र बनविले

**अ.दिल्ली** **ब.बेदर** **क.जोनपूर**

## ४ब.१५ सारांश

मुस्लिम शिक्षण पद्धतीत मक्तब मध्ये प्राथमिक शिक्षण दिले जात असे. शाळा प्रवेशाचा येथे विधी होत असे. तर मदरसांमधून उच्च शिक्षणाची व्यवस्था होती. मदरसांनाच लागून विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केली जात होती.इ. १२०६ ते इ.स.१७०७या कालखंडात विविध मुस्लिम राज्यकर्त्यांच्या सत्ता येवून गेल्यात. या राज्यकर्त्यांच्या विचारांचा प्रभाव त्या -त्या काळातील, शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर झालेला दिसून येतो. त्यातही अकबर, औरंगजेब, फिरोजशहा तुघलक यांनी शिक्षणात बदल घडवून आणलेत.स्त्री शिक्षणाचा विचार करता राजघराण्यातील स्त्रियांना शिक्षण दिले जात असे तसे सामान्य स्त्रियांना शिक्षण न मिळाल्यामुळे स्त्री शिक्षण उपेक्षितच राहिले.अध्यापन हे पवित्र कार्य असल्यामुळे शिक्षक शिक्षणासाठी वाहून घेत. विद्यार्थी शिक्षकांना मानसन्मान देई. त्यांच्याशी अदबीने वागत असत. विद्यार्थ्यांची वर्तणूक अयोग्य असल्यास आज्ञापालन न केल्यास शिक्षक शारिरिक शिक्षाही देत असत. स्वयंशिस्त हा प्रकार नव्हता. शिक्षक विद्यार्थ्यांना स्वावंलंबनाचे धडे देत.

मुस्लिम शिक्षण पद्धतीत काही उणिवा असल्यातरी या काळात विविध कलांना उत्तेजन मिळाले. भारतात स्थापत्यकला व इतर कलाकुसरीच्या वस्तू पाहण्यासाठी खरेदी करण्यासाठी परदेशातून व्यापारी व पर्यटक येत धार्मिक शिक्षणावर भर असला तरी लौकिक शिक्षणाचा समावेशही मुस्लिम शिक्षण पद्धतीत होता.

## ४ब.१६ स्वाध्याय

१. विविध मुस्लिम राज्यकर्त्यांच्या कालखंडात मुस्लिम शिक्षणाचा विकास कसा झाला ते स्पष्ट करा.

२. औरंगजेबाने शिक्षणात कोणते बदल घडवून आणले त्याच्या काळातील शिक्षणाच्या स्थितीचे वर्णन करा.

३. अकबराचे शैक्षणिक योगदान स्पष्ट करा.

४. टिपा लिहा- (अ)'मक्तब' एक प्राथमिक शिक्षणाचे केंद्र (ब)औरंगजेबाचे शिक्षण विषयक विचार

५. मुस्लिम शिक्षण पद्धतीतील प्राथमिक आणि उच्च शिक्षणाचे स्वरूप विशद करा.

६. 'मदरसा'मधील शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७. टीपा लिहा

(अ) मध्ययुगीन कालखंडातील स्त्री-शिक्षण

(ब) जहाँगिरच्या राजवटीतील शिक्षण विकास

(क) शहाजहानच्या राजवटीतील शिक्षण विकास

(ड)'मदरसा'-एक उच्च शिक्षणाचे केंद्र

(इ) मुस्लिम शिक्षणाची विद्यापीठे (केंद्रे)

(ई) फिरोज तुघलक काळातील शैक्षणिक विकास

८. मुस्लिम शिक्षणपद्धतीचे गुण, उणिवा लक्षात घेऊन या शिक्षणपद्धतीचे समीक्षण करा.

९. टीपा लिहाः

(अ) मुस्लिम शिक्षण पद्धतीचे गुण

(ब) मुस्लिम शिक्षणातील उणिवा

(क) मुस्लिम शिक्षणातील विद्यार्थी- शिक्षक संबंध

★★★

**प्रकरण ५**

# स्वातंत्र्य पूर्व कालीन भारतीय शिक्षण

(Module III Education During pre Independet India)

## आंग्लकालीन शिक्षण १८३६, १८५५

(Anglicization of Education 1836-1855)

**घटक संरचना**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ आंग्लकालीन भारतीय शिक्षण

५.२.१.पौवात्यशिक्षणाचे प्रवक्ते

५.२.२ आंग्लवादी

५.२.३ प्राच्यवादी

५.२.४ आंग्लभाषावादी (पाश्चात्यवादी) भूमिका

५.३ मेकॉलेचे टिपण आणि त्याचा प्रभाव

५.४ स्त्री शिक्षण

५.५ वूडचा खलिता १८५४

## ५.० उद्दिष्ट्ये

हा घटक वाचल्यांवर तुम्ही खालील गोष्टी करू शकाल.

- आंग्लकालीन भारतीय शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट कराल.
- पौर्वात्य शिक्षणाचे प्रवक्ते यांच्या विषयी जाणून घ्याल.
- मेकॉलेचे टिपण (जाहीरनामा) समजून घ्याल.
- शिक्षणाविषयी मेकॉलेचा दृष्टीकोनाचे वर्णन करू शकाल.
- बेटिंकचा अहवाल विषद कराल.
- वूडच्या खलीत्याची व्याप्ती वर्णन करू शकाल.

## ५.१ प्रस्तावना

अगदी अनादी काळापासून आपल्या देशातील वस्तू विविध देशात प्रसिद्ध होत्या. त्यामुळे विविध देशांशी वस्तूच्या माध्यमातून देवाणघेवाण, दळणवळण, व्यापार सुरू झाला होता. या व्यापारासाठी विविध देशातील व्यापारी फ्रेंच, डच, इंग्रज हे भारतात आले. १५ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत

ह्या व्यापाऱ्यांनी भारतात जम बसविण्याचा प्रयत्न केला. व्यापाराबरोबर धर्मांतरांचाही त्यांचा प्रयत्न होता. १७ व्या शतकापासून इंग्रज राज्यकर्ते बनण्याचा प्रयत्न करू लागले. १८ व्या शतकात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी बाळसे धरू लागली. ब्रिटीशांनी भारतीयांना सैन्यात भरती करून घेतले व तसे सैनिकी शिक्षण दिले गेले.

आपल्या देशात ह्या काळात शिक्षणाची फारच दयनीय अवस्था होती. भारतात ज्या स्थानिक शाळा होत्या त्यांना 'व्हर्नाक्यूलर' अथवा 'नेटिव्ह' शाळा या नावाने संबोधले जात असे. अशा शाळा हिंदु व मुसलमानांकरिता अलग अलग होत्या. हिंदू-मुसलमानास त्यांच्या धर्मानुसार संस्कृतीचे, साहित्याचे शिक्षण दिले जाई. इंग्रज भारतात आल्यावर येथे मिशनरी शाळा सुरू करण्यात आल्या. भारतातील लोकांनी ही पूर्वीच्या शाळेत बदल करून शाळा सुरू केल्या. या शाळांना देशी शाळा म्हणून संबोधण्यात येत होते.

**माध्यम:** देशी शाळेत दिले जाणारे शिक्षण 'देशी शिक्षण' समजले जात असल्याने शिक्षणाचे माध्यम 'देशी भाषा' हेच होते. इंग्रजी भाषा व त्यातील साहित्याला मुळीच स्थान नव्हते. ग्रामीण भागात देशी शिक्षण पद्धतीचे शिक्षण घेत असत. यात तीन 'आर' (R) म्हणजे वाचणे, लिहणे,व हिशोब करणे. शाळेत मात्र खाजगी पद्धतीने शिक्षण देण्याची प्रथा होती. या शाळांमध्ये अस्पृश्य जातींच्या मुलांना प्रवेश नव्हता.

## ५.२ आंग्लकालीन भारतीय शिक्षण- १८१३-१८३३

या काळात मिशनऱ्यांनी बऱ्याच प्राथमिक शाळांची स्थापना केली. मिशनरी भारतात येण्या पूर्वी देशी शाळेत विविध माध्यमातून शिक्षण देण्याची प्रथा सुरू होती. दुकानदार व्यावसायिक व ग्रामीण भागात देशी पद्धतीचे शिक्षण घेत असत. यात ३ 'आर' (Three R) चा वापर होत असे. म्हणजे वाचणे, लिहीणे, व हिशोब करणे. शाळेत मात्र खाजगी पद्धतीने शिक्षण देण्याची प्रथा होती.

मिशनऱ्यांचा मुख्य उद्देश भारतात धर्म प्रसार करणे हा होता. त्यासाठीच त्यांनी भारताच्या वेगवेगळ्या भागांमध्ये शिक्षणसंस्था स्थापन केल्या. म्हणूनच या मिशनऱ्यांना भारतातील आधुनिक शिक्षणाचे प्रवर्तक म्हटले जाते. शिक्षण हे त्यांच्या दृष्टीकोनातून फक्त धर्मप्रसाराचे माध्यम होते. मिशनऱ्यांना भारतीय लोकांची मानसिकता शिक्षणाच्या माध्यमातून बदलावयाची होती. एकूण त्या काळात त्या सर्व युरोपियन लोकांनी भारतात व्यापक स्वरूपाचे शिक्षणाचे कार्य केले. त्यापैकी काही पुढिलप्रमाणे आहेत.

### ५.२.१ पौर्वात्य शिक्षणाचे प्रवक्ते (Exponents of Oriental Education):

पूर्वेकडिल शिक्षणाच्या विकासाच्या मार्गाकडे पहाता लक्षात येते की १८१३ पर्यंत शिक्षणामध्ये फारशी प्रगती झाली नव्हती. अगदी मोजक्या ठिकाणी म्हणजेच, सेरामपूर, कलकत्ता, डिन्जपू मधील बाप्टीस्ट, जेसोर, पूर्व बंगाल डच चिनसूरा बेलारी येथे प्राथमिक शिक्षणासाठी प्रयत्न झालेले दिसून आले.

मुंबईमध्ये महत्प्रयासाने अमेरिकन बोर्डने धर्मप्रचाराच्या व त्या अनुषंगाने शिक्षणाच्या कार्यात पर्दापण केले. १८१३ ते१८३३ या काळात जनरल बाप्टीस्ट मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी चर्च मिशनरी सोसायटी, द वेसलियन मिशन व स्कॉटीश मिशनरी सोसायटी या मिशनरी संस्थांनी भारतात धर्मप्रसारा बरोबर शिक्षणाचे कार्य केले. वरिल काही मिशनऱ्याबरोबर पौरात्य शिक्षणाचा

प्रसार करणारे काही प्रवक्ते- सुरूवातीच्या काळात मिशऱ्यांचा कल प्राथमिक शिक्षणाकडे होता. बदल ही काळाची गरज ओळखून १८३३ ते १८५३ च्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणावर भर दिला. ख्रिश्चन मिशनऱ्यांचा शिक्षण प्रसाराचा हेतू-

शिक्षणाचे माध्यम इंग्रजी

- धर्म प्रचार करणे.
- शिक्षणाचा मुख्य हेतू धर्मांतर करणे.
- पाश्चिमात्य शास्त्राचा शिक्षणात समावेश.
- पाश्चिमात्य साहित्याचा प्रसार

वरिल बाबींचा विचार करता लक्षात येते की भारतामध्ये शिक्षणाचा पसारा वाढवणे व इंग्रजी भाषेला महत्त्व मिळवून देणे.

### १. अलेक्झांडर डफ ने (Alexander Duff):

कलकत्यामध्ये एक इंग्रजी शाळा स्थापन केली. तेथे बायबलच्या शिक्षणासाठी एक आवश्यक तासिका होती.

### २. जॉन विल्सने:

मुंबई मध्ये एका महाविद्यालयाची स्थापना केली. १८३७ मध्ये अन्डरसन (Anderson) व (Braidwood) बेडवूड याने जनरल असेब्ली स्कूल ची स्थापन केली.

### ३. डॉ. मिलर ने (Dr. Miller):

त्याचे रूपांतर ख्रिश्चन कॉलेज मध्ये केले. १८४१ मध्ये रॉबर्ट नोबेलने (Rodert Nobel) मछली पट्टण येथे नोबेल कॉलेजची स्थापन केली.स्टिफन हिस्लॉप (Stephen Hislop) ने नागपुरला १८४४ मध्ये सोसायटीच्या चौथ्या महाविद्यालयाची स्थापना केली. १८५३ मध्ये चर्च मिशनरी सोसायटीने सेंट जॉनच्या नावाने आग्रा येथे महाविद्यालयाची स्थापना केली. १८३० ते १८५७ हा काळ मिशनऱ्यांनी स्थापन केलेल्या व चालविलेल्या शाळांच होत्या. १८१३ ते १८५३ या काळात शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक गैरसरकारी खाजगी प्रयत्नांनी भर घातली.

### ४. डेव्हिड हेअर (Devid Hare): (१७७५ ते १८४२)

हे गृहस्थ १८०० मध्ये कलकत्याला आले. त्यांनी जवाहिऱ्यांचा खूप व्यापार व्यवसाय करून १८१५ पर्यंत खूप पैसा मिळवून निवृत्त झाले. इंग्लडला न जाता उर्वरित आयुष्य त्यांनी भारतातच घालविण्याचे ठरविले. त्यांनी हिंदू विद्यालय व कॉलेजची स्थापना केली. त्यांचा मुख्य उद्देश हिंदू मुलांना चांगले इंग्रजी शिक्षण देणे हा होता. यासाठी त्यांनी हिंदू व युरोपिअन ची एक समिती स्थापन केली व पूर्णपणे धर्मनिरपेक्ष पाश्चात्य शिक्षण देण्याचे ठरविले. ही समिती त्या दृष्टीने कार्यरत झाली. हिंदू युरोपिअनांची एक समिती स्थापन केली व पूर्णत: धर्मनिरपेक्ष महाविद्यालयीन पाश्चात्य शिक्षण देण्याची सोय केली.

**या डेव्हिड हेअर समितीची वैशिष्ट्ये:**

१) ही संस्था पूर्णतः धर्मनिरपेक्ष होती.

२) संस्कृत व अरबी भाषेचा उपयोग न करता बंगाली व इंग्रजी या भाषांचा उपयोग करण्यात येत होता.

३) अभ्यासक्रमात इंग्रजी भाषा व इंग्रजी साहित्य या विषयांना प्रमुख स्थान होते.

४) या अभ्यासात पौर्वात्य (पूर्वेकडिल) पौर्वात्य देशातील विषयांना स्थान नव्हते.

५) डेव्हिड हेअर हा पहिला संस्थापक आहे कि ज्याने हिंदू मुलांच्या शिक्षणाचा विचार केला.

६) डेव्हिड चा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षण संस्था स्थापन केला.

## ५. जे.ई.डी बेथून (J.E.D. Bethune)(१८०१-५१):

बेथून हे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष होते. व गर्व्हनर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून कार्यरत होते.त्यांनी भारतीय मुलींसाठी धर्मनिरपेक्ष शाळेची स्थापना केली तसेच शाळेचा सर्व खर्च वैयक्तिक पैशातून केला. पण १८५१ बेथूनचा मृत्यू झाल्यावर लॉर्ड डलहौसी ने स्वत:च्या खाजगी पैशांनी ही संस्था चालवली. तदनंतर कंपनीने ही संस्था चालविली.

**बॉम्बे एज्यूकेशन सोसायटीचे प्रयत्न:**

- ॲग्लोइंडियन मुलांना शिक्षण देणे.
- गरीब युरोपिय मुलांना प्रशिक्षण देणे.
- रिचर्ड कोबच्या संस्थेत भारतीय मुलांना प्रवेश मिळत असे.
- इतर धर्मिय मुलांना त्यांच्या बरोबर त्यांच्या भाषेच्या तासाला बसण्याची सक्ती नव्हती.
- नवीन संस्थाना मदत करणे.
- भारतीय मुलांसाठी असलेल्या शाळांचा दर्जा उंचावणे.
- भारतीय मुलांसाठी पुस्तके तयार करणे.
- नेटीव्ह स्कुल बुक ॲन्ड स्कूल सोसायटी ची स्थापना करणे.
- भारतीयांच्या शिक्षणाचा दर्जा केवळ मिशनरी वा कंपन्यांच्या मिशनरी च्या प्रयत्नाने सुटणार नाही. अशी खात्री माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन व अन्य अधिकाऱ्यांना झाल्यामुळे त्यांनी भारतीयांच्या खाजगी शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन व मदत करण्याचा धोरणाचा अवलंब केला. या शाळा नियमित चालत, रविवार हा सुट्टीचा दिवस असे.
- अभ्यासक्रमाचे स्वरूप व्यापक असून त्यांत व्याकरणाचा समावेश होता.
- इंग्रजी भाषेचे शिक्षण देणे हा प्रमुख उद्देश होता.

### ६. 'रॉबर्ट विल्बर फोर्स':

हा ब्रिटीश लोक सभेचा सदस्य होता. त्यांनी इंग्लीश ईस्ट इंडिया कंपनीचा ''ऊप Charter act'' पुनर्रचनेसाठी पुढिल प्रस्ताव मांडला.

- मिशनरी लोकांना मोठ्या संख्येने भारतात पाठवावे.
- परंतु हा प्रस्ताव पूर्वीचा अनुभव लक्षात घेवून कंपनी सरकारने हा प्रस्ताव फेटाळला.
- त्याने भारतीयांना शिक्षण देण्याच्या आपल्या पंचमुखी योजनेसाठी तीव्र आंदोलन केले.-१८१३ मध्ये इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा 'चार्टर ॲक्ट' प्रसिद्ध झाला.
- या ॲक्ट नुसार इंग्लीश मिशनऱ्यांना भारतात मुक्त प्रवेश द्यावा. यांची अंमलबजावणी नुसार खऱ्या अर्थाने मिशनऱ्यांनी भारतातील आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.
- शिक्षणाचा सोई-सुविधा उपलब्ध करून देणे हे कंपनीने स्वतःचे कार्य मानले होते.
- इंग्रज सरकारने दरवर्षी लाखो रूपये शिक्षणासाठी खर्च केले. त्यामुळे भारतीयांना आधुनिक शिक्षणाचे दालन उघडले गेले.
- त्यामुळेच आधुनिक शिक्षणाचा प्रणेता चार्ल्स ग्रॅंट आपल्या पंचमुखी योजनेच्या यशस्वीतेबद्दल आत्मविश्वासपूर्वक म्हणतो की जर सरकारने ही योजना यशस्वी करायची ठरविली तर ते सहज यशस्वी करू शकतात.यांची भूमिका फारच महत्त्वाची होती. इस्ट इंडिया कंपनीशी मित्रत्त्वाचे संबंध असल्यामुळेच मिशनरी शिक्षणाच्या क्षेत्रात एवढे कार्य करू शकले.

या काळातील शिक्षणाच्या क्षेत्रातील सरकारी कार्यापेक्षा मिशनऱ्यांनी केलेले कार्य कितीतरी जास्त होते. ईस्ट इंडिया कंपनीकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या शाळा भारतामध्ये लोक प्रिय होत्या. येथे धर्म प्रसार करण्यात येत नसे.

याउलट मिशनरी शाळांचा भर धर्मानुसार व बायबलच्या शिक्षणावर आधारित असल्यामुळे लोकांच्या मनात भिती होती.

**आपली प्रगती तपासा:**

१) पौर्वात्य शिक्षणाच्या प्रवक्त्याविषयी सविस्तर माहिती द्या.

२) बॉम्बे एज्यूकेशन सोसायटीचे शिक्षणासाठी प्रयत्न यांवर टीप लिहा.

### ५.२.२ आंग्लवादी:

भारतामध्ये ब्रिटीशांचे आगमन झाले आणि त्यांनी आपली पाळेमुळे भारतात खोलवर रोवली. विश्वविजयी होण्याच्या लालसेने ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. उदा. सैन्यात भरती कंपनीत कारकूनी अशा अमिशाने लोकांना शिक्षणाकडे वळविण्याच्या प्रयत्न केला.याच काळात इस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी संस्था राजकीय सत्ता बनली होती. ईस्ट इंडिया कंपनी ही राजकीय सत्ता बनल्यावर शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आला. हिंदू व मुस्लिम यांच्या शिक्षणाची जबाबदारी कंपनीवर पडली याच कारणांमुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांमध्ये मतभेद निर्माण झाले. या मतभेदासच आपण आंग्लवाद म्हणतो. हा आग्लवाद प्राच्यवादी (Orientarist ) व पाश्चात्य वादी (Angliasts) यांच्यामध्ये होता.

### ५.२.३ प्राच्यवादी (Orientalist):

प्राच्यवादीचे मते भारतीय शिक्षण घेऊन इंग्रजी शिकून इंग्रजांच्या खाद्यांशी खांदा लावून कार्य करील. विल्सन हा एक अशाच विचारसरणीचा होता.विल्सन च्या मते , संस्कृत, अरबी, फारशी भाषेवर आधारित शिक्षण देऊन भारतीय धर्म, जाती यापासून वेगळे ठेवू इच्छित होते. ज्यामुळे नव निर्मित ब्रिटीश राज्याला धोका पोहोचणार नाही.

काही प्राच्यवादींचे म्हणणे होते की, प्राचीन ज्ञान विचारांशी संपर्कात आल्यानंतर भारतीय संस्कृती नष्ट होईल. तसेच भारतीय साहित्यामध्ये एवढे अपार ज्ञान भांडार आहे की त्या ज्ञानाचा उपयोग युरोपवांसीयासाठी आवश्यक आहे. पाश्चात्यवादी (Anglists) पाश्चात्यवादीचे म्हणणे होते की, भारताच्या प्रगतीसाठी इंग्रजी शिक्षण आवश्यक आहे. इंग्रजी व्यापाऱ्यांना वापर करण्यासाठी त्यांनी इंग्रजी शिक्षण देण्याचे स्वीकारले. ऑफिस मध्ये कार्य करण्यासाठी कारकूनी वर्ग होता तो तयार करण्यासाठी त्यांनी शिक्षण दयावे असे पाश्चात्यवादींचे म्हणणे होते.

थोडक्यात आंग्लवादाचे कारण आपल्या लक्षात येते ते म्हणजे

- आंग्लवादाचे प्रमुख कारण कोणते असावे ?
- कोणत्या भाषेला प्रभुत्त्व द्यावे ?
- कार्यवाहिन्या कोणत्या असाव्यात ?
- अध्यापन पद्धती कोणत्या असाव्यात ?

या वरील प्रश्नावर आपआपली मते पुढे येऊ लागली. व त्यातूनच वाद निर्माण होऊ लागले. अभिजात भाषावादी पक्ष व आंग्लभाषावादी यांच्यात वाद निर्माण झाला.अभिजात भाषावाद्यांची भूमिका (पौर्वात्यवादी)वॉरन हेस्टिंग, लॉर्ड मिंटो, एच टी प्रिन्सेप, एच.एच.विल्सन व डंकन हे प्रमुख अभिजात भाषावादी होते. कंपनीला कंपनी चालवण्यासाठी उच्चवर्णीय शिकलेल्या लोकांची गरज भासू लागली म्हणून वॉरन हेस्टिंगने कलकत्त्याला मदरसा व डंकनने १७९१ मध्ये बनारसला संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली. यातूनच शिक्षणाच्या धोरणासंबंधीच्या पौर्वात्य (Orientalist) विचारसरणीची सुरवात झाली.१७६५ ते १८१३ पर्यंतच्या काळात कंपनीने भारतीय शिक्षणाबद्दल पुढिल धोरणांचा अवलंब केला.

- कंपनीने धर्मप्रसारासाठी ख्रिश्चन मिशनऱ्यांना मदत न करणे.
- कंपनीने पाश्चीमात्य ज्ञान भारतीयांना देण्याचा प्रयत्न न करणे.
- संस्कृत व अरबी भाषेतून परंपरागत अभिजात शिक्षण देणे.
- धार्मिक अलिप्तता पाळणे.

चार्टर कलम १८१३तील ४३ विभागातील तरतुंदीसंबंधी मतभेद (अभिजात भाषावादी) पौर्वात्यवादी विद्वानांचा दृष्टिकोनः

१) शिक्षणात भारतीय ज्ञानाचा प्रारंभ व विकास करणे शास्त्रीय ज्ञान अभिजात भाषांत भांषांतरित करणे. आवश्यक आहे.

२) पौर्वात्य शिक्षण देणाऱ्या सध्याच्या संस्थांना सरंक्षण देण्यात यावे व त्या तशाच चालू ठेवाव्यात.

३) भारतीय लोक इंग्रजी भाषेवर कधीच प्रभुत्त्व प्राप्त करणार नाहीत.

४) इंग्रजी भाषेची सक्ती केल्यास भारतीयांच्या मनात रागाची भावना निर्माण होईल.

५) संस्कृत व अरबीतील अभिजात साहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे व उपयुक्त आहे म्हणून भारतीयां बरोबरच तसा अभ्यास पाश्चिमात्य विद्वानांनी ही करावा.

### ५.२.४ आंग्लभाषावादी (पाश्चात्यवादी) भूमिकाः

चार्ल्स ग्रॅट लॉर्ड विल्यम बेटिंग, सर ई. पेरी. वॉर्डन हे प्रमुख आंग्लभाषावादी होते.

ब्रिटीश कायदेमंडळाने ब्रिटीश अधिपत्याखालील प्रदेशातील जनतेच्या प्रगतीसाठी व धार्मिक व नैतिक विकासासाठी पुरेशा शिक्षकांची व मिशनऱ्यांची नेमणूक करावी ही सूचना केली होती.

कंपनीच्या संचालक मंडळाने या ठरावास कडकडून विरोध केला कारण भारतात त्यांना सत्ता मजबूत करावयाची होती.कंपनीने धार्मिक अलिप्ततेचे धोरण स्वीकारले व हिंदूचे धर्मांतर करणे वेडेपणाचे आहे. त्यांच्या धार्मिक श्रद्धा चांगल्या आहेत, त्यांना वेगळ्या शिक्षणाची जरूरी नाही असे मत स्पष्ट केले.

चार्ल गॅटस ने कंपनीच्या धोरणास विरोध करून भारतीयांच्या शिक्षणाबद्दल पुढिल मुद्दे (विचार) मांडले.

१) भारतीय समाजाची नैतिक स्थिती निकृष्ट आहे याची जाणीव इंग्रजी लोकांना करून देणे आवश्यक आहे.

२) निकृष्ट समाजाची दोन कारणे आहेत.
अ)अज्ञान व योग्य धर्मविचारांचा अभाव.
ब)यासाठी त्यांना शिक्षण देणे व त्यांचे धर्मांतर करून त्यांना ख्रिश्चन धर्मात आणणे.

३) वरिल उद्देश साध्य करण्यासाठी शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे.

४) इंग्रजी भाषेद्वारे हिंदूना पाश्चिमात्य साहित्य, तत्त्वज्ञान व धर्म इ. विषय अवगत करून द्यावे.

५) असे केल्याने कालांतराने हिंदू स्वत:च इंग्रजीचे शिक्षक बनतील व सार्वजनिक जीवनात इंग्रजींचा वापर सर्वमान्य होईल.

६) छपाईच्या शोधामुळे पाश्चीमात्य ज्ञानाचा प्रसार सुलभ रीतीने करता येईल.

७) भारतीय शिक्षणात नैसर्गिक शास्त्राचे ज्ञान व तांत्रिक संशोधनवर भर द्यावा.

८) इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम व सरकारी व्यवहारातील भाषा असावी.

**आपली प्रगती तपासा:**

१) आंग्लवादाची सविस्तर चर्चा करा.

२) 'चार्ल्स ग्रॅट' याला आधुनिक शिक्षणाचा प्रणेता असे का म्हटले जाते ?

## ५.३ मेकॉलेचे टिपण आणि त्याचा प्रभाव (Macaulay's Minute & its ettect)

लॉर्ड मेकाले हे कार्यकारी मंडळाचे सभासद होते. जेव्हा भारतीयांच्या शिक्षणासंबंधीचा विवाद्य प्रश्न मंडळात उपस्थित झाला तेव्हा भारतीयांच्या शिक्षणांसबंधी आपले प्रसिद्ध टिपण लिहले. या टिपणात त्यांनी १८१३ चार्टर कलमाच्या विभाग ४३ मधील तरतुंदी अन्वयार्थ स्पष्ट केला.

१) १८१३ च्या कलमामधील (Literature) या शब्दाचा अर्थ मेकॉलेच्या मते इंग्लीश साहित्य (इंग्रजी ललित साहित्य) असा आहे.

२) शास्त्रीय ज्ञानाचा पुरस्कार हा उद्देश फक्त शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषा ठेवण्यानेच साध्य होईल.

३) चार्टर कलम (१८१३) मधील विभाग ४३ मधील विवाद्य शब्दांचे वरिल प्रमाणे अर्थ लावले न गेल्यास मेकॉलेने तो विभाग रद्द करण्याची धमकी दिली. भारतात कोणती शिक्षण पद्धती असावी यावर पौर्वात्य व पाश्चीमात्य असे सरळ दोन गट पडले. लॉर्ड बेटिंकला दोन्ही गटांनी आपआपली मते सादर केले.

### मेकॉलेचे व्यक्तीमत्त्व व भारतात आगमन:

१०जून १८३४ मध्ये मेकाले भारतात आला. तो गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सीलचा कायदेशीर सल्लागार होता. तो अतिशय हुशार व कायदेतज्ज्ञ होता, तसेच लेखक, वक्तृत्वगुणसंपन्न सुद्धा होता. त्यामुळेच त्याकाळातील गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिक याला असे वाटत होते की मेकॉलेमुळे

आंग्लभाषानिष्ठ व महित भाषा निष्ठ हा वाद संपुष्टात येईल. मेकॉलेने या दोन्ही गटाच्या व्यक्तव्याचा अभ्यास केल्याशिवाय आपले मत व्यक्त केले नाही.सर्वांचा सखोल अभ्यास करून शिक्षण विषयक धोरणासंबंधी मत विचारले नसतानाही २ फेब्रु.१८३५ रोजी त्याने आपला सल्ला विवरण पत्राच्या स्वरूपात प्रभावी भाषेत लॉर्ड बेंटिककडे पाठवून दिला.

१० जून १८३४मेकोलेचे भारतात आगमन

गव्हर्नर जनरलच्या एक्झीक्यूटिव्ह कौन्सीलच्या कायदे सल्लागार पदी नियुक्ती.

हुशार व भाषा संस्कृती याविषयीचा अभिमान.

त्यामुळे लॉर्ड बेटिंकची अपेक्षा.

मेकॉलेमुळे महितभाषानिष्ठ आंग्लभाषानिष्ठ वाद संपुष्टात येईल असा विचार

- एक लाख रूपयाचा शिक्षणावरील खर्चाचा विचार.
- भारतीय विद्वान कोणाला समजायचे ?
- इतरही विषयांवर सल्ला.
- साहित्य व वाङ:मय यामध्ये कोणत्या भाषेचा समावेश करावयाचा ?

मेकॉलेची बंगालच्या लोकशिक्षण समितीच्या सभापतीपदी नियुक्ती

संपूर्ण अभ्यासअंती मतप्रदर्शन — यामध्ये शैक्षणिक धोरणाचाही विचार.

२ फेब्रू. १८३५ ला 'सल्ला विवरण पत्र' सादर लॉर्ड बेटिंककडे

**(टिपण)**

**लॉर्ड मेकॉलेचे टिपण (जाहीरनामा):**

''जगातील सर्व भांषामध्ये इंग्रजी भाषा सर्वश्रेष्ठ आहे. राज्यकर्त्यांची व उच्चवर्णीयांची भाषा इंग्रजीच आहे, आणि पूर्वेकडील सर्व देशात इंग्रजी भाषा व्यापारास उपकारक ठरेल.''भारतीयांनी त्याच्या या विचारसरणीला विरोध केला असता तो म्हणाला, ''प्रकृतीस काय चांगले आहे हे शिकले पाहिजे जीभेस काय आवडते ते नको'' एवढ्यावरच न थांबता तो पुढे म्हणाला, ''आम्हाला भारतात असा वर्ग निर्माण करायचा आहे, जो रक्ताने व वर्णाने पूर्णत: भारतीय असेल; पण मते अभिरूची, संस्कृती , नीतीमुल्ये व बुद्धी याबाबत तो पूर्णपणे इंग्रजी असेल.''

मेकॉलेने आपला खलिता प्रसिद्ध केला त्यास मेकॉलेचे मिनीट (Mecaulay's Minute) अथवा विवरपत्र या नावाने ओळखले जाते.

**शिक्षणविषयी मेकॉलेचा दृष्टिकोन:**

**मेकॉलेचा शिक्षणाविषयी दृष्टिकोन**

- संस्कृत व अरबी भाषेस विरोध हेटाळणी
- इंग्रजीस प्राधान्य.
- इंग्रजीस अवास्तव महत्त्व.
- ज्ञानाची अदयावत दालने इंग्रजीत विस्तिर्ण होताना दिसतात.
- प्रगतीची भाषा इंग्रजी.
- उच्च वर्गाची बोलीभाषा इंग्रजी.
- पूर्वेकडील देशाशी व्यापाराची भाषा इंग्रजी.
- भारतातील विद्वान निर्माण होण्यास सह्यायभूत भाषा इंग्रजी.
- इंग्रजी साहित्याची भाषा इंग्रजी.
- लॉर्ड मेकालेने इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व देऊन संस्कृत सारख्या समृद्ध भाषेचे हेटाळणी केल्याचे प्रत्ययास येते.

**मेकॉलेच्या टिपण (Minute) (जाहिरनामा)चा प्रभाव:**

मेकॉलेच्या (जाहीरनाम्यामुळे) टिपणामुळे तो प्रसिद्धीच्या झोतात आला. त्याने आपल्या जाहिरनाम्यात इंग्रजीला उचलून धरले. व स्थानिक भाषांची हेटाळणी केली. भारतातील लोकांना त्याने आचार, विचार व वेशभूषा यांनी इंग्रजमय केले होते. काही लोकांच्या मते भारताच्या विकासात मेकॉलेच्या जाहिरनाम्यामुळे मोठेच परिवर्तन घडून आले. इंग्रजी भाषेच्या शिक्षणाने भारतात राजकीय जागृती होण्यास मदत झाली त्यामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची भारतास जाणीव झाली. मेकॉले हा एक प्रकारे विकासाचा मार्गदर्शक ठरला. भारतात इंग्रजी शिक्षण सुरू झाले नसते तर भारतात स्वातंत्र्य संग्राम घडण्यास अवधी लागला असता व आंदोलने झाली नसती. त्यामुळे इंग्रजी शिक्षणासाठी इंग्रजांना भारतात एक चांगले धोरण आखण्यास मदत मिळू शकली.

मेकॉलेमुळे भारतात पाश्चीमात्य ज्ञान-विचारांची गंगा भारतास येण्यास मार्ग मोकळा झाला. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याने ज्ञान विज्ञानाची भारतास ओळख झाली. त्यामुळे आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात विकासाची संधी आपोआपच चालून आली.

मेकॉलेने आयुर्वेदावर अकारण रोष प्रकट केला होता. आर्युकर्दीक ग्रंथ, ज्योतिषशास्त्राचा त्याने अभ्यास केला नव्हता. त्यामुळे त्याने भारतीय टीकाकारांचा रोष ओढवून घेतला. इंग्रजी शिक्षणामुळे मेकॉलेस भारतात विचाराने इंग्रजी असणारा वर्ग निर्माण करावयाचा होता. मेकॉलेने आपल्या जाहीरनाम्यात पाझर सिद्धांतांचा उल्लेख केला होता. त्या सिद्धांतानुसार भारतातील उच्च वर्गातील लोकांना प्रथम शिक्षण देऊन ते उच्च वर्णीय लोक खालच्या लोकांना शिक्षण देतील म्हणजेच वरच्या वर्गाकडून खालच्या वर्गापर्यंत झिरपत जाईल. त्यामुळे आर्थिक बोजा कमी होईल. पण तसे न होता ज्या वरच्या वर्गातील लोकांनी शिक्षण घेतले, त्यांनी खालच्या वर्गातील लोकांना शिकवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नाही. त्यामुळे शिक्षीत व अशिक्षीत लोकामध्ये आपोआपच दरी निर्माण झाली होती.

**बेटिंकचा अहवाल (Bentick's Resoulution)१८३५:**

लॉर्ड मेकॉलेनी आपला जाहिरनामा (Mecaulay Minutes) ७ मार्च १८३५ मध्ये प्रसिद्ध

केला. तो शिक्षणविषयक जाहीरनामा होता तो पौर्वात्यवादयाकडे अभिप्राचार्य पाठविला. तो जाहिरनाम्यातील स्पष्टीकरणाने नाराज झाला. त्याने लॉर्ड मेकालेच्या जाहीरनाम्यावर टीका करून देषी भाषांमधूनच भारतीयांना शिक्षण दिले जावे असे मत प्रदर्शित केले. १५ फेब्रुवारी १८३५ रोजी प्रिन्सेपकडे मेकॉलेच्या स्पष्टीकरणाला उत्तर म्हणून एक परिपत्रक तयार केले. प्रिन्सेपने आपल्या परिपत्रकात पुढिल विचार व्यक्त केले होते.

**अध्यापन पद्धती**

१.संस्कृत, अरबी भाषांना महत्त्व दयावे.

२.भारतीय शिक्षण केंद्रे सुरू ठेवावे.

३.देशी भाषेतून शिक्षण द्यावे वरिल परिपत्रकास लॉर्ड बेंटिक ने केराची टोपली दाखवून मेकालेच्या टिपणी (अहवालास) उचलून धरले.

**बेटिकने ८ मार्च १८३५ रोजी शिक्षण विषय धोरण पुढिलप्रमाणे:**

**शिक्षण विषय धोरण**

१. भारतीय लोकांना ज्ञान विज्ञान व युरोपिअन साहित्य शिकवणे हा इंग्रज शासनाचा हेतू होता. यासाठी निधि खर्च करावा.

२. प्रौर्वात्य भाषेची पुस्तके अगोदर छापण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने यापुढे या भाषेची पुस्तके छापण्यासाठी पैशाचा अपव्यय करू नये.

३. प्रौर्वात्य शिक्षण बंद न करता त्यांना अर्थसहाय्य वेतनात खंड पाडू नये.

४. क्रमांक १ ते ३ या मुदयावर खर्च करून शिल्लक रक्कम ज्ञान, विज्ञान व पाश्चीमात्य साहित्यासाठी वापरावी. बेटिकच्या माध्यमातून ब्रिटीश शासनाने भारतीयासाठी शिक्षणविषयक धोरण जाहीर केले. या अहवालामुळे भारतातील शिक्षणाचे उद्देश साधन आणि माध्यम याविषयी भारतीय शिक्षणासंबंधी पौर्वात्य पाश्चीमात्य वादावर पडदा पडला.

**आपली प्रगती तपासा:**

१.मेकॉलेचे टिपण (अहवाल) स्पष्ट करा.

---

---

---

२.मेकॉलेचे टिपण (अहवाल) व त्याचा प्रभाव यावर चर्चा करा.

---

---

---

---

३. बेटिंक चा अहवालावर टिपा लिहा.

## ५.४ स्त्री शिक्षण (Women's eduction)

१८३३ ते १८५५ या कालखंडात भारतात इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून इंग्रजीचे शिक्षण देण्यास सुरवात झाली होती. १८३५ मध्ये लॉर्ड बेंटिकने राजाराम मोहन रॉय यांच्या सहाय्याने स्त्री शिक्षणास चालना दिली. १८४४ मध्ये सरकारच्या पाठिंब्याने डलहौसी ने स्त्री शिक्षणास सरकारची रीतसर (मंजूरी) परवानगी मिळवून दिली. ही योजना पुढे १९५४ पर्यंत चालू होती. पुढे १९५४ ला वूड चा खलिता आला. त्यावेळी वूडच्या खलीत्यातील स्त्री शिक्षण पुढिलप्रमाणे-

वूड ने आपल्या खलित्यात स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. वूडचा खलिता सुरू होण्यापूर्वी भारतात अनेक संस्थामध्ये स्त्री शिक्षणाचे कार्य सुरू होते. खलित्यात नमूद करण्यात आले की ज्या शांळामध्ये स्त्री शिक्षणाचे कार्य सुरू आहे. अशा संस्थांना सहाय्य अनुदान देण्यात यावे. त्यामुळे भारतातील स्त्री शिक्षणास चालना मिळेल. अनुदान पद्धतीमुळे संचालक खूष झाले.

वूडच्या खलित्यामुळे भारतातील स्त्री शिक्षणास एक नवी दिशा मिळाली. वूडच्या खलित्याने सर्व धर्मातील स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळवण्यास मदत झालेली होती.

## ५.५ वूडचा खलिता १८५४ (Wood's Dispatch-1854)

**भारतात इंग्रजी शिक्षणाचे प्रस्थ साधारणत:**

१८३३ ते १८५३ या कालावधीत अधिक वाढले होते. या कालखंडात लॉर्ड बेंटिकने मेकॉलेच्या स्पष्टीकरणातून दिलेला जाहिरनामा १८३५ रोजी जाहिर करण्यात आला. पाश्चात्य शिक्षणाचा व त्यांच्या साहित्याचा प्रचार व प्रसार करणे हे एकमेव उद्दिष्ट व उद्देश ब्रिटीश शासनाचा होता. शासनाच्या आदेशानुसार इंग्रज मिशनऱ्यांनी भारतात नवीन शैक्षणिक संस्था सूरू केल्या परंतु त्यांचा मुख्य उद्देश धर्मप्रसार करण्याचाच होता.

ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण दर वीस वर्षांनी शैक्षणिक धोरण बदलण्याचे होते. १८३३ ते १८५३ वीस वर्षे पूर्ण झाल्याने शिक्षण विषयक धोरणात बदल करणे क्रमप्राप्त झाले होते. इस्ट इंडिया कंपनीत सर चार्ल्स वूड (Sir Charles Wood) हा संचालक पदावर कार्यरत होता. भारतातील शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्याची जबाबदारी वूडवर सोपविण्यात आली. वूड यांनी शिक्षणविषयक अहवाल १८५४ रोजी शासनास सादर केला म्हणून या अहवालास 'वूडचा खलिता' अथवा 'भारतीय शिक्षणाची सनद' अथवा 'मॅग्लर कार्टा' म्हणतात. ह्यामध्ये नवीन शिक्षणाचा घोषवारा जाहीर करण्यात आला. त्यात शिफारशी करण्यात आल्या. त्यात वूडच्या खलित्याचे उद्देश स्पष्ट करण्यात आले.

**वूडचा खलित्याचा उद्देश हेतू:**

भारतीयांना शिक्षण देण्यासाठी पुढील उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आली होते.

**वूडच्या खलित्याचे उद्देश**

- १.पाश्चात्य ज्ञानाची ओळख करून देणे.
- २. शिक्षणातून बौद्धिक विकासाबरोबर नैतिक चारित्र निर्माण करणे.
- ३.कंपनीस सक्षम विश्वासार्ह कर्मचारी तयार करणे.
- ४. इंग्रज़ मजूरांच्या वस्तूंना योग्य मागणीसाठी प्रयत्न करणे.

**वूडच्या खलित्याच्या शिफारशी:**

भारतीय शिक्षणाची जबाबदारी शासनावर असल्याचे घोषणापत्रात नमूद करण्यात आले. त्यानुसार शिक्षण प्रसार करणे हे कंपनीचे कर्तव्य ठरले. यानुसार पुढील शिफारशी करण्यात आल्या.

**वूडच्या खलीत्यातील शिफारशी**

- १)अभ्यासक्रमात विविध विषय.
- २) विद्यापिठाची स्थापना करणे.
- ३)सामान्यांसाठी शिक्षण व्यवस्था.
- ४)व्यावसायिक शिक्षण.
- ५)सामान्य शिक्षणविभागाची स्थापना.
- ६)सहाय्य अनुदान पद्धती.
- ७)शिक्षक प्रशिक्षणाची तरतूद.
- ८) स्त्री शिक्षण.
- ९)महाविद्यालये परस्परांना जोडणे.
- १०)भाषा माध्यमात सूट.
- ११)शिक्षण आणि नोकऱ्यांची निर्मिती.
- १२)वाङःमयाची निर्मिती.
- १३)मुसलमानाचे शिक्षण

**१. अभ्यासक्रमात विविध विषय :**

वूडच्या शिफारशी नुसार संस्कृत, अरबी, फारशी अशा भाषांना उपयोगी भाषा म्हणून भाषेप्रमाणे अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावे. पाश्चीमात्य साहित्य आणि विज्ञान भारतीयांना उपयोगी आहे असे समजण्यात आले.

**२. विद्यापीठाची स्थापना करणे:**

वूडच्या खलित्यामध्ये भारतीय विद्यापीठाची स्थापना करण्याचा उल्लेख आहे. त्यानुसार भारतात मुंबई, मंद्रास, कोलकत्ता येथे विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. या विद्यापीठाची स्थापना लंडन विद्यापीठांच्या धर्तीवर करण्यात यावी. प्रत्येक विद्यापीठात एक कुलपती कुलगुरू आणि इतर सहकारी पदे असावीत.

**वूडच्या खलित्याचे गुण:**

१) वूडच्या खलित्याने भारताच्या इतिहासात एका शानदार युगाचा प्रारंभ झाला. म्हणून तो "Magna Chatra of English Education in India." या नावाने ओळखला जातो.

२) वूडच्या खलीत्यामुळे ब्रिटीश सरकारला पहिल्यांदाच भारतीय शिक्षणाचा विचार करावा लागला.

३) ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी भारतीय शिक्षणाबद्दलचे कोणतेही धोरण ठरविले नव्हते. परंतु वूडच्या खलीत्यामुळे कंपनीला भारतीय शिक्षण प्रणालीचा आराखडा तयार करावा लागला. तसेच भारतीय शिक्षणाची ध्येये निश्चित करावी लागली.

४) वूडच्या खलित्यामुळे भारतीयांचे शिक्षण ही ब्रिटीश सरकारची जबाबदारी आणि कर्तव्य आहे हे निश्चित झाले.

५) वूडच्या खलीत्यामुळे भारतीयांचे शिक्षण ही ब्रिटीश सरकारची जबाबदारी आणि कर्तव्य आहे तसेच जनसामांन्या ना शिक्षीत करणे हे ती त्याचे प्रमुख कर्तव्य आहे हे निश्चित झाले.

६) वूडच्या खलित्याने लोकशिक्षणासाठी ठोस पावले उचलली गेली.

७) प्राथमिक स्तरापासून ते उच्च स्तरापर्यंतची शिक्षण प्रणाली कशी असावी हे स्पष्ट झाले.

८) पाश्चीमात्य साहित्याचा अनुवाद भारतीय प्रादेशिक भाषेमध्ये करण्याच्या योजनेमुळे लेखकांना प्रेरणा प्रोत्साहन मिळाले.

९) लोकशिक्षण विभागाची स्थापना करावयास सांगून या विभागाची जबाबदारी लोकशिक्षण व संचालकांवर सोपविणे.

१०) वूडच्या खलित्याने देशी शिक्षणाच्या विकासाकडे सरकारचे लक्ष वेधून घेतले.

११) इंग्रजी बरोबरच शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतीय प्रादेशिक भाषांना महत्त्व प्राप्त झाले.

१२) कलकत्ता, मुंबई, मंद्रास आणि गरजेप्रमाणे अन्यत्र विद्यापीठांच्या स्थापनेची पार्श्वभूमी तयार झाली.

१३) माध्यमिक शाळा व महाविद्यालयाची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने योग्य वातावरण तयार झाले.

१४) व्यावसायिक शिक्षणाचा विचार करून बेरोजगारीची समस्या सोडविण्याच्या प्रयत्नास गती मिळाली.

१५) वूडच्या जाहिरनाम्यामुळे स्त्री शिक्षणाला प्राधान्य मिळाले.

१६) शिक्षण संस्थांना सुद्धा 'सहाय्यक अनुदान' देण्याच्या शिफारशीमुळे शाळांना भक्कम आर्थिक आधाराची शक्यता निर्माण झाली.

१७) हुशार पण गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याच्या योजनेमुळे या विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर झाल्या.

१८) उच्चशिक्षित वर्गालाच सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याच्या योजनेमुळे सर्वसामान्य वर्ग शिक्षणाकडे आकर्षित झाला.

१९) शिक्षकांसाठी चांगली वेतनश्रेणी ही शिफारस बुद्धिमान वर्ग या पेशाकडे आकर्षित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त होती.

२०) वूड ने त्याच्या खलीत्यामध्ये शिक्षकासाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्याची शिफारस केली होती. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी ही बाब पूरक अशीच होती.

२१) शिक्षणसंस्थांमध्ये व नोकरीसाठी धर्माचा विचार करू नये. असे स्पष्ट केल्यामुळे धर्मनिरपेक्षता या तत्त्वास बळकटी आली.

२२) वुडच्या जाहीरनाम्यामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरवात झाली व यातूनच आधुनिक शिक्षणपद्धतीचा पाया घातला गेला.

**वूडच्या खलित्याचे दोष:**

**१)नेतृत्त्व निर्माण करणाऱ्या शिक्षणाचा अभाव:**

वूडच्या जाहिरनाम्यामध्ये नेतृत्व विकासाकरिता कोणत्याच सूचना शिक्षण पद्धतीत सांगितलेल्या नाहित.

**२) परीक्षा पद्धतीस वाजवीपेक्षा जास्त महत्त्व:**

वूडच्या जाहिरनाम्यातील तरतुदीनुसार परीक्षा पद्धतीला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देण्यात आले. परीक्षा पास होणे एवढेच विद्यार्थ्यांचे ध्येय होते.

**३) भारतीय शिक्षणाचे बाजारीकरण:**

वूडच्या जाहिरातील तरतुदी शासकीय नोकऱ्याचे आमिष दाखवून शिक्षणाची आखणी केली होती. भारतीय लोक अशा अमिषांना बळी पडल्याने आध्यात्मिक ज्ञानापासून भारतीय शिक्षणांस अलग ठेवण्यात शासन यशस्वी झाले. त्यामुळे भारतीय शिक्षणाला बाजारी स्वरूप आले.

**४) धर्मनिरपेक्षतेला तिलांजली:**

वूडच्या खलित्याने मिशनरी लोकांना धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थाना करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मिशनरी शाळांमधून धर्मनिरपेक्षता निर्माण करता आली नाही. तसेच त्यांची कार्यवाही शाळांमधून करण्यात आली नाही.

**५) सार्वत्रिक साक्षरतेचा अभाव:**

सार्वत्रिक साक्षरतेचा पुरस्कार वूडच्या खलित्यात केल्याचे आढळत नाही. भारतातील मुलामुलींना त्यांच्या ठराविक वयांपर्यत योग्य शिक्षण द्यावे याचा शासनाने पाठपुरावा केल्याचे दिसत नाही. त्यामुळे सार्वत्रिक साक्षरतेचा अभाव दिसून येतो.

**६) इंग्रजी शिक्षितांना नोकरित स्थान:**

इंग्रजी शिक्षणास अवास्तव महत्त्व देण्यात आले होते. अशा शिक्षितानांच नोकऱ्यात अग्रक्रम दिला जात असे. अशा प्रकारे प्रादेशिक (एतदेशीय) भाषा साहित्याकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष केले जात असे.

**७) लोकांच्या पैशाचा दुरूपयोग:**

वूडच्या जाहिरनाम्यात इंग्रजी शिक्षणास महत्त्व उत्तेजन देण्यावर भर होता. भारतातील शाळांना अनुदान देण्याची जाहीरनाम्यात तरतूद असून ते भारतातील लोकांच्या पैशातूनच देण्यात येत असे. लोकांचा पैसा इंग्रजी शिक्षणाच्या सोयीसाठी वापरल्याने देशी शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात आले.इंग्रजी शिक्षणावर जास्त पैसा खर्च करण्यात येत असे.

**८) (प्रादेशिक) एतदेशीय शाळांच्या विकासाकडे दुर्लक्ष:**

भारतातील देशी शाळांना शासनाने सोयी व इतर सुविधा पुरविल्या नाहीत. त्यामुळे त्यांचा विकास खुंटला.

**९) विद्यापीठ स्थापनेस लंडन विद्यापीठांचा आदर्श:**

भारतातील विद्यापीठ स्थापन करण्याची सूचना वूडच्या खलीत्यात करण्यात करण्यात आली होती. परंतु विद्यापीठ स्थापनेत इंग्लडच्या विद्यापिठाच्या आदर्शाची दृष्टी सांगीतली. त्यामुळे भारतातील प्राचीन विद्यापीठ परंपरा, आदर्श यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. सिनेट सदस्यांची नेमणूक शासनातर्फे करण्यात येत असल्याने ते शिक्षणाविषयी उदासिन असत.

**१०) व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांकडे दुर्लक्ष:**

वूडच्या (खलित्यात)जाहीरनाम्यात सांगितल्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थापना करण्यात आली. पण अशा शाळांमुळे भारतीयांना विशेष फायदा झाला नाही. केवळ अविर्भाव दाखविण्यात आला.

**११) भारतीय पद्धतीशी भारतीयांची फारकत:**

वूडच्या जाहिरनाम्यामुळे (खलित्यामुळे) भारतीयांचा भारतीय शिक्षण प्रणालीशी दुरावा निर्माण झाला. भारतीय पाश्चिमात्य विचारसरणीत गुरफटून गेले. त्यामुळे त्यांचे भारतीय शिक्षण पद्धतीशी अतूट नाते राहिले नाही.

वूडचा जाहिरनामा (खलिता) दोषरहित जरी नसला तरी त्याच्या आधारे भारतीय शिक्षणास एक नवी दिशा मिळाली त्यामुळे त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून चालणार नाही. विविधतेतून एकता आणण्याचा वूडच्या जाहीरनाम्यास इतिहासातून समूळ नामशेष करता येणार नाही. कारण वूड ने शिक्षकांचे प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, स्त्री शिक्षण, मुस्लीमांचे शिक्षण या नवीन बांबीशी भारताचा परिचय करून दिला. आतापर्यंत वर्ग आणि वर्णव्यवस्थेच्या चौकटी मध्ये अडकलेल्या भारतीय समाजाला विज्ञान, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पाश्चात्य ज्ञानाची गंगोत्री भारतीयापर्यंत पोहचवून त्यावर स्वंतत्र विचार करण्याचे एक नवे दालन उघडून दिले. जाहिरनाम्यामध्ये धर्माला स्थान दिले गेले नसल्याने धार्मिक

बंधने शिथिल केल्याचे जाणवते. तसेच सरकारी नोकरीमध्ये धर्मनिरपेक्षतेचे धोरण जाणवते. शैक्षणिसंस्था स्थापनेत निधर्मीपणा असल्याचे दिसून आले.

म्हणूनच वूडच्या खलित्यावर (जाहिरनाम्यावर) कितीही टिका केली तरी भारतीय शिक्षणातील वूडचे योगदान विसरता येणार नाही.

**आपली प्रगती तपासा**

१)वूडच्या जाहिरनाम्यातील यशापशयाचे टीकात्मक परिक्षण करा.

२) वूडच्या १८५४ च्या जाहिरनाम्यातील शिफारशी सांगून त्यांचे महत्त्व विशद करा.

३)'भारतीय शिक्षणात वुडच्याखलित्याने एक नवे पर्व सूरु केले' या विधानाची चर्चा करा.

★★★

# प्रकरण ६
# भारतीय शिक्षण आणि शैक्षणिक प्रगती

**घटक संरचना**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ भारतीय शिक्षण आयोग (१८८२)

६.२.१.उद्देश

६.२.२ योगदान

६.२.३प्राथमिक शिक्षण - सूचना व शिफारशी

६.२.४माध्यमिक शिक्षण - सूचना व शिफारशी

६.२.५विद्यापीठ शिक्षण - सूचना व शिफारशी

६.२.६आयोगाचे मूल्यांकन

६.३ विद्यापीठ आयोग (१९०२)

६.३.१ आयोग नियुक्ती कारणे.

६.३.२ आयोग उद्दिष्टे

६.३.३ सूचना व शिफारशी

६.३.४ आयोगाचे मूल्यांकन

६.४ हरटॉग कमिटी (१९२८-२९)

६.४.१ प्राथमिक शिक्षण - सूचना व शिफारशी

६.४.२ माध्यमिक शिक्षण - सूचना व शिफारशी

६.४.३ विद्यापीठ शिक्षण - सूचना व शिफारशी

६.४.४ कमिटीचे मूल्यांकन

६.५ शिक्षणाचा पाझर सिद्धांत

६.६.१ पाझर सिद्धांत स्वरूप

६.६.२ सिद्धांतासंबंधी महत्त्वाचे विचार

६.६.३ पाझर सिद्धांताची फलश्रुती

६.६ आपली प्रगती तपासा

६.७ सारांश

६.८ स्वाध्याय

## ६.० उद्दिष्ट्ये

हे प्रकरण अभ्यासल्यावर तुम्ही

- भारतीय शिक्षण आयोगाचे शैक्षणिक योगदान स्पष्ट करू शकाल.
- भारतीय शिक्षण आयोगाने प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ शिक्षणासंबंधी केलेल्या सुचना व शिफारशी विशद करू शकाल.
- भारतीय शिक्षण आयोगाचे मूल्यांकन करू शकाल.
- विद्यापीठ शिक्षण आयोगाने सुचविलेल्या शिफारशी स्पष्ट करू शकाल.
- हरटॉग कमिटीने सुचविलेल्या शिफारशीचे मूल्यांकन करू शकाल.
- शिक्षण पाझर सिद्धांताची फलश्रुती स्पष्ट करू शकाल.

## ६.१ प्रस्तावना

मागील प्रकरणात आपण स्त्री शिक्षण, मेकॉलेचे भारतीय शिक्षणातील योगदान व वुडच्या खलित्यामधील शिफारशी यांचा अभ्यास केला. या प्रकरणामध्ये आपण भारतीय शिक्षण व शैक्षणिक प्रगती याचा विचार करणार आहोत त्यामध्येही विशेषत: भारतीय शिक्षण आयोग (१८८२), विद्यापीठ आयोग (१८०२), हरटॉग कमिटी (१९२८)व शिक्षणाचा पाझर सिद्धांत यांचा पुढे अभ्यास करणार आहोत.

## ६.२ भारतीय शिक्षण आयोग (१८८२)

१८८२ मध्ये लॉर्ड रीपनने, सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. हाच भारतीय शिक्षण आयोग. जो हंटर कमिशन या नावाने प्रसिद्ध आहे.

### ६.२.१ उद्देश:

१) १८५४ च्या वुडच्या खलित्यातील तत्त्वांची अंमलबजावणी कशी झाली, ते तपासणे.

२) त्याची चौकशी करणे.

३) भारतीय शिक्षणासंबंधी योग्य उपाय सुचविणे.

### ६.२.२ योगदान:

१) १८५४च्या वुडच्या खलित्यातील शिफारशीचे समर्थन केले.

२) शिक्षण खात्यावर अधिक जबाबदारी टाकली.

३) अनुदान पद्धतीवर भर दिला.

४) माध्यमिक स्तरावर विविध अभ्यासक्रमांवर भर दिला.

५) खाजगी संस्थांना उत्तेजन दिले.

६) प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण स्थानिक संस्थांकडे दिले.

या आयोगाच्या अहवालामुळे

i) देशात मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक जागृती निर्माण झाली.

ii) २० व्या शतकाच्या सुरूवातीला राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना पुढे आली.

**६.२.३प्राथमिक शिक्षण:सूचना व शिफारशी**

**१) प्राथमिक शिक्षणाचा उद्देश:**

प्राथमिक शिक्षणाचा उद्देश उच्च शिक्षणाचा पाया किंवा आधार असा मुळीच नसून प्राथमिक शिक्षण हे जीवनोपयोगी व्हावे.

**२) प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व सुधारणा:**

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आदिवासी, गरीब आणि मागासलेल्या लोकांच्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात व्हावा.

**३) प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन:**

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाची जबाबदारी सरकारने आपल्यावर न घेता ती पूर्णत: स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवावी.

**४) प्राथमिक शिक्षणाची वित्तव्यवस्था:**

प्राथमिक शिक्षणावरील खर्चासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आर्थिक अंदाजपत्रक तयार करावे. प्रांतीय सरकारांनी आपल्या उत्पन्नाचा एक तृतीयांश भाग प्राथमिक शिक्षणासाठी मदत म्हणून द्यावा. गावांना अथवा शहरांना प्राथमिक शिक्षणासाठी वेगवेगळ्या मार्गांनी निधी जमवावा लागेल. हा निधी केवळ प्राथमिक शिक्षणावरच खर्च करावा.

**५) प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम**:

प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक राज्याला द्यावे. परंतु हा अभ्यासक्रम जीवनपयोगी व व्यावहारिक असला पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात कृषी, विज्ञान, आरोग्य विज्ञान, गणित, औद्योगिक, कला इत्यादी विषय असावेत.

**६) देशी शाळांना उत्तेजन:**

या आयोगाने देशी शिक्षण व देशी शाळांमध्ये विशेष लक्ष घातले आहे. जिल्हा बोर्डमध्ये आणि म्युनिसिपल बोर्डामध्ये अशा शाळा चालविणाऱ्या भारतीयांना प्रतिनिधत्व द्यावे. तसेच देशी विद्यालयातील अभ्यासक्रमामध्ये सरकारने कोणताही हस्तक्षेप करू नये.

### ७) शिक्षकांचे प्रशिक्षण:

प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी 'प्रशिक्षण विद्यालये'निर्माण करण्याची शिफारस केली. प्रत्येक प्रांतामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी कमीत कमी एक तरी 'नॉर्मल स्कूल' असावे. या नॉर्मल स्कूलचा संपूर्ण खर्च प्रांतीय सरकारांनी करावा.

| |
|---|
| या आयोगाच्या शिफारशीमुळेच भारतामध्ये 'स्थानिक लोकशिक्षण समिती' किंवा 'म्युनिसिपल बोर्डा' ची स्थापना झाली. |

### ६.२.४ माध्यमिक शिक्षण:सूचना व शिफारशी:

भारतीय शिक्षण आयोगाने माध्यमिक शिक्षण ही राज्याची जबाबदारी नाही. असे म्हणून सर्व सरकारी शाळा या हळूहळू खासगी संस्थांकडे सुपूर्द कराव्यात व त्यांना अनुदान द्यावे असे म्हटले आहे.त्याचबरोबर ज्या ठिकाणी जनतेला माध्यमिक शाळा हव्या आहेत, पण तेथील लोक नवीन माध्यमिक शाळा काढण्याइतके सक्षम व सधन नाहीत, अशा अपवादात्मक ठिकाणी सरकारने माध्यमिक शाळा काढाव्यात, असेही आयोगाने सुचविले. माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी सरकारने उदार असे धोरण स्वीकारून **सहायता** अनुदान देण्याची शिफारस केली आहे.

### सूचना व शिफारशी:

### १) माध्यमिक शिक्षणासंबंधीचे सरकारचे धोरण:

अ)ब्रिटीश सरकारने या शिक्षणाची जबाबदारी भारतीयांवर सोपवून स्वत:ला माध्यमिक शिक्षणाच्या कार्यातून मुक्त करून घ्यावे.ब)सरकारने सहायता अनुदान देऊन माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराला प्रोत्साहित करावे. सरकारमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळासुद्धा सरकारने स्थानिक संस्थांना हस्तांतरित कराव्यात. सरकारने फक्त अशाच ठिकाणी माध्यमिक शाळा काढाव्यात की ज्या ठिकाणी स्थानिक जनतेला किंवा संस्थांना शाळा चालविणे शक्य आहे. सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी एक हायस्कूल काढावे व त्यांनतर त्या जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाचा प्रसार स्थानिक संस्था व व्यक्तींवर सोपवावा.

### २) माध्यमिक शिक्षणाचा प्रसार:

माध्यमिक शिक्षणाच्य प्रसारासाठीच तर या आयोगाने  आपला धोरणात्मक निर्णय मांडून, उदार धोरण स्वीकारून सरकारने सहाय्यता अनुदान देण्यावर भर दिला आहे.

### ३) अभ्यासक्रम:

आयोगाने वरच्या वर्गासाठी दोन प्रकारचा अभ्यासक्रम सुचविला. १.साहित्य विषय२.व्यावसायिक अभ्यासक्रम. माध्यमिक शिक्षण पूर्ण करून विद्यापीठीय शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पहिल्या प्रकारच्या अभ्यासक्रम निवडावा. जे व्यापार किंवा व्यवसाय करू इच्छितात त्यांनी दुसऱ्या प्रकारचा अभ्यासक्रम निवडावा.

### ४) माध्यमिक शिक्षणाचा विकास:

माध्यमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी मद्रास व लाहोरला माध्यमिक शिक्षणाचे शिक्षक प्रशिक्षण देणारी महाविद्यालये आहेत. तशाच स्वरूपाची महाविद्यालये इतर ठिकाणीसुद्धा सुरू करावीत.

या प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी शिक्षकांना शिक्षणाचे सिद्धांत, तसेच वर्ग अध्यापनासाठीचे आवश्यक असे प्रशिक्षण द्यावे.

**५) माध्यमिक शिक्षणाचे माध्यम:**

माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण द्यावे. परंतु त्याचबरोबर त्यांना इंग्रजीभाषेचेही ज्ञान द्यावे.

**६.२.५ विद्यापीठ शिक्षण - सूचना व शिफारशी :**

१८८२ च्या शिक्षण आयोगाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षणाचा विचार करावा अशी अपेक्षा नव्हती. त्यामुळे आयोगाने विद्यापीठ शिक्षणावर फारसा विचार केलेला दिसत नाही पण भारतीय शिक्षण आयोगाने शिक्षणाबाबत ज्या शिफारशी केल्या त्याचा परिणाम उच्च शिक्षणावर मात्र झाला. भारतीय शिक्षण आयोगावर आधारलेल्या सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे माध्यमिक शिक्षणाचा खूप विस्तार झाला. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. त्यांना दुसरा पर्याय नसल्याने महाविद्यालयांची संख्या वाढली. महाविद्यालयीन शिक्षण हा आयोगाच्या कक्षेबाहेरील विषय होता, तरीसुद्धा आयोगाने सार्वजनिक महाविद्यालया संदर्भात महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत.

**सूचना व शिफारशी:**

१) महाविद्यालयांना दिले जाणारे सहायता अनुदान हे शिक्षकांची संख्या, त्यांची योग्यता आणि स्थानिक गरजांचा विचार करूनच दिले जावे.

२) महाविद्यालयांना इमारतीसाठी , ग्रंथालयांसाठी, फर्निचरसाठी व अनुषंगिक खर्चासाठी वेळोवेळी आर्थिक मदत करावी.

३) महाविद्यालयामध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या करताना ज्या लोकांनी युरोपियन शिक्षण घेतले आहे, अशांना प्राधान्य देण्यात यावे.

४) महाविद्यालयातील पाठ्यक्रमांचा विस्तार करावा आणि विद्यार्थ्याला त्याच्या आवडीप्रमाणे विषय द्यावा.

५) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा चारित्रिक विकास करण्यासाठी मानव-धर्म, निसर्ग-धर्म अशा विषयांचे शिक्षण द्यावे.

६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नागरिकांची कर्तव्ये समजण्यासाठी वेगवेगळ्या व्याख्यानमाला आयोजित कराव्यात.

७) गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या द्याव्यात.

८) सार्वजनिक महाविद्यालयांची फी ही सरकारी महाविद्यालयांच्या तुलनेत कमी असावी.

सरकारी महाविद्यालयांऐवजी सार्वजनिक महाविद्यालयांना सरकारने अधिक प्रोत्साहन द्यावे. उच्च शिक्षणापासून सरकारने अलिप्त रहावे.

### ६.२.६ आयोगाचे मूल्यांकन:

१) भारतीयांच्या विविध स्तरावरच्या शिक्षणाचा अत्यंत बारकाईने विचार केला.

२) प्राथमिक शिक्षणावर प्रकर्षाने सरकारचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला.

३) सर्व स्तरावरील शिक्षणासाठी सहायता अनुदान देण्याची शिफारस केली.

४) माध्यमिक शाळा अभ्यासक्रम बहुउद्देशीय पद्धतीने राबविण्याची सूचना केली.

५) शिक्षण क्षेत्रामध्ये भारतीयांना प्राधान्य देण्याचे सुचित केले.

६) भारतामध्ये एक शैक्षणिक जागृती झाली.

**आपली प्रगती तपासा:**

भारतीय शिक्षण आयोगाने प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठ शिक्षणा संदंर्भात केलेल्या सूचना व शिफारशी स्पष्ट करा.

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## ६.३ विद्यापीठ आयोग (१९०२)

लॉर्ड कर्झनने १९०२ साली भारतीय विद्यापीठ आयोगाची नियुक्ती केली. भारतातील विद्यापीठांची स्थिती सुधारणे, त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, अध्यापन आणि परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करणे या हेतूनेच या आयोगाची स्थापना करण्यात आली.

### ६.३.१ आयोग नियुक्ती कारणे:

१) भारतीय विद्यापीठांची पुनर्रचना करणे.

२) महाविद्यालयांच्या शैक्षणिक दर्जाची सर्वंकष चौकशी करणे.

३) विद्यापीठांच्या सिनेटमध्ये महाविद्यालयीन शिक्षकांना प्राधान्य द्यावे.

४) विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पदव्या देणे एवढेच माफक काम विद्यापीठाचे नाही, तर ती ज्ञानमंदिरे असावीत आणि ज्ञानाच्या प्रसाराची प्रमुख केंद्रे व्हावीत.

### ६.३.२.आयोग उद्दिष्ट्ये:

१) प्रस्थापित विद्यापीठांची सध्याची स्थिती आणि भविष्य काळातील त्यांच्या उन्नतीसाठी शोध घेणे.

२) विद्यापीठांचे कायदे आणि त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी उपाय सुचविणे.

३) विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा आणि विद्वत प्रगतीसाठी ठोस उपाय सुचविणे.

### ६.३.३ सूचना व शिफारशी:

आयोगाने विद्यापीठांच्या सर्वांगीण उन्नती साठी पुढील शिफाशी व सूचना केल्या.

१) नवीन विद्यपीठांची स्थापना करू नये.

२) प्रस्थापित विद्यापीठांनी शिक्षण - कार्य करणे आवश्यक आहे.

३) पदवीपूर्व शिक्षण संबंधित महाविद्यालयातून आणि पदव्यूत्तर शिक्षण हे विद्यापीठांमधून व्हावे.

४) प्रत्येक विद्यापीठाची भौगोलिक कार्यकक्षा निश्चित करावी.

५) सिनेटच्या सदस्यांची संख्या कमी करावी आणि त्यांच्या सदस्यत्वाचा कालावधी पाच वर्षासाठी असावा.

६) सिंडिकेट सदस्यांची संख्या ९ ते १५ पर्यंत असावी. त्यांची निवड सिनेट मार्फत व्हावी.

७) एका संघटित समिती मार्फत प्रत्येक महाविद्यालयाचे पर्यवेक्षण केले जावे.

८) महाविद्यायांना मान्यता देण्याचे नियम अधिक कडक करावेत. दुसऱ्या दर्जाच्या महाविद्यालयांना मान्यताच देऊ नये.

९) विद्यापीठ आणि महाविद्यालयातील योग्यता प्राप्त शिक्षकांना विद्यापीठांच्या सिनेटवर प्रतिनिधत्व दिले जावे.

१०) इंटरचा वर्ग बंद करून पदवी पाठ्यक्रम तीन वर्षांचा करावा.

११) अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीत बदल करावेत.

### ६.३.४ आयोगाचे मूल्यांकन:

या आयोगाच्या शिफारशीमुळे

१) विद्यापीठ सिनेट कार्यक्षम झाली.

२) संलग्नतेच्या कठोर नियमांमुळे नवीन महाविद्यालयांना अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागला.

३) अकार्यक्षम महाविद्यालये बंद झाली.

> लंडन विद्यापीठामध्ये झालेल बदल भारतीय विद्यापीठांमध्ये आणणे हेच मुख्य काम आयोगाने केले. उच्च शिक्षणांमध्ये अमुलाग्र बदल करण्याची एकही शिफारस आयोगाने केलेली नाही.

**प्रगती तपासा**

विद्यापीठ आयोगाने (१९०२) विद्यापीठ दर्जा सुधारण्यासाठी कोणत्या शिफारशी केल्या ?

___

___

___

## ६.४ हरटॉग कमिटी (१९२८-२९)

शिक्षणाची प्रगती खंडित झाली. भारतीय शिक्षणामध्ये इंग्रजीचा वरचष्मा आणि परदेशी शिक्षणप्रणाली यांचा शिरकाव झाला. या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या विकासाच्या आढावा घेण्यासाठी सायमन कमिशनने डाक्का विद्यापीठाचे कुलगुरू सर फिलीप हरटॉग यांच्या अध्यक्षतेखाली एक सहाय्यक समिती (Auxiliary Committee)नियुक्ती केली. सदर समिती भारतीय शिक्षणाच्या इतिहासामध्ये 'हरटॉग समिती' या नावानेच ओळखली जाते.

समितीच्या मतानुसार शिक्षण क्षेत्रामध्ये लक्षणीय असा विकास झाला असला, तरीही त्याच्यामध्ये अनेक अडचणी आहेत. आयोगाने प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठ या तिन्ही स्तरांमधील शैक्षणीक अडचणी विचारात घेऊन त्यावर आपले मतही मांडले आहे.

### ६.४.१ प्राथमिक शिक्षण: सूचना व शिफारशी

प्राथमिक शिक्षणाची प्रगती रोडावण्यामागे समितीने दोन कारणे सांगितली आहेत. ती म्हणजे प्राथमिक शिक्षणातील **गळती** आणि **स्थगिती**. गळती व स्थगितीच्या संदर्भात दोष दाखविताना या समितीने प्राथमिक शिक्षणाच्या सर्वांगीण समस्यांचा विचार केला आहे.

हे दोष दूर करण्याकरिता समितीने पुढील सूचना व शिफारशी केल्या:

१) प्राथमिक शिक्षणाच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर अधिक भर द्यावा.

२) प्राथमिक शिक्षणाचे एकत्रिकरण करावे.

३) ज्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी आहे आणि ज्यांचा शैक्षणिक दर्जा निकृष्ठ आहे, अश शाळा बंद कराव्यात.

४) प्राथमिक शाळेतील शिक्षणाचा कालावधी हा चार वर्षाचा असावा आणि शिक्षणाचा दर्जा सुधारावा.

५) प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम हा उदार, व्यावसायिक आणि स्थानिक गरजानुरूप असावा.

६) प्राथमिक शाळांचे वार्षिक नियोजन आणि सुट्ट्यांचा कालावधी ज्या भागात ती शाळा आहे, त्या भागातील ऋतुमान आणि परिस्थितीचा विचार करून निश्चित करण्यात यावा.

७) गळती व स्थगिती थांबविण्यासाठी प्राथमिक शाळांमधील खालच्या वर्गाकडे विशेष लक्ष द्यावे.

८) विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य, सहकार्य आणि आत्मविश्वास इत्यादी गुणांचा विकास करावा.

९) प्राथमिक शाळांमधून मनोरंजन, ग्राम-सुधार, प्रौढ शिक्षण आणि प्राथमिक आरोग्य अशासारखी केंद्रे सुरू करावीत.

१०) शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांचा प्रशिक्षण कालावधी वाढवावा.

११) शिक्षकांच्या वेतनात वाढ करून त्यांच्या सेवाशर्ती पोषक स्वरूपाच्या कराव्यात. तसेच अधिक सक्षम लोक या क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा.

१२) प्रशिक्षण विद्यालयांमध्ये सुधारणा करून उजाळावर्ग, उद्बोधन - वर्ग अशा योजना सुरू कराव्यात.

### ६.४.२ माध्यमिक शिक्षण : सूचना व शिफारशी:

हरटॉग समितीने माध्यमिक शिक्षणामधील प्रामुख्याने दोन दोष निदर्शनास आणले.

१) मॅट्रिक्युलेशन परीक्षेला अवास्तव महत्त्व.

२) नापासांचे प्रचंड प्रमाण.

माध्यमिक शिक्षणातील हे दोष दूर करण्यासाठी हरटॉग समितीने केलेल्या

**सूचना व शिफारशी:**

१) अभ्यासक्रमात अशा विषयांचा समावेश करावा की, ते विषय अभ्यासल्यानंतर विद्यार्थी जीवनोपयोगी काम करून त्यातून धनार्जन करू शकेल.

२) मिडल स्कूलचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार उद्योग व व्यवसाय यांसबंधीचे शिक्षण दिले जावे.

३) माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये औद्योगिक व व्यावसायिक विषयांचा समावेश करून विद्यार्थ्यांना त्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित करावे.

४) माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळ्या ऐच्छिक विषयांचा समावेश करावा. विद्यार्थी त्याची आवड व गरज यानुसार विषय निवड करील.

५) माध्यमिक शिक्षण स्तराचा विकास साधण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी तसेच प्रस्थापित प्रशिक्षण विद्यालयाचा दर्जा सुधारावा आणि त्यामध्ये नवनवीन अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा.

६) प्रशिक्षण विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी उजाळा वर्ग व उदबोधन वर्ग सूरू करावेत.

७) शिक्षकांच्या वेतन व सेवाशर्तीमध्ये सुधारणा करावी.

८) शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचे काम प्रभावीपणे करावे.

९) शिक्षकांना सेवा सुरक्षा देण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

### ६.४.३ विद्यापीठ शिक्षण:सूचना व शिफाशी:

हरटॉग समितीने विद्यापीठ शिक्षणामधील काही दोष निदर्शनास आणून दिले. ते खालीलप्रमाणे

१) विद्यार्थ्यांची अवाजवी भरपूर संख्या.

२) खालावलेला उच्च शिक्षणाचा दर्जा.

३) ऑनर्स कोर्सची रचना अत्यंत निरूपयोगी स्वरूपाची.

४) नापास होणाऱ्यांचे प्रमाण अधिक.

५) पदवीधर बेरोजगारांच्या संख्येत वाढ.

६) उत्तम ग्रंथालये व प्रयोगशाळांचा अभाव.

हरटॉग समितीने विद्यापीठ शिक्षणातील वरील सर्व त्रुटी दूर करण्यासाठी खालील सूचना व शिफारशी केल्या-

१) उच्च शिक्षण देण्यासाठी **अध्यापन व एकात्मिक** (Teaching and Unitary) विद्यापीठ सर्वोत्तम ठरते. परंतु भारतामधील उच्च शिक्षणाची स्थिती पाहता महाविद्यालयांना संलग्नीकरण देणाऱ्या विद्यापीठांचीच आवश्यकता भासते. म्हणून भारतामध्ये दोन्ही प्रकारच्या विद्यापीठांना प्राधान्य द्यावे.

२) विद्यापीठांचे शैक्षणिक स्तर विकसित करावेत. त्यामुळे विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यां व्यतिरिक्त माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळेल.

३) विद्यापीठ प्रवेशाचे नियम अत्यंत कडक असावेत. पात्र व लायक विद्यार्थ्यांनाच विद्यापीठ प्रवेश द्यावा.

४) प्रत्येक विद्यापीठामध्ये समृद्ध ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा आणि श्रेष्ठ दर्जाच्या संशोधन कार्याची परिपूर्ण सुविधा असावी.

५) विद्यापीठांमधून'ऑनर्स' कोर्सची योग्य सुविधा झाली पाहिजे. त्याचप्रमाणे 'पासकोर्स' ला ऑनर्सपासून पूर्ण वेगळे केले पाहिजे. ऑनर्स कोर्सला यश प्राप्त होण्यासाठी त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यापीठ आणि संबंधित महाविद्यालयावर सोपवावी.

६) पदवीधर बेकारांची समस्या दूर करण्यासाठी सर्व विद्यापीठांनी औद्योगिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सूरू करावा आणि असे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना सरकारने नोकरीची हमी द्यावी.

७) पदवीधर विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्यतेनुसार नोकरी मिळवून देण्यासाठी प्रत्येक विद्यापीठामध्ये **'सेवा योजन कार्यालय'** सुरू करावे.

८) विद्यापीठांनी जनसामान्यंसाठी उपयुक्त अशा व्याख्यानमालांचे आयोजन करावे.

**६.४.४ हरटॉग कमिटीचे मूल्यांकन:**

१) शिक्षणाच्या विविध स्तरावरील दाखविलेल्या त्रुटी व दोष स्पष्ट स्वरूपात होते.

२) कमिटीने जे उपाय सुचविले, त्यामुळे त्याची दूरदृष्टी आणि विवेकबुद्धी स्पष्ट होते.

३) शिक्षणाच्या केवळ संख्यात्मक विकासाकडे लक्ष न देता गुणांत्मक विकासाकडे लक्ष दिले.

४) भारतीयांनी मात्र संमिश्र स्वरूपात स्वागत केले कारण त्यांना असे वाटले की भारतामधील शिक्षणाचा द्रुत गतीने होत असलेला प्रसार या कमिटीला रोखावयाचा आहे.

५) ब्रिटीश सरकारने मात्र, प्रशंसा केली. या समितीच्या सूचनांमुळे सरकारला भारतीय शिक्षणाविषयी निश्चित धोरण ठरविता आले.

**प्रगती तपासा:**

हरटॉग कमिटीने प्राथमिक शिक्षणासंबंधी केलेल्या सूचना व शिफारशीचे मूल्यांकन करा.

______________________________

______________________________

______________________________

## ६.५ शिक्षणाचा पाझर सिद्धांत

भारतामध्ये आल्यानंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी जी विविध प्रकारची धोरणे आखली होती, त्यामध्ये भारतीयांच्या शिक्षणावर कमीत - कमी पैसा खर्च करणे हे सुद्धा एक धोरण होते. त्यामुळेच त्यांचा उच्च वर्गाचे शिक्षण अभिप्रेत होते. या उच्च वर्गाला शिक्षण दिल्यानंतर आपोआपच ते सामान्य लोकांपर्यत पोहोचेल असे त्यांचे मत होते. या योजनेचे पुरस्कर्ते ख्रिश्चन मिशनरी, मुंबईच्या गव्हर्नर कौन्सिलचा सदस्य फ्रान्सीस वॉर्डन, ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक आणि कायदेतज्ज्ञ मेकॉले यांचा या योजनेला पाठिंबा होता. या योजनेलाच शिक्षणाचा 'पाझर सिद्धांत' असे म्हटले जाते.

### ६.६.१ पाझर सिद्धांत स्वरूप:

पाझर या शब्दाचा अर्थ झिरपणे असा होतो. शिक्षण फक्त उच्च वर्गीयांना द्यायचे व ते हळूहळू झिरपत- झिरपत खालच्या वर्गापर्यत पोहोचेल असे या सिद्धांताचे स्वरूप होते.

ईस्ट इंडिया कंपनीमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना हा सिद्धांत अतिशय आवडलेला होता. कारण त्याचे मूळ धोरण व्यापारी होते. या सर्व कर्मचाऱ्यांचे असे म्हणणे होते की, भारतीयांच्या शिक्षणावर जास्त खर्च करावयाचा नाही. अगदी कमीत कमी खर्च त्यांच्या शिक्षणावर करायचा आणि ते शिक्षण फक्त उच्च वर्गीयाना दिल्यास नंतर शासकीय खर्च न करता ते आपोआपच खालच्या वर्गापर्यंत झिरपत येईल आणि त्या झिरपण्यावर काही खर्च करण्याची आवश्यकता असणार नाही.

### ६.६.२. सिद्धांतासंबंधी महत्त्वाचे विचार :

१) शिक्षण वरच्या स्तरावरून खालच्या स्तरापर्यंत पाझरत जाते आणि कालांतराने सर्वसामान्य लोकांपर्यत पोहोचते.

२) इंग्रजी शिक्षण हे सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी अतिशय उपयोगी आहे. हे शिक्षण घेऊन तयार झालेले लोक काही काळानंतर शिक्षक म्हणून काम करतील.

३) भारतातील उच्च वर्गीय हिंदुंना शिक्षण देऊन ख्रिश्चन धर्माचे अनुयायी केले तर त्यांच्या प्रभावाने खालच्या वर्गातील लोक आपोआपच ख्रिश्चन धर्माचा स्विकार करतील, असे ख्रिश्चन मिशनऱ्यांचे म्हणणे होते.

४) फ्रान्सिस वॉर्डनने तर असे म्हटले होते की, जास्त लोकांना थोडे ज्ञान देण्यापेक्षा थोड्या लोकांना जास्त ज्ञान देणे अधिक उपयुक्त ठरेल.

५) ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकाचे असे मत होते की आपण एक असा वर्ग निर्माण केला पाहिजे की जो वर्ग शासक आणि भारतीय जनता यांच्यामधील दुवा होऊ शकेल, असे झाले तरच आपण राज्य करू शकू.

६) लॉर्ड आकलंड यांनी पाझर सिद्धांताचा स्वीकार सरकारचे शिक्षणविषयक धोरण म्हणून केला व असे घोषित केले की, समाजातील उच्च वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करणे हा सरकारचा उद्देश असेल.

### ६.६.३ पाझर सिद्धांताची फलश्रुती :

१) उच्च वर्णीयांना दिलेले ज्ञान खालच्या वर्गापर्यंत पाझरत येईल, ही कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही.

२) शिक्षित झालेल्या वरच्या वर्गाने स्वतःचा स्वार्थ साधला. त्यांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या.

३) या सिद्धांतामुळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला.

४) भारतातील सामान्य लोकांच्या मनात इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांबद्दल द्वेष निर्माण झाला. तदनंतर भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनास सुरूवात झाली.

**प्रगती तपासा**

पाझर सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करून त्याचे परिणाम विशद करा.

## ६.६ सारांश

भारतीय शिक्षण आयोगाच्या शिफारशीमध्ये मोठ्या प्रमाणात वुडच्या खलित्यातील मुंद्याचीच पुनरावृत्ती झालेली आहे. तरी सुद्धा वुडने सांगितलेल्या बाबींना सक्रियता देण्याचे काम या आयोगाच्या शिफारशींनी केलेले आहे. या आयोगाने केलेल्या बऱ्याच शिफारशी अतिशय प्रभावी होत्या. त्यामुळेच या आयोगाचे भारतीय शिक्षणाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व होते.

भारतीय विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून भारतीय विद्यापीठ आयोग (१९०२) महत्त्वाचा ठरत आहे. या आयोगावर भारतातील विद्यापीठांची रचना व कार्यपद्धती आणि भारतातील विद्यापीठांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्याचे कार्य सोपविण्यात आले होते.

हरटॉग कमिटीने प्राथमिक शिक्षणाची चिकित्सा व प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर भर दिला. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत जीवन आणि शिक्षण याबाबतची फारकत दूर व्हावी व माध्यमिक शिक्षण सर्वंकष असावे, हा या समितीचा दृष्टीकोन होता. विद्यापीठ शिक्षणात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देवून विद्यापीठ शिक्षण घेतलेला कोणताही विद्यार्थी सुशिक्षीत बेरोजगार राहणार नाही, तसेच विद्यापीठांनी सेवा योजना कार्य करावे अशी भूमिका मांडली या समितिच्या शिफारशीमध्ये समतोल दिसून येतो.

पाझर सिद्धांतामुळे फक्त इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला. उच्च वर्णीयांना दिलेले ज्ञान खालच्या वर्गापर्यत पाझरत येईल ही कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही.

## ६.८ स्वाध्याय

१) 'भारतीय शिक्षणाच्या इतिहासात भारतीय शिक्षण आयोगाचे महत्त्व असधारण आहे' - विधानाचे समर्थन करा.

२) भारतीय शिक्षण आयोगाने (१९८२) माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या शिफारशी कोणत्या ? या शिफारशीचे मूल्यांकन करा.

३) प्राथमिक शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतीय शिक्षण आयोगाने (१८८२) केलेल्या शिफारशींचे परीक्षण करा.

४) लॉर्ड कर्झनने भारतीय विद्यापीठ आयोगाची (१९०२) स्थापना का केली ? या आयोगाने विद्यापीठ शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणत्या शिफारशी केल्या ?

५) हरटॉग कमिटीने विद्यापीठ शिक्षणा संदर्भात केलेल्या शिफारशींचे मूल्यांकन करा.

६) 'शिक्षणातील पाझर सिद्धांत' म्हणजे काय ? त्यातील गुणदोषांची चर्चा करा.

★★★

**प्रकरण ७**

# भारतीय शिक्षणातील महत्त्वपूर्ण विकास (१९२१-१९३७)

(Important Development in Education during 1921- 1937)

**घटक संरचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ आंतरविद्यापीठ मंडळ

७.३ नवीन विद्यापीठांची स्थापना

७.४ शिक्षक प्रशिक्षण

७.५ तांत्रिक शिक्षण

७.६ सारांश

७.७ स्वाध्याय


## ७.० उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासातून तुम्हाला

१) भारतातील विद्यापीठांच्या स्थापनेची पार्श्वभूमी समजेल.

२) १९२१-१९३७ या काळातील शिक्षक प्रशिक्षणाची प्रगती समजेल.

## ७.१ प्रस्तावना

लॉर्ड मेकॉलेच्या पत्रकामुळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व प्रचार होऊ लागला. इंग्रजी शिक्षण यातील बहुतांशी लोक सरकारी नोकऱ्यांकडे आकर्षिले गेले पण काही मोजके राष्ट्रप्रेमी मात्र इंग्रजी शिक्षण घेऊन भारतीय शिक्षणांचा डोळसपणे विचार करु लागले. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी, महाराष्ट्रात म. फुले, लो. टिळक, आगरकर आदिंनी राष्ट्रीय शिक्षणासाठी चळवळ सुरु केली. इ.स. १८८२ च्या शिक्षण आयोगापुढे अनेक विचारवंतांनी साक्ष दिली व प्रचलित शिक्षण पद्धतीतील दोष दाखवून दिले.

**i)<u>राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ</u> :**

लो. टिळकांनी आपल्या चतु:सुत्रीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. लॉर्ड कर्झनच्या काळात राष्ट्रीय शिक्षणाला अधिक जोर चढला. बंगालमध्ये रवींद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतन संस्था काढली. लो. टिळकांनी न्यू इंग्लिश स्कूलची पुण्यात स्थापना केली. इ.स. १९०२ मध्ये कांगडीला गुरुकुल सुरु झाले. तळेगाव येथे १९०६ मध्ये समर्थ विद्यालय सुरु झाले. डॉ. धोंडो केशव कर्वे यांनी मुलींसाठी हिंगणे येथे शाळा व ३ जून १९१६ मध्ये महिला विद्यापीठ स्थापन केले. इ.स. १९२० मध्ये म. गांधींनी

असहकार चळवळ सुरु केली आणि इंग्रजी शाळा कॉलेजमधून शिक्षण घेणाऱ्यांना बाहेर पडण्याचे आवाहन केले. १९२२ च्या सुमारास राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ थंडावली मात्र यामुळे उदयास आलेली राष्ट्रीय भावना स्वातंत्र्य चळवळीस प्रेरक ठरली.

- राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

**ii) भारतीय शिक्षण आयोगानंतरचे उच्च शिक्षण:**

इ. स. १८८२ च्या भारतीय शिक्षण आयोगाने केलेल्या शिफारशींचा परिणाम उच्च शिक्षणावर केला. लॉर्ड कर्झनने इ. स. १९०२ मध्ये उच्च शिक्षणावर विचार करण्यासाठी भारतीय विद्यापीठ आयोग स्थापन केला. आयोगाच्या शिफारशींवर आधारित इ.स. १९०४ मध्ये भारतीय विद्यापीठ कायदा करण्यात आला. या कायद्याने विद्यापीठ शिक्षण पध्दतीत बदल सुचवले. इ.स. १९१३ च्या गर्व्हमेंट ऑफ रेझोल्युशनने प्रत्येक प्रदेशात विद्यापीठांची स्थापना करावी असे म्हटले. इ.स. १७१७ मध्ये सरकारने कलकत्ता विद्यापीठ आयोग नेमला. या आयोगाच्या शिफारशींचा परिणाम पुढे सर्व देशातील विद्यापीठांवर झाला.

२) १९२१-१९३७ या काळातील शिक्षक प्रशिक्षणाची प्रगती समजेल.

## ७.२ आंतर विद्यापीठ मंडळ

सिमला येथे मे १९२४ रोजी भरलेल्या पहिल्या कुलगुरूच्या परिषदेत आंतरविद्यापीठ मंडळ स्थापन करण्यात यावे. हा निर्णय घेण्यात आला त्यावेळी त्यात भारत, सिलोन आणि ब्रम्हदेश ह्या देशाचे प्रतिनिधी होते. सध्या यात ४७ भारतीय विद्यापीठातील सदस्य आहेत. तसेच सिलोन विद्यापीठ आणि पाच भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे प्रतिनिधीही आहेत. सध्या या संस्थेचे भारतीय विद्यापीठाची संघटना (Association of Indian Universities) असे झालेले आहे.

**आंतर विद्यापीठ मंडळाची कार्ये :-**

१) सामाईक समस्येवर कुलगुरूंची चर्चा घडवून आणणे.

२) विद्यापीठात सुधारणा करण्यासाठी वित्त नियम तसेच विद्यापीठाचा दर्जा उंचावण्यासाठीचे कार्यक्रंम.

३) उच्च शिक्षणातील समस्या सोडविण्यासाठीची योग्य माहिती, स्त्रोताचा सरकार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाला पुरवठा करणे.

४) कुलगुरूच्या युनायटेड किंगडमच्या समितीने सुचविलेली कार्य खालीलप्रमाणे, सामान्य धोरण निर्मितीसाठी विद्यापीठास शिफारसी सुचविणे. त्याचबरोबर खालील काही कार्ये सांगितलेली आहेत.

१) आंतरराष्ट्रीय विद्यापीठीय संघटनेसाठी माहिती विभाग म्हणून कार्ये करणे.

२) व्यवसायाची अदलाबदली आयोजन करणे.

३) विद्यापीठीय कृतीसाठी संप्रेषण आणि सहकार्य यासाठी उत्तेजीत करणे.

४) उच्च शिक्षणावर आधारित प्रभावशाली परिषदेत प्रतिनिधी पाठविणे.

५) विदेशात भारतीय पदवी/पदविका संदर्भात नियमांचे (Circulars) तसेच भारतात विदेशी पदवी/पदविका संदर्भात मान्यता देणे.

## ७.३ नवीन विद्यापीठांची स्थापना

उच्च शिक्षणातील प्रगती फारशी लक्षात घेण्यासारखी नव्हती. गुणात्मक आणि संख्यात्मक प्रगती अपवादात्मक होती आणि हे केवळ कलकत्ता विद्यापीठ आयोग (१९१७-१९) च्या प्रभावामुळे शक्य झाले. पाच नविन विद्यापीठाची निर्मिती झाली. दिल्ली (१९२२) नागपुर (१९२३) आंध्र (१९२६) आग्रा (१९२७) आणि त्रिवेणकोर (१९३७) तसेच जुन्या सहा विद्यापीठांची पुनर्गठन आणि पुर्न-निर्मिती करण्यात आली. उदा. मद्रास विद्यापीठांतर्गत अध्ययन आणि संशोधनाचे कार्य हाती घेण्यात आले. मुंबई विद्यापीठा (बॉम्बे) अंतर्गत रासायनिक तंत्रज्ञानावर कार्य करण्यात आले. अलाहाबाद विद्यापीठांतर्गत तेथेच राहुन अध्ययन करणे हे कार्य हाती घेण्यात आले. जुन्या विद्यापीठाचे पुनर्गठन केल्यामुळे विकासाच्या दरात वाढ झाली. तसेच यात कला आणि विज्ञान क्षेत्रात काम करण्यात येऊ लागले. शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच ठेवण्यात आले. वसतिगृह, ग्रंथालय व इतर सुविधांचा निधी न मिळाल्यामुळे फारसा विस्तार होऊ शकला नाही.

**२० व्या शतकातील विद्यापीठाच्या स्थापनेचा विस्तार पुढीलप्रमाणे - :**

भारतीय विद्यापीठ आयोग (१९०२) च्या नियुक्ती लॉर्ड कर्झन च्या काळात विद्यापीठ कायदा १९०४ प्रमाणे झाली. यांत विद्यापीठात अध्ययन करण्यात यावे, महाविद्यालय हे विद्यापीठाशी संलग्नित असावे यासाठीचे नियम तयार करण्यात आले. त्यामुळे पुढील नियमीत वर्षासाठी विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. १९१३ च्या भारत सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे अध्ययन आणि परिषदेचे कार्य विद्यापीठात व्हावे याची गरज भासू लागली. कलकत्ता विद्यापीठात प्रथम अध्ययन विभागाची निर्मिती सर आशुतोष मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ कायदा १९०४ च्या अंतर्गत करण्यात आली. मध्यकाळात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ आणि काही भारतीयांची शिक्षणातील अभिरूची यामुळे नविन सहा विद्यापीठाची निर्मिती १९१३-१९२१ या काळात करण्यात आली.

यात बनारस हिंदू विद्यापीठ (१९१६) पटना विद्यापीठ (१९१७) उस्मानिया विद्यापीठ (१९१८), लखनौ विद्यापीठ (१९२०), अलिगढ मुस्लिम विद्यापीठ (१९२०) केंद्रीय कायद्यांतर्गत करण्यात आली. वरील सर्व विद्यापीठे ही केंद्रीय विद्यापीठे आहेत. उस्मानिया विद्यापीठात उर्दू भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते आणि इंग्रजी भाषा हा अनिवार्य विषय होता.

१९३० पर्यंत १६ विद्यापीठांची स्थापना झाली जसे की, पंजाब विद्यापीठ (१९२२) पासून अलाहाबाद विद्यापीठ पासून (१९२३), नागपूर आणि आग्रा विद्यापीठ , आंध्र विद्यापीठा पासून (१९२६) मद्रास विद्यापीठ, अन्नामलाई विद्यापीठ (१९२९) यातील जवळपास सर्वच विद्यापीठांत अध्ययनाचे कार्य चालते. असहकार चळवळीच्या काळात गांधीजींनी गुजरात विद्यापीठ, काशी विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना केली. तसेच राजकीय स्वातंत्र्य चळवळीत बिहार आणि जाविया गिलीया विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

१९२९-४७ या दरम्यान उच्च शिक्षणातील प्रगती राजकीय समस्यामुळे फारशी होऊ शकली नाही. स्वातंत्र्याची चळवळ, दुसरे महायुद्ध (१९३९) ही त्याची कारणे आहेत. त्यामुळे या काळात केवळ ३-विद्यापीठांची स्थापना झाली. केरळ (१९३७) उत्कल (१९४३) आणि सागर (१९४६) विद्यापीठ, स्वातंत्र्यापूर्वी १९ विद्यापीठांची स्थापना झाली. तर १९४७ साली राजस्थान विद्यापीठ, जयपूर आणि पंजाब विद्यापीठ, चंदीगढ विद्यापीठ यांची स्थापना झाली कारण पंजाब विद्यापीठ लाहोर हे पाकिस्तानात संक्रमित झाले. त्यामुळे १९४७-४८ या काळात केवळ २० विद्यापीठं, आणि त्यांच्याशी संलग्नित ५०० महाविद्यालये आणि २.५ लाख विद्यार्थी संख्या होती.

इ.स. १९१३ च्या धोरणानुसार बनारस (१९१५), म्हैसूर (१९१६), पाटना (१९१७) व मुंबई येथे एस.एन.डी.टी.विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. इ.स. १९२० मध्ये अलीगढ, ढाका व लखनौ येथे तसेच १९१८ मध्ये उस्मानिया येथे विद्यापीठांची स्थापना झाली. कलकत्ता विद्यापीठ आयोगाने प्रथमच विद्यापीठाच्या अभ्यासक्रम परीक्षा याविषयी सूचना केल्या होत्या तसेच देशाच्या औद्योगिक विकासासाठी आवश्यक ते प्रशिक्षण विद्यापीठांमधून देण्यात यावे. विद्यापीठाने विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण द्यावे असेही सुचविले. यामुळे विद्यापिठीय शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार होऊ लागला. काही विद्यापीठातून पदव्युत्तर अध्यापनही सुरु झाले. याच सुमारास मौलाना महंमद अली यांच्या प्रयत्नातून जामिया मिलिया विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाची प्रमुख उद्दिष्टे स्वसंस्कृतीची जोपासना करणे व जबाबदार नेतृत्व विकसित करणे ही होती. उर्दू वाड्.मयाच्या विकासाला या विद्यापीठाने हातभार लावला. महाराष्ट्रात पुणे येथे इ.स. १९२१ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठाचे सरकारी मदतीशिवाय शिक्षण कार्य चालविणे व राष्ट्रीय वृत्ती बाणेल असा शिक्षणक्रम ठरविणे ही उद्दिष्टे होती. या विद्यापीठात ग्राम सफाई, सूतकाम, साक्षरता वर्ग, मराठी पाठांतर परीक्षा इ. उपक्रम अध्यापन व संशोधनाबरोबर चालत.

इ.स. १९२९ मध्ये पुन्हा शिक्षणावर विचार करण्यासाठी हरटॉग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. समितीने प्राथमिक शिक्षण माध्यमिक, उच्च शिक्षण, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण, स्त्री शिक्षण, मुस्लिम शिक्षण याबाबत विचार व्यक्त केले या समितीने विद्यापीठांना प्रगत शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले.

इ.स. १९२० साली गांधीजींनी गुजरात विद्यापीठाची स्थापना केली. ''सा विद्या या विमुक्तये'' हे त्याचे बोधवचन निवडले गेले. त्यांच्या मते ''अध्यात्मिक मुक्ततेत भौतिक स्वावलंबन व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांचाही समावेश होतो. शिक्षणाने अशा सर्वकष मुक्ततेकडे न्यावे.'' या ध्येयाने प्रेरित होऊन गुजरात विद्यापीठाने सर्व स्तरांवरील शैक्षणिक संस्था स्वतःच्या परिसरात चालवल्या.

इ.स. १९३४ साली महात्माजींनी सेवाग्राम आश्रमाची स्थापना करुन तेथे शिक्षणाचे प्रयोग सुरु केले. श्री आर्यनायकम, श्रीमती आशादेवी, श्रीमती मार्जरी साईक्स यांनी त्यांना या प्रयोगात सहकार्य केले. पूर्व बुनियादी, बुनियादी, उत्तर बुनियादी या तीन स्तरातून सामान्य शिक्षणाचा विचार केला.

**आपली प्रगती तपासा**

भारतात विद्यापीठांची स्थापना होण्यामागची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

## ७.४ शिक्षक प्रशिक्षण

इ.स. १९१७ मध्ये कलकत्ता विद्यापीठाची सद्यस्थिती समस्या जाणून घेण्यासाठी कलकत्ता विद्यापीठ आयोगाची स्थापना करण्यात आली. अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यास करुन १९१९ मध्ये सरकारने आपला अहवाल सादर केला. यात माध्यमिक शिक्षणामध्ये आमूलाग्र बदलाची आवश्यकता प्रतिपादन केली. यामध्ये शिक्षक प्रशिक्षणचाही विचार केला. स्त्रीशिक्षण परिषद स्थापन करुन या परिषदेमार्फत शिक्षिका प्रशिक्षण द्यावे असे सूचित केले. या काळामध्ये ध्येयवादी शिक्षकांची एक पिढीच निर्माण झाली.

लो. टिळक, आगरकर, म. फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाल कृष्ण गोखले हे आदर्श शिक्षक म्हणून नव्या पिढीसमारे होते. इ.स. १९२९ मध्ये हरटॉग कमिटीने प्रथमच शिक्षक प्रशिक्षित नाहीत ही वस्तुस्थिती मांडली. एक शिक्षकी शाळांची समस्या मांडली व सुधारणेसाठी शिफारशी केल्या.

शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशिक्षणाचा कालावधी वाढविण्याची शिफारस केली. अधिक सक्षम लोक या क्षेत्राकडे आकर्षित होतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यास सांगितले. प्रशिक्षण विद्यालयांमध्ये शिक्षकांसाठी उजाळा वर्ग, उद्‌बोधन वर्ग सुरु करण्याची शिफारस केली. कलकत्ता विद्यापीठ आयोगाच्या शिफारशींनुसार बी.ए. व एम.ए. च्या पदवी परीक्षांमध्ये शिक्षणशास्त्र विषयाचा समावेश होऊ लागला व त्यासाठी विद्यापीठांमध्ये शिक्षण विभाग स्थापन होऊ लागला. १९१७ ते १९२९ या काळात नॉर्मल स्कूल्स व माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्था या दोहोंमध्ये संख्यात्मक वाढ झाली. तर हरटॉग समितीच्या शिफारशींमुळे प्रशिक्षण संस्थामध्ये प्रयोगशाळा, ग्रंथालये व संलग्न अशा सराव शाळांची सोय झाली. १९३७ च्या मूलोद्योगी शिक्षण योजनेत महात्माजींनी प्रशिक्षित शिक्षकांनाच नेमले. त्यांने यावर भर दिला.

या शिक्षणयोजनेत २ प्रकारची शिक्षणव्यवस्था केली होती.

(१) **दीर्घकालीन प्रशिक्षण** - प्रत्यक्ष अध्यापन न करणाऱ्या व या क्षेत्रात नसणाऱ्यांसाठी ३ वर्षाचे होते.

(२) **अल्पकालीन प्रशिक्षण** - हे फक्त सेवांतर्गत शिक्षकांसाठी १ वर्षाचे होते.

**अभ्यासक्रम:**

प्रशिक्षण कालावधीमध्ये शिक्षकांना मुलोद्योग शाळेतील सर्व विषयांच्या अध्यापन पद्धतींचे, हस्त उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाई. सूतकताई, विणकाम, फळभाज्या, बागकाम, शेती, सुतारकाम, खेळणी तयार करणे, कागदकाम इ. उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाई.

डॉ. न. रा. पारसनीस म्हणतात, १९३७ नंतर मुलोद्योगी शिक्षण पध्दतीने शाळेच्या अभ्यासक्रमात मोठा बदल घडवून आणला. मुलोद्योगी क्रियात्मक शिक्षणामुळे शिक्षकांच्या प्रशिक्षणात बराच बदल केला गेला. हेतू असा की, मुलोद्योगी शाळेत त्यांना आपली भूमिका नीट बजावता यावी.''

मुलोद्योगी शिक्षणपद्धतीमुळे शिक्षकांच्या प्रयोगशीलतेला, सर्जनशीलतेला प्रथमच वाव मिळाला. शिक्षणात कृतिला प्राधान्य दिल्यामुळे शिक्षण जीवनाभिमुख झाले. शिक्षणाला भारतीय चेहरा मिळाला.

**आपली प्रगती तपासा**

१९१७ ते १९३७ या काळातील शिक्षक प्रशिक्षण विषयक प्रगतीचा आढावा घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ७.५ तांत्रिक शिक्षण

इ.स. १९१४ मध्ये पहिल्या महायुध्दाला सुरुवात झाली आणि देशातील वातावरणच बदलले. महायुध्द संपण्यापूर्वी १९१७ मध्ये ब्रिटीश सरकारने कलकत्ता विद्यापीठ आयोगाची स्थापना केली. या आयोगाने शिक्षणाच्या सर्व घटकांचा विचार करुन विस्तृत शिफारशी व सूचना केल्या. प्रथमच विद्यापीठांमध्ये शेती, कायदा, वैद्यक, अभियांत्रिकी इ. अभ्यासक्रमांची सोय करावी अशी शिफारस केली. याच सुमारास राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ फोफावली. स्वदेशी वस्तूंचा वापर आणि परकीय वस्तूंवर बहिष्कार हे राष्ट्रीय आंदोलनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांची पूर्ती स्वदेशी वस्तूंमधून व्हावी असा आंदोलकांचा आग्रह होता. इ.स. १९२२ मध्ये म. गांधीजींनी असहकार चळवळ सुरु केली. स्वेदशी, स्वावलंबन यांना महत्त्व प्राप्त झाले. इ.स. १९२९ च्या हरटॉग कमिटीने जीवनोपयोगी शिक्षणाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले. या समितीच्या मते

(१) माध्यमिक शिक्षणात अशा विषयांचा समावेश करावा ज्यातून विद्यार्थी धनार्जन करु शकेल.

(२) मिडलस्कूलचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार उद्योग व व्यवसायांचे शिक्षण द्यावे.

(३) माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळया ऐच्छिक विषयांचा समावेश करावा. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य असावे.

(४) पदवीधर बेकारांची समस्या दूर करण्यासाठी सर्व विद्यापीठांनी औद्योगिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सुरु करावा. असे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना सरकारने नोकरीची हमी द्यावी.

### सप्रू समिती :- १९३४

शिक्षणाचे दुष्परिणाम उत्तर प्रदेशात जाणवायाला लागल्यामुळे सरकारने इ.स. १९३४ मध्ये सप्रु समिती स्थापन केली व या समितीस बेकारांच्या समस्येचा अभ्यास करण्यास सांगितले. या समितीने पुढील शिफारशी केल्या.

(१) माध्यमिक स्तर अधिक व्यावहारिक व स्वयंपूर्ण करण्यात यावा.

(२) विविध व्यवसायांकडे जाऊ इच्छिणाऱ्यांच्या व्यावसायिक गरजा भागविणारे शिक्षण असावे.

(३) नवव्या इयत्तेपासून व्यावसायिक शिक्षणाचा प्रारंभ करावा.

(४) विद्यापीठ प्रवेशासाठी आवश्यक अभ्यासक्रमाबरोबरच टेकनिकल, व्यापारिक, औद्योगिक आणि व्यवसायांशी संबंधित अभ्यासक्रमाचा समावेश माध्यमिक स्तरावर करावा.

### ॲबट वुड अहवाल (१९३६-३७):

हरटॉग समितीच्या शिफारशींच्या आधारे भारत सरकारने १९३५ मध्ये केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ पुन्हा स्थापन केले. या मंडळाच्या बैठकीत विद्यापीठीय शिक्षणाची पुनर्रचना करण्याचे सूतोवाच करण्यात आले. त्यासाठी १९३६ मध्ये ॲबट व वुड या २ तज्ञांना भारतीय शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी व व्यवसाय शिक्षणातील अडचणी दूर करण्यासाठी बोलावण्यात आले. या समितीला खालील विषयांची चौकशी करण्यास सांगितले.

(१) औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणसंस्थांमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे काय ?

(२) नवीन औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता आहे काय ?

(३) ग्रामीण भागातील मुलांसाठी कोणत्या विशेष शिक्षणाची सोय करावी ?

(४) प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये कोणत्या प्रकारचे व्यावसायिक शिक्षण दिले जाते जावे.

ॲबट व वुड या दोघांनीही भारतातील शिक्षणविषयक स्थितीचा अभ्यास करुन व्यावसायिक शिक्षण व सामान्य शिक्षण व प्रशासनाविषयी शिफारशी केल्या.

**व्यावसायिक शिक्षणासंबंधी शिफारशी :**

(१) देशाची औद्योगिक गरज लक्षात घेऊन माध्यमिक शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे.

(२) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जीवनाचा उदर निर्वाह करण्याच्या उद्देशाने व्यवसाय निवडण्यास मदत करावी.

(३) देशाच्या विविध भागांमध्ये व्यावसायिक शिक्षणाचे स्वरुप तेथील उद्योग, व्यापार आणि परिस्थिती लक्षात घेऊन मगच निश्चित करावे.

(४) सामान्य आणि व्यावसायिक शिक्षणाला एकमेकांपासून वेगळे मानू नये. पण दोन्ही प्रकारच्या शिक्षणासाठी वेगवेगळया विद्यार्थ्यांची स्थापना करावी.

(५) साहित्य शिक्षणाला दिला जाणारा दर्जा व्यावसायिक शिक्षणालाही दिला जावा.

(६) प्रत्येक प्रांतात व्यावसायिक शिक्षणाची सल्लागार समिती स्थापन करावी.

(७) कमीत कमी ५० हजार लोकसंख्या असणाऱ्या औद्योगिक प्रदेशामध्ये कनिष्ठ, वरिष्ठ तांत्रिक शाळा स्थापन कराव्यात.

(८) उद्योगपतींकडून आर्थिक मदत, इमारती घेऊन व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे.

(९) विशिष्ट व्यापारविषयक प्रशिक्षणासाठी अल्पकालिक व्यावसायिक विद्यालये स्थापन करावीत.

(१०) भारत सरकारने एक व्यावसायिक प्रशिक्षण महाविद्यालय स्थापन करुन त्याचा इतर प्रशिक्षण महाविद्यालयांशी संबंध जोडावा.

(११) भारत सरकारने पूर्ण वेळ व्यावसायिक शाळा सुरु कराव्यात यामध्ये ४ स्तर असावेत.

१) प्राथमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी - व्यापारी शाळा

२) आठवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी - ज्युनियर व्होकेशनल स्कूल

३) अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी - सिनियर व्होकेशनल स्कूल

४) बी. एससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी - औद्योगिक संस्था

**मूल्यांकन :**

या समितीच्या शिफारशींमुळे एक नवीन औद्योगिक शिक्षणसंस्था (Polytechnic) व औद्योगिक, वाणिज्य व शेतीसाठी निघाल्या. परंतु लगेच दुसरे महायुध्द सुरु झाल्यामुळे संपूर्ण शिफारशी अंमलात

आणता आल्या नाहीत. मात्र यामुळे देशात सर्व प्रथम बहुउद्योगीय विद्यालय सुरु झाले. त्यामुळे हा अहवाल ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे.

**आपली प्रगती तपासा**

ॲबट वुड समितीच्या प्रमुख शिफारशी सांगून परीक्षण करा.

## ७.६ सारांश

१९२१ ते १९३७ हा काळ म्हणजे भारतातील लो. टिळकांच्या चतु:सुत्रीतील राष्ट्रीय शिक्षणाचा धागा पकडून म. गांधीजीनी १९३७ मध्ये मुलोद्योगी शिक्षण शिक्षणासाठी काही विद्यापीठांची स्थापना केली. हरटॉग समितीच्या शिफारशींचा प्रभाव ब्रिटीश सरकारवर होत असे. शिक्षक प्रशिक्षणाला तसेच औद्योगिक शिक्षणाला याच काळात प्रारंभ झाला मात्र दर्जाकडे फारशे लक्ष दिले गेले नाही. कोणत्याही क्षेत्रात प्रारंभीच्या काळात संख्यात्मक वाढीला महत्त्व दिले जाते त्यानंतर गुणात्मक विकासाचा विचार होतो. यांच काळात दुसऱ्या महायुध्दाचे वारे वाहू लागले. त्यामुळे ब्रिटीश सरकारला येथील शिक्षणाकडे लक्ष द्यायला फारसा वेळ मिळाला नाही.

## ७.७ स्वाध्याय

१) भारतात विद्यापीठ स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय शिक्षण चळवळीची महत्त्वाची वैशिष्ट्ये कोणती ?

३) ॲबट वुड अहवालातील व्यावसायिक शिक्षणविषयक शिफारशींचे महत्त्व स्पष्ट करा.

★★★

## प्रकरण ८ - अ

# माध्यमिक शिक्षण आयोग
# (मुदलियार आयोग १९५२-१९५३)
## (Secondary Education Commission 1952-53)

**घटक संरचना**

८अ .० उद्दिष्ट्ये

८अ .१ प्रस्तावना

८अ .२ माध्यमिक शिक्षण आयोगाची रचना

८अ. ३ माध्यमिक शिक्षण आयोगाचे कार्यक्षेत्र

८अ .४ माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये

८अ .५ सूचना व शिफारशी

८अ .६ माध्यमिक शिक्षण आयोगाचे मूल्यांकन

८अ .७ सारांश

### ८अ.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१) माध्यमिक शिक्षण आयोगाची रचना सांगू शकाल.

२) माध्यमिक शिक्षण आयोगाने सुचविलेल्या शिफारशीची चर्चा करू शकाल.

### ८अ.१ प्रस्तावना

दिनांक २३ सप्टेंबर १९५२ ला मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.ए.लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना झाली. या आयोगाचे अध्यक्ष डॉ.मुदलियार होते म्हणून या आयोगास मुदलियार आयोग असे म्हणतात.

मुदलियार आयोगाने माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधी विचार केला. माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी शिफारशी सुचविण्यात आल्या. सध्या माध्यमिक शिक्षणात जी सुधारणा व प्रगती होत आहे त्याचे सर्व श्रेय माध्यमिक शिक्षण आयोगालाच द्यावे लागेल. स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षणाच्या प्रगतीत माध्यमिक शिक्षण आयोगाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

### ८अ.२ माध्यमिक शिक्षण आयोगाची रचना

माध्यमिक शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. ए.लक्ष्मणस्वामी मुदलियार हे होते. डॉ.मुदलियार यांचेसह नऊ शिक्षण तज्ज्ञांचा समावेश केलेला होता. या व्यतिरिक्त भारत सरकारचे शिक्षण अधिकारी

डॉ.एस.एम.चेरी यांनी आयोगाचे सहाय्यक सचिव म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच इतर १७ सदस्यांना या आयोगाच्या कामकाजासाठी स्वीकृत सदस्य म्हणून समाविष्ट करुन घेण्यात आले होते.

## ८अ.३ माध्यमिक शिक्षण आयोगाची कार्यक्षेत्र

दर्जेदार माध्यमिक शिक्षणासाठी आयोगाने माध्यमिक स्तरावरील सर्व बाबींचा बारकाईने विचार केला. आयोगाने कार्यक्षेत्र ठरविण्यासाठी पुढील मुद्यांचा विचार केला.

१) माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन झाला त्यावेळची माध्यमिक शिक्षणाची स्थिती व सर्व दृष्टीकोनातून भारतीय शिक्षणाचा विचार करणे.

२) माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना व सुधारणा करणे.

३) माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे, व्यवस्थापन व विषयज्ञान यांचा विचार करणे.

४) माध्यमिक शिक्षणाचा संबंध प्राथमिक व उच्च शिक्षणाशी जोडण्याचा विचार करणे.

५) माध्यमिक शिक्षणाच्या समस्यांचा आढावा घेणे.

६) देशाच्या गरजा, माध्यम आणि उपलब्ध साधने यांचा विचार करुन संपूर्ण देशासाठी समान माध्यमिक शिक्षण प्रणाली तयार करणे.

## ८अ .४ माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये

१) लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.

२) व्यावसायिक कौशल्य विकसित करणे.

३) व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे.

४) नेतृत्त्वगुण विकसित करणे.

५) राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेचा विकास करणे.

६) आनंदमय जीवन जगण्यासाठी सामाजिक मूल्यांचा विकास करणे.

## ८अ.५ सूचना व शिफारशी

**माध्यमिक शिक्षण आयोगाची शिफारशी:**

माध्यमिक शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. माध्यमिक शिक्षणातील दोष दूर करुन त्यात परिवर्तन घडविण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशांना डोळ्यासमोर ठेवून ६ ऑक्टोबर १९५२ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी आयोगाचे उद्‌घाटन केले.

**माध्यमिक शिक्षणाच्या नव्या आकृतिबंधाविषयी शिफारशी:**

शालेय अभ्यासक्रम ११ वर्षाचा असावा. या आधी १२ वर्षाचा अभ्यासक्रम होता.

प्राथमिक शिक्षण- इयत्ता १ ली ते ४ थी- एकूण कालावधी ४ वर्षे.

उच्च प्राथमिक शिक्षण- इयत्ता ५ वी ते ७ वी- एकूण कालावधी ३ वर्षे.

माध्यमिक शिक्षण- इयत्ता ८ वी ते ११ वी- एकूण कालावधी ४ वर्षे.

**माध्यमिक शिक्षण नवा आकृतिबंध शिफारशी पुढीलप्रमाणे:**

१) माध्यमिक शिक्षण ११ ते १७ वयोगटातील मुलांसाठी असावे.

२) माध्यमिक शिक्षण दोन स्तरांमध्ये विभागून करावे.

३) माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये इंटरमिजिएटचे एक वर्ष समाविष्ट करावे. ११ वीचा वर्ग हायस्कूलला व १२ वी चा वर्ग महाविद्यालयांना जोडावा.

४) विद्यापीठीय शिक्षणाचा पदवी अभ्यासक्रम तीन वर्षाचा असावा.

५) बहुउद्देशीय शाळा (Multi-purpose school) स्थापन कराव्यात. अभ्यासक्रमात विविधता असावी. विद्यार्थी आवडीनुसार अभ्यासक्रमांची निवड करु शकेल.

६) ग्रामीण शाळांमधून कृषी शिक्षण, बागकाम, पशुपालन आणि कुटिरोद्योगांचे शिक्षण द्यावे.

७) माध्यमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी तांत्रिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु कराव्यात.

८) मोठ्या शहरांमध्ये तंत्रनिकेतने सुरु करावीत.

९) सार्वजनिक शाळा व वसतिगृहयुक्त शाळांची स्थापना करावी. ग्रामीण भागात अशा शाळांचे प्रमाण जास्त असावे.

१०) शारीरिक व मानसिक समस्या असलेल्या मुलामुलींसाठी स्वतंत्र शाळा असाव्यात.

११) मुलींसाठी स्वतंत्र शाळांची सोय करावी. त्या शाळांमध्ये गृहशिक्षणाची सोय असावी.

१२) गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र व राज्यसरकारकडून छात्रवृत्ती देण्यात यावी.

१३) निवासीशाळा सुरु कराव्यात. शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रम आणि सृजनशील उपक्रम राबवावेत.

१४) विद्यानिकेतने बंद करु नयेत. ग्रामीण भागातील प्रज्ञावान मुलांसाठी सरकारी निवासी शाळा सुरु कराव्यात.

१५) मिश्र शाळा म्हणजेच सहशिक्षण शाळा (Co-Education School) यांमधील मुलींच्या आणि शिक्षिकांच्या विशेष गरजा भागविण्यासाठी निश्चित स्वरुपाच्या अटी घालाव्यात.

**भाषाविषयक शिफारशी:**

१) माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा प्रांतीय भाषा असावे. परंतु भाषिक अल्पसंख्यांकासाठी विशेष सुविधा पुरवावी.

२) विद्यार्थ्यांने कोणत्या ना कोणत्या स्तरावर हिंदी भाषा शिकली पाहिजे.

३) माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाला वैकल्पिक विषय ठेवण्याची शिफारस केली आहे.

**अभ्यासक्रमाविषयी शिफारशी:**

आयोगाने माध्यमिक शिक्षणाचे दोन स्तर निश्चित केले आहेत.

**(अ) मिडलस्कूल किंवा ज्युनिअर माध्यमिक स्तरावरील विषय**

भाषा, सामाजिकशास्त्र, सामान्य विज्ञान, गणित, कला व संगीत, हस्तव्यवसाय, शारीरिक शिक्षण.

**(ब) हायस्कूल किंवा उच्च माध्यमिक स्तरावरील विषय:**

i) मातृभाषा व प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषा व प्राचीन भारतीय भाषा व खालीलपैकी एकभाषा- हिंदी, इंग्रजी, प्रगत इंगजी, एक आधुनिक भारतीय भाषा (हिंदी वगळून), आधुनिक परकीय भाषा, एक प्राचीन भाषा.

ii) सामाजिक शास्त्र, गणित, सामान्यविज्ञान, हस्तव्यवसाय

iii) खालीलपैकी कोणत्याही एक गटातील तीन विषय-

मानसशास्त्र, विज्ञान, तंत्रविज्ञान, वाणिज्य, कृषी, ललितकला, गृहशास्त्र असे गट करण्यात आले होते. प्रत्येक गटात ५ ते ८ विषय होते. त्यातून कोणतेही तीन विषय निवडून अभ्यासावेत अशी सूचना होती.

**पाठ्यपुस्तकाविषयी सूचना व शिफारशी :**

१) पाठ्यपुस्तक समिती नेमावी. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी तज्ज्ञांची समिती नेमावी.

२) पाठ्यपुस्तक समितीने कागद, छपाई, बांधणी व स्वरुप यासंबंधीचे निकष ठरवावेत.

३) जाती, धर्म, वंश, पंथ किंवा कोणत्याही समुहाच्या भावना दुखावणारी विधाने किंवा विशिष्ट धर्माचा पगडा राखणारी पाठ्यपुस्तके नियुक्त करु नयेत.

४) पाठ्यपुस्तकांमध्ये वारंवार बदल करु नये.

**अध्यापन पध्दतीबाबत शिफारशीः**

१) अध्यापन पध्दतीचा उद्देश केवळ माहिती देणे एवढाच नसावा. जीवनमूल्ये विकसित करणे हा देखील असावा.

२) कार्यक्षमतेत वाढ, प्रामाणिकपणे काम करण्याची सवय लागेल अशा अध्यापन पध्दती असाव्यात.

३) अध्यापन पध्दती वास्तवावर भर देणाऱ्या, पाठांतरावर भर न देणाऱ्या, प्रकल्प, कृतिशील अध्ययन, क्रियाशक्तीला वाव देणाऱ्या असाव्यात.

**चारित्र्यसंवर्धनाविषयी सूचना व शिफारशीः**

आयोगाने माध्यमिक स्तरावरील मुलांसाठी चारित्र्य, नैतिकता, शिस्त व धार्मिकता यांचा विचार करुन चारित्र्यसंवर्धनासाठी सूचना व शिफारशी केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे-

१) चारित्र्यसंवर्धन करणे ही प्रत्येक शिक्षकाची नैतिक जबाबदारी राहील विविध उपक्रमांच्या आखणीतून चारित्र्यसंवर्धन व्हावे.

२) शाळेत विद्यार्थी मंडळ स्थापावे स्वयंशिस्तीवर भर द्यावा. विद्यार्थी शिक्षक संबंध दृढ असावेत. स्वयंप्रशासन, वर्गनायक पध्दतीचा अवलंब करुन शिस्त लावावी.

३) बालवीर मोहिमेसाठी राज्य सरकारने पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा बालवीर (Scout) शिबिरासाठी विद्यार्थ्यांच्या गटानुसार दरवर्षी विद्यार्थी पाठवावेत.

४) राष्ट्रीय छात्रसेना (NCC) ही केंद्रशासनाच्या अधिपत्याखालील असावी. योग्य देखभाल, प्रगती आणि विस्तार यासाठी प्रयत्न करावेत.

**विद्यार्थ्यांचे आरोग्य व शारीरिक शिक्षणाविषयी शिफारशीः**

प्रत्येक राज्यामध्ये शालेय आरोग्य सेवा उपलब्ध करावी. विद्यार्थ्यांची सातत्याने आरोग्य तपासणी करावी. आवश्यक उपचार करावा.

**परीक्षा आणि मूल्यमापनाविषयी शिफारशीः**

१) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलावे. निबंधवजा प्रश्नांऐवजी वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या वाढवावी.

२) विद्यार्थ्यांने वर्षभरात केलेल्या कामाच्या नोंदी ठेवून सर्वांगीण प्रगतीचा आढावा घ्यावा.

**शिक्षकांविषयी शिफारशीः**

माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची निवड आणि नियुक्ती करतांना सर्वत्र सारखे नियम निश्चित करावेत.

**शिक्षक प्रशिक्षणाविषयी शिफारशी :**

१) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांसाठी दोन वर्षाचे प्रशिक्षण असावे.

२) महिला शिक्षकांचा तुटवडा दूर करण्यासाठी विशेष अंशकालीन अभ्यासक्रमाची सोय करावी.

**व्यवस्थापन व प्रशासनाविषयी शिफारशीः**

१) शिक्षण संचालक हा सहसचिव दर्जाचा असावा. तो मंत्र्यांना सल्ला देणारा प्रमुख व जबाबदार अधिकारी असावा.

२) शिक्षणाचा सर्व स्तरावरील दर्जा उंचावण्यासाठी, विचार विनिमय करण्यासाठी केंद्र व राज्यामध्ये एका समितीची स्थापना करावी.

**शाळा तपासणी व शाळा मान्यतेविषयी शिफारशीः**

१) शाळेच्या समस्यांचा अभ्यास करणे आणि शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सुधारणात्मक सूचना देऊन त्यांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांना मदत करणे यासाठी निरीक्षकांचा गट नियुक्त करावा.

२) निरीक्षकांची निवड करतांना उच्च शैक्षणिक अर्हता, अध्यापन अनुभव लक्षात घ्यावा.

३) निरीक्षकांबरोबर वरिष्ठ शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षक असा तज्ज्ञांचा गट कार्यरत असावा.

**शालेय इमारत व साधने याविषयी शिफारशीः**

१) ग्रामीण भागात मध्यवर्ती ठिकाणी पुरेशी विद्यार्थी संख्या मिळेल अशा ठिकाणी शाळा सुरु कराव्यात.

२) शहरी भागातील शाळा गर्दीपासून दूर असाव्यात. विद्यार्थ्यांना येण्याजाण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

३) एका वर्गात कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ४० विद्यार्थी संख्या असावी. शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त ७५० असावी.

**कामाचे तास व सुट्यांबाबत शिफारशी :**

स्थानिक वातावरण, सामाजिक गरजा आणि व्यवसाय विचारात घेऊन कामकाजाचे तास ठरविण्याची मुभा शाळांना असावी.

**आर्थिक व्यवस्थेविषयी शिफारशीः**

व्यावसायिक शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी केंद्रस्तरावर व्यावसायिक शिक्षण मंडळ स्थापन करावे. मंडळात संबंधित खात्यांच्या मंत्र्यांचा समावेश असावा.

## ८अ .६ माध्यमिक शिक्षण आयोगाचे मूल्यांकन

स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाला योग्य दिशा देण्याचे काम मुदलियार आयोगाने केले आहे. शिक्षणाच्या इतिहासात माध्यमिक शिक्षणाचा सर्वंकष विचार करुन मौलिक अशा शिफारशी करणारा हा पहिलाच आयोग आहे. म्हणून भारतीय माध्यमिक शिक्षणाच्या इतिहासामध्ये मुदलियार आयोगाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानावे लागेल.

**हे लक्षात ठेवाः**

- शालेय अभ्यासक्रम ११ वर्षाचा असावा. अभ्यासक्रमात व अध्यापन पध्दतीत बदल करावा. मातृभाषा, संघीय भाषा म्हणजे हिंदी, परकीय भाषा-इंग्रजी, ज्यांची मातृभाषा हिंदी असेल त्यांनी हिंदी खेरीज कोणतीही भारतीय अर्वाचीन भाषा शिकावी. कोणतीही एक हस्तकला शिकावी.
- खालीलपैकी सात गटांमधील कोणतेही तीन विषय निवडावेत. मानसशास्त्र, विज्ञान, तंत्रविज्ञान, वाणिज्य, कृषी, ललितकला, गृहशास्त्र.
- मुलांची अभिरुची, कार्यक्षमता लक्षात घेऊन आयोगाने बहुविध अभ्यासक्रम सुचविला आहे. या बहुविध अभ्यासक्रमामध्ये शालांत परीक्षेनंतर विद्यार्थ्यांनी उद्योग-व्यवसायाच्या विविध क्षेत्रात प्रवेश करावा हा हेतू होता.
- परीक्षा पध्दतीत अनेक दोष दिसून आल्याने नवीन मूल्यमापन पध्दती आयोगाने सुचविली. ज्ञान, माहिती, स्मृती यांची चाचणी घ्यावयाची नसून विद्यार्थ्यांच्या विकासाचे खरे मूल्यमापन करण्यासाठी परीक्षातंत्र वापरावे. विषयज्ञान तपासणीसाठी परीक्षा नसून एकूण शैक्षणिक प्रगतीचे मूल्यांकनासाठी परीक्षा व्हावी. यासाठी आयोगाने सुधारणा सुचविल्या आहेत.
- माध्यमिक स्तरावरील अध्यापक वर्ग अधिक कार्यक्षम शैक्षणिक अर्हताधारक असावा. उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक वर्ग पदव्युत्तर पदवी प्राप्त असावा. गुणवत्ताधारक व कार्यक्षम व्यक्ती अध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात येण्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करुन आकर्षक वेतन ठरवावे.
- शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शनासाठी निष्ठापूर्वक प्रयत्न करावेत त्यासाठी बहुविध अभ्यासक्रमांची जोड घ्यावी. साचेबंद अध्यापनपध्दती न वापरता, नवनवीन अध्यापन पध्दती शोधून अध्ययन-अध्यापनकार्यात गती आणावी.
- ग्रंथालयासाठी स्वतंत्र व भव्य असे दालन, पूरक पुस्तके, अनुदान याविषयी शिफारशी केल्या आहेत. साहित्य, उपकरणे, साहित्यमांडणी, अनुदानाची तरतूद सुसज्ज प्रयोगशाळा, वैज्ञानिक दृष्टिकोन, भावी संशोधक.
- माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना करावी. नियमावली तयार करुन त्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. गुणवत्ता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी नियमांची अंमलबजावणी करावी.

## ८अ.७ सारांश

अभ्यासक्रम, त्रिभाषाविषयक सूत्र, हस्तकला, बहूउद्देशिय शाळा, परीक्षा पध्दतीने सुधारणा, शिक्षकांविषयी अपेक्षा, अध्यापन पध्दती विषयक विचार ग्रंथालयासंबंधी, प्रयोगशाळेसंबंधी, परीक्षा नियंत्रणासंबंधी विस्ताराने विचार करुन माध्यमिक शिक्षण सुधारणेसाठी शिफारशी व सूचना दिल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळातील हा आयोग असल्याने या आयोगाच्या शिफारशी त्वरीत अंमलात येतील अशी फार मोठी आशा बाळगली होती परंतु त्या शिफारशी पूर्णतः अंमलात आणल्या नाहीत. मुदलियार आयोगाच्या शिफारशींबाबत अनेक शिक्षणतज्ज्ञांनी मुक्तपणे कौतुक केले आहे. परंतु शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत नकारात्मक भूमिका अनेकांनी मांडल्यामुळे माध्यमिक शिक्षण आयोगाच्या मूल्यांकनात संमिश्र प्रतिक्रियांचा समावेश करणे योग्य ठरेल.

★★★

**प्रकरण ८ - ब**

# शिक्षण आयोग
# (कोठारी आयोग १९६४-१९६६)

(Education Commission- 1964-66)

**घटक संरचना**

८ब .० उद्दिष्ट्ये

८ब .१ प्रस्तावना

८ब .२ शिक्षण आयोगाची रचना

८ब .३ आयोगाची कार्यकक्षा

८ब .४ शिक्षण आणि राष्ट्रीय उद्दिष्टे

८ब .५ कोठारी आयोगाच्या सूचना व शिफारशी

- (अ) पूर्व प्राथमिक शिक्षण
- (ब) प्राथमिक शिक्षण
- (क) माध्यमिक शिक्षण
- (ड) उच्च माध्यमिक शिक्षण
- (ई) उच्च शिक्षण वा विद्यापीठीय शिक्षण

८ब .६ शिक्षकांविषयी शिफारशी

८ब .७ कोठारी आयोगाचे मूल्यांकन

## ८ब.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१) कोठारी आयोगाची रचना स्पष्ट करू शकाल.

२) कोठारी आयोगाने सांगितलेली राष्ट्रीय उद्दिष्टे स्पष्ट करू शकाल.

३) कोठारी आयोगाने सुचविलेल्या शिफारशीची चर्चा कराल.

## ८अ.१ प्रस्तावना

शिक्षणक्षेत्राचा राष्ट्रीय स्तरावर विकास साध्य करावयाचा असेल तर शिक्षणाच्या विविध स्तरांचा एकत्रितपणे विचार होणे आवश्यक होते, म्हणून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणावर स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी त्यांचा एकत्रितपणे विचार व्हावा. यानुसार भारत सरकारने १४ जुलै १९६४ ला तत्कालिन विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा.डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली.

## ८अ.२ शिक्षण आयोगाची रचना

शिक्षणाच्या सर्वांगीण विचार करण्यासाठी भारत सरकारने दिनांक १४ जुलै १९६४ मध्ये प्रा.डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांचा समावेश असलेल्या शिक्षण आयोगाची नियुक्ती केली. त्यात ७ सदस्य इतर देशांमधील शिक्षणतज्ज्ञ होते. या आयोगाला शिक्षण आणि राष्ट्रीय विकास आयोग या नावानेही ओळखले जाते. शिक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रा.कोठारी असल्याने या आयोगाला `कोठारी आयोग` असे म्हणतात.

## ८अ.३ आयोगाची कार्यकक्षा

शिक्षण आयोगाने शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील सर्व बाबींच्या विकासासाठी शिफारशी सुचवायच्या होत्या. `विधी आणि वैद्यक शिक्षण` आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळले असले तरी आवश्यकतेनुसार या दोन्ही शिक्षणाच्या अनुषंगानेही आयोगाला विचार करावयाचा होता.

**कामाचे उद्देश गट :**

शिक्षण आयोगाने बारा स्तरांवरील कामासाठी **उद्देश गट** निश्चित करुन घेतले होते.

शिक्षणाचे उद्देश गट →

- (१) शालेय शिक्षण
- (२) उच्च शिक्षण
- (३) तंत्र शिक्षण
- (४) कृषी शिक्षण
- (५) प्रौढ शिक्षण
- (६) विज्ञान शिक्षण आणि संशोधन
- (७) शिक्षक-प्रशिक्षण आणि शिक्षक दर्जा
- (८) विद्यार्थी कल्याण
- (९) नवीन तंत्रे आणि पध्दती
- (१०) मनुष्यबळ
- (११) शैक्षणिक प्रशासन
- (१२) शैक्षणिक अर्थव्यवस्था

शिक्षण आयोगाने या व्यतिरिक्त शिक्षणाचे सात **कार्यगट** निश्चित केले होते. ते आहेत.

शिक्षणाचे कार्यगट →

- (१) महिलांचे शिक्षण
- (२) मागासवर्गीयांचे शिक्षण
- (३) शाळा इमारती
- (४) शाळा-समूह संबंध
- (५) सांख्यिकी
- (६) पूर्व-प्राथमिक शिक्षण
- (७) शालेय अभ्यासक्रम

कोठारी शिक्षण आयोगाने आपला विस्तृत असा अहवाल २९ जून १९६६ भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.एम.सी.छगला यांच्या समोर मांडला. हा अहवाल तीन भागात आणि १९ अध्यायांचा आहे. अहवाल ७०० पृष्ठांचा आहे. यावरुन कोठारी शिक्षण आयोगाची व्यापकता लक्षात येते.

## ८अ.४ शिक्षण आणि राष्ट्रीय उद्दिष्टे

शिक्षणातून राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोठारी आयोगाने पाच सूत्री कार्यक्रम सुचविला आहे. ती पाच सूत्रे पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.


**पंचसूत्री**




कोठारी शिक्षण आयोगाने राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सुचविलेल्या पंचसूत्री कार्यक्रमाच्या संदर्भात काही महत्त्वाच्या सूचना व शिफारशी केल्या आहेत.

**शिक्षण आणि उत्पादकता:**

शिक्षणाचा उत्पादकतेशी संबंध स्थापित करण्यासाठी पुढील कार्यक्रम सुचविले आहेत.




**सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता:**

सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता शिक्षणातून निर्माण व्हावी या उद्देशाने आयोगाने पुढील उपक्रम सुचविले आहेत.

* **सामान्य शाळा**
* **सामाजिक आणि राष्ट्रीय सेवा योजना**
* **भाषाविषयक धोरण:**
    - शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे. उच्च शिक्षणाचे माध्यम सामान्यत: प्रादेशिक भाषा असावे.
    - साहित्य आणि विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये प्रादेशिक भाषांचा विकास करावा.
    - अखिल भारतीय स्तरावरील संस्थांनी इंग्रजी हेच माध्यम ठेवावे. हिंदीचाही विकास करावा.
    - प्रादेशिक भाषांना कार्यालयीन आणि प्रशासनाची भाषा मानावे.

- इंग्रजी भाषेचे शिक्षण सुरुवातीपासूनच द्यावे. आंतरराष्ट्रीय संपर्कासाठी इंग्रजी भाषा येणे आवश्यक आहे.
- जगातील इतर प्रमुख भाषा शिकविण्याची सोय शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून व्हावी.

* **शिक्षण आणि आधुनिकता**
* **सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक मूल्ये**
* **धर्मासंबंधीचे शिक्षण**

## ८अ.५ कोठारी शिक्षण आयोगाच्या सूचना व शिफारशी

कोठारी आयोगाने शिक्षणाच्या सर्व स्तरांचा सर्वंकष अभ्यास करून बदलत्या काळानुसार शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी अनेकविध उपुयक्त सूचना व शिफारशी सुचविलेल्या आहेत.

* **शिक्षणाचा नवीन आकृतीबंधः**

कोठारी आयोगाने शिक्षणाचा नवीन आकृतीबंध मांडलेला आहे तो पुढीलप्रमाणे.

| १०+२+३ |
|---|

१) पूर्व प्राथमिक शिक्षण- २ ते ३ वर्ष.
२) निम्न प्राथमिक शिक्षण- ४ ते ५ वर्ष- इ. १ ली ते ४ थी.
३) उच्च प्राथमिक शिक्षण- २ ते ३ वर्ष- इ.५ वी ते ७ वी.
४) निम्न माध्यमिक शिक्षण- ३ वर्ष- इ.८ वी ते १० वी.
५) उच्च माध्यमिक शिक्षण- २ वर्षे- इ.११ वी ते १२ वी.
६) विद्यापीठीय पदवी शिक्षण- ३ वर्षे
७) पदव्युत्तर शिक्षण- २ वर्षे.

**पूर्व प्राथमिक शिक्षण : शिफारशीः**

१) शिक्षणखात्याने प्रायोगिक तत्त्वावर पूर्वप्राथमिक (बालवाडी) शाळांची स्थापना करावी.
२) खासगी संस्थांना अनुदान देऊन पूर्व प्राथमिक शाळा काढण्यास प्रोत्साहन द्यावे.
३) पूर्व प्राथमिक शिक्षण १ ते ३ वर्षाचे असावे.
४) हे शिक्षण वयाच्या ३ वर्षापासून ६ वर्षापर्यंत ऐच्छिक ठेवावे.
५) प्रयोग म्हणून १ वर्षाचा पूर्व प्राथमिक शिक्षणाचा वर्ग प्राथमिक शाळांना जोडावा.

**प्राथमिक शिक्षण : शिफारशीः**

१) पहिलीची परीक्षा रद्द करुन पहिली व दुसरी या दोन इयत्ता म्हणजेच एक घटक मानावा.
२) इयत्ता १ ली च्या वर्गाला क्रीडन पध्दतीचा अवलंब करावा.
३) गळती कमी करण्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय करावी.
४) कार्यानुभव या विषयातून शिक्षणाचा संबंध उत्पादकतेशी जोडावा.

**माध्यमिक शिक्षण : शिफारशीः**

१) माध्यमिक स्तरावर विशेष शिक्षणाची सोय असावी.

२) उपलब्ध सुविधांनुसार प्रवेश द्यावा. गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची निवड करावी.

३) प्रत्येक जिल्हा स्तरावर माध्यमिक शिक्षणाच्या विकासाची एक योजना तयार करावी. दहा वर्षाच्या कालावधीमध्ये या योजनेची अंमलबजावणी व्हावी. विद्यार्थ्याला किमान स्तरापर्यंत आणण्यासाठी प्रयत्न करावा.

**उच्च माध्यमिक शिक्षणासाठी शिफारशी:**

१) १९७५-७६ पर्यंत पूर्व विद्यापीठीय अभ्यासक्रम विद्यापीठ किंवा महाविद्यालयातून काढून ते माध्यमिक शाळांना जोडावेत. कोणत्याही परिस्थितीत १९८५-८६ पर्यंत उच्च माध्यमिक शिक्षणाचा २ वर्षाचा अभ्यासक्रम सुरु व्हावा.

२) उच्च माध्यमिक स्तरावर इयत्ता ११ वी व १२ वी साठी वेगवेगळे विशेष स्वरुपाचे अभ्यासक्रम सुरु करावेत. इयत्ता ११ वी चा वर्ग संक्रमण अवस्थेतील वर्ग मानावा.

**उच्च शिक्षण वा विद्यापीठीय शिक्षणासाठी शिफारशी:**

१) पदवी शिक्षण तीन वर्षांचे असावे.

२) पदव्युत्तर पदवी शिक्षण दोन वर्षांचे असावे.

३) महाविद्यालयातील अध्यापनाचा कालावधी ३६ आठवड्यांचा असावा.

४) शिक्षण मंत्रालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाने सहकार्य घेऊन सुटीचे कॅलेंडर तयार करावे. परीक्षा किंवा इतर अन्य कारणांनी अध्यापन होऊ शकत नाही तो कालावधी २१ ते २६ दिवसांचा असावा.

## ८अ.६ शिक्षकांसाठी शिफारशी

कोठारी आयोगाने सर्व स्तरावरील शिक्षणाच्या संदर्भात सूचना व शिफारशी केल्या आहेत. सर्व शिफारशी पूर्व-प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण वा विद्यापीठीय शिक्षणाच्या गुणात्मक विकासासंदर्भात होत्या. शिक्षकाचे स्थान, अस्तित्त्व, सामाजिक दर्जा, राहणीमान सुधारण्यासाठी वेतनात वाढ व इतर सुविधा यांचा विचार कोठारी आयोगाने केला आहे.

## ८अ.७ कोठारी आयोगाचे मूल्यांकन

पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधनापर्यंत कोठारी आयोगाने विचार करुन शिफारशी केल्या आहेत. शिक्षण आयोगाने शिफारशी सुचविण्यापूर्वी विद्यापीठ शिक्षण आयोग व माध्यमिक शिक्षण आयोग या दोन्ही स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाविषयी नेमलेल्या आयोगांचा बारकाईने अभ्यास केलेला आढळतो. सर्व स्तरांवरील शिक्षणाच्या समस्या विचारात घेऊन या समस्यांच्या निराकरणासाठी निष्ठापूर्वक प्रयत्न कोठारी आयोगाने केला. शिक्षणाचा नवीन आकृतीबंध, शिक्षणाचे व्यावसायीकरण, बुक बँक, कार्यानुभव, शिक्षकांसाठी सुधारित वेतनश्रेणी, राष्ट्रीय शिक्षण संस्था, कृषी विद्यापीठांची स्थापना, त्रिभाषासूत्र, वंचित व दुर्बल घटकांचे शिक्षण, स्त्री शिक्षण, शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता अशा अनेक प्रकारच्या शिफारशी अंमलात आल्या आहेत.

कोठारी आयोगाने सुचविलेल्या काही शिफारशी अंशतः अंमलात आल्या. त्यात शिष्यवृत्त्या व त्यांच्यात वाढ, प्रौढ शिक्षण, शिक्षकांचा दर्जा, विज्ञान शिक्षण, संशोधन यांचा अंतर्भाव होतो. या शिफारशींची पूर्णतः अंमलबजावणी झालेली नसली तरी शिक्षणक्षेत्रात एक नवीन विचारप्रवाह सुरु झ ाला.या विचारप्रवाहाने या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी पूरक वातावरण निर्माण झाले.

शिक्षणाचा सर्व बाजूंनी विचार करणारा हा शिक्षण आयोग असल्याने देशभरातील शिक्षणतज्ज्ञ व शिक्षकांनी त्यातील सूचना व शिफारशींचे स्वागत केले. शिक्षकांच्या सुधारित वेतन श्रेणींमुळे शिक्षकांना प्रतिष्ठा मिळाली त्याचबरोबर त्यांच्या राहणीमानाचा दर्जा कमालीचा सुधारला. त्यांच्या अध्यापनकार्यात सुधारणा होऊन व्यवसायावरची निष्ठा वाढीस लागली. या आयोगाच्या अहवालाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. शिक्षण व उत्पादनक्षमता, शिक्षण व औद्योगिक संस्था, शिक्षण व राष्ट्रीय विकास, विज्ञान शिक्षण, गुणात्मक सुधारणेवर भर, मूल्यमापनाची नवीन तंत्रे, शाळासमूह योजना, शैक्षणिक सुविधांमध्ये सुधारणा, प्रज्ञावंतांचा शोध, शिक्षकांच्या हक्कांच्या संरक्षणावरील संघटनात्मक बांधणी, पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी स्वायत्त मंडळ, शिक्षणावरील खर्चाच्या प्रमाणात वाढ इत्यादी महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल अभ्यास करुन आयोगाने सूचना व शिफारशी सुचविल्या.

कोठारी शिक्षण आयोगाच्या प्रदीर्घ अहवालावर डॉ.जे.पी.नाईक, श्री.एम.एन.आचार्य, या ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञांनी आपली विचारपूर्वक मते मांडलेली आहेत. उस्मानिया विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डी.एस.रेड्डी यांनी या अहवालाबाबत प्रशंसा केलेली आहे. अहवालाच्या या सर्व बाबींचा विचार केल्यास स्वातंत्र्योत्तर काळात कोठारी आयोगाचे योगदान अद्वितीयच मानावे लागेल.

★★★

**प्रकरण ९ - अ**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- १९८६

(National Education Policy- 1986)

**घटक संरचना**


९अ.० उद्दिष्ट्ये

९अ.१ प्रस्तावना

९अ.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्ट्ये

९अ.३ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये

९अ.४ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या बाबी

९अ.५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे परीक्षण


## ९अ.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे सांगू शकाल.

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगू शकाल.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या बाबींची चर्चा कराल.

## ९अ .१ प्रस्तावना

भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी ५ जानेवारी १९९५ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देण्याची अभिवचन दिले या धोरणामुळे आपले राष्ट्र वैज्ञानिक, तांत्रिक, आर्थिक क्षेत्रात सक्षम बनून प्रगतीकडे झेप घेईल असेही म्हटले आहे. म्हणूनच शिक्षण मंगल्याने हे काम हाती घेतले होते. २० ऑगष्ट १९८५ रोजी दस्तऐवज स्वरुपात `शैक्षणिक आव्हान एक धोरणात्मक यथार्थ दर्शन` हा अहवाल प्रसिध्द झाला. यात चार महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा केली गेली आहे. या मुद्यावर राज्य व राष्ट्रीय पातळीवरही चर्चा घडवून आणल्या गेल्या. या अहवालाचे प्रादेशिक भाषांमध्ये रुपांतर करुन सर्व देशभर त्याचे वाटप केले गेले. लोकांकडून त्यावर प्रतिक्रिया, सूचना, मते विचार मागविले गेले. महाराष्ट्राचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चासत्रात, विचारमंथनात मोठा सहभाग होता.

अहवालातील चार मुद्दे →
- समाजशिक्षण आणि विकास
- शैक्षणिक विकासाचे विहंगावलोकन
- समीक्षणात्मक मूल्यमापन
- शैक्षणिक पुनर्रचना विषयक दृष्टिकोन

वरील चार मुद्यासंबंधी चर्चा करण्यासाठी कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्र यांचे आयोजन ठिकठिकाणी करण्यात आले. यातून झालेल्या विचार मंथनाचे सार एकत्र करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ सादर करण्यात आले. पुन्हा यावर राष्ट्रीय विकास परिषद केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळाच्या बैठकीतही चर्चा घडवून आणली. यातील सूचनांचा विचार करुन `राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६` चा मसुदा तयार झाला. दिनांक ८ मे १९८६ ला लोकसभेने तो स्वीकारला १३ मे १९८६ ला तो राज्यसभेने स्वीकारला.

धोरणातील महत्त्वाच्या बाबी → शैक्षणिक आव्हान
→ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६
→ कृतिकार्यक्रम

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये शैक्षणिक आव्हानांकडून कृती कार्यक्रमाकडे यात शिक्षण ही महत्त्वपूर्ण गुंतवणूक कशी आहे हा विचार महत्त्वपूर्ण मानला आहे. शिक्षणाची प्रक्रिया आणि शिक्षणाचा आशय यांचा पुनर्विचार केला आहे. उच्च शिक्षणाबाबत अनेक अपेक्षा नमुद केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे-

१. राष्ट्रीय गरजा पूर्ण करण्यासाठी उच्च शिक्षणाचा विकास करणे.
२. उच्च शिक्षणाची गुणवत्ता उच्च दर्जाची करणे.
३. उच्च शिक्षणाची संधी सर्वांना प्राप्त करुन देणे.
४. उच्च शिक्षणातून अभिरुची- अभिवृत्ती सवयी मूल्य यांना योग्य आकार देणे.

## ९अ.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे

१९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लोकसभेमध्ये पारित करण्यात आले आणि राज्यसभेतही मान्य करण्यात आले. त्यात दिलेली उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.

१. व्यक्तीमध्ये अध्यात्मिक, नैतिक, वैज्ञानिक आणि लोकशाही मूल्ये रुजविणे.
२. व्यक्तीचा परिपूर्ण विकास साधुन, सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व निर्माण करणे.
३. व्यक्तीचा आत्मविश्वास वाढवून, समस्यात्मक परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणे.
४. परिश्रम करण्याची वृत्ती वाढीस लावून श्रम प्रतिष्ठा जोपासणे.
५. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञानविषयक भौतिक परिस्थिती विषयी जागृती निर्माण करणे.
६. सामाजिक न्याय सर्वधर्म समभाव, धर्म निरपेक्षता या विषयी निष्ठा निर्माण करणे.
७. समर्पण वृत्ती व राष्ट्रभावना वाढीस लावणे.
८. आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा विकास करणे.

## ९अ.३ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी उच्च माध्यमिक सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी तयार केलेल्या पुस्तिकेत १९८६ च्या धोरणाची वैशिष्ट्ये दिलेली आहेत. ती खालीलप्रमाणे-

१. सुदृढ लोकशाहीसाठी शिक्षण
२. राष्ट्रीय एकात्मता व सर्वधर्म समभाव
३. समानतेसाठी शिक्षण
४. सांस्कृतिक वारश्याची जपवणूक
५. मनुष्य बळाचा योग्य विकास
६. राष्ट्रीय साधनसंपत्तीचा योग्य विकास व वापर
७. निरंतर शिक्षण
८. शिक्षणात समाजाचा सहभाग
९. व्यावसायिकरण
१०. राष्ट्रीय शिक्षण पध्दतीचा पुरस्कार

११. आरोग्य, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव व कला शिक्षण यावर भर.

१२. अभ्यासक्रमासाठी दहा गाभाभूत घटक

## ९अ .४ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या बाबी

१. शिक्षणाचे महत्त्व

२. राष्ट्रीय शिक्षण पध्दती

३. अर्थपूर्ण भागिदारी

४. समानतेसाठी शिक्षण : समानसंधी मिळवून देण्यावर या धोरणात विशेष भर दिला आहे. शिक्षणाची संधी न मिळालेले, शिक्षण अर्धवट सोडलेले, ज्यांचावर शिक्षण देण्याबाबत अन्याय झाला अशांना शिक्षणाची अधिक संधी दिली जाईल. स्त्रियांचा अधिक गतीने विकास व्हावा यासाठी स्त्रियांसाठी अभ्यासक्रम तयार केले जातील. प्राथमिक शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व द्यावे. पूरक नौकऱ्या, कालमर्यादेची निश्चिती, परिणामकारक मार्गदर्शन यांद्वारा स्त्रियांची निरक्षरता नाहिशी केली जाईल. समानतेपासून-वंचित-राहिलेल्या सर्व घटकांना समानता दिली जाईल.

वंचित घटक
- (१) स्त्रिया
- (२) अनुसूचित जाती
- (३) अनुसूचित जमाती
- (४) अपंग
- (५) प्रौढ
- (६) अल्पसंख्यांक

**विविध स्तरावर शिक्षणाची पुनर्रचना**

१. बालसंगोपन व शिक्षण

२. प्राथमिक शिक्षण

३. माध्यमिक शिक्षण

४. प्रज्ञावंत मुलांसाठी विद्यालये

५. व्यवसायिकरण

६. उच्च शिक्षण

७. मुक्त विद्यापीठ व दूर अध्ययन

८. ग्रामीण विद्यापीठ

९. पदव्या व नौकऱ्या यांतील संबंध तोडला जाईल

१०. खडू फळा मोहिम

११. नवोदय विद्यालय

१२. शिक्षकाची भूमिका

## ९अ .५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे परीक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील महत्त्वपूर्ण बदल हा राष्ट्रीय शिक्षण पध्दतीत संपूर्ण राष्ट्रात समान शैक्षणिक आकृती बंधाचा विचार आहे. १०+२+३ हा आकृतीबंध देशातील सर्व भागात

स्वीकारला गेला आहे. दहा वर्षाच्या विभागणीसाठी पाच वर्ष प्राथमिक शिक्षण, तीन वर्ष उच्च प्राथमिक, नंतरची दोन वर्ष माध्यमिक शिक्षण असा अंतर्भाव असणारी मूलभूत पध्दती स्वीकारण्याचा प्रयत्न केला.

+२ हा स्तर शालेय शिक्षणाचा एक भाग आहे हे सर्व देशभर स्वीकारले जावे. यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरण, शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्येला सर्वाधिक प्राधान्य देते. त्यामुळे मायक्रोपध्दतीवर आधारित बारीक सारीक तपशिलासह मांडणी केलेल्या योजनांचा स्वीकार केला आहे. तसेच मुलांना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी सर्व देशभर अगदी तळागाळयातल्या पातळीवर त्यांचे उपयोजन करीत आहे. ह्या प्रयत्नांचा समन्वय अनौपचारिक शिक्षणाचे जे जाळे पसरले जावे, त्याच्याशी साधला आहे. इ.स.२००० पर्यंत २५ % उच्च माध्यमिक विद्यार्थी, व्यवसायिक अभ्यासक्रमात सामावले जातील असे विचाराशी आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांना रोजगार वा स्वयंरोजगार मिळावा यासाठी पावले उचलली जातील. देऊ केलेल्या अभ्यासक्रमांचे पुनर्विलोकन नियमितपणे केले जाईल उच्च माध्यमिक पातळीवर विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी शासन देखिल आपल्या नौकर भरतीच्या धोरणाचे समीक्षण करील, महाराष्ट्र शासनाकडून राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

भारत सरकारने १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. या धोरणात एक राष्ट्रीय स्तरावरील समान अभ्यासक्रम सूचित करण्यात आला. या राष्ट्रीय अभ्यासक्रमातून एका विशिष्ट स्तरावरील भारतातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्यातील लिंग, स्थान, यातील भेद लक्षात न घेता समान शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी असे अपेक्षित आहे. प्रत्येक राज्याच्या सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, वैशिष्ट्यानुसार अभ्यासक्रमात इष्ट तो बदल करण्यासाठी वाव मिळावा म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रमात लवचिकता ठेवण्यात आली आहे.

हे धोरण प्रभावी, परिणामकारक शिक्षण देण्यासाठी मौलिक स्वरुपाचे ठरेल, यात वाद नाही. राजीव गांधींनी राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत असे स्पष्टपणे म्हटले होते की, या शिक्षणासाठी कोणतीही आर्थिक अडचण निर्माण होणार नाही. म्हणजेच शासनाचा या शिक्षणाला पूर्ण पाठिंबा होता. १९६८ च्या धोरणातील उणीवा काढून टाकण्यासाठी १९८६ चे धोरण आले आहे. अशी भीती व्यक्त करण्यात आली होती की, शैक्षणिक धोरणामुळे केंद्र व राज्यसरकारमध्ये अरेरावी वाढेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण न राहता ते केंद्रीय शैक्षणिक धोरण ठरेल, नवोदय विद्यालयाचे, राष्ट्रीय शिक्षण सेवा, समान अभ्यासक्रमाच्या नविन धोरणातील अशा गोष्टी आहेत की त्या राज्याच्या अधिकारावर आक्रमण करतील.

हे शतक संपले तरी, लोकसंख्या भरमसाठ वाढते आहे. शिक्षण संरचना बळकट हवी. मनुष्यबळ विकासासाठी देशभर प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. त्यासाठी शिक्षणच बहुमुखी भूमिका करेल.

१९८६ च्या धोरणात देशाची अखंडता, एकता यासाठी राष्ट्रीय शिक्षण, विकासावर पुरेसा भर दिलेला आहे. संपूर्ण देशातील शिक्षणाची संरचना व पध्दती समान असावी यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम निश्चित करण्याचा विचार योग्य आहे. पदवी आणि नौकरी यांचा संबंध जोडू नये या विचारामुळे तरुणांची मानसिकता बदलेल हे योग्य आहे. ग्रामीण भागातील बुध्दिमान मुलांचा शोध घेवून निशुल्क दर्जेदार शिक्षण देण्यासाठी नवोदय विद्यालयाची कल्पना येत काळासाठी अनुरुप आहे.

यामुळे समाजातील विषमता दूर होईल. केंद्र व राज्य सरकारची जबाबदारी स्पष्ट केली आहे. आर्थिक सहाय्यासाठी योग्य सल्ला दिला आहे. शैक्षणिक दृष्ट्या कोणताही घटक वंचित राहू नये म्हणून समान संधीचा विचार केला आहे. या शैक्षणिक धोरणाने सर्वत्र समान संधी निर्माण केली आहे. यातून अनेक चांगल्या गोष्टी दिसून येत असल्या तरी काही मर्यादा यातून स्पष्ट होतात.

★★★

## प्रकरण ९ - ब
# राममूर्ती समिती- १९९०
## (Ramamurti Committee- 1990)

**घटक संरचना**

९ब .० उद्दिष्ट्ये
९ब .१ प्रस्तावना
९ब .२ राममूर्ती समितीची रचना
९ब .३ राममूर्ती समितीचा अहवाल- अंतर्भूत बाबी
९ब .४ राममूर्ती पुनरावलोकन समितीची उद्दिष्ट्ये
९ब .५ राममूर्ती समितीची कार्यकक्षा
९ब .६ समितीची कार्यप्रणाली आणि प्रक्रिया
९ब .७ राममूर्ती समितीने सुचविलेल्या शिफारशी
९ब .८ राममूर्ती पुनरावलोकन समितीचे मूल्यांकन

## ९अ.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१) राममूर्ती समितीची उद्दिष्टे स्पष्ट करू शकाल.

२) राममूर्ती समितीने सांगितलेल्या शिफारशीची चर्चा कराल.

## ९ब.१ प्रस्तावना

भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने `राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-१९८६` ची समीक्षा करण्याकरिता ७ मे १९९० रोजी एक पुनरावलोकन समिती नियुक्त केली. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी कार्याचा आढावा घेणे हे प्रमुख काम या समितीचे होते. या समितीचे अध्यक्ष आचार्य राममूर्ती होते. म्हणून या समितीला राममूर्ती पुनरावलोकन समिती (Ramamurti Review Committee) असे म्हणतात. या समितीने १९८६ च्या धोरणाचा सर्वंकष आढावा घेऊन आपला अहवाल २६ डिसेंबर १९९० रोजी भारत सरकारकडे सादर केला. तत्कालीन पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या कार्यालयात राममूर्ती समितीने आपला अहवाल मांडला. संसदेच्या सभागृहापुढे १९९१ ला अहवाल मांडला गेला. ९ मार्च १९९१ च्या सभेमध्ये या समितीच्या विचारांची पडताळणी केली गेली.

## ९ब.२ राममूर्ती समितीची रचना

आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या राममूर्ती समितीमध्ये आचार्य राममूर्तीसह एकूण १७ शिक्षणतज्ज्ञांचा समावेश होता. त्या शिक्षणतज्ज्ञांमध्ये महाराष्ट्रातील डॉ.सिद्दीकी आणि प्रा.उषा मेहता यांचा समावेश होता.

## ९ब.३ राममूर्ती समितीचा अहवाल : अंतर्भूत बाबी

राममूर्ती पुनरावलोकन समितीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ चे पुनरावलोकन केले. या समितीने तयार केलेला अहवाल राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Policy of Education- NPE Review) यातील पाच बाबींवर आधारित आहे. त्या पुढीलप्रमाणे-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील पाच बाबी

- समानता आणि सामाजिक न्याय
- शिक्षण व्यवस्थापनाचे सर्व स्तरावर विकेंद्रीकरण
- शैक्षणिक व्यवस्थेची प्रस्थापना
- आवश्यक मूल्यांची धोरणात जोड
- कार्यव्यवस्थेला शक्ती व गती देणे.

## ९ब.४ राममूर्ती पुनरावलोकन समितीची उद्दिष्टे

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील वर उल्लेख केलेल्या पाच बाबींचा सविस्तररित्या आढावा घेतांनाच समितीची उद्दिष्टेही दृष्टिपथात येतात. ती पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

२. शिक्षण व्यवस्थापनाचे सर्व स्तरावर विकेंद्रीकरण करणे.

३. शिक्षणातून चारित्र्यनिर्मिती करणे.

४. सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे.

५. व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे.

६. शिक्षणातून विविध कौशल्य आत्मसात करण्याची व्यवस्था करणे.

७. मुलींच्या आणि महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे.

८. शैक्षणिक विकासकार्यात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविणे.

९. शिक्षणाचे व्यावसायिकीकरण करणे.

## ९ब.५ राममूर्ती समितीची कार्यकक्षा

राममूर्ती पुनरावलोकन समितीच्या विचारार्थ पुढील विषय होते.

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ आणि त्याच्या कार्यवाहीची समीक्षा करणे

२. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संशोधनासंबंधी शिफारशी करणे

३. संशोधित व सुधारित धोरणाच्या कालबध्द अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

## ९ब.६ समितीची कार्यप्रणाली आणि प्रक्रिया

राममूर्ती पुनरावलोकन समितीने पुढील कार्यप्रणाली निश्चित केली होती.

समितीची कार्यप्रणाली
- (१) विविध समित्यांची निर्मिती
- (२) राष्ट्रीय घोषणापत्राचा अभ्यास
- (३) विशेषज्ञ व शिक्षणतज्ज्ञांशी विचारविनिमय
- (४) विविध शिक्षणसंघटनांशी चर्चा

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सर्वंकष अभ्यास करुन आवश्यक त्या सुधारणा व शिफारशी सुचविण्यासाठी समितीने वेगवेगळ्या सहा उपसमित्या नेमल्या त्या पुढीलप्रमाणे

सहा उपसमित्या
- (१) समता आणि सार्वत्रिकरण
- (२) शिक्षण आणि व्यवसायाचा अधिकार
- (३) शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा
- (४) राष्ट्रीय एकात्मता, मूल्य शिक्षण आणि चारित्र्यनिर्मिती
- (५) मनुष्यबळ नियोजन
- (६) ग्रामीण शिक्षण

## ९ब.७ राममूर्ती समितीने सुचविलेल्या शिफारशी

१. भारतीय संविधानाच्या ४५ व्या कलमानुसार वयाच्या चौदाव्या वर्षांपर्यंतचे मोफत आणि सक्तीचे शिक्षण असावे.

२. भारतीय संविधानामध्ये जे मूलभूत अधिकार नोंदविलेले आहेत. त्यात शिक्षणाचाही समावेश करावा.

३. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील गळती रोखण्यासाठी निश्चित धोरण आखावे.

४. शाळा आणि ग्रामीण शिक्षण समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबाबत पूर्णतः जबाबदार समजावे.

५. प्रादेशिक भाषांना प्राधान्य द्यावे.

६. शिक्षणाचे व्यावसायिकीकरण करावे.

७. शिक्षणातील प्रादेशिक असमतोल दूर करावा.

८. शिक्षणामध्ये मूल्य शिक्षणाचा अंतर्भाव करावा.

९. नवोदय विद्यालय योजनेचे पुनर्मूल्यांकन करावे.

१०. विद्यापीठ अनुदान आयोगाची पुनर्रचना करावी.

११. त्रिभाषासूत्र यशस्वी ठरल्याने त्यात कोणताही बदल करु नये.

१२. शिक्षणात आकाशवाणी, ध्वनीफिती आणि दूरदर्शन इत्यादींचा उपयोग करावा.

१३. संगणक शिक्षण सुरु करावे.

१४. गुणांच्या आधारावर शिक्षकांची निवड न करता अभिरुचीला प्राधान्य द्यावे.

१५. शिक्षकांना व्यवस्थापन आणि इतर कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची अधिकाधिक संधी उपलब्ध करुन द्यावी.

१६. स्वयंसेवी संस्थांना कार्य करण्याची संधी देऊन त्यांना सहकार्य करावे.

१७. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण द्यावे.

१८. नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय मूल्यांना शिक्षणात महत्त्वाचे स्थान द्यावे.

**विविध स्तरावर शिक्षणाची पुनर्रचना**

१. बालसंगोपन व शिक्षण

२. प्राथमिक शिक्षण

३. माध्यमिक शिक्षण

४. प्रज्ञावंत मुलांसाठी विद्यालये

५. व्यवसायिकरण

६. उच्च शिक्षण

७. मुक्त विद्यापीठ व दूर अध्ययन

८. ग्रामीण विद्यापीठ

९. पदव्या व नौकऱ्या यांतील संबंध तोडला जाईल

१०. खडू फळा मोहिम

११. नवोदय विद्यालय

१२. शिक्षकाची भूमिका

## ९ब.८ राममूर्ती पुनरावलोकन समितीचे मूल्यांकन

देशातील शिक्षणतज्ज्ञांनीही राममूर्ती समितीच्या अहवालाकडे दुर्लक्ष केले. समितीच्या अहवालामध्ये भारतीय संविधानाच्या ४५ व्या कलमातील तरतूदींवर भर देऊन त्यात सुधारणा सुचविल्या होत्या. शैक्षणिक खर्चासाठी नवीन आर्थिक स्त्रोत सुचविले होते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करावा ही महत्त्व पूर्ण शिफारस समितीने केली होती. परंतु या शिफारशीकडे ही पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. वास्तविक शिक्षणावरील खर्च हा खर्च नसून भविष्यातील ती गुंतवणूक असते. तरी देखील या तत्त्वाचा विचार शासनाने केला नाही. भौतिकवादी संस्कृती बरोबरच नैतिक मूल्य संस्कृतीवर भर दिला होता. या समितीने शिक्षणातून मानवीय गुणांच्या विकासाच्या क्षमतेवर भर दिला होता. शिक्षणापासून वंचित घटकांच्या उत्थानासाठी समितीने बराच प्रयत्न केलेला आढळतो. मागासवर्गीयांना नि:शुल्क शिक्षण मिळावे ही देखील महत्त्वपूर्ण शिफारस केलेली आहे. परंतु अंमलबजावणी करतांना यंत्रेणचा दोष आढळतो.

आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, विज्ञान, संगणक, गणित इत्यादी व्यवहारोपयोगी विषयांचे अभ्यासक्रमातील महत्त्वपूर्ण स्थान समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

राममूर्ती समितीने महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविल्या परंतु या शिफारशींना उजाळा न मिळाल्याने या समितीचा अहवाल बंद कपाटातच पडून राहिला असे म्हटले तरी चालेल.

★★★

प्रकरण १०

# भारतीय शिक्षणाच्या काही समस्या

## अ - गळती आणि स्थगनाची समस्या

(Problem of Wastage and Stagnation)

**घटक संरचना**

१०अ.० उद्दिष्टे

१०अ.१ प्रस्तावना

१०अ.२ गळती म्हणजे काय ?

१०अ.३ गळती व स्थगनाची कारणे

१०अ.४ स्थगनाची कारणे-लक्षात ठेवा

१०अ.५ गळती व स्थगनावरील उपाय

## १०अ.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) गळती व स्थगनाची कारणे स्पष्ट करू शकाल.

२) गळती व स्थगनावरील उपाय सुचवू शकाल.

## १०अ.१ प्रस्तावना

प्राथमिक शिक्षणाचा विचार करता कोणत्याही मुलाला किमान सात वर्षाचे प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिवाय असलेली साक्षरता टिकून राहिली पाहिजे. त्या शिक्षणाचा जीवनात आणि व्यवहारात उपायोग करता आला पाहिजे. शाळेमध्ये दाखल झालेली मुले कायम स्वरूपाची साक्षरता न मिळविताच शाळा सोडून गेले तर सरकारने त्यावर केलेला खर्च श्रम वाया जातात. आज शिक्षणाचा प्रसार अजूनही चालू आहे साक्षरतेसाठी प्रयत्न चालू आहेत. अल्प काळ शिक्षण झालेली मुले शाळा सोडून देऊन त्यांचे निरक्षरता रूपांतर होते आहे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर जेव्हा त्यातील गुणवत्ता किंवा दोष शोधून काढण्यासाठी व दोष दुरूस्त करण्यासाठी अनेक वेळा समिती नेमली गेली आहे. हरटॉग समितीने आपल्या अहवालात गळती आणि स्थगिततेच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले आहे. समितीने असे म्हटले की, या दोन समस्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढत नाही.

प्राथमिक शिक्षणाप्रमाणे माध्यमिक शिक्षणातही गळती स्थगनाची समस्या आहे. प्राथमिक शिक्षणाएवढी ती तीव्र नाही. इयत्ता आठवीत दाखल होणारी मुले शालांत परीक्षा उत्तीर्ण होतात. यावरून माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता मोजली जाते. निम्म्याहुन अधिक मुले शांलात परिक्षा अनुत्तीर्ण होत असल्याने मानवी व आर्थिक शक्तींचा अपव्यय होतो. असाच अपव्यय गळती व स्थगनामुळे होत असतो.

इयत्ता ८वी त दाखल होणारे कितीतरी विद्यार्थी शालांत परीक्षेपूर्वीच शाळा सोडून देतात. यालाच गळती म्हणतात. आठवीत दाखल झालेल्या शंभर मुलांपैकी ५५ टक्के मुले अकरावीत गेली. ४५ ते ४९ टक्के विद्यार्थी दहावी पास होण्यापूर्वीच शाळा सोडतात तसेच एका वर्गात एकाहून अधिक वर्ष राहिल्यास त्यास स्थगन म्हणतात. स्थगनाचा परिणाम गळती होण्यात प्रथम होत असतो. मुलींच्या बाबतीत व ग्रामीण भागात गळतीचे प्रमाण अधिक आहे.

## १०अ.२ गळती म्हणजे काय?

प्राथमिक शिक्षणक्षेत्रातील विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यानंतर कायम स्वरूपाची साक्षरता मिळण्यापूर्वीच अल्पावधीतच शाळा सोडून जातात त्यास गळती असे म्हणतात. महाराष्ट्रात इयत्ता १लीतील ५१ टक्के मुले चौथीपर्यंत जाऊ शकतात बाकी ४९ टक्के मुले मधेच शाळा सोडून जातात.अर्थात आज हे प्रमाण बदलले आहे.

**स्थगन:**

स्थगन म्हणजे विद्यार्थ्यास एकाच इयत्तेत एका वर्षापेक्षा अधिक काळ काढावा लागणे त्यामुळे त्याच्या शिक्षणाची गती अवरूद्ध होते व तो पूर्णपणे साक्षर होवू शकत नाही.

## १०अ.३ गळती व स्थगनाची कारणे

**गळती व स्थगनाची कारणे:**

**१. असमान पातळीचे वर्ग:**

प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील जो प्रचंड विस्तार गेल्या ५० वर्षात झाला आहे त्याचा परिणाम म्हणजे आजवर ज्या कुटूंबांना गेल्या कित्येक पिढ्यात शिक्षणाचा संस्कार झालेला नाही अशा हजारो कुटुंबातील मुले आज प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकत आहेत या परिस्थितीमुळे सामान्य ज्ञान,भाषिक विकास व संस्कार या दृष्टीने असमान पातळीवर असणारी मुले एका च वर्गात शिकत असतात. या मुलांना शिकवयाचा अभ्यासक्रमही एकच असतो. आजच्या वाढत्या ज्ञानाच्या कक्षा लक्षात घेवून तयार केलेला अभ्यासक्रम नियमित वेळात असमान पातळीवरील परंतु एकाच वर्गातील मुलांना कसे शिकवायचे हा शिक्षकांपुढे प्रश्न असतो. त्याचाही परिणाम गळतीत होतो.

**२. विषयाचा पाया कच्चा:**

प्राथमिक शाळेमध्ये दाखल झालेल्या मुलांना कुठलाही शैक्षणिक संस्कार घरी किंवा बालवाडीत झालेला नसला तरी अशांना प्राथमिक शाळेत प्रवेश दिला जातो. काही मुले बालवाडीतून शिक्षण घेऊन आलेली असतात. त्यांना शैक्षणिक पार्श्वभूमीही असते.वरील दोन्ही मुलांमध्ये विषयाच्या दृष्टीने माहितीची समज असण्यात फरक असतो. त्याचप्रमाणे माध्यमिक स्तरावर असलेली कित्येक मुले प्राथमिक शाळातून पहिली ते सातवीचे वर्ग पूर्ण करून आठवीमध्ये प्रवेश घेतात. जिल्हा परिषदात व नगरपालिकांच्या शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित, भाषा हे विषय कच्चे राहिलेले असतात त्यामुळे नापासांचे प्रमाण वाढते हे गळतीचे व स्थगनाचे कारण ठरते.

**३. कौटूंबिक व आर्थिक परिस्थिती:**

बऱ्याच मुलांची कौटूंबिक व आर्थिक परिस्थिती समाधानकारक नसते त्यांचे आई-वडील मोलमजुरी

करणारे असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक ती वह्या पुस्तके, गणवेश, सुविधा पालक पुरवू शकत नाही. कित्येक वेळा विद्यार्थ्यांना कुटूंबासाठी कामे करावी लागतात. अशी मुले नंतर मध्येच शाळा सोडून देतात. आई वडील शिकलेले नसल्याने अशा मुलांना घरी मार्गदर्शन मिळत नाही त्याचा परिणाम स्थगनात होतो.

**४.मोठ्या संख्येचे वर्ग:**

शिक्षणाच्या प्रसारामुळे आज शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या, खूप वाढली आहे. एका वर्ग खोलीमध्ये ७० ते ८० विद्यार्थी असतात. शिक्षकांना वैयक्तिक लक्ष देता येत नाही. वारंवार नापास झाल्यास विद्यार्थी शाळा सोडतो किंवा एकाच वर्गात अधिक वर्ष राहतो. यामुळे गळती आणि स्थगन होते.

**५. भौतिक सुविधांचा अभाव:**

कित्येक शाळांना आजही पुरेशी इमारत नाही. क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे इत्यादी सूविधा नसतात.अशा शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर वाईट परिणाम होतो. एकंदरीत शिक्षणाबद्दल नावड निर्माण होऊन शाळा सोडली जाते.

**६. प्रशिक्षित शिक्षक वर्ग:**

आज प्रशिक्षित शिक्षकांची संख्या भरपूर आहे. पण त्यांनी ज्या ठिकाणी प्रशिक्षण घेतले आहे त्यामध्ये त्यांची शिक्षक म्हणून अजिबात तयारी झालेली नाही.शाळेमध्ये शिकविताना त्यांच्या पदवीचा व अध्यापनाच्या विषयाचा विचार न करता त्यांना अध्यापन विषय दिले जातात. याचा परिणाम विद्यार्थ्यांमध्ये विषयाची नावड संक्रमित होते व विद्यार्थी शाळा सोडतात किंवा नापास होतात.

**७. मुलींची घरकामे:**

मुलांपेक्षा मुलींचे गळतीचे प्रमाण मोठे आहे कारण मुलीला घरातील अनेक कामे करावी लागतात. ग्रामीण भागात तर घरातील आणि शेतावरील कामे करावी लागतात. ग्रामीण भागातील पालकांना मुलींच्या शिक्षणाविषयी आस्था नसते.त्यामुळे मुलींची शाळा मध्येच बंद केली जाते. त्यामुळे मुलीची गळती अधिक होते.

**८.सामाजिक परिसर:**

शहरातून झोपडपट्टीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्यांच्या परिसराचा परिणाम होत असतो शाळेविषयी, शिक्षणाविषयीची आस्था, मुलांना राहत नाही ते शाळा सोडून जातात. कारण अभ्यासासाठी योग्या जागा, योग्य वातावरण नसते त्यामुळे शिक्षणाबद्दल नावड उत्पन्न होते व शाळा सोडली जाते.

**९. शाळा आणि घर यातील अंतर:**

ग्रामीण भागातील परिसरात शाळा असल्यातरी त्या शाळा घरापासून चालत जाण्याच्या अंतरावर नसतात वाहनांची सोय नसते. पायी चालत जाणे कंटाळवाणे होते त्यामुळे गळती होते. पालकांना मुलींनी शाळेला चालत जाणे अयोग्य वाटते व शिक्षण तेथे थांबते.

**१०. भटक्या-विमुक्त जमाती:**

या जमातीतील कुटुंबे एका जागी स्थिर राहत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची अन्य सोय न झाल्याने मुलांचे शिक्षण थांबते.

**गळतीचे कारणे-लक्षात ठेवा:**

१. पालकांना शिक्षणाचे महत्व न समजल्याने.

२. गरीबीमुळे व दारिद्र्यामुळे.

३. शालेय वातावरण व शिक्षकांचे अध्यापन आकर्षक नसल्याने.

४. परंपरागत रूढी व गैरसमज यामुळे.

५. अभ्यासक्रम लवचिक नसल्याने.

६. ग्रामीण परिस्थितीशी शाळेची वेळ जुळत नसल्याने.

## १०अ.४ स्थगनाची कारणे-लक्षात ठेवा

१.शाळेत मुलांची अनियमित उपस्थिती.

२.सदोष व अकार्यक्षम अध्यापन.

३.शारिरिकदृष्ट्या व्यंग किंवा आजार.

४.पालकाच्या बदलीमुळे परगावी जावे लागणे.

५.वर्गातील संख्या भरमसाठ.

६.सदोष परिक्षा पद्धती.

७.शाळेत उशीरा दाखल करण्याने.

६.ग्रामीण परिस्थितीशी शाळेची वेळ जुळत नसल्याने.

## १०अ.५ गळती व स्थगनावरील उपाय

१. मोठ्या संख्येच्या वर्गात शिक्षकांना विविध अध्यापन पद्धतीचा वापर करावयास सांगावा गुणवत्तेच्या दृष्टीने मागे पडलेल्या विद्यार्थ्याकडे अधिक लक्ष द्यावे.

२. आर्थिकदृष्ट्या गरिब मुलांना प्राथमिक व माध्यमिक स्तरावर शिक्षणासाठी वह्या, पुस्तके, शिष्यवृत्त्या यांना आर्थिक सहाय्य द्यावे त्यासाठी आर्थिक निकष लावावा. शाळेमध्ये कार्यानुभव विषय घ्यावा त्यातून एखादा व्यवसाय शिकवावा.

३. शाळा भौतिक साधनांनी सुसज्ज करावी. त्यासाठी परिसरातील जनतेकडून निधी, गोळा करून सहाय्य घ्यावे. अनुदान सुत्राचा वापर करावा.

४. प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करावी पदवी स्तरावर असलेले विषयच अध्यापनासाठी द्यावे.

५. मुलींच्या शिक्षणासंबंधात पालकांचे प्रबोधन केले पाहिजे. मुलींना अधिक सुविधा दिल्या पाहिजेत.

६. झोपडपट्टी भागातील शाळांनी विद्यार्थ्यांना आकर्षण वाटेल असे वातावरण निर्माण केले पाहिजे. क्रीडांगणाचा वापर करून रात्री अभ्यासाची सोय करून दिली पाहिजे.७.शाळेला जाण्यासाठी ग्रामीण भागात वाहनांची व्यवस्था केली पाहिजे. मुलींसाठी वाहनाची व्यवस्था सवलतीत उपलब्ध करून दिली पाहिजे.

८. आदिवासी व भटक्या जमातीसाठी आश्रमशाळांची संख्या वाढविली पाहिजे.

९. विद्यार्थ्यांना स्वयअध्ययनाची सवय लावली पाहिजे. त्यांना स्वाध्याय दिले पाहिजे. संदर्भ पुस्तके व त्याचा उपयोग याचे मार्गदर्शन केले पाहिजे.

१०. शाळेला वसतीगृहाची सोय केली पाहिजे.

★★★

# १०ब - परीक्षा सुधार
## (Clearing House)

**घटक संरचना**

१०ब.० उद्दिष्टे

१०ब.१ प्रस्तावना

१०ब.२ प्रचलित परिक्षांचे परिणाम

१०ब.३ परीक्षा पद्धतीतील समस्या

१०ब.४ समस्या कमी होण्यासाठी उपाय

## १०ब.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) प्रचलीत परिक्षांचे परिणाम व त्यातील समस्या सांगू शकाल.

२) परिक्षेतील समस्या दूर करण्यासाठी उपाय सुचवू शकाल.

## १०ब.१ प्रस्तावना

परीक्षा घेण्याची कल्पना आपल्या देशात पुर्वापार रूढ आहे. शलाका परिक्षा, द्वारपाल परिक्षा, यासारख्या शब्दप्रयोगावरून सहज लक्षात येते. विद्वानांशी वादविवाद करून प्रशस्तीपत्रके मिळविण्याची कल्पना आपल्या देशात रूढ होती असे नाही. ज्या पश्चिमात्य देशाकडून आपण प्रचलित अध्यापन पद्धती व परीक्षा घेतली त्या इंग्लंडमध्येही ही प्रथा फार पूर्वीपासून रूढ होती इतकेच नव्हे तर इंग्लंडमधील मध्ययुगीन विद्यापीठाचे ते एक वैशिष्टे होते याच प्रथेचे रूपांतर पुढे (Viva- Voce) मध्ये मौखिक अगर तोंडी परक्षित झाले. पण वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर सार्वजनिक स्वरूपाच्या लेखी परीक्षा अस्तित्वात आल्या. परीक्षा करणे म्हणजे पारखून घेणे. परीक्षेने ज्ञान पारखून घेतले जाते. ती पारख एखाद्या तज्ज्ञाकरवी केली जाते (Examination) हा शब्द लॅटिन मधीन (Examen) या शब्दावरून आलेला आहे.(Examen) चा अर्थ तराजूचा काटा असा आहे. परीक्षक उमेदवाराचे ज्ञान काट्याला लावून पाहणे म्हणजेच कमीतकमी अपेक्षित गुणांशी जेव्हा काटा समपातळी दाखवतो तेव्हा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे जाहिर केले जाते पण ही प्रमाणे किंवा काटे विश्वसनीय, वस्तुनिष्ठ नसतील तर ?

## १०ब.२ प्रचलित परिक्षांचे परिणाम

प्रचलित परीक्षांमधून चाचणी घेतली जाते. ती कशाची तर केवळ संपादित ज्ञानाची त्यामुळे विषयाचे ज्ञान देणे हेच अध्यापनाचे प्रमुख उद्दीष्ट होते व केव्हा तरी एखादे दिवस ते कितपत लक्षात आहे हे पाहणे परीक्षेचे एकमेव उद्दिष्ट ठरते म्हणजेच यातून परीक्षा होते ती केवळ स्मरणशक्तीची. ज्ञान ही शक्ती आहे यात दुमत नाही. पण केवळ अनेक प्रकारची माहिती समजून न देता डोक्यात कोंबणे व ती पांठातराणे स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न करणे. या प्रकारच्या अध्यापना-अध्ययनाबद्दलच्या ज्या कल्पना यातून रूढ झाल्या त्या मात्र ताज्य आहे. समजूत ज्ञान ग्रहण होणे, संपादित ज्ञान कणाचे, परस्परं संबंध, लक्षात घेऊन अभ्यासलेल्या विषयाचे साकल्याने ज्ञान प्राप्त करून घेणे व त्याचा योग्य तो वापर करता येणे. या दृष्टीने ज्ञान प्राप्त करून दिले जात असेल व अध्ययन होत असेल तरच ज्ञानप्राप्ती महत्वाची ठरेल. उद. पाढे पाठ म्हणता येतात. पण दिलेला हिशोब बरोबर की चुक समजत नाही. पौंड, टन इत्यादी वजनाची कोष्टके पाठ असतात पण पारड्यात घातलेले कोणते हे ओळखता येत नाही. कशासाठी कुणाकडे अर्ज करावेत हे समजत नाहीत.रेल्वे मार्गाची मार्गदर्शकावरून माहिती काढता येत नाही. अशाप्रकारचे ज्ञान हे कुचकामी होय. आजपर्यत दुदैवाने शाब्दिक पांडित्यावरच भर दिला गेला आहे.

शालेय जगतामध्ये प्रचलित परिक्षा पद्धतीमुळे भीतीचे आणि काळजीचे वातावरण पसरलेले दिसते. शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे प्रथम तपासली पाहिजेत. या उद्दिष्टातून काय साधायचे याचे चित्र शिक्षकांपुढे स्पष्ट हवे. शिक्षणाचे सर्वमान्य ध्येय विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकास साधणे हे होय. या ध्येयाला पोषक अशी अनेक उद्दिष्टे मांडली जातात. व्यक्तीचा शारिरिक, बौद्धिक, भावनिक विकास साधणे यातून चारित्र्यसंपन्न, जबाबदार, कर्तबगार, लोकशाहीला पोषक असा नागरिक घडविणे. त्याच्यामध्ये जीवनाकडे व जगाकडे पाहण्याचा निकोप व आशावादी दृष्टीकोन निर्माण करून ऐक्याची भावना , साकार करणे, आत्मीक विकास साधणे अशी उद्दिष्टे ठेवून अध्यापन करण्याचा प्रयत्न होतो.. शिक्षणाचा हा व्यापक, विशाल उदात्त दृष्टिकोन लक्षात घेऊन प्रचलीत परीक्षा पद्धतीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास प्रचलित परिक्षेतून यातील किती उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी परीक्षा होते व होत नाही हे सहज लक्षात येते. इतकेच नव्हे तर ज्ञानाचे उपयोजन करण्याची पात्रता विद्यार्थ्यात कितपत आहे हे आजमावले जात नाही. त्याच्या मनोवृत्तीला, विचार क्षमतेतील व इतर वैयक्तिक फरक जाणण्यास परीक्षा पद्धती कुचकामी ठरते आहे. उदा. नागरिकशास्त्रातील लेख वा तोंडी चाचणी वरून उत्कृष्ट, वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या साहाय्याने नागरिकांच्या कर्तव्याचे विद्यार्थ्यास ज्ञान झाले आहे की नाही ते त्याच्या स्मरणात आहे की नाही हे कळेल. ती कर्तव्ये तच्या कृतीत कितपत उतरली आहे व त्याच्या वृत्तीत कितपत फरक पडला आहे याची कल्पना प्रचलित परीक्षेमधून येणार नाही यावरून प्रचलित परिक्षा ही मूल्यमापनाचे एकांगी साधन आहे ते साधनसर्वस्व नव्हे.

## १०ब.३ परीक्षा पद्धतीतील समस्या

शाळा, महाविद्यालयांमधून परीक्षा घेतल्या जातात. शाळातील परिक्षा, शाळेतील शिक्षकच घेत असल्याने सर्व शिक्षक जबाबदारीने परीक्षांची कामे करतात कारण परीक्षा घेणे हा त्यांच्या दैनदिंन कार्याचाच एक भाग असतो. पण विद्यापीठीय स्तरावर जेव्हा मोठ्या विद्यार्थी संख्येसाठी परीक्षांचे आयोजन केले जाते तेव्हा त्यात अनेक समस्या निर्माण होता. लेखी परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागतात. हे काम गोपनीय असते. अनेक शाळा महाविद्यालयातून, विद्यापीठातून प्रश्नपेढ्या तयार करून ठेवलेल्या असतात. पण प्रश्न तयार करतांना अनेकांनी तयार केलेले हे प्रश्न सर्वच निकषांनुसार केलेले असतात असे नाही.त्यामुळे त्यातून अनेक समस्या निर्माण होतात.पाठ्यक्रमातील घटक, उपघटक,

उद्दिष्टे यांना असलेला भारांश लक्षात घेऊन प्रश्न तयार करावे लागतात पण तसे केले जात नाही. विद्यापीठात तर झालेल्या दोन चार वर्षातील प्रश्नपत्रिका समोर ठेवून नवीन प्रश्नपत्रिका काढल्या जातात. त्यामुळे विद्यार्थी देखील सहजपणे अंदाज बांधून चांगले गुण मिळवू शकतात. प्रत्येक प्रश्नाची काठीण्य पातळी पाहिली जावी पण तसेही केले जात नाही. हे सर्वकाम अत्यंत गोपनीय व्हावे, पण तसे घडत नाही. कित्येक वेळा पेपर फुटीच्या बातम्या येत राहतात. यातून अनेक निर्माण होतात.

## १०ब.४ समस्या कमी होण्यासाठी उपाय

प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी त्या त्या विषयाचे अध्यापन करणारे तज्ज्ञ नेमले जावेत. प्रश्नपत्रिका काढताना प्रश्नांची काठीण्य पातळी, भारांश या निकषांचा वापर प्रत्येकाला सक्तीचा करावा. तीनही प्रकारचे प्रश्न असावे, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, निबंधवजा इत्यादी. प्रश्नपत्रिका तयार करताना नेमक्या प्रश्नाच्या उत्तरासाठी किती वेळ लागेल याचा निश्चित अंदाज प्रश्नपत्रिका काढणाऱ्या तज्ज्ञाला असावा.

**परीक्षा केद्रांची निश्चिती:**

परीक्षा केद्र ठरविताना परीक्षकांची संख्या आणि केंन्द्रामध्ये उपलब्ध जागा, बैठक व्यवस्था प्रकाश व वायुविजन व्यवस्था या सगळ्या गोष्टीचा विचार व्हावा. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था स्वच्छतागृह या ही गोष्टी योग्य प्रकारे आहे की नाही हे ही पहावे. पर्यवेक्षक, परीक्षा नियंत्रक, सेवक यांच्या कामाचे नियोजन केलेले असावे.

परीक्षामधून होणारे गैरप्रकार वाढत चालले आहेत. विविध परीक्षा केद्रांवर या परिक्षांचे संचालन करणे दिवसेदिवस जिकिरीचे बनत चालले आहे. शाळा किंवा महाविद्यालयात परीक्षा केद्रे चालविण्याची जबाबदारी मुख्याध्यापक किंवा प्राचार्यावर असते आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने त्यांनी ती सुव्यवस्थितपणे पार पाडावी अशी अपेक्षा असते. परीक्षार्थीच्या बैठकीची व्यवस्था, उत्तरपत्रिका व इतर स्टेशनरीची ने-आण, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छता इत्यादी कामे शिक्षकेतर कर्मचारी करीत असतात. आणि परीक्षा कक्षातून पर्यवेक्षण, प्रश्नपत्रिकांचे वाटप, उत्तरपत्रिका परीक्षार्थीना देणे, गोळा करणे, त्यावर स्वाक्षऱ्या करणे, परीक्षार्थीनी योग्य प्रकारे परीक्षा द्यावी म्हणून त्यांच्यावर लक्ष ठेवून देखरेख ठेवणे इ. कामे शिक्षक किंवा प्राध्यापकांनी पार पाडावयाची असतात. अलीकडच्या काळात शिक्षक व प्राध्यापक मंडळी परीक्षक म्हणून उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यास तयार असले तरी प्रत्यक्ष परीक्षाकाळात पर्यवेक्षणाचे काम स्वीकारण्यास मात्र फारसे उत्सुक नसतात.

**परीक्षेची पूर्वतयारी:**

विद्यार्थ्याची परिक्षेसाठी पूर्वतयारी करून देण्यासाठी कोंचिग क्लासेस गल्लोगल्ली निघत आहेत. गाईडस, अपेक्षित प्रश्नसंच आणि अनुभवी मार्गदर्शकही उपलब्ध आहेत. वर्गात नियमित उपस्थित राहून संपूर्ण अभ्यासक्रम शिकत बसण्याची गरज राहिली नाही सखोल अध्ययन, चिंतन मनन आणि ज्ञानार्जन इ. करीत बसण्यापेक्षा आणि त्यात वेळ आणि शक्ती खर्च करण्यापेक्षा गाईडस अपेक्षित प्रश्नसंच आणि शिकवण्याच्या माध्यमातून परीक्षेसाठी आवश्यक तेवढी तयारी करूनअधिकाधिक गुण मिळविण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करणे जास्त व्यावहारिक व सोयीचे असल्याची विद्यार्थ्यांना खात्री पटली आहे. आपल्या मुलाने किंवा मुलीने परिक्षत अपेक्षित यश मिळवावे यासाठी त्यांना गाईडस, अपेक्षित प्रश्नसंच, कॅसेटस इ. घेऊन देणे , कोंचिग क्लासेसला पाठविणे, एवढेच नव्हे तर परीक्षा केंद्रावर किंवा कार्यालयात जाऊन संबंधितांचे साह्य मिळविणे आणि याना त्याप्रकारे आपल्या मुलांना

जास्त गुण कसे मिळतील याकडे लक्ष देणे, त्यासाठी लागेल तेवढा खर्च पुरविणे हेच आता पालकांचे कर्तव्य बनले आहे.

परिणामी वर्गातून विद्यार्थ्याच्या अनुपस्थितीचे प्रमाण झपाट्याने वाढत चालले असून कोंचीग क्लासेसना गर्दी होत आहे. शिक्षक व प्राध्यापकांनी केवळ आपल्या नोकऱ्या टिकविण्यासाठी वर्ग घ्यायचे, विद्यार्थ्यांची उपलब्धी व लहरी सांभाळून शिकवायचे आणि जलदगतीने अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या नोटस किंवा महत्वाचे प्रश्न पुरवायचे असा शिरस्ता रूढ होत आहे.

**नैमित्तीक उपचार:**

परीक्षेत कॉप्या करणे हा गैरप्रकार असला तरी त्याचा अवलंब करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणे आता एवढे वाढले आहे की कॉप्या जवळ न बाळगणारे विद्यार्थीच आता मोजके निघतील. मूलाने कॉपी केल्याबद्दल आता पालकालाही वैषम्य किंवा फारसे आश्चर्य वाटत नसावे अशा परिस्थितीत वार्षिक परिक्षा घेऊन निकाल लावणे हा केवळ नैमित्तिक उपचार झाला आहे परीक्षा पद्धती पूर्णपणे किडलेली व कुचकामी बनत चालली आहे. ती बदलल्याशिवाय सुधारणा होणे शक्य नाही. परीक्षेतील गांभीर्य, नैतिकता, पावित्र्य वगैरे गोष्टी धूसर झाल्या आहेत. परीक्षार्थी कॉप्या करण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब करीत आहेत. गाईडस व नोटसच्या छायामुद्राकींत करून जवळ बाळगणे, शेजारच्या विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका पाहून लिहिणे, पाणी पिण्याच्या निमित्ताने अथवा लघुशंकेसाठी वर्गाबाहेर जाऊन बाहेरून कॉपीचे साहित्य आणणे, त्यासाठी कर्मचाऱ्याचे पर्यवेक्षकाचे किंवा बाहेरील व्यक्तीचे सहाय्य घेणे कोऱ्या उत्तरपत्रिका नजर चुकवून बाहेर घेऊन जाणे आणि बाहेरून त्या लिहून आणून जोडणे इ.प्रकार सर्रास घडतात.पूर्वी एखाद दुसरा विद्यार्थी अशा मार्गाचा अवलंब करित असे.आता बहुसंख्य विद्यार्थी हे मार्ग अवलंबितात. परीक्षा केंद्रावर परीक्षार्थीना पाणी पोचविणारी मुले, कर्मचारी, पोलिस इ. च्या सहाय्याने कॉप्या पुरविण्यासाठी , संबंधित प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होताच बाहेर नेऊन त्यातील प्रश्नांची उत्तरे तयार करून ती लगेच आत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यासाठी सहकारी बाहेर उभे असतात.

**मुलीही आता मागे नाहीत:**

कॉप्या करण्याचे तंत्र आता विद्यार्थ्यांनी विकसित केले आहे. परीक्षेत येणारे प्रश्न आधी समजून घेण्यासाठी विविध मार्ग अनुसरले जातात. संबंधित विषयाच्या मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिका पाहून या वर्षाचा 'गेस'(संभाव्य प्रश्नपत्रिका) देणारे मार्गदर्शक, प्राध्यापक, शिक्षक विद्यार्थीप्रिय असतात. त्याही पुढे जाऊन परीक्षा केद्रावर पर्यवेक्षक म्हणून काम स्वीकारायचे आणि आपल्या काही लाडक्या विद्यार्थ्यांना मोजके महत्वाचे प्रश्न द्यायचे, किंबहुना तेवढ्याच प्रश्नांची उत्तरे सांगायची; इतर प्रश्न गाळून केवळ महत्वाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला द्यायचा असे 'मोलाचे साह्य'काही शिक्षक व प्राध्यापक आर्थिक लाभासाठी किंवा शाळेचा, महाविद्यालयाचा निकाल सुधारावा या हेतूने करीत असतात. काही प्राध्यापकानी प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी फोडल्याचे व त्यांच्याविरूद्ध विद्यापीठाला किंवा उ.मा. शिक्षण मंडळाला कार्यवाही करावी लागाण्याची उदाहरणे आहेत काही वेळा अशा फुटलेल्या प्रश्नपत्रिका वृत्तपत्रांनी संबंधितांनी त्याबद्दल चौकशी करावी म्हणून अंकातून प्रसिद्धही केल्या. विद्यार्थ्यांनी विविध आकाराच्या बारीक हस्ताक्षरातील चिठ्या तयार करून त्यांच्या जुड्या व घड्या घालून, रबर बँडस लावून, खिशात पाकिटात, ओळखपत्राच्या कव्हर्समध्ये शर्टाच्या बाहीतून, पॅटच्या घडीतून,बुटात किंवा सॉक्समध्ये, कमरेजवळ, शरीरावर हातापायावर डकवलेल्या किंवा अडकवलेल्या असतात. असे अनेक कॉपीबहाद्दर सापडतात. मुलीही याबाबत आता धैर्याने पुढे सारसावत असून पर्स,बॅग्ज,ओढणी, हातरूमाल पॅडस आणि विविध रंगांचे कपडे इत्यादी, वापर करून कॉपी करण्याचे 'कौशल्य' आत्मसात करीत आहेत.

मुलांप्रमाणे मुंलीची कॉपी शोधण्यासाठी शारीरिक झडती घेणे पुरूषपर्यवेक्षकांना शक्य नसल्याने काही मुली संधी साधून गैरप्रकारचा अवलंब करू पाहतात. परीक्षेत कॉप्या करणाऱ्या विद्यार्थ्यांची पूर्वी निर्भत्संना केली जायची आणि त्याकडे सर्वजण दुष्कृत्य म्हणून पाहात असत. सध्या असे प्रकार नित्य घडत असूनही त्याबद्दल गांभीर्याने कोणी दखल घेत नाही. कॉप्या घडू नयेत म्हणून त्याविरूद्ध उभे राहण्याची तयारी कुणाची तयारी असल्याचे दिसत नाही. उलट जर अनेकजण कॉप्या करतात तर काही विद्यार्थ्यांनाच बाहेर का हकलले जाते काही विद्यार्थ्यांची प्रकरणे बोर्डाकडे किंवा विद्यापीठाकडे का पाठविली जातात. असे प्रश्न जातात. असे प्रश्न उपस्थित करून कॉप्यांना पाठिंबा दिला जातो. विद्यार्थीही सामुहिकरित्या अश गैरप्रकारात सामील होऊन त्याविरूद्ध काही केलयास 'आम्ही पाहून घेऊ' अशा धमक्या देतात. एवढेच नव्हे तर कॉप्या पकडणाऱ्यास केद्राबाहेर अडविणे,धमकावणे, घेराव घालणे इ. गोष्टी काही वेळा घडल्या असून परीक्षा केद्रावर दगडफेक किंवा परीक्षेवर सामूहिक भहिष्कार घालण्यापर्यंत आता विद्यार्थ्यांची मजल गेल्याचेही वृत्तपत्रिय बातम्यावरून दिसते.

अशा स्फोटक व दहशतीच्या वातावरणात आम्ही पर्यवेक्षणाचे काम कसे करावे असा प्रश्न शिक्षक प्राध्यापक उपस्थित करीत आहेत किंबहुना हे परीक्षेचे काम जादा परिश्रमिक घेऊन करावयाचे असल्याने ते पूर्णत: 'ऐच्छिक' स्वरूपाचे आहे, बंधनकारक केले जाऊ शकत नाही, अशी भूमिका शिक्षकांकडून घेतली जाते.

विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने सर्व प्राध्यापकांना पर्यवेक्षणाचे आणि परीक्षेशी संबंधित कामे समप्रमाणात वाटून द्यावीत से परिपत्रक काढले आहे शालांत मंडळाच्या व विद्यापीठाच्या परीक्षांसाठी प्राचार्यांनीच बोर्डाच्या व विद्यापीठांच्या परीक्षा पार पडेपर्यंतच्या कालावधीत 'केद्रंप्रमुख' म्हणून काम केले तर जवळपास दोन महिन्याचा काळ त्यांना त्यासाठी 'पूर्ण वेळ' द्यावा लागतो.प्राचार्यांना वर्षाअखेरीच करावयाची कामे, पुढील कामे, पुढील शैक्षणिक वर्षाची तयारी इ. कामेही याच कालावधीत करावयाची असतातत. त्यामुळे प्राचार्यांची मात्र चांगलीच दमछाक होते.सहकारी किंवा प्राध्यापक पर्यवेक्षक म्हणून काम स्वीकारण्यास तयार नसतील तर रोंजदारीवर बाहेरील माणसे नेमून परीक्षा पार पाडणे म्हणजे भाडोत्री सैनिकांच्या सहाय्याने किल्ले लढविल्यासारखे आहे . विद्यार्थी केवळ कॉप्या करून परिक्षा देत आहेत असे नाही. परीक्षकांची नावे व पत्ते मिळवीणे, त्यांच्याशी संपर्क साधून गुण वाढवून घेणे, पूनर्मूल्याकनांसाठी अर्ज देऊन व ते काम ज्या परीक्षकाकडून केले जाते त्यांना गाठून त्यांच्याकडून निकाल बदलू घेणे इ. साठी काही विद्यार्थी व त्यांचे पालक किंवा संबंधिक हितचिंतक नातेवाईक प्रयत्न करीत असतात.प्रॅक्टीकल्स परीक्षा -केद्रांवर चालू असताना परीक्षकांना भेटण्यासाठी काही पालकांची महाविद्यालयाच्या परिसरात उपस्थिती दिसून येते. परीक्षा विभागात किंवा महाविद्यालयात जे कर्मचारी परीक्षेशी संबंधित कामे करतात. त्यांचेही या कामी साह्य घेण्याचे प्रयत्न होतात. आता तर कर्मचाऱ्यांचे, पर्यवेक्षकांचे, परीक्षकांचे आणि मध्यस्थांचे या कामासाठी मोबदला घेण्याचे दर सांगितले जात असून पैशाच्या जोरावर ही कामे पार पाडली जातात. अशा प्रकारे एक पर्यायी अनधिकृत काळी यंत्रणा' परीक्षेत यश मिळविण्यासाठी उभी केली जात आहे. हे चित्र पाहून संबंध शिक्षण पद्धती व शिक्षणव्यवस्थेबद्दलच काळजी निर्माण होते.

**जबाबदारी ओळखावी:**

विद्यार्थ्यांनी, त्यांच्या पालकांनी, शिक्षकांनी व प्राध्यापकांनी, शिक्षणसंस्था, विद्यापीठे व शिक्षण मंडळे या सर्वांनी हे गैरप्रकार थांबविण्यासाठी कटिबद्ध होऊन कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे. कारण अशा गैरमार्गाने परीक्षेत यश मिळवून पुढे विविध स्तरांवर प्रस्थापित होणाऱ्या भ्रष्ट नागरिंकाकडून मूल्यहीन वर्तनाशिवाय दूसरी कोणती अपेक्षा ठेवता येईल! शिक्षक प्राध्यापकांनी परीक्षा

घेण्याची आपलीच मुख्य जबाबदारी न टाळता, ती चोखपणे पार पाडली पाहिजे. विद्यार्थ्यांनी गैरमार्गाचा अवलंब टाळून स्वत:ची क्षमता सिद्ध केली पाहिजे व सखोल अध्ययन करून सुयश मिळविले पाहिजे. विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थ्यांना कॉप्या करण्यापासून किंवा गैरमार्गाचा अवलंब करण्यापासून परावृत्त केले पाहिजे. पालकांनी केवळ आपल्या पाल्यास परिक्षेत यश मिळवून देण्याकडे लक्ष देण्यापेक्षा त्याचे चारित्र्य व व्यक्तिमत्व जोपासले पाहिजे. उ.मा. शिक्षण मंडळ, विद्यापीठ आणि शिक्षणसंस्था यांनी परस्पर सहकार्याने शिस्तीच्या वातावरणात परीक्षा सुव्यवस्थित पार पाडाव्यात आणि कूठल्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब होऊच नये. याकडे पूर्ण लक्ष देणे गरजेचे आहे.

वार्षिक परिक्षा पद्धती व मूल्यांकन पद्धती यात सुधारणा करण्यासाठी विचार व संशोधन होण्याची गरज आहे. बँकिग सर्व्हिस रिक्रूमॅट बोर्डाच्या परीक्षा किंवा 'स्पर्धा परिक्षा' यामध्ये जशा सुधारणा वारंवार करून 'वस्तूनिष्ठ मूल्यमापन' व्हावे यासाठी प्रयत्न केले जातात. त्याप्रमाणे विद्यापीठाच्या किंवा बोर्डाच्या परीक्षांमध्ये मूल्यांकन पद्धतीमध्ये सुधारणा करण्यास भरपूर वाव आहे. पण बदल करण्याची फारशी इच्छा असल्याचे, त्या दिशेने पुरेसे प्रयत्न झाल्याचे दिसत आढळत नाही. परीक्षा सल्लागार व सुधार समित्या किंवा मंडळाद्वारे असे प्रयत्न करता येतील. कृषी विद्यापीठे किंवा मुक्त विद्यापीठातून विद्यार्थ्याच्या वर्षभरातील प्रगतीचा वेध घेऊन, त्याचे सतत मूल्यांकन करून 'श्रेयांक पद्धती' द्वारे निकाल लावले जातात. तशाच रितीने विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती, वर्गपरिक्षा, सत्रपरीक्षा, गृहपाठ, वर्ग चाचण्या, मौखिक परिक्षा, अभ्यासक्रमावर आधारित प्रात्याखिके प्रकल्प इत्यादीसाठी'श्रेयांक' निश्चित करून किमान किती 'श्रेयांक' विद्यार्थ्याने मिळवावेत म्हणजे तो उत्तीर्ण घोषीत केला जाईल. आणि श्रेणी ठरविण्यासाठी किती 'श्रेयांक' मिळविले पाहिजेत हे निश्चित करून त्यानुसार मुल्यांकन करता येईल. विद्यार्थ्यानींच स्वतःचे भवितव्य आणि भावी काल उज्वल ठरावा यासाठी 'श्रेयांक' पद्धतीने मूल्यांकन करण्याची मागणी केली पाहिजे ज्ञान आणि क्षमता प्राप्त न झाली तरी, पदवी मात्र पदरात पडली पाहिजे हा मोह' विद्यार्थ्यानी सोडावा कारण तो त्यांनाच शेवटी घातक ठरणारा आणि एकंदर समाजाच्या व देशाच्या हिताला बाधक ठरेल असा आहे. आर्थिक दिवाळखोरीबरोबरच बौद्धिक दिवाळखोरी जर आपण जोपासत राहिले तर भावी काळात सर्वत्र अंधारच पसरलेला दिसेल. आपल्या सर्वाच्या कल्याणासाठी याबद्दल विचार व चिंतन करून सुयोग्य पर्याय शोधला नाही तर ही काळी यंत्रणा सर्वांचा बळी घेईल.

★★★

# १०क - अल्पसंख्याकाचे शिक्षण
(Education for Marginalized Group)

**घटक संरचना**

१०क.० उद्दिष्टे

१०क.१ प्रस्तावना

१०क.२ अल्पसंख्याक

१०क.३ अल्पसंख्याकाच्या शैक्षणिक समस्या

१०क.४ अल्पसंख्याकांच्या शिक्षणासाठी काही उपाय

## १०क.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक समस्या सांगू शकाल.

२) अल्पसंख्याकांच्या शिक्षणासाठी उपाय सुचवू शकाल.

## १०क.१ प्रस्तावना

शिक्षणाने भारतीय समाजात समानता प्रस्थापित करता येते याची प्रचिती शंभर टक्के आलेली आहे पण ही समाजाची सकंल्पना प्रत्यक्षात आणताना अनेक समस्या व अडचणी येतात. उदा. स्त्रिया, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक यांना शिक्षणाची समानसंधी उपलब्ध करून दिल्यास भारतीय समाजात सर्व बाबतीत समता हे लक्ष्य गाठणे सहज शक्य होईल असा विश्वास वाटतो.

## १०क.२ अल्पसंख्याक

भारतासारख्या खंडप्राय देशात जे लोक (निवासी) संख्येने कमी आहेत. अशा लोकांना अल्पसंख्याकं म्हणून भारतीय राज्यघटनेत संबोधले आहेत. तर जे लोक संख्येच्या दृष्टीने जास्त आहेत. त्यांना बहुसंख्याक म्हणून उल्लेखिले आहे. भारतात अल्पसंख्याक म्हणून अनेक लोक आहेत. भारतात लोकसंख्या धर्माच्या निकषावर मुस्लिम, शीख, ख्रिस्ती, जैन, नवबौद्ध, पारसी ही सर्वधर्मीय लोक भारतीय अल्पसंख्याक म्हणून मान्यता पावलेली आहेत. आज भारतात एकूण लोकसंख्येपैकी सर्वधर्मीय अल्पसंख्याक म्हणून पावलेली आहेत. आज भारतात एकूण लोकसंख्येपैकी सर्वधर्मीय अल्पसंख्याक अठरा टक्के आहेत. मुस्लिम अकरा टक्के, ख्रिस्ती तीन टक्के, शीख दोन टक्के, नवबौद्ध दीड टक्के, जैन अर्धा टक्के अशी लोकसंख्या आहे.

## १०क.३ अल्पसंख्याकाच्या शैक्षणिक समस्या

१. काही अल्पसंख्याक गट हे शिक्षणापासून वंचित आहेत किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत.

२. काही अल्पसंख्याकांना त्याच्या मातृभाषेतून माध्यमिक शालांत परीक्षेपर्यत शिक्षण मिळते पण पुढे उच्च शिक्षण त्याच्या मातृभाषेतून घेण्याची सोय नाही यामुळे उच्च शिक्षणाच्या संदर्भात त्यांची कुंचबणा होते ते उच्च शिक्षणापासून वंचित राहतात व त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. उदा. मूस्लिम धर्मीयांना शालांत परिक्षेपर्यंत उर्दू माध्यमातून शिक्षण घेता येते. पण महाविद्यालयीन शिक्षणाबाबत उर्दू माध्यमाची सोय आढळत नाही. पाठ्यपुस्तके उपलब्ध नाहीत त्यामुळे साहजिकच मुस्लिम विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात.

३. सर्व अल्पसंख्याकांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळण्याची सोय अजूनही पूर्णपणे उपलब्ध नाही.

४. अल्पसंख्याक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षणासाठी शिक्षकांची कमतरता आहे.

५. अल्पसंख्याकांच्या भाषा मध्ये सर्व वर्गाची सर्व विषयाची पुरेशी पाठ्यपुस्तके उपलब्ध नाहीत. जी पुस्तके आहेत ती शैक्षणिक गुणवत्तेच्या संदर्भात कमी दर्जाची आहेत.

६. अल्पसंख्याक समाजातील भाषा शिक्षक प्रशिक्षीत नसतात. त्यामुळे त्यांच्या अध्यापनात अनेक कमतरता दिसतात.

७. अल्पसंख्याक समाज (विविध प्रकारचे) भारतात निश्चित असे एकाच भूभागावर स्थायिक नाहीत त्यामुळे त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यास फार मोठी अडचण येते. फारच कमी असलेल्या शहरात, गावात, त्यांच्यासाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करणे शासनाला किंवा अल्पसंख्याक समाजाला देखील आर्थिकदृष्ट्या अतिशय महागाचे पडते.

८. बहुतेक अल्पसंख्याकांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होताना दिसून येते.

९. अल्पसंख्याक समाजातील ज्या काही सेवाभावी संस्था आहेत त्यादेखील अल्पसंख्याकांच्या शिक्षणाच्या बाबतीत फारशा कार्यरत नाहीत.

१०. भारतीय राज्यघटना कलम २९ ,३०,३५०, यामध्ये अल्पसंख्याकांना शैक्षणिक अधिकार दिलेले आहेत. बहुतेक अल्पसंख्याक गटांना या राज्यघटनेतील शैक्षणिक अधिकाराची माहिती देखील नाही.

११. राष्ट्रीय स्तरावर प्रामुख्याने मुस्लिम व नवबौद्ध समाज हे शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेले आहेत.

१२. मुस्लिम समाज मुलांना व मुलींना शिक्षण देण्याच्या बाबतीत उदासीन दिसून येतात.

१३. नवबौद्ध समाज मागासवर्गीय अल्पसंख्याक गट आहे.

१४. काही अल्पसंख्याक अतिशय दुर्बल व आर्थिदृष्ट्या कमकुवत असल्याने पुरेसे शिक्षण घेऊ शिकत नाही.

१५ अल्पसंख्याक समाजाच्या भाषेमध्ये तंत्र शिक्षणाची पुरेशी सोय नाही त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ते मागे पडले आहे.

१६. पंजाबमध्ये बहुसंख्य शीख स्थायिक असल्यामुळे त्यांच्यासाठी उत्कृष्ठ शिक्षणाची संधी राज्य सरकार व केन्द्रसरकार यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती प्रशंसनीय आहे. मात्र पंजाबच्या व्यतिरिक्त इतर राज्यात विखुरलेल्या शीख समाजाची शैक्षणिक प्रगती निकृष्ठ दर्जाची पाहावयास मिळते.

१७. अल्पसंख्याकांसाठी त्याच्या भाषेतील ग्रंथालये व वाचनालये नाहीत.

## १०क.४ अल्पसंख्याकांच्या शिक्षणासाठी काही उपाय

१. अल्पसंख्याक समाजाला महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांच्या भाषेच्या माध्यमाची प्रत्येक महाविद्यालयात सोय केली पाहिजेत जेणेकरून शिक्षणापासून ते वंचित राहणार नाहीत.

२. संविधानातील शैक्षणिक अधिकाराबाबत अल्पसंख्याकाना शासनाने व सामाजिक कार्यकर्त्यांनी जाणीव करून दिली पाहीजे. जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी त्यांना प्रेरित केले पाहिजे.

३. अल्पसंख्याकांना राष्ट्रीय विकासात्मक कार्यक्रमामध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे.

४. राज्यसरकार व सामाजिक संस्थांनी अल्पसंख्याक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षकांच्या जागा मंजूर करून नियुक्त्या केल्या पाहिजे. यासाठी शासनाने त्वरित अंमलबजावणी केली पाहिजे.

५. अल्पसंख्याक भाषा विषयाच्या शिक्षकांसाठी सरकारने प्रशिक्षणाची सोय केली पाहिजे.

६. अल्पसंख्याकांची दाट वस्ती असलेल्या जिल्ह्याकडे विशेष लक्ष पुरवून तेथील मुलांसाठी शाळांचे ठिकाण राज्यसरकारने निश्चित केले पाहिजे.

७. विशेषत्वे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकाच्या गरजा पुरविण्यासाठी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळांमधून विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

८. शैक्षणिक धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सर्व कार्यक्रमाच्या पूर्णाशांने लाभ या लोकांना मिळाला पाहिजे. अशी व्यवस्था शासनाने करावी.

९. अल्पसंख्याक समाजातील कारागीराचे प्रमाण जास्त असलेल्या भागात हस्तव्यवसायाचे प्रशिक्षा देणाऱ्या संस्थांची स्थापना करून त्यात पंच्याऐंशी टक्के जागा या कारागींराच्या मुलांसाठी राखुन ठेवल्या आहेत.

१०. विशेषत्वाने हस्तव्यवसायाने प्रशिक्षण देणाऱ्या संस्था काढल्या पाहिजेत. यामध्ये स्त्री शिक्षीकाच नेमल्या पाहिजे. अल्पसंख्याकांच्या भाषेतून पुस्तके काढून वाचनालये व ग्रंथालयाची संख्या वाढविली पाहिजे.

११. नवबौद्ध म्हणून असलेल्या अल्पसंख्याकांसाठी केन्द्र सरकारने अधिक सवलती मंजूर केल्या पाहिजेत. इयत्ता १ ते उच्च शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती योजना लागू केली पाहिजे.

१२. नवबौद्ध समाजातील मुलींचे शिक्षणातील प्रमाण अत्यल्प आहे. मुलीचीं साक्षरता वाढविली पाहिजे यासाठी वसतीगृह, दुपारचे जेवण, मधल्या वेळेचे जेवण,कपडे पुरविणे, वह्या पुस्तके पुरविणे या गोष्टी राज्यसरकारने कराव्यात.

भारतातील अल्पसंख्याक समाजामध्ये शासनाने बहुसंख्यांक धार्मिक गटातील कार्यकर्त्यांनी असा विश्वास निर्माण केला पाहिजे की, कोणालाही येथे सापत्न भावाने वागविले जात नाही. याच बरोबर शिक्षणाची समान संधी देण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी, राष्ट्रीय विकासासाठी या गोष्टी उपयुक्त ठरतील.

★★★

# १०ड - समावेशित शिक्षण

(Inclusive Education)

**घटक संरचना**

१०ड.० उद्दिष्टे

१०ड.१ प्रस्तावना

१०ड.२ विशेष गरज असणाऱ्या अपंग मुलांसाठीच्या सेवा

१०ड.३ समावेशित शिक्षणाची उद्दिष्टे

१०ड.४ संकल्पना

१०ड.५ सर्वसमावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये

१०ड.६ सर्वसमावेशित शिक्षणासाठी कृतीकार्यक्रम

## १०क.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) समावेशित शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करू शकाल.

२) समावेशित शिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट करू शकाल.

३) समावेशित शिक्षणासाठीच्या कृती कार्यक्रम सांगू शकाल.

## १०ड.१ प्रस्तावना

व्यक्तीच्या विकासात प्राथमिक शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे हे शिक्षण देशातील सर्व मुलां-मुलींपर्यत पोहोचविण्यासाठी शासनाने अनेक योजना, कार्यक्रम राबविले. परंतु अजूनही दर्गम,डोगरांळ, आदिवासी व झोपडपट्टी क्षेत्रातील मुले, विशेष शैक्षणिक गरज असणारी मुले मुली असे अनेक विशेष घटक वंचित राहत आहेत. या घटकांना सर्वसामान्य मुलांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शिक्षण औपचारिक व अनौपचारिक मार्गाने मिळत असते. शिक्षणाच्या वेगवेगळ्या संधी वेगवेगळ्या मार्गाने, पद्धतीने उपलब्ध करून देणे म्हणजेच समावेशित शिक्षण होय. समावेशित शिक्षण म्हणजे शिक्षण प्रवाहात सर्वाचा समावेश. समावेशित शिक्षणाचा पर्यायी शब्द आहे (Inclusive Education). सर्वांना सहभागी करून घेणारे शिक्षण, नवीन शिक्षण, प्रवाहात समावेशित शिक्षणाची संकल्पना उदयास येत आहे. विशेष शैक्षणिक गरज असणारी मुले (Children with special education need) (CWSEN), अपंग मुले यांचे शिक्षण हा समावेशित शिक्षणाचा अविभाज्य घटक मानला आहे.

संपूर्ण शिक्षण व्यवस्थेद्वारे विशेष शैक्षणिक गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभागी करून घेणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.

विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या मुलांच्या क्षमता-अक्षमता या सर्वांचा साकल्याने विचार करून सर्वसमावेशित शिक्षणात सर्वसामान्य शिक्षणाच्या कक्षा अधिक विकसित केल्या गेल्या आहेत समावेशित शिक्षणाने शिक्षण योजनेला विशेष लवचीकता प्रदान केली आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हा, तालूका गट व केंद्र या स्तरांवर विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या विशेष गरजा पूर्ण करण्याचाप्रयत्न केला जाणार आहे. समावेशित शिक्षण सर्व प्रकारच्या अपंगांना त्यांच्या समवयस्क मित्रांशी यशस्वी सपंर्क साधण्यासाठी संधी देते. प्रत्येक अंपगाला त्याच्या घराजवळ वाडीवस्तीवर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते. यासाठी तालुका स्तरावर विशेष शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत. ते विशेष शिक्षक फीरते असतील ते आपल्या तालुक्यातील प्रत्येक अपंग मुलांपर्यत पोहोचतील. त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेतील व त्या गरजांच्या पूर्ततेसाठी सर्व सामान्य शिक्षकाला, पालकांना व समाजाला मार्गदर्शन करतील.

## १०ड.२ विशेष गरज असणाऱ्या अपंग मुलांसाठीच्या सेवा

### (१) अत्यावश्यक सेवा:

समावेशित शिक्षणात विशेष गरजा अपंग मुलांना तीन प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. त्यात वर्गशिक्षक, पालक, सहाध्यायी व वर्गमित्राच्या सेवांचा समावेश आहे. या सेवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे या मुलांना पुरविल्या जातील. वर्गशिक्षकांना विशेष प्रशिक्षणाद्वारे प्रशिक्षीत शिक्षक विविध प्रकल्प राबवून पालकांना शिक्षणात सहभागी करून घेतील. अपंग मुलांच्या शिक्षणात येणारे पालकांचे वृत्तीविषयक अडथळे कमी करतील. अपंगांच्या सहाध्यायी वर्गमित्रांना योग्य मार्गदर्शन करून अपंग शिक्षणात त्यांचाही सहभाग मिळेल. छोटी बालके समवयस्कांच्याकडे पाहून अनुकरणाने अनेक गोष्टी शिकत असतात. त्यामुळे अपंग मुले त्यांचे समवयस्क सहाध्यायी यांच्यातील आंतरक्रियांनी सहकार्याद्वारे शिक्षण यशस्वी करण्याचा प्रयत्न करतील. समावेशित शिक्षण हे एक गटकार्य आहे या गटात स्वतः अपंग, त्यांचे शिक्षक, पालक, संवगडी ह्या सर्वाची महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे वर्गशिक्षक, पालक व सवंगडी यांच्या सेवा या अत्यावश्यक सेवा ठरविल्या गेल्या आहेत. त्या सेवा प्राप्त करण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम यांचे नियोजन केले जाणार आहे.

### (२) साहाय्यक सेवा:

समावेशित शिक्षणात विशेष शिक्षक प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची सेवा सहाय्यक सेवा म्हणून अपंगांना पुरविली जाते हे शिक्षक विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या गरजा लक्षात घेऊान सहाय्यक साधने पुरवितील तसेच त्यांना मार्गदर्शन करतील. मुल्यमापन करणे, अडचणी सोडविणे, मदत करणे, इत्यादी गोष्टी शिक्षक करतील.

### (३) अंशतः सेवा:

अंशतः सेवा या तात्कालिक स्वरूपाच्या असतील. जिल्हा पुनर्वसन केंद्रे, सेवाभावी समाजसेवी संस्था या सेवा या प्रकारात मोडतील. निदान करणे, दाखला देणे, तपासणी करणे, यासाठी विविध संस्था या मुलांना तत्कालीक सेवा प्रदान करतील. या सेवा दिल्यानंतर ही मुले सर्वसामान्य शाळेत दाखल होतील. समावेशित शिक्षण प्रवाहात समाविष्ट होतील. तीव्र स्वरूपाचे अपंगत्व असेल तर ही मुले विशेष शाळेत दाखल होतील. समावेशित शिक्षणात मुलांचा व्यक्तिवृत्तात घेतला जाईल. त्यांच्या क्षमतांचा अभ्यास करून वैयक्तिक आराखडा बनविला जाईल. व त्यांच्या शिक्षणाचे नियोजन केले

जाईल. अशा प्रकारे पालक, शिक्षक, समवयस्क, समाज विशेष तज्ज्ञ या सर्वाची मदत घेऊन त्यांच्या सहभागाने समावेशित शिक्षण यशस्वी करण्याचा प्रयत्न होईल.

## १०ड.३ समावेशित शिक्षणाची उद्दिष्टे

१. समावेशित शिक्षणाचा अर्थ समजून घेणे.

२. समावेशित शिक्षणात शाळेचे स्वरूप समजून घेणे.

३. विशेष शैक्षणिक गरजा ही संकल्पना समजावून घेणे.

४. दुर्बल, असमर्थ, अपंग यातील फरक समजून घेणे.

५. सध्याच्या शिक्षण पद्धतीतील बदलांची माहिती घेणे.

६. समावेशित शिक्षणाची कार्यवाही समजून घेणे.

७. मानवी हक्कानुसार सुविधा देणे. इत्यादी.

## १०ड.४ संकल्पना

१९९४ मध्ये स्पेनमधील परिषदेमध्ये हि संकल्पना मांडली गेली.(Inclusive Education) Inclusive Education means welcoming all children, without discrimination into regular or ordinary schools it refers to the process of educating all children in there neighbourhood schools, regardless of the nature of there disabilities, students participating in a inclusion programmed follow the same scheduled as their classmates in age appropriate academic classes.

सर्वसमावेशित शिक्षण म्हणजे समाजातील सर्व मुलांसाठी जाणीव पुर्वक शाळेची रचना या शाळेत सर्व प्रकारच्या मुलांच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सामान्य मुलांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे होय. सर्वसमावेशित मुलांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुले व सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न मुले, शालाबाह्य बालके यांचा समावेश होतो.

**तत्त्वे:**

१. प्रत्येक मुलास आपल्या वयाच्या मुलाबरोबर शिकणे व जवळच्या शाळेत शिकण्याचा त्यांना हक्क आहे.

२. दुर्बल अपंग, मागास हे समाजाचे घटक आहेत. मानवी हक्कानुसार सर्वांना सर्व सुविधा देणे ही समाजाची गरज आहे.

## १०ड.५ सर्वसमावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये

१. शाळा सर्वप्रकारच्या मुलांना प्रवेश देते शिक्षकांच्या अंगी शिकविण्याची सर्व कौशल्ये असावी लागतात.

२. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे शिक्षक व संस्था स्वागत करतात.

३. सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याच्या सुविधा शाळेकडे असतात.

४. गरजु मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत.

५. मुलांच्या प्रगतीसाठी पालकाची भूमिका मित्रत्वाची असते.

६. शिक्षक मुलांची प्रगती वैयक्तिक लक्ष देवून करतात.

७. कौशल्य विकसनासाठी शाळा मदत करते.

८. शाळेत शैक्षणिक उपक्रमाबद्दल सामाजिक कार्याची माहिती दिली जाते.

९. सर्वांना उपक्रमात सहभागी करून घेतले जाते.

१०. प्रत्येक मुलाला आपल्या गरजेनुसार जवळच्या शाळेत सहकार्याबरोबर शिकण्याचा हक्क आहे.

**पारंपारिक शाळा व समावेशित शाळा यातील फरक:**

| पारंपारिक शाळा | समावेशित शाळा |
|---|---|
| १.काही विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. | १.सर्व विद्यार्थ्यांचा विचार केला जातो. |
| २.आकृतीबंध ठराविक असतो. | २.लवचिकता असते. |
| ३.सामूहिक स्वरूपाचे अध्यापन असते. | ३.वैयक्तिक अध्यापन घडते. |
| ४.अध्यापनास महत्त्व असते. | ४.अध्ययनास महत्त्व असते. |
| ५.विषयकेंद्रीत शिक्षणपद्धती असतात. | ५.विद्यार्थी केंद्रीत शिक्षणपद्धती असतात. |
| ६.शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असतात. | ६.सोयीसुविधांचा पुरेपूर पुरवठा असतो. |

**सर्वसमावेशित शिक्षणातील अडचणी:**

१. प्रशिक्षीत शिक्षक मिळणे व प्रशिक्षणाची व्यवस्था करणे अवघड बाबत आहे.

२. विकसनशील देशात सर्वसामान्य विद्यार्थीच शालाबाह्य राहतात. या विद्यार्थ्यांनाच प्रवाहात आणण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्याकडे दुर्लक्ष होते.

३. सुविधा, इमारती तंत्रे, उपकरणे, आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नसते.

४. संख्यात्मक वाढ झाल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी व्यवस्थितपणे माहिती असत नाही.

## १०ड.६ सर्वसमावेशित शिक्षणासाठी कृतीकार्यक्रम

१. विशेष गरजा असलेल्या बालकांचे सर्वेक्षण करणे.

२. त्यांना सामान्य शिक्षण प्रवाहात आणणे.

३. वर्गव्यवस्था, उपकरणे, साधने यांची मांडणी करणे.

४. शालेय प्रवेशाचे शिक्षकांना ज्ञान देणे जागृती निर्माण करणे.

५. पालकांना शालेय सुविधांची माहिती करून देणे इत्यादी.

★★★

# प्रकरण ११
# शिक्षणातील प्रवाह आणि वाद
# ११अ - राष्ट्रीय ज्ञान आयोग
# (National Knowledge Commission)

**घटक संरचना**

११अ.० उद्दिष्टे

११अ.१ प्रस्तावना

११अ.२ राष्ट्रीय ज्ञान आयोगाची पाच क्षेत्रे

११अ.२.१ ज्ञानाची सुलभता

११अ.२.२ ज्ञानसिद्धांत

११अ.२.३ ज्ञाननिर्मिती

११अ.२.४ ज्ञानाची उपयोगीता

११अ.२.५ सेवा वितरण

## ११अ.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) राष्ट्रीय ज्ञान आयोगाची सविस्तर चर्चा करू शकाल.

## ११अ.१ प्रस्तावना

डॉ.वामन गोगटे, राष्ट्रीय सहमंत्री, भारतीय शिक्षण मंडळ, सी-२६, सृष्टी कॉम्प्लेक्स, गुरू गणेशनगर जवळ, कोथरूड, पुणे ४११ १०३८.

इ.स.२००४ जूनमध्ये केंद्रात संयुक्त पुरोगामी आघाडीचे शासन सत्तेवर आले. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ.मनमोहन सिंग हे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. या शासनाने पहिल्या वर्षी शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात दोन महत्त्वाचे निर्णय घेतले.

**१.राष्ट्रीय अभ्यासक्रम पुर्नरचना आराखडाः**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने आपल्या कारकिर्दीत जो अभ्यासक्रम आराखडा निर्माण करून एन.सी.इ.आर.टी.च्या माध्यमातून अमंलबजावणीस प्रारंभ केला होता तो आराखडा बाजूला ठेवून डॉ. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमूण एक नविन प्रारूप तयार केले व त्यास अनुसरून शिक्षणक्षेत्रात अंमलबजावणीस प्रारंभ केला. त्याच्या अनुकूल/प्रतिकुल बाजूसंबंधी चर्चाही शिक्षणक्षेत्रात आणि समाजात झाली आहे.

## २. एकूण शिक्षण क्षेत्र अत्यंत गतिमान झाले आहे:

जागतिकीकरणाच्या बदलत्या प्रभावामुळे बदलत्या आर्थिक औद्योगिक प्रगतीमुळे शिक्षणसंबंधीचे धोरण काय असावे याचा समग्र विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली. म्हणून डॉ.मनमोहन सिंग यांच्य सरकारने दि.१३जून २००५ रोजी एक नवीन सल्लागार समिती स्थापन केली. डॉ. मनमोहन सिंग यांनी याबाबत पुढील विचार व्यक्त केले.आता आपण दुसऱ्या महत्त्वपूर्ण टप्प्यात प्रवेश केला आ हे. या टप्प्यात उत्कृष्ट संस्था निर्मीती करायची आहे. ज्याच्यामुळे शिक्षणक्षेत्रात उत्तमता, संशोधन आणि आपल्या क्षमतांची बांधणी या सर्व साधनांच्या सहाय्याने एकविसाव्या शतकाला योग्यप्रकारे सामोरे जाऊ.

या समितीलाच राष्ट्रीय ज्ञान आयोग असे संबोधण्यात येते. या समितीचे अध्यक्ष डॉ.सॅम पित्रोदा असून आणखी पाच तज्ज्ञ या समितीचे सभासद आहेत. ते सभासद पुढीलप्रमाणे (१)ड्रॉ.पी.एम.भार्गव (जीवतंत्र ज्ञान शास्त्रज्ञ)(२) डॉ.अशोक गांगुली (अर्थशास्त्रज्ञ, संचालक रिझर्व बँक ऑफ इंडिया)(३) डॉ. जयंती घोष (अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक ज. नेहरू वीद्यापीठ)(४)डॉ.दिपक नायर (अर्थशास्त्रज्ञ व प्राध्यापक ज. नेहरू विद्यापीठ)(५)श्री . नंदन नीलकेणी (अध्यक्ष, इन्फोसिस), ही समिती पंतप्रधानांची सल्लागार समिती म्हणून कार्य करीत आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सुकाणू गट (नॅशनल स्टिअरिंग ग्रुप)पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला आहे. या गटात शेती, मानवी संसाधन, मनुष्यबळ , विज्ञान व तंत्रज्ञान, व्यापार आणि माहिती तंत्रज्ञान या खात्याचे मंत्री सदस्य आहेत. योजना आयोग हा राष्ट्रीय ज्ञान आयोगासाठी नोडल एजन्सी म्हणून काम पहात आहे. या राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा कलावधी दि. ८ ऑक्टोबर २००५ ते ८ ऑक्टोबर २००८ एवढा आहे.

भारताचे तेजस्वी गतीमान अशा ज्ञानधिष्ठीत समाजात रूपांतर करणे हे व्यापक ध्येय राष्ट्रीय ज्ञान आयोगाने निश्चित केले आहे. आयोगाने ज्ञानाच्या संदर्भात पाच क्षेत्रे महत्त्वपूर्ण मानली आहेत.(१)ज्ञानाची सुलभता (२)ज्ञानसिद्धांत (३)ज्ञाननिर्मित (४)ज्ञानाचे उपयोजन (५) ज्ञान-सेवा वितरण. आयोगाने या पाच क्षेत्राच्या संदर्भात काही विचार व्यक्त केले आहेत ते सांराश रूपाने असे सांगता येतील.

## ११अ.२ राष्ट्रीय ज्ञान आयोगाची पाच क्षेत्रे

### ११अ२.१ ज्ञानाची सुलभता:

याबाबत आयोगाने साक्षरता, ग्रंथालय, भाषा आणि अनुवाद, नेटवर्क (ज्ञान आणि स्वास्थ्य सूचना), पोर्टल्स (भारत जल पोर्टल, भारत पर्यावरण पोर्टल) या उपघटकाबाबत काही विचार व्यक्त केले आहेत.

### (अ) साक्षरता:

इ.स.१९८८ मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशनने (एन.एल.एम.) साक्षरतेसंदर्भात असे म्हटले की, १५ ते ३५ वर्षे या वयोगटातील ७५टक्के लोक इ.स. अखेर कार्यात्मक साक्षरता संपादन करतील आणि हिच स्थिती भविष्यकाळात कायम राहील. इ.स. २००१ च्या जनगणेनुसार ६५.३८टक्के साक्षरता उद्दिष्ट साध्य केले आहे. साक्षरता कार्य अधिक सक्षम, फलदायी करण्यासाठी विविध उपायांची चर्चा आयोगाने केली आहे. उदा. राष्ट्रीय साक्षरता मिशनची संरचना (फ्रेम वर्क) माहिती संपादन तंत्राचा वापर (आय.सी.टी) या विषयाला अनुसरून साहित्य निर्मिती, संसाधन व्यक्तिच्यासाठी विशेष प्रशिक्षण, पंचायत संस्थांची भूमिका इ.

### (ब) ग्रंथालयः

ग्रंथालयासंदर्भात आयोगाने अनेक महत्त्वपूर्ण बाबीकडे लक्ष वेधले आहे. ग्रंथालय हे माहिती आणि ज्ञानाचे केंद्र असून राष्ट्रीय अन आतंरराष्ट्रीय पातळीवरील ज्ञानासाठी प्रवेशवद्वारे आहेत. यासाठी विविध स्तरावरील पुस्तकांची संख्या, पुस्तके पुरविण्याबाबत सेवा सुविधा अन्य संस्था-शासकीय यांचा सहभाग इ. बाबत विस्तृत विचार केला आहे.

### (क) भाषा आणि भाषांतर (अनुवाद):

या दोन महत्वपूर्ण बाबीकडे अयोगाने लक्ष वेधले आहे. ज्ञान संपादन करण्यासाठी भाषा हे अत्यंत महत्वपूर्ण माध्यम आहे.अयोगाने इंग्रजी भाषा याबाबत विशेष मतप्रदर्शन केले आहे. जग जवळ येत असताना विचारांच्या देवाणघेवाणीत अनुवादाचे स्थान वेगळेच आहे ते अधोरेखित करून त्यासंबंधी काही सूचना केल्या आहेत.

### (ड) नेटवर्कः

संगणक युगामध्ये विविध नेटवर्कसचे महत्व नाकारू शकणार नाही. पुरेशी संशोधन सामुग्री जेथे उपलब्ध आहे अशा उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांचे कार्य कार्यपद्धती यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. अशा सर्व संस्थानी विचार, कार्यपद्धती, सांख्यिकी माहिती, आपापली सर्व संसाधने (रिसोर्सेस) या सर्वांचा परस्पर सहकार्याने सहभाग कसा वाढेल याकडेही आयोगाने लक्ष वेधले आहे. इ.स.१९८० सुमारास युरोपमध्ये अशा प्रकारच्या कामास प्रारंभ झाला. त्यांचे लाभ त्यांना मिळत गेले. याचा उल्लेख करून भारतातही अशा प्रकारची देवाण-घेवाण आवश्यक आहे. असे प्रतिपादले आहे. आरोग्य माहिती विषयी अशा प्रकारचे नेटवर्क प्रस्थापित झाले पाहिजे. त्यासाठी काही शिफारशी आयोगाने केल्या आहेत.

### (इ) पोर्टल्सः

कोणतीही सामग्री संकलीत, उपलब्ध केली की त्याची उपयुक्तता वाढणार आहे. त्यासाठी आधुनिक जगात पोर्टल्सचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विविध ज्ञान क्षेत्रासाठी पोर्टल्स स्थापन करावी लागतील. त्या कामाला प्रारंभही झाला आहे. उदा. पाणी या क्षेत्रात माहिती, ज्ञान यांच्या देवाण घेवाणीसाठी ''भारतीय जल पोर्टल्स'' चे कार्य चालू झाले आहे. तसेच उर्जा क्षेत्रासाठी भारत उर्जा पोर्टल्स, पर्यावरणाच्या क्षेत्रासाठी भारत पर्यारवरण पोर्टल्स इ. चे पोर्टल सूरू होण्यासाठी नियोजन चालू आहे.

### ११अ२.२ ज्ञानसिद्धांतः

शिक्षणाच्या माध्यमातून विकास आणि परिवर्तनाचा मार्ग अधिक प्रशस्त होणे हे सार्वत्रिक सत्य आहे. आयोगाने शालेय , व्यावसासायिक, उच्च शिक्षण, मुक्त दूरस्थ शिक्षणासंदर्भात शिफारशी केल्या आहेत. वैद्यकीय, कायदा,व्यवस्थापन आणि इंजिनिअरींग शिक्षणाबाबत विस्तृतपणे मतप्रदर्शन केले आहे व त्यांच्या शिफारशीं बाबत कार्यावाही चालू आहे. तसेच शालेय शिक्षणाबाबत विविध पैलू उदा. शिक्षणस्तर, गुणवत्ता , शासकीय-अशासकीय व्यवस्थापन इ. मुद्यांचा विचार आयोग करीत आहे. मात्र व्यावसायिक शिक्षण, उच्चशिक्षण, मुक्त आणि दूरस्थ शिक्षण याबाबत आयोगाने शिफारशी केल्या आहेत.

**११अ२.३ ज्ञाननिर्मिती:**

कोणत्याही समाजाची प्रगती, विकास दोन घटकांवर अवलबूंन असतो.(१) उपलब्ध संसाधन, सामग्री यांचा उपयोग नवनवीन पद्धतीने करीत जाणे (२) नवनवीन संसाधनाचा (रिसोर्सेस) शोध लावणे व दोन्हीसाठी ज्ञानाची निर्मीती ही आवश्यमक बाब आहे .आयोगाने बौद्धिक संपदा अधिकार, विज्ञान आणि तंत्रज्ञान, नविन शोध (इनोव्हेशनस) या तीन घटकांच्या सहाय्याने ज्ञाननिर्मितीची मांडणी केली आहे.

**(अ) बौद्धिक संपदा अधिकार:**

आंतरराष्ट्रीय व्यापार पेठेत स्पर्धेत टिकायचे असेल, स्वत:चे स्थान अबाधित ठेवायचे असेल तर बौद्धिक संपादा अधिकाराचे महत्व जाणून घेतले पाहिजे.या कायद्याचे स्वरूप आणि तथ्य जाणून घेणे, विविध क्षेत्रात या कायद्याशी संबंधित जे जे गट आहेत त्यांच्या प्रशिक्षणाची निरंतर व्यवस्था करणे, तसेच ज्ञाननिर्मिती, ज्ञान उपयोजन आणि वितरण या सर्व प्रक्रियेत बौद्धिक संपदेच्या हक्कबाबत सजगता निर्माण करणे आवश्यक आहे. बाजारपेठांची मागणी आणि त्यापासून होणारे लाभ यांच्याशी संबंधीत हे मुद्दे महत्वाचे आहेत.

**(ब) विज्ञान आणि तंत्रज्ञान:**

लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या आवश्यक बाबी आहेत.ज्ञानाची निर्मिती आणि उपयोजिता यातूनच विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील नेतृत्व विकसित होणे ही एक सहज प्रक्रिया आहे.म्हणून अयोगाने संशोधनसाठी निधीची उपलब्धता,भारताकडे नेत्तृत्व येणे, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील आंतरविद्याशाखीय ज्ञान विषयाचा परिचय, त्या विषयांच्या अध्ययनाची व्यवस्था, समाजातील गरीब आणि वंचीत समुदायातील लोकांच्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर अधिक सोप्या पद्धतीने करणे इ. मुद्यांवर सविस्तर विचार केला आहे.

**(क) नविन शोध (इनोव्हेशनस):**

भारताची निर्यात ३०टक्के संयुक्त वार्षिक वृद्धी दर या गतीने वाढते आहे. उत्पादनाची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय दर्जाची आहे. याचे श्रेय कार्यवृद्धीला पूरक वातावरण, गुंतवलेले भांडवल आणि श्रम उत्पादकता स्पर्धात्मक दरात सेवा उपलब्धता याकडे जाते. तसेच या संदर्भात जे जे नवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत त्याचा शोध घेणे,. त्याची उपयुक्तता तपासून अशा प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे म्हणून आयोग राष्ट्रीय पातळीवर अशा प्रकारची व्यवस्था (प्रणाली) उत्पन्न करू इच्छिते. त्या प्रणालीच्या सहाय्याने स्थानिक पातळीवरून राष्ट्रीय पातळीपर्यंत उद्योगशीलतेला अधिक प्रोत्साहन मिळेल.

**११अ२.४ ज्ञानाची उपयोगीता:**

ज्ञानाचा योग्य उपयोग तंत्रज्ञानात उचित बदल करण्यासाठी जसा होतो त्याचप्रमाणे माहितीची विश्वसनियता, नियमित पुरवठा यासाठीही होतो. शेती, लघु आणि मध्यम उद्योजक आणि पारंपरित ज्ञान या सर्वांचा उपयोग गरीब, वंचित वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी परिणामकारकरित्या होऊ शकतो असे आयोगाचे मत आहे. शेती-भारतातील ६०टक्क्यापेक्षा जास्त लोकांच्या उत्पन्नाचे साधन शेती हेच आहे. भारतातील जी.डी.च्या दृष्टीने शेतीचा हिस्सा कमी होत असला तरीसुद्धा देशातील सर्वात मोठे आर्थिक क्षेत्र म्हणजे शेती हेच आहे. म्हणून शेती उत्पादनात घट होणे हे देशाच्या दृष्टीने लाभदायक नाहीच उलट आर्थिक दृष्ट्या धोकादायक आहे. आयोगाने शेती, शेती उत्पादनात स्थिर स्वरूपी वाढ

व्हावी यासाठी शेतीच्या विविध समस्यांविषयी चर्चा केली आहे. भारतीय शेतकी संशोधन परिषद (आय.सी.ए.आर.) या संस्थेच्या सहाय्याने संशोधन व विस्तार यासंबंधी मते व्यक्त केली आहेत.

**पारंपारिक ज्ञान:**

प्रत्येक समाज गटाकडे काही पारंपारिक ज्ञान चालत आलेले आहे या विशिष्ट समुदायाची ओळख त्यातून होत असते. ज्ञानाचे उपयोजन जर झाले तर लोकांच्या राहणीमानात,आर्थिक स्तरात निश्चित चांगला बदल घडेल. जगण्यासाठी काही पर्यायी, टिकाऊ साधन निर्माण होऊ शकेल असे आयोगला वाटते. म्हणून आयोगाने काही मुददे सूचनार्थ ठेवले आहेत.

१. पारंपारिक ज्ञान संकलन-उपयोजन: त्यासाठी काही संकल्पनाची मांडणी करणे.

२. औषधीजन्य वनस्पतीची शास्त्रीय माहितीचे संकलन करणे व सूत्रबद्धता आणणे.

३. पारंपारिक शेतीतंत्रे विकसित करणे.

४. सांस्कृतिक परंपरा आधारित पर्यटनाचा विचार करणे.

५. पारंपारिक जल व्यवस्थापनाचे तंत्र अभ्यासणे इत्यादी.

**११अ२.५ सेवा वितरण:**

स्वतंत्र देशातील नागरिक शासकीय यंत्रणेकडून ज्ञान आधारित सेवेचा लाभ घेऊ शकतात. आंधुनिक तंत्रज्ञानामुळे या सेवा पारदर्शी, कार्यकौशल्य वाढवणाऱ्या आणि उत्तरदायित्व स्विकारणाऱ्या अशा विविध गुणवत्तेच्या प्राप्त होण्याची संधी मिळाली आहे. इ.प्रशासन हे त्याचे फार मोठे उदाहरण आहे. या सेंवांचा केंद्रबिंदू सर्वसामान्य नागरिक हाच आहे. आयोगाने अशा प्रशासनामुळे होणाऱ्या अनेक लाभांचा उल्लेख केला आहे. उदा. सार्वजनिक सेवा कमी खर्चात आणि अधिक चांगल्या गुणवत्तेने उपलब्ध होणे, वेळेत बचत होणे, सरकारी प्रशासनात पारदर्शकता आणि नागरिक अधिक समर्थ बनणे, शासकीय सेवेत सातत्याने गुणवत्तापूर्वक सुधार होणे इत्यादी. आयोगाने इप्रशासनाबाबत काही सूचना केल्या आहेत.

(१) इ-प्रशासनासाठी काही किमान प्रमाणके (स्टँडर्डस) प्रस्थापित करणे व त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे.

(२) भविष्यकाळात राष्ट्रीय पातळीवर जे काही उपक्रम हाती घेण्यात येतील ते सर्व इ-प्रशासनाच्या माध्यमातून कार्यान्वित करणे.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने ज्या पाच महत्वाच्या क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे व त्यासंबंधी जी भूमिका मांडली आहे . तसेच काही सूचनाही केल्या आहेत त्याचा थोडक्यात आढावा वरील मुद्यातून घेतला आहे.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने आपला पहिला अहवाल डिसेंबर २००६ मध्ये पंतप्रधानांना सादर केला आहे. त्यात ग्रंथालये, भाषा, अनुवाद, नेटवर्क, शिक्षणविषयक, अधिकार, व्यावसायिक शिक्षण, उच्च शिक्षण, इ-प्रशासन, राष्ट्रीय विज्ञान आणि सामाजिक विज्ञान फाऊंडेशन अशा नऊ विषयांबाबत आपल्या शिफारशी सादर केल्या आहेत.

साक्षरता, मुक्त आणि दूरस्थ, शालेय शिक्षण, शेती, पारंपारिक ज्ञान इ. चौदा विषयांबाबत

आयोगाचे कार्य चालू असून तिसऱ्या टप्प्यात परिसर, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण-प्रशिक्षण, अध्ययन पद्धती इ. अकरा विषयांबाबत आपल्या शिफारशी पुढील वर्षी(२००८)सादर करणार आहेत.

आयोगाने डिसेंबर २००६मध्ये ज्या नऊ विषयांवर शिफारशी सादर केल्या आहेत त्यापैकी ग्रंथालय भाषा आणि अनुवाद, शिक्षणाचा मूलभूत हक्क, व्यावसायिक शिक्षण- प्रशिक्षण, उच्च शिक्षण या विषयावरील शिफारशीचा अहवाल थोडक्यात पुढीलप्रमाणे दिला आहे.

**(अ) ग्रंथालय:**

ग्रंथालयाचे महत्व अधोरेखित करून विविध स्तरावरील ग्रंथालयाचे जाळे प्रभावीपणे निर्माण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच 'ग्रंथालय' संबंधी काही शिफारशी पुढीलप्रमाणे नोंदविल्या आहेत.

(१) राष्ट्रीय ग्रंथालय आयोगाची स्थापना(नॅशनल कमिशन ऑन लायब्ररीज)व्हावी. केंद्र शासनाने हा आयोग स्वतंत्रपणे, स्थायी स्वरूपात आणि स्वायत्त अशा प्रकारे राहावा. तसेच याचा प्रारंभ ताबडतोब व्हावा असे नियोजन करावे.

(२) सर्व ग्रंथालयाचे सर्वेक्षण राष्ट्रीय पातळीवर व्हावे. सांस्कृतिक मंत्रालयाने प्रशासकीय आणि आर्थिक मदत द्यावी लाभार्थीच्या गरजा व त्यांच्या वाचन सवयी याबाबत राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या कार्याचा एक भाग म्हणून नियमित आढावा घेतला जावा. एक वर्षाच्या कालावधीत असे सर्वेक्षण पूर्ण व्हावे.

(३) ग्रंथालये आणि माहिती विज्ञान (इन्फर्मेशन सायन्स), शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन या विभागाची पुनर्रचना करावी. प्रगत प्रशिक्षणासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करावी.

(४) ग्रंथालय कर्मचारी वर्गाचे पुनर्मुल्यमापन, केंद्रीय ग्रंथालय निधी, ग्रंथालय व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करावे. समाजाचे आधुनिकीकरण होण्यासाठी योजना आखाव्यात.

(५) वैयक्तिक, खाजगी ग्रंथालयांना प्रोत्साहन व देणग्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

(ब) (१)भाषा व अनुवाद याबाबत आयोग म्हटतो की इयत्ता १ली पासून इंग्रजी अध्यापनास प्रारंभ व्हावा. इयत्ता ३री पासून इंग्रजी माध्यमातून शिकविले गेले पाहिजे. त्यामुळे शाळा शाळातील अंतर कमी होईल.

(२) राष्ट्रीय चाचणी सेवा या केंद्राची स्थापना करावी.

(३) ४० लाख प्राथमिक शिक्षकांना इंग्रजीत प्रशिक्षण देणे आवश्यक आहेत. इंग्रजी क्रमिक पुस्तकांची निर्मिती करावी. भारत हा बहुभाषिक देश आहे त्यामुळे भाषांतरासाठी मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. भाषांतर एक उद्योग क्षेत्र म्हणून विकसित करावे. भाषा अनुवादाचे एक संग्रह केंद्र निर्माण करावे. अनुवादीत साहित्यासाठी एक (Clearing House) निर्माण करण्याची गरज आहे. भाषांतर-अनुवादाचे शिक्षण-प्रशिक्षणाची व्यवस्था करावी. राष्ट्रीय स्तरावर परिषदांचे आयोजन करावे.

**(क) शिक्षणाचा मूलभूत हक्क:**

केंद्र सरकार शिक्षणाच्या हक्काविषयी कायदा करणार नाही पण सर्व राज्यांनी असा कायदा

करावा. राष्ट्रीय ज्ञान आयोगाला असे वाटते की, प्रारूप विधेयकात बऱ्याच त्रुटी आहेत.प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी (GDP)२.५ पर्यंत आर्थिक तरतूद करावी. सर्व शिक्षा अभियानाचे कार्य चालू आहे ते सहाय्यकारी ठरेल. शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, सेवांतर्गत सुविधा, यांचा उल्लेख होणे आवश्यक आहे.

### (ड) व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण:

सध्या व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण हा विभाग (HRD) या कार्यक्षेत्रात येतो आयोगाने असे म्हटले आहे की, (HRD) ने राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण विकास आणि तंत्रज्ञान, संस्था स्थापन करावी. प्रशिक्षणात लवचिकता स्विकारावी. व्यावसायिक शिक्षण, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण यांच्यात संबंध प्रस्थापित व्हावेत. शालेय शिक्षणात व्यावसायिक व दुय्यम कौशल्ये यांचा यात समावेश करावा.

व्यावसायिक शिक्षणासाठी साधन संपत्तीत वाढ, उत्पादन व सेवा क्षेत्रातील लागणारे मानवी बळ लक्षात घेतले तर शिक्षणासाठी जो खर्च होतो त्यातील १० ते १५% खर्च व्यावसायिक शिक्षणावर व्हावा.

असंघटित आणि अनौपचारिक क्षेत्रातील व्यक्तींसाठी सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत. सद्यस्थितीतील उद्योग गरज लक्षात घेऊन मनुष्य बळ पुरवावेत प्रशिक्षणात सुधार आणि लवचिकता आणावी.

### (इ) उच्च शिक्षण:

शालेय शिक्षणाचा पाया मजबुत व भक्कम असला पाहिजे. शालेय शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकाला उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे. विस्तार, उत्कृष्टता, सर्वसमावेशकता, या तीन सुत्रांच्या आधारे आयोगाने सूचना केली आहे.

(१) विस्तार-नजीकच्या काळात भारताला १५०० विद्यापीठांची गरज आहे.

(२) नियामक यंत्रणेत बदल व सुधारणा करण्याची गरज आहे.

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या भूमिकेत कार्याची पुनर्मांडणी केली पाहिजे.

(४) ५० राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना करावी. यापुढील तीन वर्षात विद्यापीठाच्या उभारणीस प्रारंभ व्हावा. विद्यापीठांना लागणारी आर्थिक तरतूद, विद्यार्थी प्रवेश, शुल्क, मूल्यमापन पद्धती इत्यादीबद्दलही आयोगाने मते व्यक्त केली आहेत.

### आयाम व उत्कृष्टता:

सध्याच्या विद्यापीठाच्या कार्यपद्धतीत आयोगाने सुधारणा सुचविल्या आहेत.

(१) दर ३ वर्षांनी अभ्यासक्रमाची पुनर्रचना.

(२) २५% मूल्यमापन हे सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापन ठेवावे.

(३) अध्यापनाबरोबर संशोधनाला महत्व द्यावे.

(४) बुद्धिमान व्यक्तींसाठी भरीव आर्थिक वेतन द्यावे.

(५) अध्ययन-अध्यापनाला पूरक साधने अद्ययावत ठेवावी. जसे ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक सुविधा, माहिती तंत्रज्ञान.

(६) विद्यापीठीय स्तरावर विविध समस्यांची पुनर्मांडणी करावी. कुलगुरूंची निवड पद्धती बदलावी.

(७) विद्यापीठाचा आकार याचा नव्याने विचार व्हावा.

(८) पदवी शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाची पुनर्रचना केली पाहिजे.

(९) महाविद्यालयाला स्वायत्तता प्रदान करावी.

(१०) पदवी शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांचे एक मध्यवर्ती मंडळ असावे.

**सर्वसमावेशकता:**

उच्च शिक्षणात योग्य व गुणवान विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची, अध्ययनाची संधी मिळावी. आर्थिक दारिद्र्य हे कारण प्रवेशासाठी ठरू नये. त्यासाठी शिष्यवृत्त्या, कर्जे यांची व्यवस्था व्हावी.

**समारोप:**

वरील सर्व विषयांवर चर्चा होण्याची नितांत गरज आहे. अनेक मुद्दे, शिफारशी वादग्रस्त ठरतील. अनेक शिफारशी मोघम आहेत. शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधितांनी या अहवाला संबंधी भविष्यात प्रकाशित होणाऱ्या शिफारशीसंबंधी जनजागृती करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने ज्ञानाच्या संबंधात पांच क्षेत्रे विचारात घेतली आहे.

(१) ज्ञानाची सुलभता

(२) ज्ञान सिद्धांत

(३) ज्ञाननिर्मिती

(४) सेवा वितरण

(५) ज्ञानाचे उपयोजन

**इ.स. २००६ मध्ये शासनाला सादर केलेल्या शिफारशी:**

ग्रंथालये, अनुवाद, भाषा, ज्ञाननेटवर्क, शिक्षण विषयक हक्क, व्यावसायिक शिक्षण, उच्च शिक्षण, राष्ट्रीय विज्ञान, सामाजिक शास्त्र प्रतिष्ठान, इ-प्रशासन. इ.स.२००७ पर्यंत- सध्या काम चालू. साक्षरता, आरोग्य माहिती नेटवर्क , पोर्टल्स, मुक्त आणि दूरस्थ शिक्षण., शालेय शिक्षण, विधी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण,व्यवस्थापन शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शोध उत्तेजकता शिक्षण. बौद्धिक संपदा हक्क. विज्ञान तंत्रज्ञान.शेती. परंपरागत शेती.

**इ.स.२००८ अखेर पुढील वर्षी करावयाचे कार्ये:**

परिसर अभ्यास, सार्वजनिक आरोग्य, लिंगभेद, निर्धोक पाणी, अध्ययन अध्यापन पद्धती, शिक्षण प्रशिक्षण, पायाभूत उद्योग, कायदेविषयक सल्ला केंद्र इत्यादीबाबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शासकीय प्रशासन, पारदर्शी प्रक्रिया.

★★★

# ११ - ब) उच्च शिक्षणावर जागतिकीकरणाचा प्रभाव

(Impact of Globalistion on Higher Education)

**घटक संरचना**

११ब.० उद्दिष्टे

११ब.१ प्रस्तावना

११ब.२ जागतिकीकरणाचे शैक्षणिक स्वरूप

११ब.३ उच्च शिक्षणासंबंधीच्या जागतिक समस्या

## ११ब.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) उच्च शिक्षणावर पडणारा जागतिकीकरणाचा प्रभाव स्पष्ट करू शकाल.

## ११ब.१ प्रस्तावना

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगातील माणसे एकमेकांशी जोडली जात आहेत. अध्ययन-अध्यापन प्रक्रियासुद्धा एका अर्थाने एकमेकांशी जोडली गेली. यापुढे जागतिक स्पर्धेत उत्कृष्ट तेच टिकेल म्हणून आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना कामाच्या, संवादाच्या उत्कृष्ट पद्धती शिकवाव्या लागतील व आयुष्यभर सतत शिकत राहण्याची मनोवृत्ती त्यांच्यामध्ये रूजवावी लागेल. शिक्षण प्रक्रियासुद्धा मूलभूत बदल स्वीकारणारी व गतिमान बनवावी लागेल. ''औद्योगिक भाषेत सांगायचे तर आजचा जागतिक शिक्षण उद्योग वार्षिक १५०० बिलीयन डॉलरच्या घरात आहे. त्याला जागतिक बाजारपेठ आहे आणि त्याला 'शिकण्याची ' सेवा आणि सत्व देणाऱ्या नवीन सिद्धांताची प्रतीक्षा आहे. त्याचमुळे या उद्योगानेसुद्धा ही तत्वे अंगीकारणे प्राप्त आहे. येणाऱ्या 'ज्ञानमय जगतात' शिक्षणाचे उद्दिष्ट 'सर्वांना परवडेल अशा किमतीत, सर्वांसाठी सर्वोत्कृष्ट शिक्षण' हेच असणार आहे.शिक्षणक्षेत्राची समस्या ही आहे की, विद्यापीठे आणि महाविद्यालये साचेबद्ध आणि जुनाट मानसिकतेत जखडली आहेत. अजूनही कालबाह्य अभ्यासक्रम शिकविला जातो. आणि ते त्यांच्या ग्राहकांना किंवा समाजालाही उत्तरदायी नाहीत आणि गतिमान बदल आणि प्रगती यांना आवश्यक सोईसुविधा, संसाधनेयांचा तिथे पूर्ण अभाव आहे. जागतिक व्यापार संघटना गॅटसच्या राज्यात गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय मान्यता या आव्हानांचा सामना शिक्षणक्षेत्राला लवकरच करावा लागणार आहे आणि अनेकांच्या अस्तित्वाचा प्रश्न समोर येणार आहे. प्राप्त परिस्थितीत या समस्येवर एकच उत्तर आहे, ते म्हणजे उद्योग आणि शिक्षण यांनी एका समान पातळीवर येऊन उभयहिताच्या उद्देशाने एकाच व्यासपीठावर एकत्र येणे.''(सकाळ पूणे आवृत्ती १९ ऑगस्ट २००५ डॉ. राम ताकवले-लेखक)आदरणीय डॉ.ताकवले यांनी जागतिकीकरणाच्या व विद्यापीठे संबंधाबद्दल अतिशय समर्पकपणे विवेचन केले आहे. विद्यापीठांना आता भूतकाळात योग्य ठरणारे शिक्षण न देता भविष्यकाळात उपयुक्त ठरणारे शिक्षण द्यावे लागेल.

## ११ब.२ जागतिकीकरणाचे शैक्षणिक स्वरूप

जागतिकीकरणाचे पडसाद उमटलेले दिसतात. उदाहरणार्थ, वाढते इंग्लिश मिडियमचे सत्र. परदेशी शाळा.

**शिक्षणाचे जागतिकीकरण:**

जागतिक व्यापार संघटनेच्या वर्गीकरण यादीमधील विविध सेवा क्षेत्रामध्ये शिक्षण या सेवा क्षेत्राचा समावेश होतो. येथे शिक्षणाचे पाच विभागात वर्गीकरण करण्यात आले. प्राथमिक शिक्षण, माध्यामिक शिक्षण, उच्च, प्रौढ व इतर शिक्षण. गॅट कराराच्याा माध्यमातून प्रत्येक सदस्य देशाने सर्व शिक्षणक्षेत्राच्या विभागामध्ये व्यापार केलेला नाही.फक्त उच्च शिक्षणाचे क्षेत्र खुले केले आहे. बदलत्या शैक्षणिक तंत्रज्ञानामुळे सारे जग एक महाजाल बनलेले आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकारच्या सीमा नष्ट झाल्या आहेत. या सर्वांपलीकडे माहितीची, ज्ञानाची देवाणघेवाण करून प्रत्येक राष्ट्र विकासाकडे झेप घेत आहे. अशा प्रकारे शिक्षण ही विश्वव्यापी संकल्पना झाली आहे.

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत गॅटच्या अंतर्गत १२ प्रमुख व्यापारी सेवांचा अंतर्भाव केलेला आहे. शिक्षणालाही व्यापारी सेवेचा दर्जा दिलेला आहे. याचा अर्थ असा की, व्यापारातून सर्व प्रक्रिया, ध्येय-धोरणे, नियम, हे आता शिक्षणाला लागू होतील.

**जागतिकीशिक्षणाची ध्येये:**

१. जागतिकीकरणाचा परिणाम व प्रक्रिया समजावून घेणे.

२. जागतिकस्तरावरील ज्ञान, तंत्रज्ञान, साधन-सामुग्री, मनुष्यबळ यांचा एकत्रित उपयोग करून शिक्षणातील विकासाची गती वाढविणे.

३. माहिती तंत्रज्ञानाची माहिती करून घेऊन कौशल्ये विकसित करणे.

४. जगातील चांगल्या गोष्टींचे संवर्धण करणे.

५. जाणीव-शांतता, सलोखा, पर्यावरण समतोल, चिरंजीव विकास यासंदर्भात नव्या जाणीवा निर्माण करणे.

६. जागतिक स्पर्धेत तोंड देण्यास सक्षम बनविणे.

**जागतिकशिक्षणाचा अभ्यासक्रम:**

१. अभ्यासक्रम अनुदेशाची भाषा इंग्रजी असेल.

२. विज्ञानाच्या प्रात्यक्षिकावर व कौशल्यावर भर.

३. तंत्रज्ञानयुक्त स्वावलंबी अभ्यासक्रम.

४. सुप्त गुण वाढीस लावणारा अभ्यासक्रम.

५. बदलत चाललेल्या संस्कृतीचा परिचय करून देणारा अभ्यासक्रम.

६. अर्थशास्त्राचा अभ्यासक्रमात समावेश.

**जागतिक शिक्षणासाठी अध्ययन अध्यापन पद्धती:**

ई-लर्निंग, इंटरनेटचा वापर, व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग, सॅटेलाईट शिक्षण, संगणक सहाय्यित अनुदेशन, आभासी वर्ग, ई-ग्रंथालय.

**जागतिकीकरणाचे फायदे:**

संस्कृतीची देवाणघेवाण, विज्ञानाचे ज्ञान, जागतिक दर्जाचे अध्यापन, वैश्विक दृष्टी, अद्ययावत अभ्यासक्रम, दर्जेदार शिक्षण.

**जागतिकीकरणामुळे शिक्षणासमोर निर्माण झालेली आव्हाने:**

संस्थांची पुनर्रचना, शिक्षकांची बदलती भूमिका, अभ्यासक्रमाची पुनर्रचना, स्पर्धेत वाढ, संस्थांचे मूल्यमापन, गुणवत्ता संघर्ष, मूल्यसंघर्ष, परीक्षा पद्धतीत बदल, अनुदेशाची भाषा इंग्रजी, इंटरनेट व तंत्रज्ञानाचा वापर, जागतिक समाजाची निमिर्ती, संस्कृति संक्रमण, कौशल्य अभिवृत्तीत बदल, शिक्षणाचे व्यावसायिकरण, शिक्षणाचे खाजगीकरण-उदारीकरण, विद्यार्थी भूमिकेत बदल, वाढते शहरीकरण, पर्यावरण असमतोल, रोजगार निर्मिती इत्यादी.

## ११ब.३ उच्च शिक्षणासंबंधीच्या जागतिक समस्या

आर्थिक समस्येमुळे जगातील महत्वाच्या देशांसहित इतरही बऱ्याच देशात एकंदरित शैक्षणिक वातावरण वरचेवर बिघडत चाललेले दिसते. प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. परंतु आवश्यक साधने (शिक्षकवर्ग धरून) गरजांच्या प्रमाणात वाढलेली नाहीत. शिक्षणासाठी आवश्यक वाचनालय व प्रयोगशाळा इत्यादीसह पायाभूत सोयींसाठी आर्थिक उपलब्धी सातत्याने अपुरी राहिलेली आहे. मूलभूत संशोधनावरचा खर्चसुद्धा त्या मानाने अल्प प्रमाणात आहे. या सर्व गोष्टीमुळे शिक्षण क्षेत्रात एकंदरित ऱ्हास झालेला आढळतो. या परिस्थितीचा कल प्रत्येक देशात थोड्याफार प्रमाणात वेगळा असेल परंतु त्यामध्ये बरेच साम्यसुद्धा आहे. आपल्या देशात उच्च शिक्षणाचे रूप झपाट्याने बदलत आहे. अशा वेळेस आपण इतरांच्या अनुभवावरून बरेच काही शिकू शकतो. असे म्हणता येईल की, आजचे उच्च शिक्षण भिन्न प्रकारे का होईना स्वभावतः जागतीक बनलेले आहे. जागातीक पातळीवर समस्या किंवा संदर्भ खालीलप्रमाणे लक्षात घेण्यासारखे आहे.

(१) शिक्षण आणि व्यवसाय हे एकमेकांस पूरक असे उपक्रम आहेत. प्रारंभीच्या शिक्षणापासून ते व्यवसायापर्यंत परस्पर संबंध व त्यातील बदल यासंबंधी फारसा विचार केला जात नाही. कित्येक देशांमध्ये व्यावसायिक शिक्षण व रोजगार यांचा संबंध चांगल्या प्रकारे जोडला जातो. परंतु कला व विज्ञान शाखांमध्ये त्यासंबंधी फारसा विचार होत असल्याचे दिसत नाही.

(२) जीवनातील उच्च शिक्षणाची आवश्यकता, तंत्रज्ञानातील जदलगतीने होणारे बदल आणि नवीन प्रकारच्या रोजगार निर्मितीमुळे वरचेवर स्पष्ट होत आहे. याचा परिणाम म्हणून कित्येक देशात पदवीनंतर विभीन्न प्रकारचे अभ्यासक्रम विकसित झाल्याचे आढळून येतात.

(३) तंत्रज्ञानामुळे दूरस्थ शिक्षण पद्धतीत क्रांती झालेली आहे. त्याचा प्रभाव शिक्षणसंस्थांची प्रत उंचावण्यात आणि गुणवत्तेची हमी प्राप्त करून देण्यात झालेला दिसतो. तंत्रज्ञानाचा प्रभाव अध्यापन आणि अध्ययनावर प्रस्थापित विद्यापीठांमधूनसुद्धा आढळून येतो. हे तंत्रज्ञान महागडे आहे. शिवाय ते अल्पकाळात कालबाह्य ठरू शकते आणि त्याचा वापर सूरू करण्यासाठी भरपूर

प्रारंभिक गुंतवणूकही आवश्यक असते. अनेक विद्यापीठांमधून प्रस्थापित वाचनालय आणि व्यवस्थापन पद्धतीत आमूलाग्र बदल वेबवर आधारित माहिती प्रसारण पद्धतीमुळे झालेला आहे.

(४) एका देशामधून दुसऱ्या देशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत प्रंचड वाढ झालेली आहे. दुसऱ्या देशात ज्यांना मागणी आहे अश कौशल्यनिपुण व्यक्तींना वाढत्या संधी प्राप्त होत आहेत आणि सध्या हा ओघ विकसनशील देशांमधून (उदा.भारत व चीन) विकसित देशांकडे जात असल्याचे दिसून येते. राष्ट्राच्या विकासासाठी देशाची बुद्धिमत्ता त्याच मातित विकसित होईल आणि तिथेच त्याचा सदुपयोग होईल असे मार्ग शोधले पाहिजेत. अभ्यासक्रमाचे आंतरराष्ट्रीय, विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक जाणीव, विदेशी भाषांमधून अध्ययन, शैक्षणिक व्यवसायाची आंतरराष्ट्रीय सांधेजुळणी अशा काही गोष्टी उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणासाठी आवश्यक ठरतात.

(५) एखादा देश दुसऱ्या देशात पदवी शिक्षणाकरता आवश्यक असलेल्या क्षमतांचा फायदा घेऊ शकतो आणि नवीन तंत्रज्ञान विशेषीकरणासाठी प्रगत पातळीवरचे अध्ययन व संशोधन यामध्ये एक महत्वाचा दुवा ठरू शकतो.

(६) उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे हे दृश्य सध्या जगभर दिसत आहे. काही सार्वजनिक विद्यापीठाचे खाजगीकरण अशा अर्थाने होत आहे की, त्यांना लागणारा निधी उभारण्याची जबाबदारी त्यांनाचा मोठ्या प्रमाणावर उचलावी लागत आहे. शिवाय अशा विद्यापीठांना समाजभिमुख होण्यास सांगितले जाते आणि वरचेवर विद्यार्थ्यांकडे 'गिऱ्हाईक'म्हणून (व्यापारी दृष्टीकोनातून) बघितले जात आहे.

(७) सर्वत्र शिक्षण क्षेत्र अडचणीत आले आहे. अंशकालीन शिक्षकांच्या संख्येत भरमसाठ वाढ झाली आहे. विद्यार्थी, शिक्षक प्रमाण, शिक्षण व्यवसायातील कामाचा मोबदला व पगार, शिक्षकांचे नीतीधैर्य या गोष्टी ढासळत आहेत. व्यावसायिक बांधिलकीशिवाय विद्यापीठ ही प्रभावी संस्था होऊ शकत नाही.

(८) सपंर्काबाबत आणि सतेसंबंधीच्या अडचणी जगाच्या कित्येक भागात आढळतात. लिंग, वंश आणि समाजातिल विविध हे गंभीर समस्या म्हणून बाकी राहतातच.

(९) उच्च शिक्षणक्षेत्रात'जबाबदारी' हे आजकालचे ब्रीद्रवाक्य आहे. अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था, मुख्यत: शासन, शैक्षणिक उत्पादन क्षमतेचे मूल्यमापन आणि आर्थिक विभाजनावर नियंत्रण अधिकाधिक करू इच्छित आहेत. शासनाच्या पद्धतीमुळे निर्माण होणारे तणाव शेवटच्या टोकापंर्यत जाऊन तुटण्याच्या बेतात आहेत. वरचेवर विद्यापीठे ही व्यवस्थापनाच्या आधीन होत चालली आहेत आणि शिक्षकांच्या परंपरागत अधिकार क्षीण होत आहे.

सध्या उच्च शिक्षणाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात अनाचराने व भ्रष्टाचाराने व्यापलेले दिसते आहे. आवश्यक तरतूदीची व अटींची पूर्तता न करताच संस्थांची निर्मिती, विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यामधील संस्थाचालकाचा भ्रष्टाचार,शासनातील भ्रष्टाचार, परीक्षा पद्धतीतील भ्रष्टाचारास, शिक्षकांची कर्तव्यच्युती, खाजगी शिकवण्या व इतर व्यवसाय इत्यादीमुळे सामाजिक व नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत चालला आहे. सरकारी कायदे, विद्यापीठाचे विधिनियम, आदेश पायदळी तुडविणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीची वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे सर्व अपेक्षा भंग पावत आहेत. खऱ्या अर्थाने गुणवत्तेला विना अनुदानित तत्वाने आणि कॅपिटेशन, डोनेशन पद्धतीने हरताळ फासला आहे.ज्याला परवडेल आणि जिथे परवडेल तिथे त्याने शिक्षण घ्यावे आणि ज्यांना परवडणार नाही अशांनी तसेच राहावे असे धोरण स्वीकारले जात आहे.

प्रचंड खर्च करण्याची कुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेची केवळ तांत्रिकता पूर्ण करून प्रवेश दिला जातो. जागतीकीकरणाने एका बाजूने गुणवत्तेचा चेहरा परिधान केलेला आहे. तर दुसऱ्या बाजूला शिक्षण ही जागतीक पातळीवरची विक्रीची वस्तू बनविलेली आहे. जगातील निरक्षरांच्या एकूण संख्येपैकी ७० टक्के जनता निरक्षर जनता भारतात राहते आहे. ही भारतीय जतन दारिद्र्यरेषेखालील अवस्थेमध्ये जगत आहे. इतरांच्या बरोबरीने जीवन जगण्याचा, शिक्षणाचा आणि आरोग्याचा हक्क त्यांना मिळायला पाहिजे. यांना वंचित ठेऊन भारताचा विकास होऊ शकणार नाही. स्वातंत्र्यानंतरच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतल्यास हे धोरण अपयशी ठरलेले आहे. अद्यापही सर्वांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण या धोरणाची अंमलबजावणी झालेली नाही भारत सरकार जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या दबावाला बळी पडून शिक्षणावरील खर्चात दिवसेंदिवस कपात केली जात आहे.

शिक्षणाच्या विकासाच्या बाबतीत भारताची स्थिती इतर देशांच्या विदारकच आहे. २००२ च्या मानवी विकास निर्देशकांत २००० सालासाठी जगातील १७३ देशातील शिक्षण क्षेत्राच्या विकासाचे निर्देशक तयार करून त्यांची जागतिक क्रमवारी लावण्यात आली आहे. त्यामध्ये भारताचा क्रमांक १४१ वा आहे. आणि झिबाव्वे (९२), झांबिया (९१), इंडोनेशिया (१०१),चीन (९६), थायलंड (८०) यासारखे देश भारताच्या पुढे आहेत.

एकंदरीत उच्च शिक्षण क्षेत्रातून शासन आपले अंग काढून घेत असल्याने शिक्षणाचा बाजार आणि पदव्यांचा लिलाव मांडला जाणार आहे. जागतिकीकरणाची भाषा वापरून शिक्षणाचा व्यापार खुला होणार असून जागतिक पातळीवरील अनेक कंपन्या आपल्या देशात शिक्षणाचा धंदा करण्यासाठी प्रवेश मिळविण्याच्या प्रयत्न आहेत. उच्चवर्गीय आणि श्रीमंतांना गुणवत्तेच्या शिक्षणाचे स्वप्न दाखवून लुटण्यासाठी परदेशी कंपन्यांना मुक्त परवाना मिळण्याची शक्यता आहे. भारत कोणत्या प्रकारचा देश असावा याची निर्देश करणाऱ्याभारतीय घटनेच्या मूलभूत तत्वांना तिलांजली देऊन वंशवाद, जातीयवाद या देशाच्या एकतेवर आघात करणाऱ्यांना महत्व प्राप्त करून दिले जात आहे. यामुळे देशातील निरक्षरांची संख्या वाढेल, शिक्षणावरल अनुदाने क्रमाक्रमाने बंद होतील. शिक्षणामध्ये खाजगी संस्थांचे प्रमाण वाढल्याने शिक्षणाचा खर्च वाढेल आणि गरीब मुलांचे शिक्षण थांबेल, मुलींच्या शिक्षणात घट होईल, अभ्यासक्रमाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप नष्ट होईल आणि त्यास जातीयवाद स्वरूप आल्याने भावी पिढ्यांची मानसिकता व दृष्टिकोन यावर प्रतिकूल परिणाम होतील, सर्व सामाजिकशास्त्रे, इतर विज्ञान शाखेचा विकास थांबेल, एंकदरीत देशाच्या एकात्मतेवर सरंक्षणावर, संवर्धनावर त्याचे दुरगामी परिणाम होतील.शिक्षणातील वरील संभाव्य परिणाम लक्षात घेता हा केवळ शैक्षणिक प्रश्न राहिला नाही तर त्यास राष्ट्रीय प्रश्नाचे स्वरूप आले आहे. ज्या राष्ट्राच्या अभ्यासक्रमात राष्ट्रबांधणी, राष्ट्रविकास यांना महत्व दिलेले असते तीच राष्ट्रे जागतिकीकरणाच्या काळात आपले अस्तित्व टिकवू शकणार आहेत. यासाठी राष्ट्रीय मूल्यांच्या संस्काराची गरज आहे. त्यासाठी सर्व पातळीवरील सर्व अभ्यासक्रमात स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता याबाबतच्या शिक्षणक्रमांचा समावेश सक्तीचा असला पाहिजे. असे शिक्षण एका वेळी जीवनमान उंचावते आणि समाजालाही अधिक समृद्ध करते. वेतनमान व उत्पादकता वाढविण्यास मदत करते ज्याद्वारे व्यक्ती व राष्ट्र अधिक श्रीमंत होतात. आर्थिक विकासासाठी अनुकूल लोक आणि वातावरण निर्माण होते,गुणवत्ताधारक व जबाबदार नागरिक निर्माण करण्यास मदत होते, लिंग, वंश, धर्म, वर्ग इत्यादीवर आधारित भेदांना विरोध करण्यास चालना देते, जबाबदार लोकशाही समाज निर्माण करण्यात समृद्ध उच्चशिक्षण क्षेत्र महत्वाची भूमिका बजावते, विकसित देशात शिक्षण क्षेत्राला एक प्रमुख राजकीय प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. उदा अमेरिकेत भौतिक भांडवलाच्या तुलनेत मानवी भांडवल हे तीन पटीहून अधिक महत्वाचे मानले आहे. यासाठी शिक्षणातील गुतंवणूक वाढविणे आवश्यक ठरते. ही गुंतवणूक फक्त फायद्याच्या निकषावर न होता ती सामाजिक निकषावर होणे,

केवळ पैशाच्या बळावर प्रवेश देणाऱ्या व्यवस्थेऐवजी गुणवत्तेला महत्व देणारी व्यवस्था निर्माण करणे हे एक मोठे आव्हान शिक्षणाच्या ज ागतिकीकरणातून निर्माण झाले आहे.

**परदेशी विद्यापीठे व जागतिकीकरण:**

कोणत्याही परदेशी शिक्षण संस्थेला आपल्या देशात येवून शिक्षण द्यायचे असेल तर यु.जी.सी.कडून परवानगी घ्यावी लागते. शिवाय केंद्र व राज्यशासनाकडून परवानगी घ्यावी लागते. काही स्थायी निधी व काही अटीची पूर्तता करावी लागते. परदेशी विद्यापीठे ही अतिशय परिपूर्ण तंत्रज्ञान, उत्तम साधनसाहित्य, उत्तम अभ्यासक्रम, उत्तम इमारती व त्याच बरोबर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशातील उत्तम नोकरीच्या संधीची उपलब्धता करून देतील या सर्वांपुढे टिकण्यासाठी सर्व बाबतीत तोडीस तोड आहोत हे भारतीय शिक्षण संस्थांना सिद्ध करावे लागेल. अध्ययन-अध्यापन प्रकिया उत्तम प्रकारे राबवावी लागेल. परदेशी विद्यापीठात फ्री-शिप, रिझर्वेशन या आपल्याकडे असणाऱ्या बाबी असणार नाहीत. भारतीय उच्च शिक्षणाला परदेशी विद्यापीठाच्या आगमनाने फार मोठ्या संक्रमण अवस्थेतून जावे लागणार आहे. आज अनेक भारतीय शिक्षण संस्थांमध्ये परंदेशी विद्यापीठाचे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत.

★★★

# ११- क) समृद्ध विकासाची ध्येये
# (युनोस्को)

**घटक संरचना**

११क.०उद्दिष्टे

११क.१ प्रस्तावना

११क.२ समृद्धी विकासासाठी तीन महत्त्वपूर्ण क्षेत्राचा विकास अंतर्भूत आहे.

११क.३ समृद्धी विकासासाठी आठ ध्येये

## ११अ.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) समृद्धी विकासाची ध्येये सविस्तर विशद कराल.

## ११क.१ प्रस्तावना

युनायटेड राष्ट्रांनी समृद्ध विकासाच्या ध्येयासाठी पाऊले उचलली. ही एकंदरीत आठ आंतरराष्ट्रीय विकासाची ध्येय एकूण १९२ राष्ट्रांतील सदस्यांनी सांगितली आहेत आणि २३ आंतरराष्ट्रीय संघटनांनी ती २०१५ पर्यंत संपादित करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. जगातील गरिब राष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा विकास करण्यासाठी प्रोत्साहित करणे हे समृद्ध विकासाचे उद्दिष्ट आहे. यांत बालकांचे मृत्युचे प्रमाण कमी करणे, एडस सारख्या रोगांचे नियंत्रण करणे, दारिद्र्य कमी करणे यासाठी जागतिक सहभागाचा विकास करणे इ. बाबीचा समावेश करण्यात आला आहे. जगातील सर्वच नेत्यांनी युनायटेड राष्ट्रांनी सांगितलेला समृद्धी विकासाचा जाहिरनामा स्वीकारला आहे.

## ११क.२ समृद्धी विकासासाठी तीन महत्त्वपूर्ण क्षेत्राचा विकास अंतर्भूत आहे

१) मानवी भांडवलाला आधार देणे.

२) भौतिक सोयी-सुविधांमध्ये प्रगती.

३) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांमध्ये वाढ.

पोषणात वाढ, आरोग्याची काळजी, पुनर्रूत्पादन क्षमतेत वाढ आणि शिक्षण हे मानवी भांडवलाची उद्दिष्टे आहेत. तर सुरक्षित प्यावयाचे पाणी, उर्जा, आधुनिक माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, पर्यावरणाचे संरक्षण हे भौतिक सुविधांमधील प्रगतीचे उद्दिष्ट आहे. तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकिय हक्कांमध्ये स्त्रीयांचे सबलीकरण, हिंसेचे प्रमाण कमी करणे, राजकीय दबाव, जनसेवेतील समान उपयुक्तता आणि संपत्ती अधिकाराच्या सुरक्षिततेत वाढ यांचा समावेश होतो.

## ११क.३ समृद्धी विकासासाठी आठ ध्येये

१) दारिद्र्य आणि भूकेचे निर्मुलन करणे.

२) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण संपादन.

३) स्त्रीयांचे सबलीकरण आणि लिंग समानतेत वाढ.

४) बालकांच्या मृत्युचे प्रमाण कमी करणे.

५) आईच्या आरोग्यात प्रगती करणे.

६) एड्स, मलेरीया आणि इतर आजारांचे निर्मूलन करणे.

७) पर्यावरण संरक्षणात वाढ करणे.

८) विकासासाठी जागतिक सहभागाचा विकास करणे.

**भारतीय संदर्भात:**

समृद्धी विकासाचा जाहिरनामा दूरदृष्टीचे एक माध्यम आहे. कि ज्यात गरिब आणि श्रीमंत राष्ट्रांचा जागतिकीकरणात चांगले घडविण्यासाठीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. विषेश कालावधीत म्हणजेच २०१५ पर्यंत हा करार राबविला जाणार आहे. समृद्धी विकासात भूकबळी आणि दारिद्र्याचे निर्मूलन, बालमृत्युच्या प्रमाणात घट, एड्स, मलेरिया, यासारख्या रोगांच्या जाणीव जागृतीचे मुलभुत शिक्षण २०१५ पर्यंत झालेच पाहिजे ही महत्त्वाकांक्षा आहे. तसेच यांत लिंगसमानता, पर्यावरणाचा विकास, बहुकंपन्या आणि आंतरराष्ट्रीय सहयोग या गोष्टीचा देखील समावेश करण्यात आला आहे.

**सरकारचे प्रतिपादन:**

भारत सरकारने असे प्रतिपादन केले आहे की, २०१५ पर्यंत सांगितलेल्या सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. म्हणजेच दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल. बालमृत्युचे प्रमाण कमी होईल. त्यासाठी सरकार कडून विविध योजना राबविण्यात येतील. जसे कि, राष्ट्रीय ग्रामीण एम्प्लॉयमेंट गॅरन्टी योजना, सर्व शिक्षा अभियान, बालकांच्या आरोग्यावरील कार्यक्रम, समावेशित बालकांचे शिक्षण, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, राजीव गांधी राष्ट्रीय पिण्याचे पाणी मिशन, आणि संपूर्ण आरोग्याची सुरक्षितता इ.

★★★

# ११- ड खाजगीकरण आणि उच्च शिक्षण

(Privatization and Higher Education)

**घटक संरचना**

११ड.० उद्दिष्टे

११ड.१ प्रस्तावना

११ड.२ उच्च शिक्षण आणि खाजगीकरण

११ड.३ खाजगी क्षेत्रातील उच्च शिक्षणाचे धोके

## ११ड.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही

१) खाजगीकरण आणि उच्च शिक्षण यातील संबंध स्पष्ट करू शकाल.

## ११ड.१ प्रस्तावना

२१ वे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. ज्ञानाला मर्यादा नसतात. ज्याला ते आत्मसात करता येते. त्याचेच ते होते. आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासात ज्ञानोपासक कोणत्याही देशातील असो, कोणत्याही धर्माचा असो पण त्याने केलेले संशोधन , लावलेले शोध, त्याने जगाच्या ज्ञानात टाकलेली भर यामुळे अखिल मानव जातीचे जीवन संपन्न झाले आहे म्हणून म्हणतात की, 'विद्वान सर्वत्र पूज्यते' अशा काही विशिष्ट हेतूने संपूर्ण मानव जात एकत्र येत आहे याला मुख्यत: विज्ञान व तंत्रज्ञान या दोन गोष्टी कारणीभूत आहेत यातूनच जागतीकीकरणाचा उगम झालेला आहे. जगातील सर्व देशात १९८५ नंतर उदारीकरण, खाजगीकरण, जागतीकीकरण या संकल्पनांनी थैमान घातले. युनो, गॅट, नाणेनिधी, जागतिक बँक, इत्यादी. जागतीक संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याशिवाय विविध प्रकारचे व्यवसाय एकमेकांत करावेत. एकंदरीत जागतिकीकरणाचा परिणाम जगातील सर्व देशांवर झालेला आहे. बहुसंख्य कंपन्यांचा विस्तार होवून विदेशात गुंतवणूक वाढत आहेत. खाजगीकरणातून जागतीकीकरण हा २० व्या शतकाच्या अखेरचा व २१ शतकाचा प्रारंभीचा पर्वणीचा शब्द बनला आहे.

## ११ड.२ उच्च शिक्षण आणि खाजगीकरण

उच्च शिक्षणाचा भार आता खाजगी क्षेत्राला उचलावा लागणार आहे व त्याच्या बऱ्या वाईट परिमाणांना सामोरे जावे लागण्यात सुटका नाही. कारण नवीन आर्थिक निती ही अंमलात आणण्यावर भर देण्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर करून माध्यमिक शिक्षणापर्यतची जबाबदारी स्विकारण्याचीच राज्य सरकारांना मार्गदर्शक तत्व म्हणून केंद्र सरकारकडून दिले असल्याचे लक्षात येते. किंबहुना राज्य सरकारच्या अखत्यारित शिक्षण हा विषय असल्याने त्याबाबतचे धोरण व अग्रक्रम ठरविण्याची मुभा ची ती राज्य सरकारे स्वत:च्या विचार व सोयीने घेत आहेत. उदाहरणार्थ, कर्नाटक राज्यात

प्राथमिक शिक्षणासाठी खूप सोई सवलती, व उत्तेजनात्मक धोरण स्विकारले जात आहे. उच्च शिक्षणसंस्थाच्या प्राबल्याचे चित्र दिसते.

उच्च शिक्षणाच्या उपलब्धतेसाठी वाढता प्रसार व वाढलेली विद्यार्थी संख्या, सामावून घेण्यासाठी, खाजगी क्षेत्र अपरिहार्य ठरले आहे. विद्यार्थी संख्या ही कल्पनेपेक्षा जास्त वाढत आहे. खाजगी क्षेत्र हे शिक्षणात आता समकक्ष रितीने नवीन तर सार्वजनिक व सरकारी क्षेत्राच्या नाकर्तेपणामूळे ते आता (Creative Partnership) म्हणजेच सृजनशील सर्जक बनणर आहे. शिवाय या क्षेत्राकडे स्वावलंबी नेतृत्व आले आहे. खाजगी क्षेत्रात उच्च शिक्षणासाठीच्या शैक्षणिक संस्थांचे स्थान बळकट होत आहे. हे मान्य असले तरी सरकारी क्षेत्र, वा सार्वजनिक खर्चातून चालणाऱ्या शिक्षणसंस्था व खाजगी विनाअनुदानीत या दोन्ही टिकायला हव्यात. शिक्षणपद्धती व माध्यमे म्हणून काही उपाय खालील प्रकारे देता येईल.

**(अ) पार्टनरशिप:**

शिक्षणाचे खाजगीक्षेत्र हे सार्वजनिक व सरकारी क्षेत्राशी स्पर्धा करणारे म्हणून ठरू नये याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच स्पर्धा करायची झाली तर ती गुणावत्ता वाढीमध्ये होय. शैक्षणिक संयोजकत्व हे या दोन्ही क्षेत्राच्या सहकार्याने निर्माण व्हायला हवी. एज्युकेशनल इंटरप्राईज ही संकल्पना आता विकसित व्हायला हवी. कारण शिक्षणक्षेत्रात येऊ घातलेली अनिश्चितता व धोके यांना सामोरे जाण्यासाठी त्याची गरज आहे. सर्जनशील पार्टनशीप या दोन्ही क्षेत्रात निर्माण व्हायला हवी.

**(ब) महाविद्यालये/ संस्थांचा परस्पर मेळ:**

सरकारी शिक्षणसंस्था आणि खाजगी विनाअनुदानीत शिक्षणसंस्था जया उच्च शिक्षणात कार्यरत आहेत. त्यांच्यामध्ये विशिष्ट हेतूने एकत्र येणे हा सुद्धा शैक्षणिक भाग ठरावा अशी अपेक्षा आहे काही विशिष्ट कालावधी, करार काही विशिष्ट बाबींबद्दल आखणी करून या संस्थांनी एकत्र यावे तसेच खाजगी शैक्षणिक संस्था जरी एकाच मॅनेजमेंटच्या आधिपत्याखाली नसल्याने व समान कोर्सेस व उद्दिष्टांची बांधिलकीर मानणारे असतील तर त्यांनीही एकमेकांच्या सहकार्याने काही उपक्रम, शोध, प्रयोग राबविणे करावे, अशा प्रकारची कोलॅबोरेशन केल्याने वित्तीय व प्रशासकीय क्षमतांचे अधिक चांगले परिणाम होण्यासाठी वापर होवू शकेल. इंजिनियरिंग, कॉम्प्युटर सायन्स, मॅनेजमेंट आणि मिडीया स्टडीज अशाप्रकारच्या कोर्सेस चालविणाऱ्या खाजगी-विनाअनुदानीत संस्थांनी, कॉमन प्रोगॅम्स तयार करून विशिष्ट प्रोजेक्ट घेऊन संयुक्त पणे साधने व मनुष्यबळाचा संसाधनाचा, उपयोग करून घेण्यातून शैक्षणिक गुणवत्ता, समाजासाठी उपयूक्तता, विस्तारकार्य वाढविणे शक्य करून घेता येईल. काही वेळा व्यावसायिक लाभही उठविण्यास सहकार्य व कोलॅबोरेशन उपयोगी पडते.

**(क) स्वायत्त महाविद्यालये / निवडक महाविद्यालये:**

जे खाजगी क्षेत्रात चालू आहे त्यांना ॲकेडमीक वित्तीय, प्रशासकीय, स्वायत्तता देताना त्याची पूर्वीची कामगिरी आणि मूल्यमापनाचा आधार घ्यावा अशा महाविद्यालयांना फी आकारण्याचे अधिकार द्यावेत. पण शैक्षणिक उत्कृष्टतेचा व समानतेचा आधार घेण्यास भाग पाडावे. अंशत: आर्थिक सहाय्य म्हणून सरकारने अनुदान द्यावे.

**(ड) कम्युनिटी कॉलेज:**

उच्च शिक्षणासाठी आणखी एक भारतीय विद्यार्थ्यांसाठी मॉडेल उपलब्ध होऊ शकेल. कम्युनिटी

कॉलेजेस सुरू करता येतील. सरकारच्या नियमानुसार शिक्षणाचा फॉर्मल पॅटर्न स्वीकारला जावा. ज्यांना उच्च शिक्षणाचा खर्च करणची आर्थिक ताकद नसलेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. त्याच बरोबर मागे पडलेल्यांनाही शिक्षण घेण्यास संधी मिळेल. अर्थात ग्रामीण, आदिवासी, अनुसूचित जाती जमाती, डोंगरांळ दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कॉलेजेस असावी. व्यवसाय, उद्योग, कौशल्य, व्यवहार उपयुक्ततेच्या दृष्टीने यांचा अभ्यासक्रम तयार केला जावा. त्याच भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. शिक्षकांच्या व कर्मचाऱ्याच्या पगारासाठी त्या त्या भागातील कराच्या रूपाने उत्पन्नाचा वाटा दिला जावा.

**(इ) बहुउद्देशिय महाविद्यालये:**

विना-अनुदानित ना-नफा-ना तोटा, या तत्वावरही सुरू करावी. याचा दर्जा निर्धारित करून दिला जावा. प्रवेश घेणारे विद्यार्थी शक्यतो निवासी असावेत. शिक्षण चालू असताना आकलनाच्या चाचण्या घ्याव्यात. इंटर्नशिप महत्वाची मानावी.

थोडक्यात असे म्हणता येईल की, उच्च शिक्षण हे महत्वाचे झाले आहे ते केवळ सरकारी, अनुदानित राहिले नसून खाजगी क्षेत्रातील संस्था, उच्च शिक्षण देण्यातचे काम करीत आहे. संपूर्ण खाजगीकरण हे कोणत्याही देशात शिक्षणासंदर्भात अस्तित्वात नाही. जपान, कोरिया, फिलपाईन्स, लॅटीनअमेरिका या देशांमध्ये खाजगी करण झाले आहे. आफ्रीका, युरोप, आशिया या देशात मिश्र शिक्षण पद्धती प्रचलीत आहेत. आपल्या देशात उच्च शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. शिकणाऱ्यांची संख्या वाढत आहे तेव्हा खाजगी क्षेत्रातील विना-अनुदानित उच्च शिक्षणाचे योगदान मान्य करावे लागेल.

उच्च शिक्षणाचे खाजगीकरण ही स्थिती आता भारतासारख्या देशात अटळ आहे, असे बोलले जाते. शिक्षणतज्ज्ञानी त्यास मान्यता दिलेली आहे. सरकारचीही मूक संमती आहे, नव्हे राज्यकर्त्यांच्या निर्णयाचाच हा भाग आहे. कारण सरकारची मान्यता असणे हे आवश्यक असल्याने व विद्यापीठांशी संलग्नताही अपरिहार्य असल्याने तेवढ्याच मर्यादा, त्यानुसार नियंत्रण ठेवण्याचा अधिकार अनुक्रम सरकार व विद्यापिठांनी राखून ठेवला आहे. खाजगी क्षेत्रातून शिक्षणात त्रुटी जाणवतात.

## ११ड.३ खाजगी क्षेत्रातील उच्च शिक्षणाचे धोके

उच्च शिक्षणात खाजगी शिक्षणसंस्थांना मान्यता देऊन सरकारने एक प्रकारे शिक्षण विस्तारास चालना दिली व शिक्षण घेणाऱ्यांचीही संख्यांहि वाढत आहे हे मान्य. मात्र त्या संस्थाच्या गुणवत्ता आणि प्रशासन यासंदर्भात काळजी करण्यासारखी स्थिती निर्माण होत आहे. काही शिक्षणसंस्था दर्जेदार व शैक्षणिक तत्त्वांचीच कास धरून कार्यरत आहेत, हे मान्य आहे.

उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणात दोन प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे.(१)सरकारी अनुदानावर चालणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था (२)स्वबळावर स्वतंत्रपणे वित्तीय तरतुदीवर म्हणजेच विनाअनुदान शिक्षण संस्था. अर्थात या दोन्हीही प्रकारातील शिक्षण संस्था विद्यापीठांशी सलग्न आहेत ॲकॅडमिक व्यवस्था त्यानुसार आहे.

विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या शैक्षणिक गुणवत्तेविषयी नेहमीच शंका व्यक्त केली जाते. ती सामाजिक मानसशास्त्रीय आहे. या संस्था व अनुदानित संस्था या दोहोंमध्ये सारखा अभ्यासक्रम, परीक्षाही एकाच देखरेख यंत्रणा व अधिकाराखाली घेणे आणि प्रथा, संकेत व नियमांमध्ये एकवाक्यता

अशी स्थिती आढळते. अर्थात, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचा स्वयंअर्थबळावर चालणाऱ्या संस्थांमध्ये प्रवेश हा बऱ्याच वेळा अडचणीचा व शैक्षणिक गुणवत्तेला बाधा आणणारा ठरतो हे मान्य विद्यार्थ्यांच्या अन्य प्रकारच्या सुप्त शक्ती, कलागुणांना, उपक्रमशिलतेला वाव मिळेल याची खात्री नसते अर्थात, सरकारी अनुदानावर चालणाऱ्या अनेक उच्चशिक्षण संस्थांमध्ये ती असतेच याची हमीही देता येत नाही. कारण नोकरदारांच्या नोकऱ्या कायम, संघटनांचे पाठबळ, 'पावती' काढून नोकरी मिळविल्याने संस्थाचालकांचा त्याच्यावरचा नैतिक वचक कमी, संस्थाप्रमुखांची वशिल्याने नेमणूक वा नातेवाईक परिचितांची राजकारणीच्या शब्दानुसार वर्णी आणि विद्यापीठाचे यथातथा नियंत्रण. कारण अशा कमिट्यांमधील सदस्यही कुलगुरू, कुलसचिर वा विशिष्ट संघ किंवा संघटनाच्या मर्जीतले, त्यांची तैनात 'वेगळ्याच' पद्धतीने केली की बस्स! असेही ऐकिवात आहे. म्हणजे सरकारी अनुदानावर चालणाऱ्या संस्थांचा कारभार शैक्षणिक मूल्यधिष्ठित, गुणवत्तेचा, शिस्त व स्वयंशिस्तीचा, शिक्षकांया उत्स्फूर्त सहभाग व साध्य-सिद्धतेचा, दर्जेदार पद्धतीने चालला आहे. असेही जसे ठामपणे म्हणणे आता कठीण झाले आहे. तसेच विनाअनुदानित सर्व उच्च शिक्षणसंस्था बेशिस्त, गैरकारभाराच्या, अशैक्षणिक, शिक्षकांची उदासीनता व अध्यापन-अध्ययनात कुचराई, अपुऱ्या शैक्षणिक सुविधा असलेल्या, पोल्ट्री वा अन्य शेडमध्ये भरणाऱ्या , गैरमार्गाने विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करून घेणाऱ्या असतातच असे नाही. उलट अशा काही संस्थामध्ये शिक्षकांवर वचक व शिस्तीचे पालन करण्यास भाग पाडणारी व्यवस्था, शिस्त, व्यक्तिगत मूल्ये, व्यावसायिक प्रशिक्षण आणि सामाजिक संवेदनशीलता-बांधिलकी अशाचे सुखद दर्शन घडते.

**वित्तीय प्रशासकीय स्वायत्तता:**

स्वायत्त शिक्षणसंस्था हा विचार तात्विकदृष्ट्या उचित व शिक्षणमूल्यांना धरून आहे. विशेषत: जेव्हा सरकार उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्यास असमर्थ अथवा तसा हस्तक्षेप व वित्तीय भार देण्याची गरज नाही. अशा खुलीकरण-खाजगीकरणाच्या विचाराचे असेल तर शिकणारांची गरज भागविण्यासाठी शिक्षणसंस्थांना खाजगीरित्या शिक्षण देण्याची मुभा दिली जाते.खरे तर ॲटानॉमस कॉलेजेस ही फक्त सरकारला आर्थिक बोजा नको आहे म्हणून दिली जातात कारण ती वेगळा व नवीन अभ्यासक्रम राबवत नाहीत. शिवाय शिक्षकांचे वेतन व अन्य हे सरकारच्या नियमानुसार म्हणजे युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनच्या निर्धारित श्रेणीनुसार दिले जाते. स्वायत्त कॉलेजेस संदर्भात शैक्षणिक संस्था म्हणून क्रांतीकारक व नाविन्यपूर्ण ठसा त्यांनी उमटविलेला नाही. त्या संस्थांमधून बाहेर पडणारे विद्यार्थी वा 'प्रॉडक्ट'हे सुद्धा नोकरी, व्यवसाय व अन्य संबंधित क्षेत्रात वेगळे नाव वा कामगिरी करताना दिसतातच असे नाही. कारण त्यांचीही मानसिकता रूळलेल्या वाटेने जाण्याची आणि लेबर मार्केटही त्यासच सरावलेले त्यामुळे पदवी व पदव्युत्तर डिग्री ही संलग्न विद्यापीठाच्या समकक्ष, समनाव व समकोर्सचीच राहिली आहे.

स्वायत्तता ही फक्त वित्तीय व अर्थविषयक आणि प्रशासन व व्यवस्थापनामध्ये स्वातंत्र्य उपभोगण्याची मुभा या अर्थाने सध्या तरी प्रचलित आहे. अर्थात, अनेकविध कोर्सेस, अल्प मुदतीचे कोर्सेस आणि संघटित उद्योगांची गरज लक्षात घेऊन परकीय उद्योग-व्यवस्थापन-प्रशासन जॉब अपॉर्च्युनिटीजच्या दृष्टीने निवड करून सुरू करण्याची सुविधा व स्वतंत्र निर्णय घेणे शक्य झाले आहे. त्या शक्यतेमुळे जी स्वायत्त महाविद्यालये वा शैक्षणिक संकुल (उदा.भारती विद्यापीठ, पुणे) आहेत त्यांनी तो प्रयत्न यशस्वीपणे चालू ठेवला आहे यशस्वी व अर्थवाही अशा रितीने ही संकुले गतिमान व्हायला हवीत. तसा प्रयत्न चालू आहे. अनेक विद्यार्थी परदेशात आपल्या गुणवत्तेवर जॉब मिळवून स्थिरावताहेत.

**मर्यादा दोनही पद्धतीच्या:**

सरकारी अनुदानावर चालणाऱ्या खाजगी शिक्षण संस्थामधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम स्थानिक, प्रादेशिक किंवा राष्ट्रीय महत्वकांक्षेला अनूसरून नाही. दुसरी मर्यादा म्हणजे जुन्या पद्धतीचेच शिक्षण, विषय चालू आहेत व जे थोडेफार बदल होताहेत ते तुकड्या तुकड्याच्या स्वरूपात व पर्यायी ऐच्छिक विषय म्हणूनच व काही विशिष्ट महाविद्यालयांमध्ये ती सुविधा कशीबशी असते. तिसरे म्हणजे जो विषय अथवा अभ्यासक्रम एवढेच काय पण शिक्षण कोर्स पूर्वी सूरू केलेला असेल व व्याख्यात्यांची नेमणूक होऊन ते कायम झाले असतील आणि होतातही असे कोर्सेसही कालबाह्य ठरले तरी सुरू ठेवणे व्यवस्थापनाला भाग पडते. पण विद्यार्थ्यांना रस व त्याचा ओढा असत नाही. चौथे म्हणजे अनुदान हे वेतनासाठी व वेतनेवर म्हणून सरकारकडून दिले जाते. पण वेतन अनुदानासही हल्ली विलंब होत आहे त्यामुळे व्याख्यात्यांचे पगार अनियमित होत आहेत. वेतनेवर अनुदान तर फारच विलंबाने व शैक्षणिक वर्ष संपल्यानंतरच बहुधा ई.बी.सी च्या रकमा येतात. पाचव्या वेतन अयोगानुसार वेतन मजुंरी व देयके सुरू झाली व एकूणच उच्च शिक्षणाच्या वेतन व वेतनेतर अनुदानास विलंब, दिरंगाईने घेरले आहे जणू. ही मर्यादा फार चिंताजनक आहे. कारण शिकविण्याऱ्यांवर टांगती तलवारच जणू. प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन, ग्रॅच्युईटी वगैरेबाबत नवनवीन सरकारी जी.आर.निघत असून त्यामुळे शैक्षणिक वातावरणात गढूळ झाले आहे. पाचवी मर्यादा म्हणजे याही क्षेत्रात कंत्राटी असाच शब्द वापरता येणार नाही. पण तशाच'तासिका' आधारावर शिक्षक नेमणेकच सूरू आहे. सहावी मर्यादा म्हणजे सरकार उच्च शिक्षणावर खर्च करू इच्छित नाही. कारण आर्थिक टंचाईग्रस्त स्थितीमुळे व इच्छाही नाही. केन्द्र सरकार अजूनही याबाबत सकारात्मक भूमिका घेत आहे. पण २०टक्के रक्कमेची जबाबदारी घेणारी राज्ये सरकारे आर्थिक अडचणीमुळे वा अन्य कारणाने मागे राहत आहे.

सरकारी अनुदानाशिवाय चालणाऱ्या खाजगी शिक्षणसंस्थांच्या मर्यादा जाणवतात. किंबहुना, अनिष्ठ व अवैध प्रकारांनी घेरलेल्या आहेत. काही उपद्रवमूल्य जे सामाजिक व शैक्षणिक बाबतीत दाखवत आहेत तर काही अगदी खालच्या दर्जाच्या आहेत. मात्र काही स्वयं-अर्थ-भार उचलणाऱ्या सेल्फ फायनान्सिंग संस्था याला अपवाद आहेत हे नक्कीच. तरीही या वित्त वा निधी स्वतः उभारून चालणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या मर्यादा खूप आहेत. पहिले म्हणजे महाविद्यालये काढून शैक्षणिक प्रगतीचे उच्च ध्येय बाजूला ठेवून केवळ व्यापारी तत्त्वावर ती चालविली जातात आणि नफा मिळविण्यास प्राधान्य दिले जाते. कॅपिटेशन व मोठी फी घेऊन प्रवेश देण्याची पद्धती ही सुद्धा दुसरी मोठी त्रुटी आहे. खरे तर शिक्षण हे समानता व सामाजिक न्यायासाठी आणि भारतीय घटनेतील सेक्यूलर आणि सोशल उद्दिष्टे साध्य करण्याचे साधन आहे पण तो हेतू साध्य होतोच असे नाही.

तिसरा मुद्दा म्हणजे खाजगी विनाअुनदानित महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना वेतनही नियमानुसार व वेतनश्रेणीने दिले जाताना आढळत नाही. काही महाविद्यालये अपवाद आहेत. शिक्षकांचे आर्थिक शोषण केले जाते. त्याबाबत शिक्षक संघटनाही उदासीन आणि विद्यापीठेही निष्क्रीय आहेत, असाही अनुभव आहे.

चौथा मुद्दा म्हणजे उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये आर्थिक सत्तांची केन्द्रे आणि राजकीय गटाचा वरचष्माही आढळतो. अर्थात- कमी-जास्त प्रमाणात तरी कधी उघड वा छुपे असे हे दोष आढळतात. सगळीच महाविद्यालये टाकाऊ आहेत व राजकारणाचे अड्डे आणि शोषणची केंद्रे आहेत असे तर मुळीच नाही. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांची सोय हा महत्वाचा उपयुक्ततेचा भाग आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. शिवाय अशी सेल्फ फायनान्सिंग कॉलेजेस ही तर रीतसर आणि संबंधित विद्यापीठांची स्क्रूटीनी कमिटी जाऊन पाहणी करून त्या रिपोर्टआधारे चालू झालेली आहे. सरकारची मान्यता व विद्यापीठांची मंजुरी घेऊनच या संस्था अस्तित्वात आल्या आहेत. शिवाय वेळोवेळी संलग्नीकरण

'रिन्यू' अथवा पुढील वर्षासाठी चालू ठेवण्यासाठीही समिती नेमली जाते. ती कमिटी प्रत्यक्ष भेट देऊन माहीती घेऊन संस्थाचालक- संस्थाप्रमुख आणि अधिव्याख्यात्यांशी चर्चा करून माहितीचा विहित फॉर्म वा फॉर्मसही भरून महाविद्यालय चालू ठेवावे याबद्दलचा रिमार्क देतात. त्या निर्णय व अहवालानुसार ही महाविद्यालये चालू आहेत सध्या २००१ साली महाराष्ट्र शासनाने २९ विनाअनुदानित महाविद्यालयांना परवानगी दिलीय. तेव्हा विद्यापीठे व सरकार यांच्या नियंत्रणातच त्रुटी आहेत की काय, ज्यामूळे या संस्था असामाजिक आणि अशैक्षणिक वाटचाल करताहेत.

★★★

# संदर्भ सूची

**मराठी:**


१. गद्रे नीता, गद्रे ल.श.(१९७७), 'शिक्षणाचा इतिहास भाग - २' पुणे : नूतन प्रकाशन.

२. दुनाखे अरविंद (१९९८), 'प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान' पुणेः नूतन प्रकाशन.

३. घोरमडे के.यू.घोरमडे कला (२००६), 'भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान,' नागपूर : विद्या प्रकाशन.

४. कायदे-पाटील गंगाधर (२००७), 'भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या', नाशिकः चैतन्य पब्लिकेशन्स.

५. जाधव मोहन, भोसले आरती, सरपोतदार प्राची (२००७) 'भारतीय शिक्षणाचा विकास' कोल्हापूर : फडके प्रकाशन.

६. बनकर अनिल, शिंदे बी.डी. गायकवाड के.एस.(२०१०)'मध्ययुगीन भारताचा इतिहास' मुंबई : दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ.

७. वशिष्ठ विजेंद्र कुमार (२००९),'भारतीय शिक्षाका इतिहास' नई दिल्ली : अर्जुन पब्लिशिंग हाऊस.

८. जौहरी, पाठक (१९९१), 'भारतीय शिक्षाका इतिहास' आगराः विनोद पुस्तक मंदिर

९. भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास - बन्सीबिहारी पंडित, डॉ. आरती सपकाळे, लता- - - - मोरे.

१०. भारतीय शिक्षणाचा इतिहास - डॉ. गणेश शेटकर, डॉ. शारदा शेवतेकर, डॉ. शोभना जोशी.

११. भारतीय शिक्षण व्यवस्थेचा विकास - डॉ. अनंत चौधरी.

१२. भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या - डॉ. मीनल नरवणे, नित्य नूतन प्रकाशन.

१३. भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण - डॉ. आनंद वास्कर, डॉ. पुष्पा वास्कर, नित्य नूतन प्रकाशन.

१४. भारतीय शिक्षणाचा इतिहास - डॉ. गणेश शेटकर, डॉ. शारदा शेवतेकर, डॉ. शोभना जोशी (मृण्मयी प्रकाशन).

१५. पारसनीस न. व. (२००५) शिक्षणाची तात्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका, पुणे, नुतन प्रकाशन.

१६. देशपांडे के. ना. व माळी आ.ळा. (२००६) भारतीय शिक्षणाचा इतिहास प्राचीन भारतीय शिक्षण, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

१७. डॉ. गणेश शेटकर, डॉ. शारदा शेवतेकर, डॉ. शोभना जोशी, भारतीय शिक्षणाचा इतिहास,मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद २००३.

१८. डॉ. शारदा शेवतेकर, मदन निकुमे, स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षणाचा इतिहास आणि शिक्षणाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपुर २००५.

१९. मीनल नरवणे, भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, २ आ, नुतन प्रकाशन, पुणे - २००५.

२०. किरण नागतोडे, भारतीय शिक्षण पद्धतीचा विकास, विद्या प्रकाशन, नागपुर २००७.

२१. गाजरे रा. वि., शिक्षणाचे अधिष्ठान, नित्यनुतन प्रकाशन, पुणे - २००७.

२२. शोभा चौधरी, शालेय कामकाजाचे अधिष्ठान आणि शिक्षणाची विशेष क्षेत्रे, व्यंकटेश प्रकाशन, जळगाव - २००८.

२३. के.यू.घोरमडे, कला घोरमडे,'भारतातील शैक्षणिक संघटन व प्रकाशन, विद्या प्रकाशन, नागपूर : २०१०

२४. किरण नागतोडे, शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह, विद्या प्रकाशन, नागपूर : १९९७.

**इंग्रजी:**

1. Dash B.N. (2003) History of Education in India, Delhi, Dominant Publishers and Distributors.

2. P. Annie Amala, P. Anupama, D. Bhaskara Rao (2004) History of Education, New Delhi. Discovery Publishing House.

3. Syed M.H. (2006) Encyclopaedia of India Education, New Delhi. Anmol Publication Pvt. Ltd.

4. Tara Chand (2004) Development of Education System in India, Delhi Anmol Publication Pvt. Ltd.

5. Report on National Knowledge Commission (2005) Govt. of India, New Delhi.

6. Rawat .P.(1965), "History of Education" Agra : Ramprasad and Son's.

7. Mukharji S.N.(1995) "History of Education In india" Baroda : Acharya Book Depot.

◆ ◆ ◆